टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे

इतिहास विभाग

तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील

विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी सादर

करण्यात आलेला शोधनिबंध

विषय

''लोकमान्य टिळकांचे राजकारण आणि महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळ : एक अभ्यास'' (१८८१ ते १९२०)


संशोधक

श्रीपाद भालचंद्र उंडे

मार्गदर्शक

डॉ.एस.आर.शेंडे


ऑगस्ट २०१४

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे

इतिहास विभाग

तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील

विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी सादर

करण्यात आलेला शोधनिबंध

विषय

‘‘लोकमान्य टिळकांचे राजकारण आणि महाराष्ट्रातील सांस्कृतिक

चळवळ : एक अभ्यास’’ (१८८१ ते १९२०)

ऑगस्ट २०१४

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या इतिहास पदव्युत्तर विभाग, तात्त्विक, सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयाच्या पीएच.डी. (विद्यावाचस्पती) या पदवीसाठी **श्री. श्रीपाद भालचंद्र उंडे** यांनी **''लोकमान्य टिळकांचे राजकारण आणि महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळ, एक अभ्यास''. (१८८१ ते १९२०)** या विषयावरील शोधनिबंधाचे काम माझे मार्गदर्शनाखालील पूर्ण केलेले आहे.

सदर शोधनिबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझे माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही.

पुणे

दि.

संशोधक मार्गदर्शक

**(डॉ.एस.आर.शेंडे)**

# प्रतिज्ञापत्र

मी **श्रीपाद भालचंद्र उंडे,** टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे असे घोषित करतो की,**''लोकमान्य टिळकांचे राजकारण आणि महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळ : एक अभ्यास'' (१८८१ ते १९२०)''** या विषयावरील संशोधन डॉ.एस.आर.शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण केलेला आहे.

पीएच.डी. (इतिहास) पदवी प्राप्त करण्याकरता हा संशोधन प्रबंध टि.म.वि. सविनय सादर करण्यात येत आहे. हा संशोधन प्रबंध मी स्वप्रयत्नाने पूर्ण केलेला आहे. उपलब्ध माहिती सत्य असून ती अदययावत आहे व योग्य त्या ठिकाणी संदर्भ दिलेले आहेत असे मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो.

स्थळ :

दिनांक

संशोधक विद्यार्थी

**(श्रीपाद भालचंद्र उंडे)**

# ऋणनिर्देश

सदर प्रबंधाचे लेखन करताना अनेकांचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या मोलाचे सहकार्य लाभले. त्यांचे ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य मानतो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू श्री.डॉ.दिपक टिळक, रजिस्ट्रर श्री. उमेश केसकर, इतिहास विभागप्रमुख डॉ. संध्या पंडीत, सामाजिक शास्त्र विभागाचे अधिष्ठाता श्री.विजय कारेकर सर, अधिष्ठाता श्री. डॉ. श्रीकांत कार्लेकर सर, पुणे विद्यापीठाच्या डॉ. श्रध्दा कुंभोजकर मॅडम, डॉ. दिपक देशपांडे सर, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ग्रंथपाल व त्यांचे सर्व सहकारी, सेवक वर्ग, केसरी मराठा ट्रस्टचे ग्रंथालय, भारत इतिहास संशोधक मंडळाचे सचिव डॉ.भावे सर, फर्ग्युसन कॉलजेचे ग्रंथालय, गोखले हॉल ग्रंथालय, स.प.महाविद्यालय पुणे येथील ग्रंथालय, तसेच कविवर्य मोरोपंत वाचनालय नगरपरिषद बारामती, तसेच भारत इतिहास संशोधक मंडळातील श्री.मंदार लवाटे यांचे मला मोलाचे सहकार्य मिळाले त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

सदर प्रबंध सादर करताना माझे संशोधन मार्गदर्शक डॉ.एस.आर. शेंडे, विभागप्रमुख इतिहास विभाग स.प.महाविद्यालय पुणे, यांचे अतिशय बहुमोल असे मार्गदर्शन लाभले त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. माझ्या कुटुंबातील सर्व सदस्य व मित्र परिवार यांनी दिलेली प्रेरणा व सहकार्य याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. सदर प्रबंध टायपिंगचे काम सौ. चारूशीला कुलकर्णी यांनी केले त्याबद्दल त्यांचा देखील मी अत्यंत आभारी आहे.

# अनुक्रमाणिका


| अ.न. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र |
| --- | --- | --- |
| १ | प्रस्तावना. | १ ते २० |
| २ | १९ व्या शतकातील सांस्कृतिक व राजकीय जीवन. | २१ ते ४७ |
| ३ | टिळककालीन सांस्कृतिक व राजकीय जीवन. | ४८ ते ८२ |
| ४ | लोकमान्य टिळकांचे राजकारण आणि महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळीचे अनुबंध. | ८३ ते १६४ |
| ५ | लोकमान्य टिळकांच्या विचार व कार्यावरील प्रतिक्रिया. | १६५ ते १९७ |
| ६ | उपसंहार. | १९८ ते २०८ |
| ७ | संदर्भसूची | २०९ ते २१८ |
| | परिशिष्ट क्र. १ ते १० | २१९ ते २९० |

# प्रकरण १ ले

# प्रस्तावना

**प्रस्तावना**

लोकमान्य टिळक भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील प्रभावी नेते होते. त्यांनी स्वतंत्र्य ग्रंथ लेखनाव्दारे व केसरी मराठा वृत्तपत्रांच्या माध्यमातून आपले विचार समाजापर्यंत पोचविले. लोकमान्य टिळकांचे विचार व कार्य यावर तत्कालीन व विद्यमान विचारवंतांनी निरनिराळया स्वरूपाचे लेखन केलेले आहे. परंतु लोकमान्य टिळकांनी भारतीय स्वातंत्र्यआंदोलनात महाराष्ट्रातील विविध सांस्कृतिक घटकांच्या आपल्या राजकीय विचार व चळवळीसाठी उपयोग करून घेतला व लोकमान्य टिळकांचे राजकारण आणि महाराष्ट्रातील संस्कृतील चळवळीचे काय? व कसे अनुबंध होते. हा पैलु विचारात घेवून विशेष अभ्यास झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे ''लोकमान्य टिळकांचे राजकारण आणि महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळ: एक अभ्यास (१८८१ ते १९२०)'' या विषयावर संशोधनासाठी उपलब्ध प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे संशोधन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधन विषयाचे महत्व (Rational and significance of the study)**

सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळ आणि उपक्रम लोकांच्या प्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम आहे. कुठलीही विधायक कल्पना किंवा सुधारणा या माध्यमातुन लोकांना सुलभतेने समजावता येतात आणि पटविता येतात, कारण त्या त्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असतात आणि सामाजिक व सांस्कृतिक संकेतांशी निकट असतात. १८८१ ते १९२० हा प्रस्तुतचा कालखंड देशप्रेमाने भारावलेला कालखंड आहे. १९ वे शतक हे भारतीयांच्या जीवनातील एक अत्यंत महत्वाचे पर्व, प्रबोधन

काळ होय. त्याकाळात लोकजीवनावर पारंपारिक धर्माचा प्रभाव होता. याचा तत्कालीन लोकजीवनाशी अत्यंत महत्वाचा संबंध होता. त्यानंतरच्या काळामध्ये आपल्याला परंपरा व आधुनिकता असा संघर्ष आपणांस दिसून येतो. याकाळात महाराष्ट्रातल्या अनेक विचारवंतांनी आधुनिकतेचे विचार मांडलेले आपणांस दिसून येतात. या काळातला इतर समाज अशिक्षित, आडाणी आहे. तर तरूण शिक्षित देशप्रेमाने भारावलेला आहे. आडाणी लोकांना त्यांच्या भाषेत समजावून सांगण्यासाठी लोकमान्य टिळकांनी गणशोत्सव, गणेशोत्सावाचे एक अंग मेळे, शिवाजीउत्सव, रामदासनवमी, दसरा, कीर्तन, प्रवचन, नाटक, भाषणे इत्यादी विविध सांस्कृतिक घटकांचा आपल्या राजकीय प्रचार, प्रसारासाठी लोकमतजागृतीसाठी खुबीने, कौशल्यपुर्ण उपयोग केला. त्याचबरोबर लोकमान्य टिळकांनी भारतीय राजकारणाची आणि स्वातंत्र्याची जी मांडणी केली ती हिंदू तत्वज्ञानाच्या व विशेषत: वेदान्ताच्या परिभाषेत केली त्यामुळे ती अधिक प्रभावी ठरली. उदा. लोकमान्यांनी लिहिलेले 'गीतारहस्य', टिळकांनी ज्याला लक्ष्य करून उद्‌देशून आणि ज्याच्यासाठी 'गीतारहस्य' लिहिले. तो महाराष्ट्रातील तत्कालीन सुशिक्षित वर्ग होता. तो दोन प्रकारचा होता. एक सनातनी आणि दुसरा सुधारक. सनातनी म्हणजे पारंपरिक संस्कृत शास्त्री पंडितांचा वर्ग गीतेच्या शंकराचार्यकृत कर्मसंन्यासपर अर्थाला प्रमाण मानून आपली लौकीक कर्तव्ये टाळणारा होता. तर आधुनिक नवशिक्षित सुधारक वर्ग हा आपल्या प्राचीन पंरपरेविषयी तुच्छताबुध्दी बाळगून पाश्चात्य तेवढे चांगले व अनुकरणीय असे समजून मिल आणि स्पेन्सर यांना अनुसरून उपयुक्ततावादाचा अंगीकार करणारा होता. लोकमान्य टिळकांच्या या मांडणीचा हा दृष्टिकोन अभ्यासणे, त्याचबरोबर लोकमान्य टिळकांच्या राजकीय चळवळीचे अनुबंध समाजजीवनाशी सांस्कृतिक जीवनाशी जोडलेले होते. हयाचादेखील विश्लेषणात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न या

विषयातून होऊ शकेल म्हणून हा विषय मी निवडला आहे. माझ्या एम. फिल च्या संशोधनात यातील काही संदर्भ आलेले आहेत, त्याचा विश्लेषणात्मक अभ्यास यातून होऊ शकेल म्हणून देखील या विषयाची निवड मी केली आहे.

## संशोधन विषयाचा कालावधी

''लोकमान्य टिळकांचे राजकारण आणि महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळ:एक अभ्यास ( १८८१ ते १९२०)'' हा संशोधनाचा विषय आहे. या विषयाचा अभ्यास करताना १९ व्या व २० व्या शतकातील महाराष्ट्रातील टिळकपूर्वकालीन व टिळककालीन सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय घडामोडींची त्यांचा परस्परांशी असलेला संबंध व लोकमान्य टिळकांच्या राजकीय चळवळीचे सांस्कृतिक अनुबंध यांची सविस्तर माहिती घेण्यात आली आहे.

## संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा

सदर संशोधनामध्ये १९ व्या व २० व्या शतकातील महाराष्ट्रातील टिळकपूर्वकालीन व टिळककालीन सांस्कृतिक जीवन कसे होते. या काळातील लोकजीवनावर धर्माचा प्रभाव या दोन शतकामध्ये कसा होता. संस्कृती, सण, व्रतवैकल्ले, परंपरा, रूढी विविध प्रकारच्या कला, भजन, किर्तन इत्यादी कला यांचा लोकजीवनाची असणारा संबंध यांची माहिती घ्यावी लागली आहे. त्याचबरोबर १९ वे शतक हे प्रबोधनाचे शतकदेखील मानले जाते. या काळात पाश्चात शिक्षणामुळे आधुनिकतेचे विचार मांडले जात होते. त्यामुळे एक प्रकारचा सांस्कृतिक संघर्ष या कालावधीत दिसून येतो. त्यामुळे या काळातील विविध विचारवंत लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर, विष्णुशास्त्री चिपळूकर, आगरकर,

भांडारकर, गोखले, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, इत्यादींच्या विचारांची व कार्याची माहिती, त्याचा समाजावर झालेला परिणाम इत्यादींची माहिती घ्यावी लागते. त्याचबरोबर बिटिशांच्या प्रभावाचे परिणाम, शिक्षण, धर्मावर इत्यादी महिती घ्यावी लागलेली आहे.

१९ व्या व २० व्या शतकामध्ये धर्म व समाज जागृती झाली. समाज व धर्म जागृतीसाठी काम करणाऱ्या अनेक संस्था स्थापन झाल्या त्यांचे कार्य व परिणाम यांची देखील माहिती घेतलेली आहे.

त्याचबरोबर लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्य आंदोलनाला चालना देण्यासाठी विविध उपक्रमांचा कल्पकतेने वापर करून एक जनआंदोलन उभे केले त्यासाठी त्यांनी गणेशोत्सव, मेळे, भजन, कीर्तन, प्रवचन, यात्रा, उत्सव सत्पुरूष इत्यादी सांस्कृतिक घटकांचा वापर कसा केला या बाबींची माहिती घेण्याचा प्रयत्न केला आहे.

त्याचबरोबर १९ व्या व २० व्या शतकामधील टिळकपूर्वकालीन व टिळककालीन महाराष्ट्रातील राजकारण कसे होते. त्याकाळात राजकीय प्रचार, प्रसारासाठी विविध संस्थांची रचना झालेली दिसून येते. त्यांची माहिती संशोधनातून घेतलेली आहे. विविध वर्तमानपत्रांचे कार्य, विविध राजकीय विचार, रानडयांचे राजकीय, आर्थिक विचार व त्यांचे कार्य, आर्थिक राष्ट्रवाद इत्यादींची माहिती घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

भारतीय स्वातंत्र्याचे आंदोलन उभे करताना लोकमान्यांनी जे सर्वसामान्यांसाठी राजकारण केले, त्यांचे सुत्र काय होते. त्याचबरोबर लोकमान्य टिळकांनी विविध सांस्कृतीक घटकांचा वापर, लोकमत जागृतीसाठी, संघटीत करण्यासाठी केला. त्यांचे विविध लिखित वाडमय, भाषणे इत्यादींचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करून लोकमान्य टिळकांच्या राजकीय चळवळीचा सांस्कृतिक अनुबंध याच्या आधारे मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे (Aims & Objective)

१) १९, २० व्या शतकातील टिळकपूर्वकालीन व टिळककालीन महाराष्ट्रातील सांस्कृतिक व राजकीय जीवनाच्या अनुबंधाचा शोध घेणे.

२) सांस्कृतिक जीवनाचा आढावा घेवून त्यावरील राजकीय प्रभावाचा मागोवा घेणे.

३) लोकमान्य टिळकांनी महाराष्ट्रातील सांस्कृतिक घटकांचा आपल्या राजकीय विचार व चळवळीसाठी कसा उपयोग करून घेतला याचा उपलब्ध साधनांच्या आधारे शोध घेणे.

## संशोधनाची गृहितके (Hypothesis)

१) १९ व्या/२० व्या शतकातील टिळकपूर्वकालीन व टिळककालीन महाराष्ट्राच्या लोकजीवनात कीर्तन, भजन, धार्मिक - उत्सव, नाटय, गायन, अभिनय इत्यादींना महत्व होते.

२) लोकमान्य टिळकांनी आपल्या राजकीय चळवळीसाठी निरनिराळया सांस्कृतिक घटकांचा उपयोग करून घेतला.

३) महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय जीवनावर सांस्कृतिक घडामोडींचा प्रभाव होता.

## संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन (Review of Literature)

न.चिं.केळकरांनी ‘लोकमान्य टिळकांचे चरित्र खंड क्रमांक १ ते ३’ लिहिलेले आहे. त्याचबरोबर ‘लोकमान्य टिळकांचे केसरीतील लेख भाग १’, ‘लोकमान्य टिळकांची धर्म विषयक मते’ इत्यादी ग्रंथ प्रसिध्द झाले आहेत.स.वि.बापटांनी ‘लोकमान्य टिळकांच्या आठवणी व आख्यायिका खंड क्रमांक १ ते ३’ संग्रहीत केल्या आहेत. त्याचबरोबर केसरी मराठा ट्रस्टने समग्र ‘लोकमान्य टिळक वाडमय खंड क्र. १ ते ७’ प्रसिध्द केलेले

आहेत. त्याचबरोबर लोकमान्य टिळकांचे विविध विषयांवरील धोरण 'केसरीप्रबोध' या ग्रंथामधून दिसून येते. विव्दांस म.धो. यांनी संपादित केलेला 'लोकमान्य टिळकांची पत्रे' या ग्रंथावरून लोकमान्य टिळकांनी इतरांना व त्यांना आलेल्या पत्रांचां संदर्भ आपणांस मिळतो. त्याचबरोबर लोकमान्य टिळकांचे 'श्रीमद्‌भगवद्‌गीतारहस्य' केसरी मुद्रणालयाने प्रसिध्द केलेले आहे.

त्याचबरोबर भा.कृ.केळकरांनी 'टिळक विचार' हे पुस्तक लिहिलेले आहे. ज.स.कंरदीकरांनी 'गणेशोत्सवाची साठ वर्षे' हे पुस्तक लिहिले आहे. त्याचबरोबर ना.गो.जोगांनी 'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक' हे टिळक विचार सांगणारे पुस्तक लिहिलेले आहे. शं.द.जावडेकर यांनी लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांचे विचार सांगणारे 'लोकमान्य टिळक व महात्मा गांधी' हे पुस्तक लिहिलेले आहे. ग.प्र.प्रधान यांनी 'लोकमान्य टिळक' हा ग्रंथ लिहिलेला आहे. न.रा.फाटकांनी 'लोकमान्य' हा ग्रंथ लिहिला. सदानंद मोऱ्यांनी 'लोकमान्य ते महात्मा खंड १ व २' हे ग्रंथ लिहिलेले आहेत. त्याचबरोबर ए.के.भागवत व जी.पी.प्रधान यांनी 'Lokmanaya Tilak A Biography' हा ग्रंथ लिहिला आहे. त्याचबरोबर जे.व्ही.नाईक यांनी 'British Secrete official View regarding Lokmanya Tilak & Gita Rahasya' हा ग्रंथ लिहिला आहे.

## <u>पूर्वसंशोधन</u>

१. उंडे श्रीपाद भालचंद्र, '' लोकमान्य टिळकांच्या राजकीय विचारांची धार्मिक पार्श्वभूमी : एक अभ्यास, एम. फिल. अप्रकाशित प्रबंध मार्च २००९ टि.म.वि. पुणे.

२. धर्माधिकारी अविनाश, : " Tilak philosophy of History" एम फिल. अप्रकाशित प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे १९८३.

३. पाटील सुरेश गोपाळ,''राष्ट्रीय प्रबोधनात शिवजयंती व गणेश उत्सवाचे योगदान,' एम.फिल अप्रकाशित प्रबंध, टि.म.वि. पुणे २०००.

४. पाटील सुरेश गोपाळ, ''लोकमान्य टिळकांचे राष्ट्रवादी विचार आणि त्याचा भारतीय राष्ट्रीय चळवळीतील प्रयोगाचा इतिहास'' प्रकाशित Ph.D. प्रबंध, टि.म.वि. पुणे जाने २००९.

५. विद्यासागर ए. एस. ' केसरी वृत्तपत्राचे भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील योगदान' (१८८१ – १९२०) अप्रकाशित Ph.D. प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, जाने २००२.

६. ठिपसे प्रतिभा, 'लोकमान्य टिळक आणि प्रा.आगरकर यांच्या विचारप्रणालीचे तात्वीक अधिष्ठानाचा एक तौलानिक अभ्यास, अप्रकाशित, Ph.D. प्रबंध, टि.म.वि. पुणे जाने १९९८.

**संशोधन पध्दती (Research Methodlogy and techniques to be used)**

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा अवलंब केलेला आहे. प्रस्तुत संशोधनाच्या पाठीशी असलेल्या सैध्दांतिक संकल्पना स्पष्ट करण्यासाठी चिकित्सात्मक, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतींचा वापर केलेला आहे. विविध समस्यांचे अन्वयार्थ सांगण्यासाठी योग्य त्या ठिकाणी तळटिपा दिलेल्या आहेत.

या संशोधनासाठी समकालीन व्यक्तींची चरित्रे, समकालीन अहवाल, समकालीन वृत्तपत्रे, शासकीय अधिकाऱ्यांचे लेखन व अहवाल, पत्रे, संस्थांचे अहवाल, पत्रिके, मासिके, हस्तलिखिते, चरित्रग्रंथ, आत्मवृत्ते, छायाचित्रे इत्यादी साधनांचा वापर केलेला आहे.

सदर संशोधनासाठी भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, शासकीय विभागीय ग्रंथालय विश्रामबागवाडा पुणे, गोखले हॉल ग्रंथालय

लक्ष्मी रोड पुणे, टिळक स्मारक ट्रस्ट चे संग्रहालय व ग्रंथालय, गायकवाड वाडा पुणे, टि. म. वि. गुलटेकडी येथील ग्रंथालय, स.प. महाविद्यालय पुणे येथील ग्रंथालय, फर्ग्युसन महाविद्यालयाचे ग्रंथालय, शासकीय पुराभिलेखागार मुंबई, कविवर्य मोरोपंत वाचनालय बारामती, इत्यादी संस्थांना भेटी देवून संशोधन साधने संकलित केलेली आहेत.

**संशोधन करीत असताना खालील संशोधनाच्या पायऱ्यांचा वापर केला.**

1) Formulation of research Problem
2) Formation of hypotheses
3) Making a research design
4) Data collection
5) Data verification using internal and external criticisam.
6) Data analysis
7) Interpretion and concluding processes
8) Report writing

**साधने**

प्राथमिक साधनांमध्ये गीतारहस्यचे हस्तलिखित, लोकमान्य टिळकांनी विष्णुसहस्त्रनामासंबंधित लिहिलेली १० पानी प्रस्तावनेचे टिपण, त्याचबरोबर १८९६ साली दामोदर चाफेकरांनी छापलेला व प्रसिध्द केलेला मेळा, त्याचबरोबर ‘ज्ञानप्रकाश’ सप्टें १९०९ चा अंक, ‘सहयाद्री’ जून १९३९चा अंक, ‘सहयाद्री’ जाने १९४२ चा अंक,सहयाद्री ऑ १९४१ चा अंक, सहयाद्री लोकमान्य टिळक विशेषांक ऑ. १९३५ चा अंक, चित्रमयजगत जुलै १९२० चा अंक, चित्रमयजगत जाने १९३५ चा अंक, चित्रमयजगत सप्टेंबर १९२२ चा अंक, चित्रमयजगत ऑगस्ट १९१५ चा अंक, मुमुक्षु २६ सप्टेंबर १९०७ चा अंक, मुमुक्षु १७ सप्टें १९०८ चा अंक, वार्तनिधी २७ एप्रिल १८८९, चा अंक, ८ ऑगस्ट १९२० चा

लोकसंग्रहचा अंक, इत्यादी नियतकालीकांचा व हस्तलिखितांचा प्राथमिक अप्रकाशित साधने म्हणून वापर केला आहे. प्राथमिक प्रकाशित साधनामध्ये केसरीमराठा ट्रस्टने प्रकाशित केलेली सी.डी. ''लोकमान्य टिळकांचा'' सन १९१५ च्या गणपती उत्सवांतील आवाज याचा वापर केला आहे. त्याचबरोबर लोकमान्य टिळकांनी विश्वनाथशास्त्री कबाडे सांगली यांना दि. १० ऑगस्ट १९१५ रोजी लिहिलेल्या पत्राचा देखील वापर केलेला आहे. त्याचबरोबर 'केसरी मुद्रणालयाने' प्रकाशित केलेले 'केसरी शताब्दी सूची' खंड १, 'केसरी प्रबोध', केसरी १८८१ ते १९८१. (वैचारिक संदर्भ आणि वाटचाल), लोकमान्य टिळकांचे केसरीतील लेख भाग — ४, ओरायन, श्रीमद्भगवतगीतारहस्य, समग्र लोकमान्य टिळक खंड १ ते ७ इत्यादी. एवढया प्राथमिक प्रकाशित साधनांचा विशेष संदर्भ म्हणून वापर केलेला आहे.

त्याचबरोबर अभ्यास काळाशी संबंधित दुय्यम साधनांमध्ये, लोकमान्य टिळकांच्या आठवणी व आख्ययिका खंड १ ते ३, यांचा वापर केलेला आहे. त्याचबरोबर न.चि.केळकरांनी लिहिलेले टिळक चरित्र खंड क्र. १,२,३ यांचाही वापर केलेला आहे. त्याचबरोबर 'लोकमान्य टिळकांची धर्मबुध्दी व धर्मविषयक मते' हा न.चि. केळकरांच्या ग्रंथाचा वापर केलेला आहे.शं.द.जावडेकर यांचे 'आधुनिक भारत', भा.कृ. केळकर लिखित 'टिळक विचार', ग.प्र. प्रधानांचे, 'लोकमान्य टिळक', तर्कतीर्थ जोशी लेखसंग्रह,खंड क्र.१, य.दि.फडक्यांचे, 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड क्र. १,' अबीद हुसेन यांचे 'भारताची राष्ट्रीय संस्कृती', राजा दिक्षित यांचे 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र': मध्यमवर्गाचा उदय, नी.वी.सोवनी यांचे एकोणीसाव्या शतकातील महाराष्ट्रातील तथाकथित प्रबोधनाचे स्वरूप, भास्कर भोळे यांचे 'एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य खंड २, बनहटटी यांचे, 'टिळक आणि आगरकर', शंकर दाते यांचे 'लोकमान्य टिळकांचे

पुण्यस्मरण कार्य व तत्वज्ञान, प्रमोद ओक यांचे एलफिन्स्टन, मुंबईचा गवर्नर, 'सदानंद मोरे यांचे 'लोकमान्य ते महात्मा खंड १ व २' व 'कर्मयोगी लोकमान्य' (चिकित्सक आकलन), चंद्रकांत घोरपडे यांचे, 'गणोशोत्सवाची १०० वर्षे', त्याचबरोबर शांता कोठेकरांचे इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, व शकुंतला क्षिरसागरांचे प्रबंधलेखनाची पध्दती व विवेक पाटकरांचे, 'संशोधन मार्गावरील प्रवास' या दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे.

## प्रकरण विभागणी

| क्रमांक | प्रकरणाचे नाव |
|---|---|
| १ | प्रस्तावना. |
| २ | १९ व्या शतकातील सांस्कृतिक व राजकीय जीवन. |
| ३ | टिळककालीन सांस्कृतिक व राजकीय जीवन. |
| ४ | लोकमान्य टिळकांचे राजकारण आणि महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळीचे अनुबंध. |
| ५ | लोकमान्य टिळकांच्यां विचार व कार्यावरील प्रतिक्रिया. |
| ६ | उपसंहार. |

## प्रकरण पहिले — प्रस्तावना

या पहिल्या प्रकरणामध्ये सुरूवातीला प्रस्तावना दिलेली आहे. त्यामध्ये संशोधनाचे नाव, संशोधन विषय निवड, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, संदर्भ साहित्यांचे पुनर्विलोकन (review of Litarature), संदर्भ साधने, संशोधन पध्दती, संशोधन विषयाची व्याप्ती, संशोधन विषयाच्या मर्यादा, प्रकरण नियोजन, संशोधन विषयाचे महत्व, त्याचबरोबर

सदर संशोधन विषयाचे योगदान (Contribution of Research work) दिलेले आहेत. त्याचबरोबर सदर संशोधनाचे निष्कर्ष दिलेले आहेत.

**<u>प्रकरण दुसरे — १९ व्या शतकातील सांस्कृतिक व राजकीय जीवन</u>**

सदर प्रकरणामध्ये १९ व्या शतकात महाराष्ट्रात टिळकपूर्वकालात धर्मांचा लोकजीवनावर कसा प्रभाव होता. पारंपारिक सण, व्रतवैकल्ये यांचा लोकजीवनाशी कसा संबंध होता. या काळात परंपरा विरूध्द आधुनिकता असा संघर्ष दिसून येतो. हे उपलब्ध साधनांच्या आधारे मांडलेले आहे. त्याचबरोबर तत्कालीन समाजावर हिंदु धर्माचा पगडा दिसून येतो. १९ व्या शतकामध्ये पारंपरिकता सोडून आधुनिकतेचे विचार मांडले जात होते. रूढी, परंपरा, सामाजिक चालिरीती, सामाजिक नियम या संदर्भात विचार मांडले जात होते. आणि त्याला अनुसरून लेखनाच्या माध्यमातून, व्याख्यानाच्या माध्यमातून नवमताच्या विचारांचा प्रसार करण्याचे काम सुरू झाले होते. या नवमताच्या पुष्टीमध्ये प्रामुख्याने नवशिक्षित ब्राम्हण वर्गांचा समावेश होता याचे उपलब्ध साधनांच्या आधारे विवेचन केलेले आहे.

या प्रकरणामध्ये १९ व्या व २० व्या शतकातील महाराष्ट्रातील टिळककालीन सांस्कृतिक जीवन कसे होते. त्याच्या प्रगतीचे टप्पे कसे विकसित होत गेले, याचा उपलब्ध साहित्याच्या आधारे शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रात मराठा राज्य खालसा झाल्यानंतर ब्रिटीशांची पेशवाईबाबतची भूमिका काय होती, एलफिस्टनची भूमिका काय होती. त्याच्या पुढच्या काळामध्ये विविध राजकीय प्रश्न मांडणाऱ्या संस्थांची स्थापना झालेली दिसून येते. त्यांचे विचार व भूमिका शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

न्या. रानडयांचे कार्य, दुष्काळसंबंधी चळवळ, आर्थिक शोषणावर आधारीत विचार, इंग्रज राजवट कशी आहे ते दाखविण्याचे त्यांचे प्रयत्न,

त्यातून आर्थिक राष्ट्रवादाची निर्मिती कशी झाली हे उपलब्ध साधनांच्या आधारे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्याकाळात मेळा, भाषणे, व्याख्याने, नाटक, लेखन वर्तमानपत्रे इत्यादी इंग्रज विरोध, प्रदर्शित झालेला दिसून येतो. त्याकाळात विविध शिक्षणसंस्थांच्या माध्यमातून शिक्षण, राजकारण विषयक, प्रचार प्रसाराचे कार्य झालेले दिसून येते.

## प्रकरण तीसरे — टिळककालीन सांस्कृतिक व राजकीय जीवन.

या प्रकरणामध्ये प्रथम धर्म ही संकल्पना स्पष्ट केलेली आहे. त्याचबरोबर टिळकांच्या काळी असलेली धार्मिक परिस्थिती मांडण्याचा उपलब्ध साहित्याच्या आधारे प्रयत्न केलेला आहे. चिपळूकरांच्या विचारांचा मागोवा घेता त्यांचा दृष्टिकोन मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. विष्णुशास्त्री पंडीत यांची समाज सुधारणेच्या बाबतीतील विशेष कामगिरी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. अगरकर व रानडयांचे समाजसुधारण्याविषयक विचार मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

महात्मा फुले यांची धर्मसंकल्पनेची मांडणी, त्यांचा सत्यशोधक समाज, त्यांचे धर्मविषयक विवेचन आणि त्यांची चळवळ. महात्मा फुले यांच्या कार्यापासून धर्म आणि समाज यांच्यांतील संबंधावर आघात करून नवविचारावर आधारीत असलेला समाज निर्माण करण्याची प्रक्रिया कृतीच्या पातळीवर सुरू झाली होती हे उपलब्ध पुराव्यांच्या आधारे मांडलेले आहे.

त्याकाळातील महाराष्ट्रातील विविध धर्म पंथ आणि तत्कालीन सांस्कृतिक जीवनातील स्थान, खिस्ती मिशनरी, धर्मप्रसार, शाळा, दवाखाने, शिक्षण, ग्रंथालय इत्यादी बाबत उपलब्ध साधनांच्या आधारे विवेचन केले आहे.

१९ व्या शतकात धर्म व समाज जागृतीसाठी काम करणाऱ्या अनेक संस्था स्थापन झाल्या. त्यांच्या विचार व कार्यासंबंधी उपलब्ध पुराव्यांच्या

आधारे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर लोकमान्य टिळकांच्या धार्मिक विचारांचा उपलब्ध साधनांच्या आधारे मागोवा घेतला आहे.

त्याचबरोबर दादाभाई नौरोजींचा आर्थिक नि:सारणाचा सिध्दांत, त्यांचे अर्थविषयक व राजकीय भूमिका विचार कार्य इत्यादी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

त्याचबरोबर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना. पहिल्या २० वर्षातील काँग्रेसची कामगिरी व त्याचबरोबर काँग्रेसचे टप्प्याटप्प्याने विकसित होणारे राजकारण व त्यातील महाराष्ट्रातील व्यक्तींचा सहभाग यांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

त्याचबरोबर लोकमान्य टिळकांचे लिखाण, भाषणे, विचार इत्यादीतून लो. टिळकांनी आर्थिक विपन्नावस्थेला सरकार कसे जबाबदार आहे हे साधार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रकरण चौथे — लोकमान्य टिळकांचे राजकारण आणि महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळीचे अनुबंध —**

या प्रकरणामध्ये लोकमान्य टिळकांच्या राजकीय चळवळीचे सांस्कृतिक अनुबंध याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये लोकमान्य टिळकांचे लिखाण असंतोष निर्माण करण्याचा प्रमुख भाग दिसून येतो. लिखाणाद्वारे त्यांनी समाजाला प्रेरणा देण्याचे काम केलेले दिसून येते. गीतारहस्य लिहिण्यामागे मुळ प्रेरणा काय होती? त्यामागे कोणते सांस्कृतिक पदर होते, हयाचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

त्याचबरोबर टिळकांच्या राजकारणाचे सूत्र काय होते, हे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचबरोबर टिळकांनी कोणकोणत्या सांस्कृतिक साधनांचा वापर केला, याचे उपलब्ध साधंनाच्या आधारे विवेचन केलेले आहे.

गणेश ही सर्वच हिंदूंची आराध्यदेवता मानली जाते. या देवतेचे सार्वजनिक ठिकाणी उत्सव करून त्यानिमित्त एकत्र आलेल्या लोकांना किर्तन, प्रवचन, भाषण, नाटय, व्याख्यानांच्या माध्यमातून व मेळयांच्या माध्यमातून जागृत करण्याचे कार्य त्यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या लोककल्याणकारी राजाचा जन्मोत्सव साजरा करून लोकांच्यामध्ये सर्वधर्म व स्वदेशाची जाणीव जागृत करण्याचे कार्य त्यांनी केले. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीयशिक्षण या स्वराज्याच्या चतु:सुत्री चा प्रसार करण्यासाठी व राजकीय विचारांच्या प्रसारासाठी किर्तन, प्रवचन, यात्रा, सत्पुरूष, इ. माध्यमातून त्यांनी प्रयत्न केले. अनेक किर्तनकारांना व प्रवचनकारांना राजकीय विचार मांडण्यांचा प्रेरणा त्यांनी दिली इत्यादी बाबींचे विवेचन केलेले आहे.

त्याचबरोबर लोकमान्य टिळकांचे राजकीय कार्य, राजकीय विचार इत्यादींवर तत्कालीन, समकालीन व विदयमान विचारवंतांच्या प्रतिक्रिया यांच्याआधारे लोकमान्य टिळकांचे राजकारण आणि महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळीचे अनुबंध हे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

लोकमान्य टिळकांनी आपले राजकारण करताना विविध सांस्कृतिक घटकांचा वापर कशा प्रकारे केला. सांस्कृतिक विचारांच्या अंगाने गणपती उत्सव, शिवाजी उत्सव भजन, किर्तन मेळावे, भारूडे, त्यांची चतु:सुत्री, त्यांची राष्ट्रीय शिक्षण संकल्पना, इत्यादी संबंधी लोकमान्य टिळकांचे राजकारण व त्याचा सांस्कृतिक अनुबंध स्पष्ट करण्याचा उपलब्ध साधनांच्या आधारे प्रयत्न केलेला आहे.

**प्रकरण पाचवे — लोकमान्य टिळकांच्या विचार व कार्यावरील प्रतिक्रिया**

या प्रकरणात लोकमान्य टिळकांचे लेखन, त्यांचे विचार व कार्य याबाबत समकालीन, विद्यमान, अनेक देशी व परदेशी विचारवंतांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. त्याआधारे लोकमान्य टिळकांच्या राजकारणांचे अनेकविध पैलु आपल्यापुढे दिसून येतात. त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

लोकमान्य टिळकांच्या राजकीय कार्याला व्यापक अर्थाने धर्माचे अधिष्ठान होते. याचा उपलब्ध लेखक, विचारवंतांच्या प्रतिक्रियांच्या आधारे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

टिळकांचे राजकीय कार्य व त्यासाठी त्यांनी वापरलेली साधने याबाबत अनेक परदेशी, देशी समकालीन व विद्यमान विचारवंतांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. एकदंरीत लोकमान्यांनी आपल्या धर्म या संकल्पनेत उदात्त विचारांचा अवलंब करून राष्ट्रसंवर्धन केले, त्यांच्या या धर्मभावनेचा व्यापक अर्थ, त्याचे सांस्कृतिक चळवळीशी असणारे अनुबंध मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**प्रकरण सहावे — उपसंहार**

या प्रकरणात अभ्यास विषयांच्या संदर्भात उपलब्ध साधनांच्या आधारे विवेचन करताना जी अनुमाने काढण्यात आली ती मांडलेली आहेत. त्यात १९ व्या व २० व्या शतकातील टिळकपूर्वकालीन व टिळककालीन महाराष्ट्राच्या लोकजीवनात कीर्तन, भजन, प्रवचन, नाटक, धार्मिक उत्सव, गायन, अभिनय इत्यादींना महत्व होते. त्याचबरोबर लोकमान्य टिळकांनी आपल्या राजकीय चळवळीसाठी निरनिराळया सांस्कृतिक घटकांचा उपयोग करून घेतला. महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय जीवनावर सांस्कृतिक घटकांचा प्रभाव होता.

**निष्कर्ष —**

- तत्कालीन समाजावर हिंदुधर्माचा पगडा होता.
- याकाळामध्यें परंपरा विरूध्द आधुनिकता असा संघर्ष दिसून येतो.
- १९ व्या शतकामध्ये पारंपारिकता सोडून आधनिकतेचे विचार मांडले जात होते.
- रूढी, परंपरा, सामाजिक चालीरिती, सामाजिक नियम,या संदर्भात विचार मांडले जात होते आणि त्याला अनुसरूण लेखनाच्या व्याख्यानांच्या माध्यमातून नवमताच्या विचारांचा प्रसार करण्याचे काम सुरू झाले होते. नवशिक्षित ब्राम्हण वर्गाबरोबरच समाजाच्या विविध स्तरातील घटकांचा समावेश असलेला दिसून येतो.
- महात्मा फुले यांच्या कार्यापासून धर्म आणि समाज यांच्यांतील संबंधावर आघात करून नवविचारावर आधारीत असलेला समाज निर्माण करण्याची प्रक्रिया कृतीच्या पातळीवर सुरू झाली होती.
- त्या काळामध्ये पाश्चात्य शिक्षणाचा, धर्मप्रसाराचा, धर्मांतर प्रक्रियेचा, ख्रिस्ती मिशनऱ्यांचा धर्मप्रसार व धर्मकार्याचा, इत्यादी गोष्टींचा परिणाम समाजावर झालेला दिसून येतो.
- १९ व्या व २० व्या शतकातील महाराष्ट्रात टिळकपूर्व व टिळककालात धर्म व समाज जागृतीसाठी काम करणाऱ्या अनेक संस्था स्थापन झालेल्या दिसून येतात.
- टिळकांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद ब्रिटीशांच्या धोरणाविरूध्द टिळकांचे भुमिकायुध्द दिसून येतो. रंगाने भारतीय पण रूपाने इंग्रजी लोक तयार करण्याचे इंग्रजांचे धोरण होते याला टिळकांनी विरोध केलेला दिसून येतो. यामध्ये टिळकांनी विरोध करताना संस्कृतीचा आधार घेतलेला दिसून येतो. पाश्चात्य विरूध्द पौर्वात्य संस्कृती असा संघर्ष दिसून येतो.

- १९ वे शतक हे महाराष्ट्राच्या इतिहासातील सांस्कृतिक संघर्षाचे शतक मानले जाते. या काळात ब्राम्हणी संस्कृती आणि ब्राम्हणी संस्कृतीला विरोध करणारी हिंदू धर्माचीच घटक असलेली ब्राम्हणेतर संस्कृती विकसित होताना दिसते.
- याकाळात राजकीय जागृती व प्रसार जनतेमध्ये करण्यासाठी व आपल्या मागण्या मांडण्यासाठी विविध संस्थांची स्थापना झालेली दिसून येते.
- त्याकाळात वर्तमानपत्रे, भाषणे, व्याख्याने, मेळे इत्यादीतून राजकीय अंगाने प्रचार व प्रसाराचे कार्य होत असे असे तत्कालिन साधनांवरून दिसून येते.
- न्या.रानडे निरनिराळया पध्दतीने कार्य करीत होते असे दिसून येते. रानडयांनी आर्थिक अंगाने विचार करून ‘आर्थिक राष्ट्रवादाद्वारे समाजामध्ये जाणीव जागृती केलेली दिसून येते.
- लोकमान्य टिळकांनी आपल्या अनेक लेख, भाषणे, विचारांच्या माध्यमांतून जागृती करताना आपल्या ‘आर्थिक विपन्नावस्थेला’ सरकार कसे जबाबदार आहे. हे पटवून देऊन सरकार विरोधात असंतोष निर्माण करून, ‘राजकीय चळवळ’ उभी केलेली दिसून येते.
- हिंदू धर्म ग्रंथांच्या आधारे लोकमान्य टिळकांनी ओरायण, आर्यांचे मुलवस्तीस्थान, गीतारहस्य इत्यादी राजकीय व धार्मिक विचार मांडणारे वाङःमय निर्माण केले.
- पाश्चात्य जीवनाशी ओळख झाल्यावर राष्ट्रवाद आणि लोकशाही या उदात्त विचारसरणीचे बीजरोपण व्हावे यासाठी टिळकांनी आवश्यक अशा संस्थात्मक जीवनाचा पाया रचला. हे उदात्त विचार त्यांनी अनेक कार्यक्रमाच्या माध्यमातून लोकांपर्यत नेण्याचे काम केले.
- राष्ट्रवाद स्वीकारून हिंदुस्थानातील भिन्न धर्म, विविध जाती, भाषा, जीवनपध्दती यासर्वात ऐक्य निर्माण झाले पाहिजे तरच आपला

तरणोपाय आहे अशी त्याची ख्याती पटली होती असे दिसून येते. त्यासाठी त्यांनी एक राजकीय आकांक्षा उत्पन्न करून स्वराज्याशिवाय तरणोपाय नाही हे लोकांना पटवून दिले व एकात्मता निर्माण होण्यासाठी लोकांना शिकवण दिली.

- स्वराज्य म्हणजे सर्वसामान्य माणसाचे राज्य असाच अर्थ लोकमान्यांना अभिप्रेत होता असे दिसून येते. सामान्य माणसांच्या अंतकरणात देशभक्तीची ज्योत त्यांनी प्रज्वलित केली व स्वराज्याचा मूलमंत्र देताना प्रजासत्ताक राज्य हा अर्थ लोकांच्या मनावर त्यांनी बिंबवला व सामान्य माणसाचा स्वाभिमान जागृत करून त्यांना त्यांनी कृतिशिल व आत्मविश्वासू बनविले.
- लोकमान्य टिळकांनी आपल्या आयुष्यात राजकारण करताना धर्म या संकल्पनेचा विचार केलेला दिसून येतो. त्यासाठी त्यांनी गणपती उत्सव, शिवाजी—उत्सव, किर्तन, नाटक, मेळे, इ. व्यासपिठावरून त्यांनी आपले विचार मांडून सामाजिक ऐक्य व जागृती, व लोकसंघटन करण्याचा प्रयत्न केला. या व्यासपिठाचा वापर त्यांनी राष्ट्रीय जागृती करण्यासाठी, प्रबोधनासाठी व स्वराज्य मिळविण्याच्या कामी एक साधन म्हणून केला असे उपलब्ध साधनावरून दिसून येते.
- गणेश उत्सवातून त्यांनी लोकसंघटन केले, तर शिवाजी उत्सवातून त्यांनी स्वाभीमानाची भावना लोकांत निर्माण केली. स्वराज्य स्थापनेच्या कार्यात सर्वाना सर्व धर्मियांना कर्तबगारीनुसार, परधर्म सहिष्णुवृत्तीने वागवून संधी दिली. त्यांच्या उत्सवात परधर्मीय व बहुजन समाज आनंदाने सहभागी झाले. दोन धर्मीयात एकोपा वाढीस लागणे हे उत्सवाचे गमक आहे असे दिसून येते.
- उत्सवांच्या माध्यमातून त्यांनी चतु:सूत्रीचा प्रभावीपणे वापर केला. जुना आधार व नवीन संस्कार मिळून हा उत्सव त्यांनी बनविलेला होता असे

दिसून येते. त्यांच्या कार्यावर देशी व विविध परदेशी विचारवंतांनी व त्यांच्या समकालीनांनी विविध प्रतिक्रिया व्यक्त केलेल्या आहेत.

- एकंदरित लोकमान्यांनी आपल्या धर्म या संकल्पनेत उदात्त विचारांचा अवलंब करून त्याग, परोपकार, सहिष्णुता, बंधुभाव, जेष्ठांचा आदर सहनशिलता, दया, क्षमा, शांती, शिल, चारित्र इ गुणांचा अवलंब करून राष्ट्रसंर्वधन केले व त्यांच्या धर्मभावनेचा हा व्यापक अर्थ त्यांनी समाजापुढे मांडला असे दिसून येते.
- त्यांनी लोकजागृतीसाठी व आपल्या राजकीय विचारांच्या प्रचारासाठी, राजकीय चळवळीसाठी तत्कालीन महत्वाच्या सांस्कृतिक घटकांचा उपयोग करून घेतला असे दिसून येते. त्यात उत्सव, मेळयासारखी लोककला, किर्तन, प्रवचनासारखे धार्मिक माध्यम इत्यादींचा त्यात समावेश होतो.
- लोकमान्य टिळकांनी राजकीय विचार लोकांपर्यत नेण्यासाठी यात्रा, उत्सव व सत्पुरूष या सांस्कृतिक साधनांची मदत घेतली. त्यामुळे लोकमान्य टिळकांच्या कार्याला राजकारणाबरोबरच धर्मकार्याचेही स्वरूप प्राप्त झाल्याचे दिसून येते. किर्तन,प्रवचन या माध्यमातून राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी, बहिष्कार या राजकीय विचारांच्या प्रचार व प्रसार करण्यासाठी अनेक किर्तनकार, प्रवचनकारांना त्यांनी प्रोत्साहीत केलेले दिसून येते. त्यात हिंदू प्रमाणे मुस्लिम वक्त्यांचाही समावेश होता असे आढळून येते.
- टिळकांचे राजकीय कार्य व त्यासाठी त्यांनी वापलेली साधने याबाबत अनेक समकालीन परदेशीलेखक व त्यांनी मांडलेले विचार, ब्रिटीश अधिकारी, विचारवंतांनी ज्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत त्यावरून लोकमान्य टिळकांच्या राजकीय विचार कार्याचे सांस्कृतिक अनुबंध स्पष्ट

होण्यास मदत होते. त्यामुळे त्यांच्या राजकीय कार्याला व्यापक अर्थाने धर्माचा आधार होता असे दिसून येते.

- यावरून १९ व २० व्या शतकातील महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळीचे भारतीय स्वातंत्र आंदोलनातील योगदान किती महत्वाचे व मोठे आहे हे दिसून येते.

**Contribution of Research work (सदर संशोधनाचे योगदान)**

- १९ व्या शतकातील सांस्कृतिक चळवळ समाजाला कळू शकते या चळवळीचे भारतीय स्वातंत्र आंदोलनातील योगदान स्पष्ट करण्यासाठी.
- पारंपारिक लोककला, समाजप्रबोधनासाठी, उन्नतीसाठी किती महत्वाच्या आहेत हे समाजाच्या निदर्शनास आणुन देणे.
- विविध प्रश्न सोडविण्यासाठी सांस्कृतिक घटकांचा उपयोग होवू शकतो. लोकजागृतीने विविध प्रश्न सोडविता येवू शकतात.
- या विविध कलांचा आजही प्रभावीपणे उपयोग करून घेता येवू शकतो. सांस्कृतिक चळवळ कालच्या इतकी आजही महत्वाची आहे.

## सूचना

भारतीय समाजामध्यें परंपरंने चालत आलेल्या भजन, किर्तन, मेळे, दशावतार, कलापथके, शाहीरी इत्यादी सारख्या कलांना आजही पूर्वीइतकेच महत्व आहे. हे लक्षात घेवून या कला, कलाकार व त्यांचे वाङ्‌मय यांचे जतन करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. उपरोक्त कलांचा उपयोग विद्यमान काळातील विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी लोकजागृती करण्यासाठी होऊ शकतो. हे लक्षात घेऊन निरनिराळया पातळीवरून या कला, कलाकार व त्यांचे साहित्य व वाङ्‌मय यांचे संवर्धन होणे आवश्यक आहे.

# प्रकरण २ रे

# एकोणीसाव्या शतकातील सांस्कृतिक व राजकीय जीवन

संस्कृती म्हणजे काय? संस्कृत शब्दाची उत्पत्ती

संस्कृती हा शब्द सांप्रत 'कल्चर' या इंग्रजी शब्दाचा प्रतिशब्द म्हणून रूढ झाला आहे. संस्कार शब्द आपण प्राचीन काळापासून वापरीत आलो आहोत.

'संस्कार' आणि 'संस्कृती' हे दोन्ही शब्द सम अधिक कृ या एकाच धातूपासून बनले आहेत. त्यांचा अर्थही व्याकरणदृष्टया एकच आहे. पण 'संस्कार' हा शब्द धार्मिक क्षेत्रापुरताच मर्यादीत राहिला. धर्मासह समग्र अंर्तबाहय जीवनाच्या उन्नत अवस्थेसाठी संस्कृती हा शब्द वापरला जातो.

**<u>संस्कृतीच्या व्याख्या</u> —**

भारतीय संस्कृती कोशात संस्कृतीचा '' धर्म, नीती, कायदा, ललित, कला वाडमय, सभ्यता आणि शिष्टाचार या गोष्टींचा संस्कृतीच्या अध्यात्मीक भागात अंतर्भाव होतो.'' असा संदर्भ आलेला आहे.[१] अबिद हुसेन आपल्या भारताची राष्ट्रीय संस्कृती या ग्रंथात संस्कृतीची व्याख्या करताना असे लिहतात की, '' संस्कृती हा शब्द 'कल्चर' या इंग्रजी शब्दासाठी प्रतिशब्द म्हणून रूढ झाला आहे. या शब्दामधून जे जे व्यक्त होते त्याची व्याप्ती फार मोठी आहे. धर्म तत्वज्ञान, राजकीय वा सामाजिक व्यवस्था, साहीत्य,शास्त्र,कला, नीती, कायदा अशा विविध गोष्टींचे संस्कृतीमध्ये समावेश होतो. या कारणांमुळे संस्कृती या शब्दाची सोपी, सुटसुटीत व्याख्या करणे अवघड आहे.''[२] प्राचीन भारतीय संस्कृती विषयक लेख संग्रहात संस्कृतीची व्याख्या पुढील प्रमाणे केलेली आहे. ''प्रकृती विकृती आणि संस्कृती या तीन शब्दांच्या विचार या संदर्भात करणे उपयुक्त ठरेल. प्रकृती म्हणजे निसर्ग. विकृती म्हणजे त्यात होणारा अनिष्ट बदल आणि

संस्कृती म्हणजे त्यात केला जाणारा इष्ट बदल. सहाजिकच संस्कृती ही एक प्रकारे कृत्रिम प्रयत्नसाध्य गोष्ट ठरते.''[३]

संस्कृतीचे घटक काय आहेत –

निरनिराळया विद्वानांच्या व्याख्यांचा मागोवा घेता संस्कृती या संकल्पनेत धर्म, तत्वज्ञान, राजकीय व सामाजिक व्यवस्था, साहित्य, शास्त्रे कला, निती, कायदा या घटकांचा समावेश केला जातो.

## टिळकपूर्वकालातील महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवन

एकोणीसावे शतक हा भारताच्या व महाराष्ट्रातील इतिहासातील महत्वपूर्ण व वैशिष्टयपूर्ण असा टप्पा आहे. या शतकामध्ये भारतातील तसेच महाराष्ट्रातील धार्मिक सुधारणा चळवळींचा, राष्ट्रवादाचा, स्वातंत्र्य आंदोलनाचा व आधुनिकतेचा आरंभ काल सुध्दा होता. या सर्वांना साकल्याने प्रबोधन असे म्हणता येईल. या काळात एक प्रकारचे वैचारिक व बौध्दीक सामाजिक, प्रबोधन युग सुरू झाले असे मानता येते. Renaissance या इंग्रजी शब्दाला पर्याय म्हणून मराठीत प्रबोधन ही संज्ञा वापरली जाते.[४]

एकोणीसाव्या शतकातील समाज व्यवस्थेसंबंधी (१८०० च्या काळातील महाराष्ट्र) आपल्या 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र : मध्यम वर्गाचा उदय' या ग्रंथात विवेचन करतांनां डॉ.राजा दिक्षित यांनी तत्कालीन प्रथा, रूढी, परंपरा, धर्म, कला, वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, गावगाडा, कुटुंबसंस्था, वत्रवैकल्ये व अंधश्रध्दा इत्यादी मुद्दयांवर प्रकाश टाकला आहे.[५]

एकोणीसाव्या शतकासंबधी आपले मत मांडताना भास्कर भोळे आपल्या एकोणीसाव्या शतकातील मराठी गदय (खंड २) या ग्रंथामध्ये

असे लिहितात की, ''१८१८ साली पेशवाई संपून महाराष्ट्रात ईस्ट इंडिया कंपनीची राजवट सुरू झाली. तेव्हापासून पुढे सत्तरऐंशी वर्षाचा इतिहास म्हणजे ब्रिटीश राजवटीशी स्थानिक समाजाच्या झालेल्या क्रिया प्रतिक्रियांचा इतिहास म्हणतात येईल. ब्रिटीश राजवटीमुळे भारतीय समाजाचा बौध्दीक विकास संपुर्णपणे नव्या दिशेने घडून आला आणि त्या अनुषंगाने त्याच्या राजकीय, धार्मिक आणि आर्थिक दृष्टीकोनातून बदल झाला. एका शतकाच्या आतच भारताचा जणू मध्य युगातून आधुनिक युगात प्रवेश झाला. हा रोमेशचंद्र मुजूमदारांचा अभिप्राय यथा तथाच म्हणावा लागेल. त्यामुळे भारताच्या आणि महाराष्ट्राच्या दृष्टीने एकोणीसावे शतक हे केवळ सत्तातंराचे शतक न ठरता ज्ञानविस्ताराचे, जीवनविषयक नवजाणिवांचे, विचार प्रवाहांमधील अंत कलहांचे, आत्मपरिक्षणाचे आणि मुलभूत प्रश्नांचा भिडण्याचे शतक ठरले होते. या समाजात तत्पुर्वीच्या हजार वर्षात जे घडले नव्हते ते विविधांगी बदल या शतकाने घडवून आणले.[६]

## <u>एकोणीसाव्या शतकाचा पुर्वाध महाराष्ट्रातील धार्मिक परिस्थिती</u> —

एकोणीसाव्या शतकाचा पुर्वाध पुर्णपणे रूढीच्या बंधनात बंदीस्त होता. सर्व व्यवहार धर्म व रूढींच्या बंधनात बंदीस्त होते. समाजजीवनावर व व्यवहारावर संपूर्णपणे धर्माचा पगडा दिसून येतो. या संदर्भात एकोणीसाव्या शतकातील धार्मिक परिस्थिती विषयी, ''महाराष्ट्रातील धर्म सुधारणेचे आंदोलन,'' या लेखात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी असे लिहितात की, '' यावेळी हिंदी मनुष्याचा परंपरागत जीवनक्रम हा संपूर्णपणे सनातन रूढींच्या बंधनात बंदीस्त होता. धार्मिक आणि सामाजिक या दोन कल्पनात भेद दाखविणारी सीमारेषा सापडत नव्हती. जन्मापासून मरणापर्यंतचे महत्वाचे व्यवहार धर्म— रूढींच्या मर्यादितच बध्द होते. या

सकाळपासून त्या सकाळपर्यंतचे कार्यक्रमही धर्मग्रंथांनी व परंपरागत रूढींनी ठरवून दिलेलेच असत. स्नान, पान, भोजन, उपजिविकेचे व्यवसाय, विवाह पध्दती, समाजातील भिन्न—भिन्न उच्च निच स्तरांवरील वा समान स्तरावरील जाती जमातींचे आचार विचार, विवाह पध्दती, उपासना पध्दती, अंतक्रिया इत्यादी सर्व मानवी क्रिया सनातन रूढीने डोळयावर ढापण लावलेल्या घाण्याच्या बैलाप्रमाणे एका चक्रात चालत असत.''[७]

## एकोणीसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक परिस्थिती —

एकोणीसाव्या शतकातील महाराष्ट्रात स्त्री—दास्याची समस्या त्रीव झालेली दिसून येते. बालविवाह, बालसंभोग, स्त्री शिक्षणावरील निर्बंध, बहुभार्या पध्दत, विधवा विवाहावरील निर्बंध, केशवपण, सती, इत्यादी समस्या पेशवाईच्या आणि अव्वल इंग्रजीच्या काळातही अस्तित्वात होत्या. महाराष्ट्रातील या सामाजिक परिस्थितीविषयी य. दि. फडके आपल्या 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' या ग्रंथात असे लिहितात की, ''महाराष्ट्रात बालविवाह, विषम विवाह किंवा बालविवाह मात्र सर्रास होत असत. अनेक विवाहीत स्त्रियांना लहान वयात वैधव्य येणे हा त्या प्रथांचा अटळ परिणाम होता. ब्राम्हणासारख्या उच्च समजल्या जाणाऱ्या जातीमध्ये विधवेचा पुर्नविवाह करायला मनाई असे. नवरा मरताच विधवा असलेल्या अल्पवयीन बालिकचेही केशवपन केले जात असे आणि अशा तऱ्हेने कोवळया झालेल्या स्त्रियांना आयुष्यभर स्वयंपाक करावा लागे आणि नातेवाईक स्त्रियांची बाळंतपणे करून त्यांची पोरे वाढवावी. एखादया पुरूषाच्या कृपाप्रकाराने मनुष्य वासनाच्या आहारी जाऊन एखादी विधवा गर्भवती झाली की तिला एक तर पोटचे पोर मारावे लागे, नाहीतर दूर कोठेतरी जाऊन गुपचुप बाळंतपण आटोपून पोर विकावे अगर टाकावे लागे.

विधवांच्या या दुर्कमेची जाहीर चर्चा बाळ जाभेकरांनी 'दर्पण' पत्रात १८३७ सालच्या ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात टिपण प्रसिध्द करून प्रथम सुरू केली. भोपाळचे तेलगी ब्राम्हण सुवाजी बापू यांनी वयात येण्यापूर्वीच नवऱ्यांना पारख्या झालेल्या बालविधवांना पुर्नविवाह करून दयावा असे प्रतिपादन केले. स्मृतिसंताचा आधार घेऊन इष्ट सुधारणा परंपरानिष्ठ लोकांच्या गळी उतरवायचा प्रयत्न करणाऱ्या जाभेकरांना महाराष्ट्रातील युगीन समाजसुधारकांचे कुलपुरूष म्हटले पाहिजे.''[८]

**<u>टिळकांपूर्वीचा महाराष्ट्र</u> —**

लोकमान्य टिळकांपूर्वीचा महाराष्ट्र कसा होता. महाराष्ट्राची धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक परिस्थीती कशी होती याचे वर्णन न.चिं. केळकरांनी लोकमान्य टिळकांचे चरित्र खंड क्र. १ मध्ये केले आहे. यासंबधी ते असे लिहितात की,

'' या कालावधीतील ब्राम्हणांचे दोन वर्ग करता येतील. एक वर्ग भटभिक्षूक शास्त्री पंडित यांचा व दुसरा कारकुनी पेशाचे ब्रम्हणांचा पाहिल्या वर्गासंबधाने पाहता असे दिसते, की दर उजाडल्या दिवशी या वर्गाचे महत्व कमी कमी होत होते. त्यांच्या महत्वाला निदान धंदयाला तरी बाजीरावशाहीत पुष्कळ तेजी होती. पेशवाईत दरबारी श्रावणमासी जी दक्षणा वाटली जाई, तिचे आकडे लाखावर गेलेले आढळतात. रयतेचा पैसा या एका वर्गावरे इतक खर्च करणे आजच्या दृष्टीने कोणालाही अयोग्यच वाटेल. पण त्या काळी युक्ता युक्तेची ही दृष्टीच जन्मली नव्हती. तथापि वेदपारायण व संस्कृतविदयेचे संरक्षण येवढीच दृष्टी घेतली तर त्या विदयेला तेव्हा ते एक मोठेच उत्तेजन होते यात शंका नाही. बाजीरावशाहीत तर विदयासंपन्न ब्राम्हणाच्या परामर्षाखेरीज प्रत्यक्ष ब्राम्हण भोजनाचे स्तोमहि पंक्तीत पुष्कळच वाढले होते. सव्वा हात केळींचे पान व

त्यावर वाढलेली पक्वान्ने आणि इतर खाद यांच्या गोष्टी ऐकल्या म्हणजे कोणाच्याही तोंडाला पाणीच सुटावे! पेशवाई नष्ट झाल्यावर अर्थात या खात्याला मोठाच धक्का बळकावला. तथापि ब्राम्हण धर्माचे वर्चस्व अदयापि कायम असल्यामुळे ब्राम्हण संस्थानिकच काय, ब्राम्हणेतर संस्थानिकहि ब्राम्हणांना 'दानधर्म बराच करीत.''[९]

बाजीरावशाही समाप्त झाल्यानंतर एलफिन्स्टन साहेबाने ब्राम्हणांची कोंडी करून दक्षिणा देण्याची पूर्वीची चाल बंद केली. तथापि इतर देवस्थानाच्या उत्पनाबरोबर दक्षिणेचा खर्च त्याने पुढेही चालू ठेवला. मात्र त्याने त्याचे रूपांतर केले. या दक्षिणा फंडातून प्रथम विदयेला उत्तेजन म्हणून बक्षिसी देण्यात येत. नंतर नाशिक व वाईच्या दोन प्रसिध्द क्षेत्रांच्या ठिकाणी हिंदुलोकांकरिता संस्कृत कॉलेज काढण्याचा विचार चालू झाला. पण अखेर तो रहित होऊन, १८२१ साली खुद्द पुण्यातच विश्रामबागवाडयांत सरकारी संस्कृत पाठशाला स्थापनात आली व तिच्याकरिता पन्नास हजार रक्कम बाजूला काढून ठेवली.''[१०]

## <u>पारंपारिक धर्मात सुधारणा करण्यासाठी झालेले प्रयत्न</u>:

१९ व्या शतकामध्ये पारंपारिकता सोडून आधुनिकतेचे विचार मांडले जात होते आणि त्याला अनुसरून लेखनाच्या माध्यमातून व्याख्यानांच्यां माध्यमातून नवमतांचा विचारांचा प्रसार करण्याचे काम सुरू झाले होते. या नवमताच्या पुष्टीमध्ये प्रामुख्याने नवशिक्षित ब्राम्हण वर्गाचा समावेश होता व प्रबोधनाची प्रेरणा ही मुख्यत: राजकीय पातळीवरच उद्‌भवली.

या संदर्भात नी.व्ही.सोवनी '१९ व्या शतकातील महाराष्ट्रातील तथाकथिन प्रबोधनाचे स्वरूप' या व्याख्यानात असे म्हणतात की, ''महाराष्ट्रात ही विचारांची चळवळ ब्राम्हण व पुढारलेल्या शिक्षित समाजातच प्रथम निर्माण झाली हेही इतिहासावरून स्पष्ट दिसते. ज्या

परकीय राजसत्तेने आपणास पराभूत करून आपला समाज तसाच बलशाली करता येईल का? आपले दुर्बलत्व नेमके कशात आहे? ते नाहीसे करण्यास काय इलाज केले पाहिजेत? या प्रश्नमालिकेनेच हा विचार सुरू झाला यावरून एक गोष्ट स्पष्ट आहे की येथील 'तथाकथित प्रबोधनाची प्रेरणा ही मुख्यत: राजकीय पातळीवरच प्रथम उद्‌भवली तेथून इतर पातळयांवर पसरली. पाश्चात्य संस्कृतीच्या आघाताला राजकीय प्रत्याघात हे आपल्या प्रबोधनाचे स्वरूप आपण लक्षात बाळगले पाहिजे.[११]

## महाराष्ट्रातील धर्म सुधारणेचे आंदोलन

बाळशास्त्री जांभेकर (१८१२ ते १८४६) हे महाराष्ट्रातील सामाजिक, धार्मिक व राजकीय विचारांचे प्रवर्तक होते. त्यांनी निरनिराळया माध्यमातून समाज प्रबोधनासाठी प्रयत्न केले. त्यांच्या विचार व कार्यामुळे लोकमान्य टिळकांच्या सांस्कृतिक चळवळीची पार्श्वभूमी तयार झाली असावी असे दिसते. [१२]

लोकहितवादी गोपाळराव हरी देशमुख (१८/२/१८२३ ते ९/१०/१८९२) यांनी धर्मसुधारणा व सामाजिक सुधारणा यांच्या आंदोलनाला आवश्यक अशी वैचरिक लेखनात्मक बैठक निर्माण केली. ब्राम्होसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज व सत्यशोधक समाज यांच्या पाठीशी ते उभे राहिले. नव्या सामाजिक शिक्षणास, आवश्यक अशा वृत्तपत्रे, ग्रंथालये इत्यादी संस्थांना उत्तेजन दिले. परंपरेविरूध्द फार मोठे बंड उभारण्याचा जीवनाभर प्रयत्न केला.[१३]

इंग्रजांनी पेशवाईनंतर महाराष्ट्रात नव्या पध्दतीचे शिक्षण होतकरू पिढीस देण्यास सुरूवात केलेली दिसून येते. याकाळात इंग्रजांना आपला धर्म, आपली संस्कृती, आपला व्यापार, वाढविण्याची आकांक्षा दिसून येते.[१४]

त्याकाळामध्ये मिशनरी लोकांनी ख्रिस्ती धर्म प्रसार केलेला दिसून येतो. प्रार्थनासमाजिस्ट ही धर्मांतराला सर्वात अधिक प्रवण असलेली दिसून येतात. त्यांनी गीतेच्या बरोबरीने बायबलला मान दिलेला दिसून येतो तरीही त्यांनी लवकरच असा निर्णय दिलेला आढळतो की, हिंदू धर्मात काही व्यंगे असली तरी ख्रिस्ती धर्माने झाले तरी सर्व शंकांना समर्पक उत्तर मिळतेच असे नाही. त्याकाळातील सुशिक्षित लोकांची व्दिधा मनस्थिती न्या. रानडे यांनी प्रार्थनासमाजाचे अध्वर्यू दादोबा पांडुरंग यांचेच उदाहरण देवून सिध्द केलेले दिसून येते. अशी त्या काळातील सुशिक्षितांची धर्माबाबत व्दिधा मनस्थिती दिसून येते.[१५]

इंग्रजी शिक्षणाच्या वाढीबरोबर हिंदू लोकांस ख्रिस्ती करण्याची मिशनरी लोकांची आकांक्षाही वाढीस लागल्याचे दिसून येते. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मप्रसारामुळे होणारे हिंदू धर्माचे नुकसान महाराष्ट्रातील लोकांच्या लक्षात लवकरच आले. ख्रिस्ती मिशनरी व हिंदू धर्मोपदेशक यांच्यातील वाद आपणांस पाहावयास मिळतात.[१६]

## टिळकपूर्वकालातील महाराष्ट्रातील राजकीय जीवन

### महाराष्ट्रातील राजकारणाच्या प्रगतीचे टप्पे

१९ व्या व २० व्या शतकातील राजकारण हे टप्प्याटप्प्याने प्रगत होत गेले. न.चिं.केळकर 'रानडे यांची राजकारणविषयक भुमिका' या सहयाद्री रानडे विशेषांकांतील लेखात महाराष्ट्रातील राजकारणाच्या प्रगतीचे दहा टप्पे पाडतात व असे लिहितात की,''

**१. आश्चर्य** — १८१८ साली झालेला प्रकार पाहून लोकांना आश्चर्य वाटले.

२. **कौतुक —** नव्या राज्यकर्त्यांनी कारभाराच्या जुन्या पध्दतीमध्ये एकदम कोणतीही क्रांती केली नाही. त्यांचे धोरण जुन्या पध्दतीतील दोष काढून ती सुयंत्रित करावी इतकेच होते.

३. **स्वप्न जागृति —** ''......, १८५८ राणीच्या जाहीरनामाचा अर्थ ऐका वाक्यांत सांगावयाचा तर प्रजेने शांत रहावे आणि तिला संतुष्ट ठेवण्याची खबरदारी सरकारने घ्यावी.

४. **विवेकदृष्टी —** यांनतर मध्यमवर्ग सुशिक्षित झाला. नविन राज्यव्यवस्था बरोबरी, पण तिच्यांतही दोष आहेत ही विवेकदृष्टी त्यांना प्राप्त झाली व तो कशी प्रगट करावी याचा तो विचार करू लागला.

५. **असमाधान —** विवेकदृष्टीमुळे असमाधान उत्पन्न झाले. परंतू त्यांना अप्रितींचे किंवा अंसतोषाचे त्रीव स्वरूप अजून आले नव्हते. पण ते हळूहळू येवू घातले होते.

६. **आकांक्षा —** लॉर्ड रिपनसारखा व्हाईसरॉय हिंदूस्थानात आला. परंतू त्याने केलेल्या उदारमतवादी सुधारणांत हक्क व अधिकार यांची भूक दबविण्याची औषधे नसून ती चेतविण्याचींच पौष्टीक द्रव्ये होती.

७. **असंतोष —** या परिवर्तनाचा कळस कर्झनशाहीत झाला. टिळक प्रभृति लोकांना 'असंतोषाचे जनक ' अशा पदव्या या काळांतील चळवळीनेच मिळाल्या.

८. **राजकारणाच्या संघटनेचा प्रारंभ —** हा प्रारंभ प्रथम मुंबई, पुणे, मद्रास येथे स्थापन झालेल्या लोकसभांनी केला. तो १८८५ साली राष्ट्रीय सभेची स्थापना होवून संघटित झाला.

९. **मर्यादित स्वराज्याची मागणी —** यांत मुख्यत: कायदेकौन्सिलांची मागणी समाविष्ट होती. पूर्वी न अनुभवलेल्या अशा त्रीव स्वरूपाच्या चळवळी म्हणजे निषेध, अपमान, धिक्कार, बहिष्कार, हत्या, विध्वंस

इत्यादी सर्व प्रकारच्या साधनांचा उपयोग नवीन पिढीचे पुढारी किंवा पुढाऱ्यांचे अनुयायी अमलांत आणू लागले.

१०. **जबाबदार स्वराज्याची मागणी —** या मागणीला १९२० च्या सुमाराला सुरूवात झाली. पंरतू जबाबदारीचे स्वराज्य म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. पूर्ण स्वातंत्र्य आहे. चळवळीला अधिक व्रीवता आणणारा, हिंसेला प्रतिस्पर्धी असा अहिंसा हा शब्द पुढे आला.''[१७]

महाराष्ट्रात सुरूवातीला इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर तुर्तास कोणतेही अमुलाग्र बदल करू नयेत असे धोरण दिसून येते. न्याय, शिक्षण, समाजजीवनातील नव्या कल्पना एलफीनस्टने राबविल्याचे दिसून येते. या संदर्भात डॉ. अरविंद देशपांडे असे लिहितात की, ''....महाराष्ट्रात इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर सुध्दा या नव्या राजवटीमुळे सामान्य जनतेच्या जीवनक्रमात लक्षणीय बदल घडून येवू नयेत किंवा बदल झालेच तर ते त्यांच्या नकळत व्हावेत अशी एलफिनस्टनची इच्छा होती म्हणूनच त्याने आपल्या सगळयाच सहकाऱ्यांना 'नवीन काही करू नका,' 'कोणतेही आमूलाग्र बदल करू नका' असा आदेश दिला. पंरतू इंग्रजांचे राज्य येणे हीच एक इतकी महत्वपूर्ण घटना होती की काही बदल हे अपरिहार्यच होते. मग त्या बदलांचा धक्का जितका सौम्य होईल तितका तो करावा अशी काळजी त्याने घेतली.

महाराष्ट्रात एलफिन्स्टनने अनेक नव्या प्रथा सुरू केल्या. इंग्रजांच्या सामाजिक व्यवहाराच्या ज्या काही कल्पना होत्या, त्या कल्पना येथे राबविण्याच्या त्याने प्रयत्न केला. त्याचा जीवनविषयक दृष्टीकोन इंग्लड व युरोपातील वैचारिक कल्पनांवर आधारीत होता. या नव्या कल्पना महाराष्ट्रात राबविण्याचे श्रेय नक्कीच एलफिन्स्टनकडे जाते. न्याय, शिक्षण, समाज जीवनाच्या नव्या कल्पना महाराष्ट्रात रूजविण्याचा एलफिन्स्टनने प्रयत्न केला आणि त्यात तो बऱ्याच अंशी यशस्वीही झाला परंतू त्याच्या

यशाचे आणखीही एक कारण आहे त्याच्या कल्पना प्रत्यक्षात उतरणारा एक वर्ग महाराष्ट्रात तयार झालेला होता. किंबहुना संपूर्ण १८ व्या शतकभर हा वर्ग हळूहळू तयार होत होता पण मराठेशाहीत त्याला दिशा मिळत नव्हती. त्याला एलफिन्स्टनने दिशा मिळवून दिली, पंरतू हेही तितकेच खरे आहे की त्याच्या प्रयत्नांपेक्षा इंग्रजांची प्रशासकीय गरज या बाबतीत जास्त प्रेरक ठरली.'' [१८]

एलफिन्स्टनने इ.स.१८१८ मध्ये पेशवाई नामशेष झाल्यावर हिंदुस्थानवर ब्रिटीशांचे सार्वभौमत्व स्थापन करण्याचे कार्य केले त्याचबरोबर उदार धोरण आखुन त्यांने एतद्देशीयांची मने जिंकुन घेतली. त्याने दूरदृष्टीने धोरण दाखवून दिले. यासंबंधी आधुनिक भारत या ग्रंथात शं.द. जावडेकर असे लिहितात की, ''इ.स. १८१८ मध्ये पेशवाई नामशेष करून हिंदुस्थानवर ब्रिटीशांचे सार्वभौमत्व स्थापन करण्याचे कार्य मौंट स्टुअर्ट एलफिन्स्टन याने केले व तोच मुंबई इलाख्याचा पेशवाईनंतरचा पहिला गव्हर्नर बनला. इ.स.१८१९ पासून १८२७ पर्यंत तो मुबंईचा गव्हर्नर होता. याच काळात १८२० ते १८२७ सर टॉमस मन्रो हा मद्रासचा गव्हर्नर होता. या दोघांनी ब्रिटीश राजनितीला एक उदार धोरण लावून दिले किंवा दाखवून दिले आणि ते जाहिर करून त्यांनी काही एतद्देशीय लोकांची अंतकरणे आकर्षित करून घेतली. हिंदुस्थानचे सार्वभौमत्व आपल्याकडे आले. त्यावेळी हे सार्वभौमत्व आपण किती काळ टिकवू शकू, ते अधिकात अधिक काळ कोणाला धोरणाने टिकू शकेल आणि आपल्या साम्रज्याची अखेर काय होईल, यासंबंधीचे विचार त्यांच्या डोक्यात घोळत असणे अगदी स्वाभाविक आहे. तो. १८१९ च्या मे महिन्यात सर जॉन माल्कम यास लिहितो , '' आज का उदया हा सर्व देश आपला बनवावा हेच बहुधा इष्ट आहे.......... आपणांस जर एतद्देशीय सैन्य काबूत ठेवता आले आणि रशियन लोकांना दूर ठेविता आले,तर एतद्देशीय लोक

आमच्या शिक्षणाने शहाणे होईपर्यंत आणि दोघांच्या हिताच्या दृष्टिने आमचा संबंध तोडणे इष्ट होईपर्यंत आमच्या साम्रज्याला इतर कोणताही धोका मला दिसत नाही.''[१९]

महाराष्ट्रातील राजकारणाच्या प्रगतीचे सुरूवातीचे टप्पे त्यामध्यें प्रामुख्याने बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी व त्यानंतर गोपाळ गणेश आगरकर यांनी इंग्रजी राज्याची समीक्षा करताना इंग्रजी राज्याची उत्तर बाजू दाखवून देण्याबरोबरच हिंदुस्थानच्या दरिद्रयाची मिमांसा केलेली दिसून येते. यासंबंधात विसाव्या शतकातील महाराष्ट्र या ग्रंथात य.दि.फडके असे लिहितात की, ''१८१८ मध्ये महाराष्ट्रात पेशवाईची परिसमाप्ती होवून आंग्लाई प्रस्थापित झाल्याने त्या वर्षापासून महाराष्ट्राच्या इतिहासातील आधुनिक युग सुरू झाले असे समजले जाते.

महाराष्ट्रात इंग्रजी विदया घेतलेल्या लोकांच्या पहिल्या व दुसऱ्या पिढीचे बहुतेक जण इंग्रजी राजवटीने दिपून गेले होते. इंग्रजी आमलाखालच्या बंगालमध्ये साठ सत्तर वर्षाच्या काळात 'बलात्कार', जुलूम आणि कुनीती ऐवजी लोक निर्भयपणा आणि 'स्वतंत्रता' भोगतात हे पाहून महाराष्ट्रातील आदय समाजसुधारक बाळशास्त्री जांभेकर यांस विस्मय वाटल्याचे त्यांनी म्हटले आहे.

४ फेब्रुवारी १८४९ रोजी प्रसिध्द झालेल्या लोकहितावादींच्या पत्रात म्हटले आहे. आपण स्वराज्य गमावले कारण आपल्याला राज्यकारभार करता येत नाही व आपले राज्य सांभाळण्याची ताकद नाही, असे लोकहितवादींचे म्हणणे होते.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात इंग्रजी राजवटीची नवलाई ओसरल्यानंतर गोपाळ गणेश आगरकरांसारखे समाजसुधारक इंग्रजी राज्याची उलटबाजू अथवा आमचे घोर दरिद्रय, हिंदुस्थानास क्षय लागला,

इंग्लीश राज्यात पोटभर अन्न मिळत नाही, अशा मथळयाचे लेख लिहू लागले.[२०]

१९ व २० शतकामध्ये राजकीय बाबतीत प्रथम वृत्तपत्रामध्यें लोकमत व्यक्त होवू लागले असे दिसून येते विविध वृत्तपत्रांच्या माध्यमातून राज्यकर्त्यासमोर प्रजेची गाऱ्हाणी मांडण्याचे काम झाल्याचे आढळते. वृत्तपत्रांच्या या कामगिरीविषयी य.दि.फडके आपल्या विसाव्या शतकातील महाराष्ट्र या ग्रंथामध्ये असे लिहितात की,'' इंग्रजी राजवटीत प्रथम छापखाने व वृत्तपत्रे यांच्यामार्फत लोकमत व्यक्त होवू लागले. बाळशास्त्री जांभेकरांचे दर्पण (१८३२), सूर्याजी कृष्णाजी प्रकाशित करीत असलेले मुंबई अखबार (१८४०), भाऊ महाजनांचे प्रभाकर (१८४१), व धुमकेतू (१८५३) ही पत्रे, ज्ञानोदय (१८४२) हे ख्रिस्ती मिशनऱ्यांचे साप्ताहिक, वर्तमानपत्र दिपिका (१८५२), किंवा उपदेश चंद्रिका (१८४४) व विचारलहरी (१८५२) यासारखी शास्त्री पंडीतांनी चालविलेली वृत्तपत्रे तसेच ज्ञानप्रकाश (१८४९) अशा विविध वृत्तपत्रांतून इंग्रजी राजवटीत उदयाला आलेल्या बुध्दिजीवी मध्यमवर्ग राज्यकर्त्यांसमोर प्रजेची गाऱ्हणी, आशाआकांक्षा मांडू लागला. विष्णुशास्त्री पंडीत, लोकहितवादी, रानडे वगैरेंनी १८६२ साली काढलेले 'इंदुप्रकाश' पत्र, रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक यांच्या मालकीचे 'नेटिव ओपिनियन' (१८६४), वगैरे वृत्तपत्रातील टिकेचा सुर सौम्य होता. त्यांच्या तुलनेने विष्णुशास्त्री चिपळूकरांनी १८७४ साली काढलेल्या निबंध मालेतील टिका चांगलीच चरचरीत असे.''[२१]

विविध वृत्तपत्रांतून इंग्रजी राज्यपध्दतीवर टीका, शिक्षणप्रसाराचे, ज्ञानप्रसाराचे कार्य, धर्मप्रचाराला आळा घलण्याचे कार्य, विविध सामाजिक प्रश्न इत्यादी विषयी लिहिले जात असे. पंडीत महादेवशास्त्री जोशी आपल्या भारतीय संस्कृती कोश खंड क्र. ७ मध्ये याचे वर्णन करताना

असे लिहितात की, '' इ.स. १८४१ मध्ये भाऊ महाजन यांनी 'प्रभाकर' नावाचे पत्र सुरू केले लोकहितवादींची शतपत्रे प्रथम प्रभाकरातच प्रसिध्द झाली. इंग्रजी राज्यपध्दतीवर टिका प्रथम त्याच पत्रात सुरू झाली. भाऊ महाजनांनी पाश्चात्य ज्ञानाचा प्रसार केला त्याचप्रमाणे आपल्या संस्कृतीविषयी व भाषेविषयी अभिमानही प्रगट केला.

ज्ञानोदय — इ.स. १८४२ च्या जून महिन्यात अमेरिकन मिशनऱ्यांनी अहमदनगर येथे धर्म प्रसारासाठी 'ज्ञानोदय' हे पत्र सुरू केले. ज्ञानोदयात हिंदुधर्मावर बरीच टिका केली जात होती. तथापी या वृत्तपत्राने केलेले शिक्षण प्रसाराचे व ज्ञान प्रसाराचे कार्य उल्लेखनीय आहे त्याने हिंदू धर्मातील अनिष्ट गोष्टींवर प्रहार केल्यामुळे समाजसुधारणेला निश्चित मदत झाली.

विचारलहरी — ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या वाढत्या प्रचाराला आळा घालण्यासाठी कृष्णाशास्त्री चिपळूकर यांनी विचारलहरी नावाचे साप्ताहीक १८५२ मध्ये सुरू केले. उपदेशचंद्रिका व सध्दर्म दिपिका ही पत्रेही त्याच उददेशाने निघाले.

ज्ञानप्रकाश— १८४९ मध्ये पुणे येथे 'ज्ञानप्रकाश' हे पत्र लिघाले. कृष्णाजी त्रिबंक रानडे यांनी हे पत्र सुरू केले. देशातील व परदेशातील वर्तमान सर्वांना कळावे हा तर ज्ञानप्रकाशाचा उद्‌देश होताच, शिवाय महाराष्ट्रातील विविध संस्था, स्त्रीशिक्षण देशी, उद्योगधंदे, व्यापार, कर इत्यादी विषयी त्यांत चर्चा होत असे त्या काळात जे विविध सामाजिक प्रश्न उपस्थित झाले, त्यात ज्ञानप्रकाशने सुधारणांच्या पाठपुरावा केलेला दिसतो.

इंदुप्रकाश —मुंबईत १८६२ जानेवरीत विष्णुशास्त्री पंडितांनी चालू केले. जनार्दन सखाराम गाडगीळ त्यांचे पहिले संपादक होते. इंग्रजी विभागाचे संपादन पहिले चार महिने न्यायमुर्ती रानडे यांनी पाहिले. विष्णुशास्त्री

पंडीत यांनी इंदुप्रकाशात विधवाविवाह, बालविवाह, केशवपण, स्त्रीशिक्षण इत्यादी विषयावर अभ्यासपूर्ण व आवेशयुक्त लेखन केले. सामाजिक सुधारणेच्या बाबतीत इंदुप्रकाशची कामगिरी फार मोलाची आहे.[२२]

निरनिराळया पाश्चात्य शिक्षण संस्थांच्या प्रभावामुळे पाश्चात्य राष्ट्रतील राजकीय तत्वज्ञानाचा परिचय होत चालला होता. याचा परिणाम म्हणजे देशाच्या निरनिराळया भागामध्ये विविध संस्थांच्या माध्यामातून आपले राजकीय अस्तित्व प्रकट करण्याचे काम केले जात होत या संदर्भात 'काँग्रेसचा उग्दम व प्रारंभ' या लेखात त्र्यंबक देवगिरीकर असे लिहितात की, '' ५७ चे बंड संपून राष्ट्रात स्थिरस्थावर होत होती. निरनिराळया शिक्षणसंस्था निघत होत्या. पाश्चात्य राष्ट्रांतील राजकीय तत्वज्ञानाचा परिचय होत चालला होता व इंग्रजांच्या राज्यपध्दती विषयी आदर वाटू लागला होता. सामाजिक व शैक्षणिक प्रश्नांसंबंधी ही जोरजोराचे विचार उसळू लागले होते. ५७ च्या बंडापूर्वी ६ वर्षे बंगालमध्ये प्रसन्नकुमार टागोर व डॉ. राजेंद्रलाल मिश्रा यांनी ब्रिटिश इंडिया असोसिएशन'काढली आणि मुंबईस जगन्नाथ शंकरशेट, दादाभाई नौरोजी यांनी 'बॉम्बे असोसिएशन' स्थापन केली. मद्रासमध्ये राजकीय जीवनाला 'हिंदू'पत्राने १८७८ साली सुरूवात केली. पुण्याला रा.ब.नूलकर, सीतारामपंत चिपळूनकरांनी 'सार्वजनिक सभा'स्थापन करून राजकीय अस्तित्व प्रकट केले. या संस्था सरकारच्या कारभारावर वेळी अवेळी टीका करत या पलीकडे राजकारणांत त्यांच्या हातून काहीच कार्य होत नसे. १८५०ते१८८०पर्यंत सरकारवर टिका करण्यांचे काम तेवढेच सुरू होते.''[२३]

महाराष्ट्रातील त्यापुढच्या राजकारणाच्या प्रगतीच्या टप्प्यामध्ये न्या. रानडे यांनी सनदशीर व जबादार राज्यपध्दतीचा पुरस्कार केलेला दिसून येतो. रानडे यांची 'राष्ट्रोध्दाराची योजना' या लेखात प्रो.द.गो. कर्वे असे लिहितात की ,'' समाजांतील प्रत्येक व्यक्तीच्या अंगी असलेल्या गुणांची

पूर्ण वाढ होण्यास तिला स्वातंत्र्य व जरूर ते सामाजिक सहाय्य असावे अशी रानडयांची अपेक्षा असल्याने 'सनदशीर व जबाबदार राज्यपध्दतीचा' त्यांनी पुरस्कार केलेला आढळतो.

''......, येथील लोकांस स्वातंत्र्य व शिकवण देवून आपल्या पायांवर उभे राहण्यास समर्थ करणे न्याय्य व इंग्लडच्याही हिताच्या दृष्टिने इष्ट आहे ही गोष्ट सरकारच्या मनावर बिंबविणे, आणि आपण आपला उज्ज्वल इतिहास आणि भविष्यकाळातील नियुक्तकार्य ही ध्यानांत घेवून एकजुटीने आणि स्वावलंबाने संघटित व सर्वांगीण प्रगतीचा मार्ग आक्रमिला पाहिजे ही शिकवण लोकासं देणे, हयाच दोन गोष्टी रानडयांनां मुख्यत्वेकरून करावयाच्या होत्या.''[२४]

रानडे यांचे राजकारण लोकसंघटना करण्यापासून सुरू झाले. राजकीय चळवळीचा तो प्रारंभ होता असे दिसून येते,'रानडे यांची राजकारण विषयक भूमिका',या लेखात न.चिं. केळकर असे लिहितात की, ''रानडे यांचे राजकारण लोकसंघटना करण्यांपासून सुरू झाले आणि तींत सर्व प्रकारची जनता आणण्याचा त्यांचा प्रयत्न असल्यामुळे व राजकीय चळवळीचा तो प्रारंभच असल्यामुळे त्यांना त्रीव स्वरूपाच्या स्वातंत्र्याच्या ध्येयाचा उच्चार करता आलाच नाही. हे उघड आहे.''

''....., रानडे यांच्या काळी अर्ज विनंत्या हे जे स्वरूप राजकारणाला होते ते स्वरूप कोणत्याही परशासीत देशांतील प्रगतिपर राजकारणाला प्रथम असतेच.''[२५]

न्या.रानडे यांनी 'भारतीय अर्थशास्त्राची' रूपरेखा आखली. त्यामुळे त्याकाळी मर्यादित राजकीय सत्तेच्या योगाने त्याची फलप्राप्ती झालेली दिसून येते या महत्वाच्या कामगिरीविषयी प्रा.काळे. वा.गो. आपल्या 'न्या. रानडे हयांची अर्थशास्त्राविषयक कामगिरी,' या लेखात असे लिहितात की, ''... स्वदेशी साखरेच्या धंदयाचे बाबतींतल्या प्रंतिक सरकारच्या अुदासिन

वृत्तींचे वर्णन वर आलेच आहे तिच्या मुळांशीहि अिंग्लिश अर्थशास्त्राची 'अकरणा' ची शिकवण होती. हिंदुस्थानच्या आर्थिक प्रगतीच्या मार्गात हे शास्त्र येअू लागल्याकारणाने त्याची नाडी परीक्षा करणे आवश्यक झाले, ही चिकित्सा न्यायमूर्तीनी तत्ज्ञांच्या दृष्टिने करून 'इंग्लिश अर्थशास्त्राच्या' दोषांचे अविष्कारण पध्दतीशीर रीतीने केले. ब्रिटीश राष्ट्राने आपले शास्त्र पाहिजे तर स्वत:साठी ठेवावे, पण हिदुंस्थानसाठी त्याच्या परिस्थितीस व गरजांस अनुसरून नवे व पुनर्घटित शास्त्र हवे हे सिध्द करून 'भारतीय अर्थशास्त्राची रूपरेखा' त्यांनी आखली. न्यायमुर्तीच्या हया बाबतीतंल्या महत्वाच्या कामगिरीची किंमत हिंदीराष्ट्रास अलीकडे मिळालेल्या 'मर्यादित राजकीय सत्तेच्या योगाने' त्यांच्या अर्थविषयक कल्पनांस मूर्तस्वरूप प्राप्त झाले आहे हयावरून करतां येते.''[२६]

भारतीय अर्थशास्त्रावर रानडयांनी तीन लेख लिहिले याविषयी काळे वा.गो. असे लिहितात की,''हिंदुस्थान देशाच्या विशिष्ट राजकीय, सांस्कृतिक व सामाजिक परिस्थितीस अनुलक्षुनच अर्थशास्त्राचे सिध्दांत हया देशाच्या संपत्तीविषयक प्रश्नांस लागू केले पाहिजेत असा आग्रह धरून,''भारतीय अर्थशास्त्राची मुहूर्तमेढ रोवण्यांचे सर्व श्रेय न्यायमुर्ती रानडे हयांस आहे. ''[२७]

**निबंधमालेचे कार्य**

विष्णुशास्त्री चिपळूकर हे अनेक प्रकारे आपल्या निबंधमालेतून तत्कालीन समाजाचे राजकारणाविषयी प्रबोधन करताना दिसतात. विष्णुशास्त्री चिपळूकरांच्या निंबधमालेच्या कार्याविषयी व तत्कालीन निबंधमालेच्या परिणामविषयी य.दि.फडके असे लिहितात,''विष्णुशास्त्री चिपळूकरांनी १८७४ साली काढलेल्या निबंधमालेतील टीका चांगलीच चरचरीत असे. १८७९ च्या सप्टेंबरमध्ये सरकारी नोकरीचा राजीनामा देईपर्यंत विष्णुशास्त्रांना सरकारवर उघड टीका करणे शक्य नव्हते. इतिहास

किंवा इंग्रजी भाषा यासारंख्या विषयावर लिहिण्याच्या निमित्ताने विष्णुशास्त्री ख्रिस्ती मिशनऱ्यांवर, इंग्रज अधिकाऱ्यांवर आणि त्यांचे गोडवे गाणाऱ्या लोकहितवादी, जो.फुले यांसारख्या ऐतदेशीयांवर तुटून पडत. स्वभाषा, स्वधर्म व स्वदेश याविषयीच्या अभिमानाने निबंधमालेत जे लिहिले गेले त्याचा तेव्हा शाळा कॉलेजात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवर फार परिणाम झाला. इंग्रजी भाषा या विषयावरच्या निबंधाचे लेखक विष्णुशास्त्री हे कारस्थानी ब्राम्हण असून त्यांच्यासारखे लोक देशातील असंतोषाच्या व राजद्रोहात्मक प्रवृत्तीच्या बुडाशी असल्याचा आरोप मेजर जेकब यांनी 'एलिफास' हे टोपणनाव घेऊन बॉबे गॅझेटमध्यें प्रसिध्द केलेल्या पत्रात केला.(३ ऑक्टोबर १८७६) तेव्हा आपले लिखान राजद्रोहात्मक नसल्याचा विष्णुशास्त्रांनी निर्वाळा दिला.''[२८]

निबंध मालेच्या कामगिरीविषयी भास्कर भोळे असे लिहितात की, ''विव्दत्ता प्रचुर व शास्त्रीय लेखन इंग्रजी इतकेच परिणामकारक करावे, मराठीतूनही करता येते, हे प्रत्यक्ष प्रमाणाने सिध्द केले. अव्वल इंग्रजीत त्यांच्यापूर्वी मराठीत झालेले बव्हंश लेखन शालेय, भाषांतरवजा किंवा पाश्चात्य प्रभावाने डोळे दिपल्याप्रमाणे होते. त्याचा परिणाम आत्मग्लामी व पराभूत मनोवृत्ती बळावून आत्मभानाचा लोप होण्यात झाला आहे, असे 'माला' कारांचे निदान असल्यामुळे त्यांनी ते आत्मभान परोपरीने जागवण्याचा प्रयत्न आपल्याच एकटाकी लेखनातून केला होता. निद्रिस्त व संमोहित राष्ट्राला खळबळून जागे करण्याचे कार्य निबंधमालेने निश्चितच केले.''[२९]

आपले राजकीय आस्तीत्व प्रकट करण्यासाठी विविध प्रकारच्या संघटना, संस्था स्थापन झाल्याचे दिसून येते या तत्कालीन संस्थाचे वर्णन य.दि.फडके यांनी आपल्या विसाव्या शतकातील महाराष्ट्र या ग्रंथामध्ये केलेले आहे. पुण्याच्या डेक्कन असोसिएशनच्या तुलनेने नाना शंकरशेट

यांनी पुढाकार घेवून २६ ऑगस्ट १८५२ रोजी मुंबईत स्थापन केलेल्या बॉम्बे असोसिएशने संघटनेचे चिटणीस होते. तर दादाभाई नौरोजींनी संघटना स्थापन होताना महत्वाचे भाषण केले होते. या संघटनेच्या वतीने तीन हजार लोकांच्या सहया असलेल्या एक अर्ज इंग्लंडमधील उमरावांच्या सभागृहास सादर करण्यात आला होता (४ मार्च १८५३). बॉम्बे गॅझेटसारखी इंग्रजी वृत्तपत्रे व पोप यांच्यासारखे अधिकारी यांनी सरकाराला विरोध करण्यासाठी बॉम्बे असोसिएशन स्थापन झाली असल्याचा आरोप करून काहूर माजविले होते.या संघटनेची सुत्रे मुंबईतील धनिक व्यापाऱ्यांच्या रोठियांच्या हाती होती.''खिशाला चटटा बसे तेव्हाच व तेवढया बाबतीतच हे चळवळ करीत.''असे दिसते. संघटना स्थापन करण्यापूर्वी नाना शंकरशेट व बमनजी होमराजी वाडिया यांनी मागण्यांची एक यादी तयार केली होती या यादीत मुंबई नगरपालिका असावी, ब्रिटीश संसदेत हिंदी प्रतिनिधी असावेत वगैरे मागण्यांचा अंतर्भाव केला होता. संस्थेचे चिटणीस डॉ. भाऊ दाजी यांनी संस्थेतर्फे १८५३ साली धाडलेल्या अर्जात कंपनीच्या राजवटीविषयी कडक भाषा वापरली होती.

<u>ईस्ट इंडिया असोसिशन</u> — १ डिसेंबर १८६६ रोजी दादाभाई नौरोजींनी लंडनमध्ये 'ईस्ट इंडिया असोसिएशन' स्थापना केली होती. हिंदी लोकांना सनदी मुलकी सेवेत प्रवेश करता यावा, यासाठी इंग्लंडमध्ये व हिंदुस्थानात एकाच वेळी स्पर्धात्मक परीक्षा घेतल्या जाव्यात, अशी मागणी करून त्यासाठी १८६७ व १८६८ साली दादाभाईंनी इंग्लडमधील लोकमत अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न केला. दादाभाईंच्या 'ईस्ट इंडिया असोसिएशनची' शाखा मुंबईतीच काढण्यात आली (२२ मे १८६९). तेव्हा दादाभाई काही दिवसांच्या वास्तव्यासाठी इंग्लंडमधून हिंदुस्थानात आले होते. मुंबई शाखेचे अध्यक्ष डॉ. भाऊदाजी होते. आणि काशीनाथपंत तेलंग व फिरोजशहा मेहता शाखेच्या कामात हिरीरीने भाग घेत होते.

बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन — तेलंग, फिरोजशहा,ब्रदुद्दीन तय्यबजी हे तरूण वकील मंडलिकांच्या 'बॉम्बे असोसिएशानमध्येही' होते. १८७५ नंतर बॉम्बे असोसिएशच्या एकतंत्री कारभार रावसाहेब मंडलिकांच्या आदेशानुसार चालत असे. बॉम्बे असोसिएशनच्या पुनरूस्थानासाठी प्रयत्न करण्यापेक्षा तेलंग, फिरोजशहा, बद्रुद्दीन, दिनशा वाच्छा वगैरेनी मंडलिक, दादाभाई वगैरेंच्या सहकार्याने 'बॉम्बे प्रेसिडेन्सी असोशिएशन' ही नवी संघटना स्थापन केली.

कलकत्ता, मद्रास व मुंबई या शहरांतल्या अशा संघटनेपेक्षा काहीशी वेगळी अशी 'वसई असोसिएशन' नावाची संघटना गोविंद बाबाजी वसईकर (१८२६—१९०६) यांनी १८६२ साली स्थापन केली. पण वर्षभराने तिचे काम थंडावले.

१८६० साली आयकराविरूध्द ठाणे, कल्याण, भिंवडी, पनवेल,शहापूर व विशेषत: वसई येथे लोकांनी निदर्शने करून असहय करवाढी विरूध्दाचा असंतोष व्यक्त केला. या पार्श्वभूमीवर गोविंद बाबाजी जोशी यांनी 'वसई असोसिएशन' स्थापन केली होती. हा उपक्रम अपेक्षेइतका यशस्वी झाला नाही, तरी नाउमेद न होता गोविंदरावांनी 'ठाणे जिल्हा असोसिएशन' स्थापन केली. ८ फेब्रुवारी १८६८ नगरपालिका, शाळा, जंगलखाते वगैरेंच्या कारभाराविषयी सरकारास अर्ज करून सूचना करण्याचे काम या संघटना करीत असत.''

मुंबई इलाख्यातिल अशा सर्व मंडळांमध्ये पुण्याच्या सार्वजनिक सभेचे' कार्य सातत्याने व सुसंघटितरित्या चालले होते. पर्वती देवस्थानच्या पंचांच्या गैरकारभारला आळा घालण्यासाठी, गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका (१८२९ — १८८०) यांनी सरदार इनामदारांच्या सहाय्याने सार्वजनिक सभेची स्थापना केली. २ एप्रिल १८७० या संघटनेच्या

बहुसंख्य ब्राम्हण सभासदांमध्ये सरदार, इनामदार, सावकर, व्यापारी वगैरे असले तरी सभेची सुत्रे मुख्यत: वकिलांच्या हाती होती.

१८७१ च्या नोव्हेंबरमध्ये म.गो.रानडे न्यायाधीश म्हणून पुण्यात काम करू लागल्यांनंतर, ते सार्वजनिक सभेची सुत्रे पडदयाआडून हलवू लागले. ते सरकारी नोकर असल्याने उघडउघड संघटनेचे सभासद होण्यास राजी नव्हते. त्यामुळे १८८० सालापर्यंत सार्वजनिक काका नंतर सिताराम हरी चिपळूकर, शिवरामहरी साठे, गोपाळकृष्ण गोखले,सार्वजनिक सभेचा कारभार पाहत असले तरी १८९६ साली टिळकांनी ही संस्था काबीज केली, तोपर्यंत सार्वजनिक सभा रानडयांच्या तंत्राने चालत असे.

१८७५ सालापर्यंत सातारा, कराड, वाई, धारवड, भिंवडी, नासिक, नगर, सोलापूर, बार्शी, सिन्नर वगैरे ठिकाणी सार्वजनिक सभेच्या शाखा स्थापन झाल्या होत्या. सभेच राजकारण अर्ज विनंत्यांचेच होते. इंग्रज राज्यकर्त्यांना लोकांच्या गाऱ्हाण्यांची व मागण्यांची कल्पना देवून त्यांच्या धोरणात बदल व्हावेत यासाठी दबाव आणण्याचा प्रयत्न सार्वजनिक सभा करीत असे. प्रतिनिधी ग्रामीण भागात ठिकठिकाणी जावून माहिती गोळा करीत. तिला आकडेवारीची जोड देवून अहवाल तयार केला जात असे आणि तो सरकारला सादर केला जात असे.''

''१८७५ चे शेतकऱ्यांचे दंगे, १८७५ – ७७ च्या दुष्काळ वगैरे घडामोडींच्या संदर्भात सार्वजनिक सभेने केलेल्या हालचालींमुळे मुंबई सरकार व मुंबईचे गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल यांची सभेवर इतकी नाराजी झाली आणि रानडयांची सरकारने बदली करून त्यांना नाशिक व धुळे येथे पाठविले.''[३०]

त्या काळात आपले आस्तीत्व प्रकट करण्यासाठी, प्रश्न मांडण्यांसाठी विविध प्रकारच्या संस्थांची स्थापना झाल्याचे दिसून येते. कौशल्यशिक्षक सभा, वक्वृत्वोत्तेजक सभा, ग्रंथोत्तेजक मंडळी.[३१]

१९ व्या शतकातील महाराष्ट्रातील परिस्थितीविषयी भाष्य करताना दादाभाई नौरोजी महाराष्ट्रातील वैग्युण दाखवितात, आत्मपरिक्षण करण्याचा सल्ला देतात. ते दि.२६ सप्टेंबर १९०७ रोजीच्या मुमुक्षु'त असे लिहितात की, ''आपले अंगी असलेले गुण दाखविण्यास योग्य संधी न देता तुम्ही अगदी नालायक असे बिनदिक्त हमेशा म्हणून लोकांची नालस्ती करणे ही जुलमी राजांची युक्ती पुरातनचीच आहे.''

''...,तुम्ही महाराष्ट्रीय का सगळे हिंदवासी लोक निस्तेज, तुमच्या रीती रानटी तुमची राहणी जंगली, तुमचा धर्म वेडगळ समजुतीने भरलेला, धर्मभेदामुळे तुमच्यांत जूट होणे शक्य नाही. तुमचे राजे जुलमी, त्यांची नाती अन्यायाची, तात्पर्य तुम्ही, तुमचा धर्म, तुमचे राजे एवंच तुमचे सर्वच काही त्याज्य असे सांगसांगून शिरोभागाच्या अवतरणांत म्हटल्याप्रमाणे मतलबी लोकांनी आम्हा महाराष्ट्रीयांस अगदी वेडगळ, नेभळे व कुचकामाचे ठरविले आहे व त्याप्रमाणे आम्हांस वाटावे अशी तजवीज जिकडे तिकडे कडेकोट केली आहे. ज्यांना स्वार्थ साधावयाचा नव्हता अशांनी आपल्याविषयी जे काही मत दिले असेल तेच खरे.''[३२]

अशाप्रकारे आपणांस १९ व्या शतकातील टिळकपूर्वकाळातील सांस्कृतिक व राजकीय परिस्थिती दिसून येते. टिळकपूर्वकाळात धर्मांचा प्रभाव लोकजीवनावर, समाजजीवनावर दिसून येतो.

**सारांश**

- एकोणिसाव्या शतकाचा पूर्वार्ध पुर्णपणे रूढींच्या बंधनात बंदिस्त होता. सर्व व्यवहार धर्म व रूढींच्या बंधनात होते. समाज जीवनावर व व्यवहारावर संपुर्णपणे धर्माचा पगडा दिसून येतो.
- लोकमान्य टिळकांच्या वैचारिक जडणघडणीवर तत्कालीन धार्मिक परिस्थितीचा प्रभाव पडलेला दिसतो. त्याकाळात हिंदूधर्माला अवकाळा प्राप्त झाली होती. कर्मकांड म्हणजे धर्म अशी समाजाची धारणा बनलेली होती. तर दुसऱ्या बाजुला हिंदूधर्मातील इंग्रजी विचार व शिक्षणामुळे प्रभावीत झालेला सुशिक्षित हिंदू धर्म सुधारण्यासाठी प्रयत्न करीत होता असे दिसते.
- १९ व्या व २० व्या शतकातील राजकारण हे टप्प्याटप्प्याने प्रगत होत गेले असे दिसून येते.
- महाराष्ट्रात सुरूवातीला इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर कोणतेही आमुलाग्र बदल केलेले एलफिन्स्टनने दिसून येत नाहीत. याउलट त्याने न्याय, शिक्षण, समाजजीवनातील नव्या कल्पना राबविल्याचे आढळून येते.
- १९ व्या व २० व्या शतकामध्ये प्रथम इंग्रजी राजवटीविरूध्द छापखाने व वृत्तपत्रे यांच्यामार्फत लोकमत व्यक्त होवू लागले असे दिसून येते. विविध वृत्तपत्रांतून बुध्दिजीवी मध्यमवर्गाने आपल्या आशा, आकांक्षा, प्रजेची गाऱ्हाणी मांडलेली दिसून येतात, वृत्तपत्रातून राज्यपध्दती,शिक्षणप्रसार, ज्ञानप्रसार, धर्मप्रचाराला आळा, सामाजिक प्रश्न इत्यादी विविध बाबींवर लिहिले जात होते असे दिसून येते.
- पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावामुळे पाश्चात्त राष्ट्रातील राजकीय तत्वज्ञानाचा परिचय होत चालला होता.त्यामुळे देशाच्या विविध

भागांमध्ये आपले राजकीय आस्तीत्व प्रगट करण्यासाठी विविध संस्था स्थापन झाल्याचे दिसून येते.

- न्या.रानडयांनी राजकीय सुधारणांची मागणी करताना जबाबदार व सनदशीर राज्यपध्दतीचा पुरस्कार केलेला आढळून येतो.
- न्या.रानडे यांनी ‘भारतीय अर्थशास्त्राची’ रूपरेखा आखुन महत्वाची कामगिरी करून अर्थिक राष्ट्रवाद प्रगट केला व त्यामुळे हिंदी राष्ट्रास मर्यादित राजकीय सत्तेच्या योगाने अर्थविषयक कल्पनांस मूर्तस्वरूप प्राप्त झाल्याचे दिसून येते.

## संदर्भ

१) जोशी महादेवशास्त्री (संपा.),भारतीय संस्कृती कोश, खंड ९,पृष्ठ ५९६, ५९७.

२) हुसेन अबिद, भारताची राष्ट्रीय संस्कृती, एन.बी.टी.इंडिया, नवी दिल्ली, १९९२, पृ.१,२,३.

३) भट श्रीपाद, प्राचीन भारतीय संस्कृतीविषयक लेखसंग्रह, पुणे, टि.म.वि., २८ फेब्रुवारी २००८, पृ. ६.

४) दिक्षित राजा, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र मध्यमवर्गाचा उदय, पुणे, डायमंड पब्लीकेशनस, १६ डिसेंबर २००९, पृ. २.

५) कित्ता, पृ.३७ ते ३९.

६) भोळे भास्कर लक्ष्मण (संपा.), एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य, खंड २, दिल्ली, साहित्य अकादेमी, २००८, पृ. I to xLIx.

७) जोशी लक्ष्मणशास्त्री, महाराष्ट्रातील धर्मसुधारणेचे आंदोलन, जोशी तर्कतीर्थ लेखसंग्रह, खंड १, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २० ऑगस्ट १९८२, पृ.३३३, ३३४.

८) फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, जाने १९८९, पृ.३६,३७.

९) केळकर न.चिं., लोकमान्य टिळकांचे चरित्र, खंड १, रिया पब्लिकेशस, कोल्हापूर, ऑक्टो २०१२, पृ. ६९.

१०) कित्ता, पृ. ७४ — ७५.

११) सोवनी नी.वी., १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील प्रबोधनाचे स्वरूप, लोकमान्य टिळक व्याख्यानमाला, पुष्प २ रे , टि.म.वि., पुणे, प्रथमावृत्ती, जुलै १९८१, पृ. ४.

१२) जावडेकर शं.द., आधुनिकभारत, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला पुष्प, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमवृत्ती, १९३८, पृ. ७६.

१३) तर्कतीर्थ जोशी लेखसंग्रह, खंड १, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २० ऑ १९८२, पृ. ३३५.

१४) केळकर न.चिं., 'लोकमान्य टिळकांचे चरित्र', खंड क्र.१, रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर, ऑक्टोबर २०१२, पृ. ७१.

१५) कित्ता, पृ. ७१,७२.

१६) कित्ता, पृ. ७२.

१७) केळकर न.चिं., 'रानडे यांची राजकारणविषयक भूमिका, सहयाद्री, रानडे विशेषांक, खंड १५ वा, अंक १ला, जाने १९४२,पृ.९ ते ११.

१८) ओक प्रमोद, एलफिन्स्टन, मुंबईचा गर्व्हनर माउन्टस्टुअर्ट एलफिन्स्टन याचे चरित्र, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २७ मार्च १९९०, पृ.६ व ७.

१९) जावदेकर शं.द., आधुनिक भारत, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला पुष्प, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९३८, पृ.२८, २९.

२०) फडके य.दि.,विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, ३० जाने १९८९, पृ.४,३४, ३५.

२१) कित्ता, पृ. ६५, ६६.

२२) जोशी महादेव शास्त्री (संपा.),भारतीय संस्कृतीकोश, खंड क्र. ७, मराठी भाषा व साहित्य ते राजस्थान, केंद्रीय शिक्षा मंत्रालय, दिल्ली, आणि म.राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई यांच्यां साहयाने प्रकाशित, भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे.

२३) देवगिरीकर,त्रं.र.,काँग्रेसचा उग्दम व प्रारंभ, चित्रमयजगत, वर्ष२६ वे,अंक १ ला, जाने १९३५, पृ. १.

२४) कर्वे द.गो., रानडे यांची राष्ट्रोध्दाराची योजना, सहयाद्री, रानडे विशेषांक, खंड १५ वा, अंक १ला, पुणे,जानेवारी १९४२,पृ. ६७.

२५) केळकर न.चिं., उपरोक्त, पृ. १२, १५.

२६) काळे वा.गो., न्या रानडे हयांची अर्थशास्त्रविषयक कामगिरी, सहयाद्री रानडे विशेषांक, खंड १५ वा, अंक १ ला, जाने १९४२, पृ. २९.

२७) कित्ता, पृ.२९.

२८) फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, ३० जाने १९८९, पृ. ६६.

२९) भोळे भा.ल.,एकोणिसाव्या शतकातील मराठी गदय, खंड २, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, २००८, पृ. XXXIII.

३०) फडके य.दि., उपरोक्त, पृ. ७३ ते ७८.

३१) बनहट्टी श्री.ना., नवभारत ग्रंथमाला २२, टिळक आणि आगरकर, सुविचार प्रकाशन, नागपूर १९५६, पृ. २५,२६.

३२) नौरोजी दादाभाई, महाराष्ट्र कसा होता? मुमुक्षु, २६ सप्टेंबर १९०७, पृ. क्र. २.

# प्रकरण ३ रे

# टिळककालीन सांस्कृतिक व राजकीय जीवन.

टिळकपूर्वकालात व टिळककालात धर्मांचा लोकजीवनावर प्रभाव आढळून येतो, त्यामुळे धर्म ही संकल्पना समजावून घ्यावी लागते. धर्माची एकच एक व्याख्या करता येत नाही. धर्म ही संकल्पना काळाच्या ओघात बदलत गेलेली दिसून येते. याबाबत अनेक विचारवंतानी आपली मते मांडलेली आहेत.

**धर्माची व्याख्या** –

वर्णाश्रम – धर्मसंस्थेचे गुणवर्णन करताना वि. का. राजवाडे असे म्हणतात की, "धर्म म्हणजे कायदा सर्व प्रकारचा कायदा – संसाराचा कायदा, नित्यकर्माचा कायदा, न्याय मनसुबा निवडण्याचा कायदा, शुचिर्भूतपणाने वागण्याचा कायदा ...... असे कायदयाचे, चार्तुवर्ण्याचे राज्य......धर्मराज्य म्हणतात ते हेच. रामराज्य म्हणून जे गातात ते हेच. सौराज्य म्हणून म्हणतात ते हेच."[१] शं. द. पेंडसे असे म्हणतात की, "धृ म्हणजे धारण करणे या धातूपासून 'धर्म' हा शब्द तयार झालेला आहे. काही विशिष्ट नितिनियम घालून घेऊन धर्म हा समाजाचे धारण व पोषण करीत असतो. आहार, निद्रा, भय इ. विकार पशुप्रमाणेच मनुष्यात रागत: प्राप्त असतात. धर्म या पशुप्रवृत्तीला आळा घालण्यास सांगतो. प्रकृतीच्या ताब्यात न जाता प्रकृतीवर ताबा मिळविण्यातच खरा पुरूषार्थ आहे, खरी आत्मोन्नती आहे ही गोष्ट धर्म शिकवितो आणि आत्मोन्नति, आत्मकल्याण अथवा मोक्ष हे ध्येय पुढे ठेवून त्याला अनुकूल असे नितीविषयक नियम धर्म घालून देतो. निश्रेयस किंवा मोक्ष हे मानवजातीचे परम साध्य प्राप्त करून घेण्याकरीता समाजाला स्वाथ्य लाभावे त्याचे धारणपोषण व अभ्युदय व्हावा, अशा प्रयत्न धर्म करीत असल्यामुळेच "यतोभ्युदयानि:

श्रेयससिध्दी: स धर्म: ” अशी धर्माची व्याख्या कणादाने केली आहे. सर्व मानवजातीच्या ऐहिक व पारमार्थिक कल्याणांकरता अवतीर्ण झालेला जो हा ‘धर्म’ तो वेदांनी प्रणीत केलेला असल्यामुळे त्याला ‘वैदिक धर्म’ असे म्हणतात.[२]

## टिळकांच्या काळी असलेला धर्म व महाराष्ट्रातील धार्मिक परिस्थिती —

लोकमान्य टिळकांच्या वैचारिक जडणघडणीवर तत्कालिन धार्मिक परिस्थितीचा प्रभाव पडलेला दिसतो. त्याकाळात हिंदूधर्माला अवकळा प्राप्त झाली होती. कर्मकांड म्हणजे धर्म अशी समाजाची धारणा बनलेली होती. तर दुसऱ्या बाजुला हिंदूधर्मातील इंग्रजी विचार व शिक्षणामुळे प्रभावित झालेला सुशिक्षित वर्ग हिंदू धर्म सुधारण्यासाठी प्रयत्न करीत होता असे दिसते.

लोकमान्य टिळकांची ‘धर्मबुध्दी व धर्मविषयक मते’ या निबंधात श्री.प्रभाकर वासुदेव बापट असे लिहितात की,‘‘ टिळकांच्या विद्याभ्यासाचा काळ म्हणजे हिंदूर्धाला सर्वात अवनतीचा काळ येऊन गेल्यावर थोडया वर्षानंतरचा काळ होय. एका बाजूस सर्व चेतना नष्ट झाल्याप्रमाणे मृतप्राय होऊन अत्यंत अवनतीस पोचलेला हिंदू धर्म, त्यांचे दुर्बल व कर्तव्याधिकाराच्युत धर्माधिकारी, व त्याच्यावर हल्ला करणारे परधर्मीय मिशनरी, तर दुसऱ्या बाजूस इंग्रजी विद्येचा प्रसार झाल्यामुळे, पाश्चात्यांकडील बुध्दी व प्रत्यक्ष प्रमाण याला श्रेष्ठ मानून तदनुरोधाने आपल्या कर्तव्याचा विचार करणाऱ्या तत्वज्ञान्यांचे अनुयायी बनल्याने, धर्माविषयी उदासिन असणारे सुशिक्षित, यामध्ये हिंदूधर्माची स्थिती फार भयंकर झाली होती. यावेळी सुशिक्षित लोकांच्या नविन विचारांच्या योगाने ‘हिंदू धर्माच्या’ अवनत स्वरूपात ज्या वाईट चाली रूढ झाल्या होत्या,

त्यांचा तिटकारा उत्पन्न होऊन पाश्चात्य धोरणाने त्या सुधारण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू होता.''[३]

लोकमान्य टिळक राष्ट्रनिष्ठ असले तरीही, पारंपारिक रूढी, परंपरा, चालिरीती व तत्कालीन सनातनी धार्मिक जिवनाच्या विरूध्द जाण्याचे धाडस लो. टिळकही करू शकले नाहीत असे त्यांच्या पत्नी सत्यभामाबाई टिळक यांच्या आठवणीवरून दिसून येते असा उल्लेख येतो. याबाबत सिध्देश्वरशास्त्री चित्राव यांची आठवण दिसून येते.[४] लोकमान्य टिळकांच्या रूढी, परंपरेविषयीच्या विचारांची आठवण लिहिताना लक्ष्मण भिडे असे लिहितात की, ''फार पुरातन कालापासून चालत आलेली ही रूढी एकदम मोडणे शक्य नाही. उतावीळ काही तरी करण्यात अर्थ नाही, दमाने घेतले पाहिजे अस्पृश्य समाजाचे लोकमत अनुकूल करून घेण्याचा आम्ही कसून प्रयत्न केला पाहिजे. अस्पृश्यांनीही आपल्यातील दोष काढून टाकले पाहिजेत. शेवटी ज्या कामास मी स्वताला वाहून घेतले आहे ते सर्व जातीचे असल्यामुळे प्रत्यक्ष शक्य नसले तरी अप्रत्यक्षपणे ती अस्पृश्यांच्या उध्दारार्थच झटत आहे.''[५]

चिपळूकरांनी आपल्या लेखनाच्या माध्यमातून समाज विघातक रूढी, परंपरा, अंधश्रध्दा इत्यादीवर आघात करून वैज्ञानीक दुष्टीकोन मांडण्याचा प्रयत्न केला. लोकमान्य टिळकांच्या वैचारिक जडणघडणीत ही बाब महत्वाची ठरल्याचे दिसते. विष्णुशास्त्री चिपळूकरांच्या विचारांचा मागोवा घेता य.दि.फडके असे लिहितात की, '' विष्णुशास्त्री कर्मठ सनातनी नव्हते. देशकाल परिस्थितीनुरूप जे बदल करणे आवश्यक व अपरिहार्य ठरेल ते आस्ते आस्ते करावेत, लोकांचे मन वळवून ते त्यांच्या गळी उतरवावेत आणि तसे करताना समाजाची, धर्माची मूळ चौकट न बदलता शक्यतो पंरपरा जतन कराव्यात असा त्यांचा 'कौझव्हैटिव' दृष्टिकोन होता. भुतेखेते, शुभशकून, तिथी, वार, नक्षत्रे वगैरेंची फले पाहण्याचा प्रघात वगैरेवर त्यांचा

विश्वास नव्हता. ज्ञानार्जनाने हे लोकभ्रम दूर होतील असे त्यांना वाटत असे. ब्राम्हणांच्या पोटजातीत विवाह व्हावेत, बालविवाहाची केशवपनाची दृष्टचक्र नष्ट व्हावी, विधवांना विवाहाची मुभा दयावी स्त्रियांना शिक्षण दयावे याबाबत त्यांचे टिळक, आगरकर वगैरे सहकाऱ्यांशी स्थूल मानाने एकमत होते.''[६]

विष्णुशास्त्री चिपळूकर यांनी लोकभ्रम या विषयावर तीन निबंध लिहिले यात ते लिहतात,'' या निबंधात आपल्या लोकांत आज फार दिवसांपासून जी कित्येक खुळे माजली आहेत त्याविषयी लिहावयाचे आहे. ही खुळे म्हणजे भुते, खेते, शकुन, मंत्र, ग्रहांचे शुभाशुभ योग, देव, नक्षत्र, किमया, रमल इत्यादी होत. यावर बहुतेक लोकांच्या विश्वास असल्यामुळे लबाडांस फावून लोकांचे फार नुकसान होते. अेक तर हे सर्व निव्वळ भ्रांतीचे प्रकार असल्यामुळे हे मनास जडले असता त्यांस क्षीणत्व येते. शिवाय काळाचा, श्रमाचा व पैशाचा विनाकारण खर्च होतो.''[७] डॉ.रा.गो. भांडारकर देशाची खरी उन्नती व्हावयाची असल्यास उन्नत धर्माचा प्रसार व धर्मजागृतीचे महत्व विशद करताना दिसून येतात आपल्या एका व्याख्यानात ते असे म्हणतात की, ''जी गोष्ट व्यक्तीची तीच देशाची. खरी उन्नती व्हावयाची असेल, तर प्रथम उन्नत धर्माचा प्रसार झाला पाहिजे, राजकीय हक्क प्राप्त करून घेण्यास राष्ट्रीय सभा भरवा अथवा प्रांतीक सभा भरवा किंवा सामाजिक सुधारणा घडवून आणल्यास सामाजिक परिषद भरवा, परंतु जोपर्यंत धर्मजागृती झाली नाही, तोपर्यंत देशास हया खटपटीत खरे यश यावयाचे नाही. प्रथम आत्म्याचीच उन्नती झाली पाहिजे.''[८]

आधुनिक भारताच्या जडणघडणीमधील अत्यंत महत्वाचे कार्य स्वामी दयानंद सरस्वती यांनी केलेले दिसून येते. त्यांच्या या कार्याविषयी 'आधुनिक भारताची जडणघडण: धर्मपरिवर्तन,' या लेखात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी असे लिहितात की, '' धर्मपरिवर्तनाच्या आंदोलनातील

अत्यंत थोर व्यक्ती म्हणजे स्वामी दयानंद सरस्वती होय, त्यांनी वैदिक धर्माला नवा उजाळा दिला. मूर्तिपूजा, श्राध्द, अवतारवाद, जातिभेद, स्पर्शस्पर्श या प्रकारचे धर्माचार हे खरे वैदिक धर्माचार नव्हते वेदात यांना थारा नाही. पुराणे व स्मृतिग्रंथ हे खरे धर्मग्रंथ नव्हेत, आर्यधर्म हा सर्व मानवांचा धर्म आहे इतर अवैदिक धर्म उपधर्म होत. असा आक्रमक सिध्दान्त प्रतिपादणारा महर्षी प्रथमच हिंदू धमैतिहासात दयानांदांच्या रूपाने प्रकट झाला.''[९]

विष्णुशास्त्री पंडित यांनी महाराष्ट्रात समाजसुधारणेच्या बाबतीत विशेष कामगिरी केल्याचे दिसून येते या संबंधात डॉ.द.ल.सहस्त्रबुध्दे आपल्या 'रानडे आणि सामाजिक सुधारणा', या लेखात असे लिहितात की, ''विष्णुशास्त्री पंडीत हे फार मोठे समाजसुधारक होवून गेले. विष्णुशास्त्री फार मोठे विव्दान होते. त्यांनी समाजसुधारणेच्या बाबतीत विशेष कामगिरी केलेली आहे. सामाजिक सुधारणा कोणत्या अवश्य आहेत, त्या रूढ झाल्याने समाजाला कोणते फायदे होणार आहेत त्यात, न्याय, दया कशा प्रकारे समाजात येअील यांची साधक बाधक प्रमाणे देण्याचे काम त्यांनी केलेच पण त्याच्याहि पुढे जाऊन ज्या सामाजिक सुधारणा अवश्य म्हणून लोकांना आपण सांगतो त्याला शास्त्राधार आहे, या सामाजिक सुधारणा केल्याने आपण धर्मविरूध्द जात नाही पूर्वीच्या आपल्या उच्च कालांतील चालीच आपण समाजात आणण्याचा प्रयत्न करीत आहोत, यात समाजाचे कल्याण आहे, देशाचे हित आहे अशी लोकांची खात्री पटविण्याचे काम अबाधित चालू ठेवले होते.''[१०] आगरकरांनी आपल्या विचार, लेखनांच्या माध्यमातून तत्कालीन समाजचिकित्सा करून तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर टिका केलेली दिसून येते. आगरकरांच्या विचारांचा मागोवा घेता न.चिं.केळकर असे म्हणतात की,'' धर्म, स्त्रीशिक्षण, घटस्फोट, स्त्रीपुरूष प्रेम, जातिभेद,

सहशिक्षण, सोवळे ओवळे, स्त्रीपुरूष वेषभुषा इत्यादी सर्व विषयांची चिकित्सा करून लोक जुने ते सोने  समजून तेच ऊराशी धरून कसे बसतात आणि सुधारणेला ते किती भितात किंवा तिरस्करणीय मानतात, हे त्यांनी आपल्या 'सुधारक'पत्रांतून निर्भिडपणे व धैर्याने दाखविलेले आहे.''[११]

महाराष्ट्रात समाज सुधारणेच्या क्षेत्रात न्या रानडयांनी समाज सुधारणेची चळवळ केलेली दिसून येते. रानडे यांची राष्ट्रोध्दाराची योजना या सहयाद्री, जाने १९४२ च्या लेखात प्रा. द. गो. कर्वे रानडेंच्या सामाजिक सुधारणा चळवळीसंबधी असे लिहितात की, ''रानडे हयांस सुधारक पक्षाचे अग्रणी समजत असत ते खरोखरच हया व्यापक अर्थानेच होय. बालविवाह, स्त्री शिक्षण, अस्पृश्यता निवारण, प्रौढविवाह इ. बाबतीत त्यांच्या नेतृत्वाखाली जी चळवळ झाली तीस सामाजिक सुधारणेची चळवळ असे म्हणायचा प्रघात आहे आणि सामान्य अर्थाने तो योग्यही आहे.''[१२] महात्मा ज्योतिबा फुले यांनी सुरू केलेल्या ब्राम्हणेतर चळवळीचे वाहक या नात्याने कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांचे विचार व कार्य यांचा उल्लेख करता येतो. कोल्हापुरच्या दरबारात निर्माण झालेले विविध धार्मिक प्रश्न आणि त्याच्या ब्राम्हणी धर्म व संस्कृतीशी असलेला संबंध विचारात घेता ही बाब ही समस्या ब्राम्हणी संस्कृती आणि अब्राम्हणी संस्कृती यांच्या संघर्षाचे प्रतीक मानली जाते या संघर्षाविषयी न.चिं.केळकर असे लिहितात की, '' वेदोक्त प्रकरण, ब्राम्हणेतर चळवळ आणि वरिष्ठ राजकारण यांत जेव्हा महाराज विशेष लक्ष घालू लागले. तेव्हा मात्र या तीनही दृष्टीनी टिळकांविषयी त्यांच्यामनात अप्रीती उपन्न झाली. वेदोक्तासंबंधीने महाराजांना वाटे की,'' हे माझे घरचे व दरबाराचे काम आहे. यात टिळकांनी लक्ष का घालावे? माझ्या अुपाध्याचे मी काय वाटेल ते करीन त्याचे गाऱ्हाने घेवून ते जगप्रसिध्द केल्याने माझी बदनामी होते.''

''ब्राम्हणेतर चळवळीसंबंधाने टिळकांवर महाराजांचा राग ... महाराजांची समजूत अशी की, टिळक हे ब्राम्हण्याचे कट्टर पुरस्कर्ते असून त्यांच्या बळावर ब्राम्हणत्व थोडे बहुत जिवंत आहे आणि वरिष्ट राजकारणांत तर टिळक हे सरकारचे शत्रु म्हणून ते महाराजांचे शत्रु सामाजिक बाबतीत लोकशाही अवतरावी असे महाराजांचे मत असले तरी राजकीय सत्ता म्हटली म्हणजे तेथे मात्र पुरी राजेशाही किंवा नोकरशाही असावी असा त्यांचा सिध्दान्त असे.''[१३] त्याकाळामध्ये महाराष्ट्रात ब्राम्हण व ब्राम्हणेतर सांस्कृतिक चळवळीविषयी वृत्तपत्रांमधून परस्परविरोधी लेखन केल्याचे आढळते.''[१४] महात्मा फुले यांच्या काळी समाजसुधारणेचे प्रयत्न होत होते. सुधारक व सनातनी यांच्या नकळत समाजसुधारणेबद्दल वादविवादही होत असत. त्या काळातील समाज सुधारणेच्या प्रयत्नाबद्दल महाराष्ट्रातील धर्मसुधारणेचे आंदोलन या लेखात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी असे लिहितात की, ''हिंदू धर्म ग्रंथाच्या आधारे समाज सुधारणेचे प्रयत्नही या काळी होत होते. प्रौढ विवाह व विधवाविवाह यांना अनुकूल किंवा इतर अनेक सामाजिक सुधारणांना अनुकूल अशी धर्मबद्दल वचने पुष्कळ सापडतात. त्यांच्या आधारे आम्ही धर्मसुधारणा करीत आहोत अशी भूमिका घेणारे सुधारकही सुधारक पंथात होते. या भूमिकेला विरोधीही धर्मशास्त्र प्रवचने पुष्कळच सापडतात.सुधारक व सनातनी यांच्यात त्या काळी वादविवादाच्या सभा भरत.परस्परांना विचारांचे खंडण व मंडन करणारे वादविवाद वृत्तपत्रात वा पुस्तक पुस्तीकांच्याद्वारे प्रसिध्द होत. विधवा विवाहांचे, प्रौढ विवाहांचे जातिजातीत सहभोजनाचे समारंभ घडवून आणले जात. अशा प्रकारचे बंगाल व महाराष्ट्र या प्रदेशातील शिक्षित व पांढरपेशा समाजात आंदोलन सुरू झाले.सनातनी वर्ग बहुसंख्य असल्यामुळे सुधारकांवर बहिष्कार पडू लागले. त्याच कच्या दिलाचे सुधारक माघार घेत. धर्मशास्त्री वचनांच्यां आधारे समाज सुधारणाच्या प्रयत्नात राममोहनरॉय,

विद्यासागर इ. मंडळींनी प्रथम पुढाकार घेतला. त्यांचे लोण महाराष्ट्रातही पोहचले. महाराष्ट्रात शंकरचार्याचा धर्मपीठ म्हणून फार मोठा अधिकार पांढरपेशा वर्गात मानला जात होता. परंपरागत धर्मपीठे समाजसुधारणेच्या विरूध्द होती.त्यांचे फतवे किंवा धर्माज्ञा समाजसुधारकांच्या विरूध्द निघत.[१५]

महात्मा फुले यांनी पुरोहितशाहीच्या विरोधात लोकजागृती करण्यासाठी ‘गुलामगिरी’ हा ग्रंथ लिहिला.[१६]‘गुलामगिरी’ ग्रंथाच्या माध्यमातून महात्मा फुले यांनी पुरोहितशाहीवर आघात करून ब्राम्हणेत्तर समाजात जागृती करण्याचा प्रयत्न केला.[१७] महात्मा फुले यांनी आपल्या लेखनाच्या माध्यमातून ब्राम्हणी धर्म, देवता व पौराणिक कथा यांच्यावर आघात करण्यासाठी बहुजनांची नवी मानके (प्रतिके) व कथा निर्माण केल्या.[१८](उदा. बळीची कथा.),महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्माच्या माध्यमातून सत्याचे महत्व समाजावर बिबंवण्याचा प्रयत्न केला तसेच पुरोहितशाहीला आव्हान देण्यासाठी ब्राम्हणेतरांची प्रतिसंस्कृती उभी करण्यासाठी प्रयत्न केले.[१९]सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून सार्वजनिक सत्यधर्म व ब्राम्हणेतरांची सांस्कृतिक चळवळ उभी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. बहुजन समाजामध्ये स्वाभीमान जागृती व राजकीय आकांक्षा निर्मितीसाठी महात्माफुले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा लिहिला. हा पोवाडा ब्राम्हणेतरांना प्रेरणा व प्रोत्साहन देणारा होता.[२०] ब्राम्हणी धर्माच्या शोषणाचे बळी ठरलेल्या स्त्री—शुद्रांना माणूस म्हणून जगण्याची प्रेरणा व शक्ती महात्मा फुले यांच्या विचार, लेखन व कार्य यामुळे मिळाली त्यामुळे महाराष्ट्रात ब्राम्हणी संस्कृतीला पर्याय देणारी अब्राम्हणी संस्कृती महाराष्ट्रात रूजली गेल्याचे आढळते.[२१]

टिळककालीन महाराष्ट्रतील धर्म व संस्कृतीवर प्रभाव टाकणारा एक महत्वाचा घटक म्हणून ख्रिस्ती मिशनऱ्यांच्यां धर्मप्रसाराच्या चळवळीच्या विविध मार्गांचा उल्लेख करावा लागतो. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कार्याविषयी

तर्कतीर्थ जोशी असे लिहितात की,‘‘ परंपरागत रूढी, चालीरिती, पुजाप्रकार या सर्वांवर ख्रिश्चन मिशनरी जोराचा टिकाप्रहार करू लागले. त्यांनी इंग्रजी शिक्षणाची विद्यालये स्थापली. ख्रिश्चन धर्माच्या मठांचा विस्तार केला. नियतकालिके व वृत्तपत्रे काढली. पुराणकथा, मूर्तिपुजा, तीर्थयात्रा, व विशेष: कृष्णचरित्र यांच्यातील विसंगती, तर्कदृष्टता, अनाचार दाखवून ख्रिश्चन धर्मप्रचारकांनी विद्यालयांतील हिंदू विद्यार्थ्यांना हे वेडगळ प्रकार कसे आहेत हे पटविण्याचा सतत प्रयत्न केला. परंतू ख्रिश्चन धर्म प्रचारकांना त्यात पाहिजे तसे यश मिळाले नाही हिंदू धर्मातील उच्च वर्गातील फार थोडया व्यक्तींना ख्रिश्चन धर्माची दीक्षा घेण्याची बुध्दी झाली. आधुनिक पाश्चात्य शिक्षणाचा मात्र परिणाम फार खोल झाला. ख्रिश्चनांची बाटविण्याची म्हणजे हिंदूनां धर्मांतराची चळवळ यशस्वी होवू शकली नाही परंतू हिंदू धर्माचीच अंतर्गत परिवर्तन होवून त्याला नवा आकार देण्याचे व त्याचे मूलगामी परिवर्तन करण्याचे प्रयत्न मात्र जोरात सुरू झाले.[२२] अशा प्रकारचे उल्लेख य.दि.फडके यांच्या पुस्तकात येतात. हिंदू धर्म व संस्कृतीवर खिस्ती मिशनऱ्यांकडून होत असलेल्या आघाताला प्रत्युत्तर म्हणून महाराष्ट्रातील विव्दान विचारवंत आपल्या परीने प्रयत्न करीत होते त्यात

१. मोरभट्ट दांडेकर यांनी रेवरंड जॉन विल्सन यांच्यांशी जाहीर वादविवाद केला होता.
२. कृष्णशास्त्री चिपळूकर यांनी १८५२ साली ‘विचारलहरी’ हे पत्र काढले, त्यात मिशनरी व खिस्ती धर्म यांच्यांवर टीका असे.
३. वेदशास्त्रसंपन्न कृष्णशास्त्री साठे यांनी १८५२ साली मुंबईत ठाकुरव्दारला खिस्ती धर्माविरूध्द व्याख्यानमाला गुंफली.
४. गंगाधरशास्त्री फडके यांनी ‘हिंदुधर्मतत्व’ नावाचे पुस्तक लिहून हिंदूधर्माचे गुणगान केले होते.

५. विष्णु भिकाजी गोखले उर्फ विष्णुबाबा ब्रम्हचारी (१८२५ – १८७१) विष्णुबाबा आणि मिशनरी यांच्यांमधील वादाची हकीकत 'समुद्रकिनारीचा वादविवाद' या पुस्तकात आढळते. 'वेदोक्त धर्मप्रकाश' या ग्रंथावरून त्यांना वैदिक धर्म, संस्कृत विदया, गुणकर्माधिष्ठित चातुवर्ण्यपध्दती यांचा कसा जबरदस्त अभिमन वाटत होता हे दिसते. गर्दीला भुरळ घालणाऱ्या आपल्या वकृत्वाच्या जोरावर विष्णुबुवांनी पंधरासोळा वर्षे दौरे काढून ख्रिस्ती मिशनऱ्यांच्यां प्रचारास उत्तर म्हणून अनेक व्याख्याने दिली. १८६७ साली प्रसिध्द झालेल्या त्यांच्या 'सुखदायक राज्यप्रकरणी निबंध' या शीर्षकाच्या छोटया पुस्तीकेची त्याच साली प्रसिध्द झालेल्या कार्ल मार्क्सच्या कॅपिटलशी तुलना करण्याच्या आणि विष्णुपंतांचा गौरव करण्याचा अनेकांनां मोह होतो. विष्णुबुवांची काही मते त्यांच्या काळाच्या संदर्भात लक्षात घेतली तर खरोखरच पुढारलेली वाटतात. पुनर्विवाहास, घटस्फोट घेण्यास, स्त्रियांना शिक्षण देण्यास त्यांचा विरोध नव्हता. सती जाण्याच्या चालीस तसेच बालविवाह, जरठ बालविवाह, विषमविवाह या रूढीना त्यांचा विरोध होता. जन्मजात जातीभेद नसावेत. तसेच महार मांग वगैरे नीच मानल्या गेलेल्या जातींची उन्नती व्हावी यासाठी ब्राम्हणांनी प्रयत्न करावेत असे ते सांगत.[२३]

**<u>इंग्रजी शिक्षणपध्दती</u>**

इंग्रजांच्या आगमनामुळे शिक्षणाचे दारे सर्वांसाठी खुली झाली त्यामुळे भारतीय संस्कृतीतील वैगुण्य, खुल्या चालीरीती याबाबत आत्मचिंतन करून सुधारणा घडवू पाहणारा शिक्षितांचा नवा वर्ग समाजात जन्माला आला त्यामुळे महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनाचा नवा पैलु पुढे

आला या संदर्भात तर्कतीर्थ जोशी असे लिहितात की, ‘‘ इंग्रजी शिक्षणपध्दतीने परंपरागत भारतीय संस्कृतीच्या जीवनमूल्यांची समीक्षा करणारी नवी सुशिक्षितांची पिढी निर्माण झाली. ब्रिटीश राज्याची भारतात स्थापना झाली व नव्या शिक्षणपध्दतीचा पाया घातला गेला. त्यामुळे भारतीयांची अंधश्रध्देत गुरफटलेली व आगतिकतेत सापडलेली विवेचक बुध्दी मुक्त झाली. ब्रिटीश राज्याच्या स्थापनेच्या अगोदर ब्रिटीशांचा व इतर युरोपियंनाचा संपर्क सतत वाढत होता. त्यांच्या औद्योगिक क्रांतीचे वारेही भारताच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यावर येवून आदळत होते. ब्रिटींशाच्या राज्यस्थापने नंतरच आधुनिक शिक्षणाच्या व्दारे प्रबोधनाची प्रभात येथे उजाडली. आधुनिक शिक्षण, वाडमय व कला यांच्या शिक्षणाच्या लाभ काही थोडया भारतीयांना झाल्याबरोबच प्रतिभाशाली व संवेदनशील अशा अत्यंत अल्प शिक्षितांच्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलून गेला. विद्युत अंधाराने यंत्र थरथरावे त्याप्रमाणे त्यांची मने नवविचारांनी थरारू लागली. सामाजिक,धार्मिक संस्थांना बदलण्यास व तशी नव्या संस्था उभारण्यास आवश्यक असलेली आधुनिक दृष्टी लाभली.[२४] नवशिक्षितांच्या वर्गांतूनच महाराष्ट्रातील समाजात राजकीय जागृती करणारे समाजसुधारणा करणारे लोक पुढे आले. त्यात पंडीत रमाबाई रानडे, बाया कर्वे, आनंदीबाई जोशी, बिपिन मेधावी, नानाशंकरशेठ, डॉ.रखमाबाई, ताराबाई शिंदे, काशीताई कानिटकर[२५] त्याकाळातील स्थापन झालेल्या संस्थांची नावे १) परमहंस सभा, २)प्रार्थना समाज[२६]३) उपयुक्ताप्रसार सभा, ४) कल्याणोन्नयक सभा.[२७]

अशाप्रकारे टिळककालीन महाराष्ट्रात टिळकांच्या पूर्वसुरींनीं सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व धर्मविषयक जागृती इत्यादी क्षेत्रात कार्य केल्याचे आढळून आले. ब्राम्हणेत्तरांची चळवळ टिळक कार्यात पडण्यापूर्वीची आहे असे आढळून येते. महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या

ब्राम्हणेत्तर चळवळींचे वाहक या नात्याने कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांनी कार्य केल्याचे दिसून येते.

## लोकमान्य टिळकांचे धर्मविषयक विचार —

धर्म ही समाज परिवर्तन करणारी, समाजाला वळण लावणारी, नैतिक मार्गदर्शन करणारी संस्था आहे व ती मोडता कामा नये ही टिळकांची भूमिका होती.धर्मभेद, उपासनापंथातील विविधता टिळक मानीत. कोणत्याही धर्माबद्दल आकसबुध्दीने वागू नये अशी त्यांची भुमिका होती.[२८]

## लोकमान्य टिळकांच्या धर्मविषयक व्याख्या —

१) "धर्म केवळ आध्यात्मीक कल्पना नसुन समाजाला वळण लावण्यासाठी, त्याचे शील किंवा चारित्र्य बनविण्यासाठी धर्माचा व्यावहारिक उपयोग होतो असे टिळकांचे मत होते."

२) "धर्म शब्दात परमेश्वराच्या ज्ञानाचा व त्याची कृपा संपादन करून घेण्याच्या मार्गाचाच उपयोग होतो असे नाही, तर त्याबरोबर काही सामाजिक, व्यावहारिक व नैतिक आचारांचा आणि आयुष्यातील प्रसंगाविशेषी कराव्या लागणा–या विधिंचा व संस्कारांचाही त्यात समावेश केला जातो."[२९]

३) लोकमान्य टिळक हिंदु धर्माची व्याख्या करताना असे म्हणतात की, "वेदांच्या ठिकाणी प्रमाण्यबुध्दी म्हणजे वेद प्रमाण मानणे, ईश्वरप्राप्तीची साधने अनेक आहेत हे मान्य करणे आणि उपास्य दैवत अमुकच असले पाहिजे असा नियम नसणे हे आमच्या धर्माचे लक्षण होय."

"प्रमाण्यबुध्दिवैदेषु साधनानामनेकता ।
उपस्यानाम, नियम श्रचैतदधर्मस्य लक्षणम" ।

४) भा. कृ. केळकर आपल्या 'टिळक विचार' या ग्रंथात टिळकांनी केलेली हिंदू धर्माची व्यापक व्याख्या सांगताना असे लिहीतात की, "हिंदूस्थानात राहणारा जो जो असेल तो तो हिंदू असेल मग तो हिंदू कोणत्याही धर्माचा असो."[३०]

**हिंदूधर्माचे लक्षण** —

टिळक कुठल्याही धर्माचा द्वेष करित नसले तरी आपला धर्म कसा श्रेष्ठ आहे, चांगला आहे हे पटवून देण्यासाठी प्रयत्न करताना दिसतात. हिंदूधर्म वैविध्याने नटलेला आहे. हिंदूधर्मात विविधता आहे. परधर्मीय लोक हिंदूधर्माच्या विविधतेचा मुद्‌दा पुढे करून टिका करतात. परधर्मीयांच्या टिकेला उत्तर देण्यासाठी व हिंदुधर्माची महती पटवून देण्यासाठी टिळक हिंदू धर्माची लक्षणे सांगतात.[३१]

**हिंदूधर्माचे स्वरूप लक्षण** —

'हिंदू धर्माची' लक्षणे सांगताना ब्रम्ह, स्मृती, श्रुती, पुराणे, आचार, पोषाख, धर्मग्रंथ, हिंदूचे धर्मग्रथ म्हणून वेदांची महती टिळकांनी सांगितलेली आहे. लोकमान्य टिळकांनी हिदूधर्माची महती, व्यापकता पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. या भाषणाच्या अखेरीस टिळक हिंदू धर्माची व्याख्या करून त्याचा अर्थ असा सांगतात की, "वेदांच्या ठिकाणी प्रामाण्यबुध्दी म्हणजे वेद प्रमाण मानणे, ईश्वरप्राप्तीची साधने अनेक आहेत हे मान्य करणे आणि उपास्य दैवत अमुकच असले पाहिजे असा नियम नसणे हे आमच्या धर्माचे लक्षण होय."

लोकमान्य टिळक हिंदू धर्माची व्यापक व्याख्या सांगताना असे म्हणतात की, "हिंदुस्थानात राहणारा जो जो असेल तो तो हिंदू मग तो कोणत्याही धर्माचा असो."[३२]

**लोकमान्य टिळकांचे राष्ट्रीयत्वात 'हिंदूत्वरक्षण' हे तत्व होते.** —

लोकमान्यांच्या राष्ट्रीयत्वात हिंदूत्वरक्षण हे प्रमुख तत्व होते. त्या संदर्भात 'लोकमान्य टिळक व महात्मा गांधी' या ग्रंथात आचार्य शं.द. जावडेकर असे म्हणतात की, "आपल्या राष्ट्रीय कल्पनेला धर्माचा आधार घ्यावा असे जेंव्हा वेदान्ती म्हणतो, तेव्हा हा धर्म म्हणजे हिंदू धर्म, मुसलमानी धर्म किंवा ख्रिस्ती धर्म, यापैकी कोणता तरी एक धर्म असा त्याचा अर्थ नसतो. लोकमान्यांच्यां राष्ट्रीयत्वात 'हिंदुत्वरक्षण' हे प्रमुख तत्व होते असे म्हणावयाचे असेल तर त्याच त्यांच्यां राष्ट्रीयत्वात मुसलमानत्व रक्षण किंवा ख्रिस्तीत्व रक्षण ही तत्वेही अंतर्भूत होतात असेही म्हणावे लागेल. वेदान्ती धर्मदृष्टिला हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती हे निरनिराळे धर्म नसून ते एकाच विश्वधर्माचे पंथ दिसतात. प्रत्येक धर्मातील संकुचित वृत्ती नष्ट करून सर्वांची अंतःशुध्दी करणे हा मार्ग आहे असे वेदान्ती मनुष्याला वाटते. लोकमान्यांनी याच व्यापक धर्मभावनेचा आपल्या राष्ट्रीयत्वाला आधार घेतला व म्हणून त्यांची हिंदू मुसलमानांच्या ऐक्यावर आरंभापासून शेवटपर्यत दृढ श्रध्दा होती."[३३]

**धर्माचे महत्व** —

लोकमान्य टिळकांनी सोलापूर येथील दि २६ जानेवारी, १९०८ रोजीच्या भाषणात 'धर्माचे व्यावहारिक व राजकीय महत्व' स्पष्ट करताना 'रामदास स्वामींच्या' विचारांचा आधार घेऊन स्पष्ट केलेले दिसून येते.[३४]

लोकमान्य टिळकांची धार्मिक कामगिरी स्पष्ट करताना प्रभाकर बापट असे म्हणतात की, "टिळकांचे खरे संघटनात्मक कार्य म्हटले म्हणजे हिंदी राष्ट्राचा अभ्युदय पुनरूज्जीवनाने होणार या महासिध्दांताची स्थापना होय." टिळकांचा आग्रह लोकांच्या संमतीनेच लोकांवर बंधने घातली पाहिजेत एवढया पुरताच होता.

टिळकांची दुसरी धार्मिक कामगिरी म्हणजे धर्मोपदेशकाचे त्यांनी केलेले कार्य होय. हिंदूधर्माविषयी त्यांची अनिश्चितता जाऊन त्यातील तत्वज्ञानावर त्याची श्रध्दा बसताच त्यांनी धर्माविषयी रास्त अभिमान उत्पन्न करून धर्मजागृती करण्याचा प्रयत्न केला. आपल्या धर्मामध्ये वाईट गोष्टी शिरल्या असल्या तरी त्याचा पाया फार चांगला आहे. हे पाश्चात्य व पौर्वात्य तत्वज्ञान यांच्यां तुलनात्मक विवेचनाने सिध्द करून त्यांच्याविषयी अभिमान उत्पन्न केला. यामुळे नविन पिढीतील सुशिक्षित लोकांच्या मनातील धार्मिक अश्रध्दा जाऊन त्यांची हिंदूधर्मावर श्रध्दा बसत चालली.

टिळकांची सर्वात मोठी धार्मिक कामगिरी म्हटली म्हणजे त्यांनी केलेली 'प्रवृत्तीमार्गाची स्थापनाच' होय. टिळकांनी पाश्चात्य मनुजसेवेचा मार्ग घेऊन हिंदुच्या तत्वज्ञानाशी त्यांची सांगड घातली व अशा त-हेने हया दोन मार्गांचा मिलाफ केला.[३५]

अशाप्रकारे टिळककालात महाराष्ट्रातील सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक परिस्थिती दिसून येते.

## टिळककालीन राजकीय जीवन

### राजकीय जागृती

१९ व्या शतकातील महाराष्ट्रात समाजधुरीणांनी सामाजिक सुधारणांना प्राधान्य दिल्यामुळे स्वातंत्र्याचा विचार मागे पडला. समाजात एक प्रकारची राजकीय सुस्तता आणि स्वस्थता आलेली दिसून येते. अशा समाजाला राजकीयदृष्टया जागृत करण्यासाठी आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याला प्राधान्य देण्यासाठी जहाल राष्ट्रवादाची आवश्यकता विष्णुशास्त्री चिपळूकरांना वाटल्याचे दिसून येते व त्यासाठी त्यांनी राष्ट्रवादी विचार आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याला प्राधान्य देणारा विचार मांडून महत्वाचे विषय मांडून लोकशक्ती जागृत करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.[३६]

विष्णुशास्त्रींनी स्वसंस्कृती अभिमानाची जाणीव सतत जोपासली. ब्रिटीशांनी केलेल्या शोषणावर त्यांनी प्रकाश टाकून ब्रिटिशांनी आपल्या देशाची कशी हालाखीची आणि दयनिय स्थिती केली आहे हे सांगण्यासाठी त्यांनी रूपकांचा वापर केलेला दिसून येतो.[३७]

विष्णुशास्त्रांच्या मते ब्रिटिश राजवटीचा मुख्य परिणाम म्हणजे 'स्वातंत्र्यनाश' स्वातंत्र्यनाशामुळे आपण ब्रिटिशांचे फक्त शारिरीक गुलाम झालो नाही तर मानसिक आणि बौध्दिकदृष्टीने आपण ब्रिटिशांचे गुलाम झालो आहोत. असे विचार मांडून ब्रिटिश राजवटीच्या महाभयंकर परिणामावर त्यांनी  प्रकाश टाकलेला दिसून येतो.[३८]

निबंधमालेल्या उदयानंतरच महाराष्ट्रात क्रांतीकारक राजकीय विचारांना सुरूवात झाल्याचे दिसून येते. १८९५ नंतरच्या महाराष्ट्रात क्रांतीकारी राजकीय विचारांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केल्याचे दिसून येते. केसरी आणि काळ हि दोन्ही उग्र राष्ट्रवादावर भर देणारी पत्रके निबंधमालेपासुन प्रेरणा घेवूनच निर्माण झाल्याचे दिसून येते. [३९]

२८ डिसेंबर १८८५ मुंबई येथे भरलेल्या पहिल्या काँग्रेसमध्ये काँगेस भरविण्याची उद्देश चतुष्य सांगितले होते असे दिसते. यासंदर्भात, 'काँग्रेसचा उग्दम व प्रारंभ' या लेखात त्र्यंबक देवगिरीकर असे लिहितात की,''डफरीनने सामाजिक प्रश्नांकरता काँग्रेस नको, राजकारणाकरिता पाहिजे, असे स्पष्ट मत दिले. तसेच गव्हर्नर अध्यक्ष झाला तर लोक मोकळेपणाने बोलणार नाहीत म्हणून त्याला अध्यक्ष करू नये असे सांगितले. आपण हिंदुस्थानांत आहो तोवर या कल्पनेचा जनक मी आहे, ही गोष्ट फोडू नये, असेहि लॉर्ड डफरीन यांनी हयूमला बजावले.

२८ डिसें १८८५ मुंबई अधिवेशनाचे अध्यक्ष उमेशचंद्र बानर्जी यांनी आपल्या भाषणांत कॉग्रेस भरविण्याचे उद्देश चतुष्य सांगितले ते असे,

१)''हिंदुस्थानकरता असणाऱ्या साम्राज्यातील निरनिराळया कळकळीच्या कार्यकर्त्यांमध्ये मैत्रीचा सलोखा वाढविणे. २) वर्ण, जात, प्रांतिक वृत्ती यांचे परसारांतील स्नेहसंवर्धनाने उच्चारण करणे, लॉर्ड रिपनच्या कारकीर्दीत उत्पन्न झालेल्या एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेची वाढ व संघटना करणे. ३) सांप्रतच्या महत्वाच्या व निकडीच्या सामाजिक प्रश्नांबद्दल देशांतील सुशिक्षित वर्गाची विचारांती बनलेली परिपक्व मते मागवून संग्रहित करणे. ४)पुढील बारा महिन्यांत कोणते सार्वजनिक कार्य पुढाऱ्यांनी करणे जरूर आहे, ते ठरविणे.'' [४०]

१८८५ ते १९०५ पर्यंतच्या काँग्रेस कार्याचा परिणाम झालेला दिसून येतो. स्वराज्याशिवाय आपला उध्दार होणार नाही, अशी भावना लोकांत निर्माण करण्यात काँग्रेस यशस्वी झाली असे दिसून येते, या संदर्भात देवगिरीकर असे लिहितात की, '' १९०५ साल अखेर रूपये, आणे, पैमध्ये काँग्रेसच्या पदरांत काय पडले असे जर कोणी विचारले, तर त्याचे उत्तर देणे कठीण आहे. पण या काळांत अनेक निधडया छातीचे राष्ट्रकार्यकर्ते निर्माण झाले, वृत्तपत्रे निघाली सभा–परिषदांतून निर्भयपणें लोक बोलू लागले व स्वराज्याशिवाय आपला उध्दार होणार नाही, ही जाणीव निर्माण झाली.''

''१८८६ सालांतून १९०६ पर्यंत म्हणजे २० वर्षांपर्यंतच्यां काँग्रेसचे निरीक्षण एकदम करण्याची कारणे उघड आहेत. तेच तेच ठराव, तीच तीच भाषणे, त्याच त्याच व्यक्ती अशी या २० वर्षांतील हकीगत आहे. रूसो–जपानी युध्द होईपर्यंत व लॉर्ड कर्झन यांच्या अंमल जारी होईपर्यंत काँग्रेसचे राजकारण हादरले नव्हते मऊ शय्येवरील राजकारणाचा तो काळ होता. वर्षभर गडगंज पैसा मिळवावा आणि नाताळांत फर्स्ट, सेकंड क्लासांतून कधी दिल्ली, कधी मद्रास, कधी कलकत्ता, कधी मुंबई अशा

लांबच्या सफारी कराव्यात म्हणजे राजकारण संपले,अशी तेव्हाची शोचनीय स्थीती होती.[४१]

कॉंग्रेसच्या या प्रवासात संपूर्ण देशातून विविध व्यक्ती चमकल्या. त्याबरोबरच महाराष्ट्रातील विविध व्यक्तींनी देखील कामगिरी केलेली दिसून येते यासंदर्भात, 'कलकत्ता ते बनारस' या लेखात देवगिरीकर असे लिहितात की, '' कॉग्रेसमध्ये पहिल्या वीस वर्षांत चमकलेल्या व्यक्ति पुष्कळच होत्या दादाभाई नौरोजी, हयूम, फेरोजशहा, टिळक गोखले, वाच्छा , आनंदाचार्लू, सुब्रहम्ण्य अय्यर, उमेशचंद्र बानर्जी, आनंदमोहन बोस, राजेंद्रलाल मित्र, लाला लजतपराय, बिपिनचंद्र पाल, मदनमोहन मालवीय, वेडरबर्न, हेन्टी कॉटन वगैरे व्यक्तींनी कॉंग्रेसमध्ये चांगलीच कामगिरी केली. या २१ वर्षांत पुष्कळ महाराष्ट्रीय व्यक्ती कॉंग्रेसमध्ये कुठल्या ना कुठल्या ठरावावर बोलत असत. महादेवराव रानडे, नामजोशी, नूलकर, चिपळणूकर, तेलंग, चंदावरकर, दाजीसाहेब खरे, दादासाहेब करंदीकर, खापर्डे,मुधोळकर, केशवराव देशपांडे, एस.बी. भाटे, जनार्दन रघुनाथ निमकर, के.जी. नातू, बी.एस. सहस्त्रबुध्दे, डॉ.भालचंद्र, के.व्ही. जोशी, डी.बी. चक्रदेव, मोरोपंत जोशी, डॉ. नानासाहेब देशमुख, व्हि. एम. भिडे, व्ही.व्ही. मोडक, जे.एम. सामंत, डी.जी. पाध्ये, एन.व्ही. गोखले, एम. एन. समर्थ, व्ही.एन. आपटे, शिवरामपंत परांजपे, न.चिं.केळकर, डी. एस.गरूड, महादेवराव बोडसे, जी.बी.फणसळकर, एन.के. आगाशे, अभ्यंकर जी. आर. नारायण विष्णु बाम, गोपाळ हरी भिडे, व्ही.एम. भिडे, महाजनी आर.व्ही. डॉ. मुंजे, आर.डी. नगरकर, साठे.ए.सी वगैरे महाराष्ट्रातील व वऱ्हार नागपुरकडील मंडळी कॉंगेसमध्ये बोलत असत.''[४२]

कॉंग्रेसचा मूळ हेतू एकराष्ट्रीयत्वाची भावना जागृत करण्याचा होता. ही महत्वाची कामगिरी कॉंग्रेसने  पहिल्या २० वर्षांत केलेली दिसून येते त्या संदर्भांत देवगिरीकर असे लिहितात की, '' कॉंग्रेसला या २० वर्षांत

कितपत यश मिळले हा प्रश्न महत्वाचा आहे. ३० वर्षांनंतर आपण या प्रश्नाकडे निर्विकारपणे पाहू शकतो. यात वाद नाही. काँग्रेसच्या कोणत्या मागण्या सरकारने मान्य केल्या हा प्रश्न गौण आहे. राष्ट्राची सर्वांगीण वाढ होण्यास कॉंग्रेसची पुण्याई कितपत खर्च पडली हा मुख्य प्रश्न आहे. इंग्रजांच्या आमदानींत हिंदुस्थानांतील सर्व लोक, दरबाराच्या, अस्तिवाच्या किंवा इतर कारणाने एकत्र होत पण खरे स्नेहसंवर्धन, काँग्रेससारख्या राष्ट्रव्यापी संस्थेशिवाय इतरत्र होणे कठीण. तामील प्रांतापासून कश्मिरी पंडीतापर्यंत आणि ब्रम्हदेशापासून सिधुंपर्यंत सर्वजण एकत्र आले, एकच दु:खे सांगू लागले हा लहान फायदा झाला नाही. काँग्रेसचा मूळ हेतू इतकाच होता. एकराष्ट्रीयत्वाची भावना जागृत होण्यास काँग्रेससारखे दुसरे स्थानच नव्हते ही गोष्ट अनुभवसिध्द आहे.''[४३]

त्यापुढच्या महाराष्ट्रातील राजकारणाच्या प्रगतीच्या दृष्टीने महाराष्ट्रात लोकमान्यांच्या स्वदेशी बहिष्कारायोग या चळवळीमुळे एका नवीन युगाला आरंभ झाल्याचे दिसून येते. या काळात लोकमान्य टिळकांनी लोकांनां चळवळीसाठी प्रेरीत केल्याची दिसून येते. या संदर्भात 'नवयुगारंभ' या आपल्या लेखात रामकृष्ण भिडे असे लिहितात की,''महाराष्ट्रात लोकमान्य टिळक यांनी बंगालचा 'स्वदेशी बहिष्कार योग' उचलून धरून तत्प्रीत्यर्थ अतिशयच चळवळ केली. अशारीतीने नवयुगारंभाला अनुकूल्याचे वारे चोहोबाजूंनी सुटू लागले होते. या संबंधाने लोकमान्य टिळकांनी,'काळ येत चालला, सावध व्हा', या केसरीतील लेखांत पुढील इशारा दिलेला आहे, ''इंग्रजी राज्याचा नाश करून त्याच्याऐवजी स्वराज्य स्थापण्याची अदयाप पुरी ताकद नाही, हे खरे पण आपल्या हक्काकरीता एकसारखे निश्चयाने व नेटाने भांडत राहून व बहिष्कार आणि संप यांच्यांसारख्या शक्य तेवढया गोष्टी आपल्या ताब्यात घेवून या देशांतील इंग्रजी राज्यव्यवस्था जितकी होईल तितकी दगदगीची व जिकरीची करून टाकणे आणि त्यामुळे गोऱ्या

अधिकारी वर्गास सळो का पळो करून सोडणे शक्य आहे. स्वातंत्र्याकरितां एकदा तंटा सुरू झाला म्हणजे मग यश प्राप्ती झाल्याखेरीज तो विझत नाही, असे इंग्रजी ग्रंथकारांनींच आम्हांस शिकविले आहे. आणि तोच इशारा आमच्या राजकर्त्यास त्यांच्याच जातीच्या ग्रंथकारांच्या भाषेत आम्ही देत आहो.''[४४]

स्वराज्याचे प्रणेते दादाभाई नौरोजींनी आर्थिक, स्वराज्यविषयक अतिशय महत्वाची कामगिरी केलेली दिसून येते. त्यासंदर्भांत रामकृष्ण भिडे असे लिहितात की, ''नव्या पक्षाच्या अपेक्षेपेक्षा जास्त दादाभाईंच्या हातून काम झाले. डोळयांपुढे दिसणाऱ्या इंग्रजी राज्याचे मनोहर स्वरूप परिणामी देशास अपायकारक आहे. इतकेच नव्हे तर, हिंदुस्थानची पिछेहाट करणारे आहे, ही गोष्ट प्रथमतः दादाभाईंच्यांच पूर्णपणे लक्षात आली व त्याविषयी एकसारखी चर्चा चालू ठेवून विलायतच्या व हिंदूस्थानच्या लोकांस त्यांनी निर्विवादपणे सिध्दही करून दाखविली इंग्रज राज्य वरून कितीही सुबक दिसले तरी हल्लींची राज्यपध्दती कायम रहिल्यास हिंदुस्थान देशाला ती धुळीला मिळवील, हा सिध्दांत दादाभाईंनीच प्रथमः जोराने व निर्विवाद युक्तीने सिध्द करून दिला. अर्थात ते अध्यक्ष झाल्याबद्दल नव्या पक्षला बरेच वाटले.''[४५]

भारताच्या दरिद्रयाची मिमांसा करीताना दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, जी.व्हि.जोशी, आर.एन.मुधोळकर यांनी विविध प्रकारे आपले विचार मांडले आहे. त्या संदर्भात टी.व्हि. पर्वते त्यांच्या विचारांचा मागोवा घेताना असे लिहितात की, '' Dadabhai Naoroji was the first prominent national leder to proclaim the existence of absolute poverty in India. In 1876 he declared in his eassay ' Poverty in India' that, " India is suffering seriously in several ways and in sinking in poverty. The masses of India do not get enough to provide the bare necessities of life." He made poverty of india his special subject and

toured all over England for years to fullfil his life Long mission of awakening the British Pudic to the true condition of India .

"-- Ranade wrote in 1890 that " the existence of this poverty of the country is phenomenal. "

"…, G.V. Joshi spoke of this Povertey as , " Crushing and degrading in the case of millions and millions in the lower strata of popelation the appalling amount of misery and suffering that already exists all the country over. "

R.N. Mudholkar while seconding the resolution on poverty in india at the 1891 session of the congress said ' The India of today presents a most mournful and abnormal spectacle." [46]

लोकमान्य टिळकांनी देखील भारताच्या दरिद्रयाची कारण मिमांसा 'परकीय राज्य' हेच भारताच्या गरीबीचे कारण आहे. असे प्रतिपादन केलेले दिसून येते. Prof. N.V. Sovani writes as follows on Tilaks economic thought and ideas , " He believed that one of the principal causes of Indian poverty was British rule and the imperial system that articulated it and consequently the end of Brithish rule was the first precondition of ending Indian poverty. "

" There are numerous passages in Tilak's writings and seppches extending over a period of nearly forty years which testify to an awareness on his part that the economic exploitation of india by Britain was much more insidious than political domination both of which led to the stunting of the growth of india's manhood and prevented it from rising to its full stature." [47]

अशा प्रकारे भारतीय दरिद्रयाची मिमांसा तत्कालीन विचारवंतांनी केलेली दिसून येते.

स्वराज्य हे साध्य, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीयशिक्षण ही तीन प्रमुख साधने आहेत. कलकत्ता काँगेसने भिक्षांदेहीची पूर्वपरंपरा मोडली व स्वावलंबनाचा मार्ग पत्करावा असा सिध्दांत या कॉग्रेसने मांडला. अशी महत्वपूर्ण कामगिरी कलकत्ता राष्ट्रीय सभेने केलेली दिसून येते. या संदर्भात रामकृष्ण भिडे असे लिहितात की,'' स्वावलंबनाचे ठराव व मवाळांचे धोरण या राष्ट्रीय सभेत राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी व बहिष्कार

यांना मान्यता देणारे ठराव पास झाले. मेथाप्रभृति मवाळांना स्वदेशीच्या ठरावांतील झीज सोसूनही स्वदेशी स्वीकारावे ही कल्पनाच पसंत नव्हती. परंतू काँग्रेसने झीज सोसून स्वदेशी मालास उत्तेजन दयावे,असा ठराव पास केला यानंतर बहिष्कारासंबंधी ठराव मंजूर झाला.'' ''स्वराज्य आमचे साध्य आहे व स्वदेशी चळवळ,बहिष्कार योग आणि राष्ट्रीय शिक्षण ही सदर हेतू सिध्दीस नेण्याची स्वावलंबनाची तीन प्रमुख साधने होत असा कायमचा सिध्दांत कलकत्ता येथील राष्ट्रीय सभेने घालून दिला. भिक्षांदेहीची पूर्वपरंपरा मोडली व स्वावलंबनाचा कष्टमय परंतु अंती सुखकर व स्फुर्तीकारक असा नवयुगारंभ झाला असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.''[४८]

लोकमान्य टिळक कलकत्ता येथील भाषणात बहिष्कारायोगाचे महत्व व बहिष्कार योगाचा अर्थ सांगताना ते असे म्हणतात की, ( कलकत्ता येथे राष्ट्रीय सभा संपल्यानंतर लोकमान्य टिळकांचे 'टेनेटस ऑफ दि न्यू पार्टी', 'नवापक्ष व त्याचे मार्ग' या विषयावर व्याख्यान झाले.) '' स्वराज्य मिळेपर्यंत आपण सरकारची अडवणूक उर्फ सत्याग्रह चालू ठेवला पाहिजे बंगालची फाळणी हे एक दु:ख आहे, पण स्वराज्याचा अभाव हे खरे रोगनिदान आहे व त्याला अडवणूक ही मात्रा आहे, अशी बहिष्कारायोगाची व्याख्या केली. याखेरीज त्यांनी भाषणात ही अडवणूक करबंदीपर्यंत करून सरकारला कसलिहि मदत करावयाची नाही व याचाच अर्थ बहिष्कारयोग असा सांगितला.''[४९]असे काँग्रेसचे त्यावेळचे राजकारण दिसून येते. त्यापुढच्या टप्पामध्ये काँग्रेसमध्ये १९०७ मध्ये जुन्या व नवीन विचारसरणीत झगडा झालेला दिसून येतो. देशांत मवाळ व जहाल असे दोन पक्ष अस्तित्वात आले असे दिसते. या संदर्भात रामकृष्ण भिडे या परीस्थितीचे वर्णन करताना असे लिहितात की, '' सुरतेलाच दोन पक्षांच्या दोन वेगवेगळया सभा होवून देशांत मवाळ व जहाल असे दोन पक्ष कायम

झाले. मवाळांनी आपली कन्व्हेन्शन काढल्याने व राष्ट्रीय पक्षाने राष्ट्रीय सभेला न जोडल्याने राष्ट्रीय सभा राष्ट्रीय पक्षाच्याच स्वाधीन राहिली व यापुढे सरकारने जे दडपशाहीचे धोरण स्वीकारून टिळक, अरविंद, लालजीप्रभृती, देशभक्तांनां कारागृहवास दाखविला तो दाखविला नसता, तर राष्ट्रीय सभा पुढेही मवाळांच्या हातीच जाती ना.''

''...अशा रीतीने राष्ट्रीय सभेत फुट पडली जुन्या व नव्या विचारसरणीतील हा झगडा होता. कॉंगेसने प्रारंभापासून भिक्षांदेहीचे स्वीकारलेले धोरण राष्ट्राला सर्वस्वी घातुक असल्याने ते फेकून देवून स्वावलंबनाच्या मार्गच यापुढे राष्ट्राने स्वीकारला पाहिजे असा उपदेश दादाभाईनी कलकत्ता कॉंग्रेसला दिला व तो संदेश राष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत पसरून जनतेत स्वावलंबनाच्या वृत्तीचा प्रसार करणे हा नव्या पक्षाचा हेतू असल्याने त्यासाठी झगडण्याचे कार्य राष्ट्रीय पक्षाने हाती घेतले. हिंदुस्थानच्या राजकारणांत अशा रीतीने देशाला उपकारक अशा नव्या युगास प्रारंभ झाला.''[५०] त्यापुढील महाराष्ट्रातील राजकारणात पुढचा प्रगतीचा टप्पा दिसून येतो. १९१४ साली लोकमान्य टिळक तुंरूगांतुन सुटून आल्यानंतर त्यांनी काँग्रेस मध्ये पुर्नप्रवेश केला.

१९१६ ते १९२० या चार वर्षात लोकमान्य टिळक काँग्रेसचे प्रमुख सुत्रधार राहिलेले दिसून येतात. या काळाला काँग्रेसमधील 'टिळकयुग' असे म्हणतात. या टिळकांच्या राजकारणाविषयी 'युध्दकालीन काँग्रेस' या चित्रमयजगतमधील, जाने १९३५ च्या लेखात देवगिरीकर असे लिहितात की, ''१९१४ च्या ऑगस्टमध्ये महायुध्दाला सुरूवात झाली. त्यापूर्वी थोडे दिवस लोकमान्य टिळकांची तुरूंगातून सुटका झाली. काँग्रेसमध्ये भूपेंद्रनाथ बसू ॲनिबेझंट, सुब्बाराव वगैरे काही व्यक्ती होत्या. त्यांना टिळकांनी काँग्रेसमध्ये यावे व उभयपक्षांनी महायुध्दाचे वावटळींत राजकारण धडाडीने पुढे न्यावे असे वाटे. १९१६ साली लोकमान्य टिळक काँग्रेसमध्ये गेले व

तेव्हापासून त्यांचा अंत होईपर्यंत ते कॉंग्रेसचे प्रमुख सुत्रधार म्हणून राहिले. या काळाला 'कॉंग्रेसमधील टिळकयुग' असे म्हणावयास हरकत नाही.''

''लोकमान्य टिळक व बेझंट या दोघांनींही कॉंग्रेसच्या ठरावाचा प्रचार व त्याला अनुमती मिळविण्याकरता प्रयत्नाची शिकस्त केली. टिळकांनी संघाच्या शाखा काढल्या, हजारो सभासद केले, अनेक दौरे काढले, पैसे गोळा केले व स्वराज्याच्या कल्पनेने जनतेला भारावून टाकले. महायुध्दाच्या तो काळ असल्यामुळे सरकार या पुढाऱ्यांना जपून बोलावयास सांगे व पुढारीही तोल न सोडता बोलत. महात्मा गांधींनी हरिजनांच्या करता जसा दौरा काढला तसा हा दौरा होता. विलायतेस जाऊन आपले गाऱ्हाणे तेथील लोकांच्या कानावर घालावे असाहि तेव्हा प्रयत्न सुरू झाला.

१९१६ — १९२० असा हा सांधिकाळ आहे. या काळातील घटनांचा पुढील राजकारणावर परिणाम होण्याला युध्दकालीन परिस्थिती व तदंगभूत चळवळी याच कारण झाल्या यांत वाद नाही. मॉटेग्यूसाहेबांची कितीही सदिच्छा असली, तरी ती फलद्रुप झाली नाही असे प्रत्यक्ष अनुभवाने ठरले. सरकार स्वत:चे धोरण एका बाजूने प्रगती व दुसऱ्या दडपशाही असे सांगत असते. या दुसऱ्या धोरणामुळे त्यांच्या पाहिल्या सदिच्छेवर पाणी पडते. मॉटेग्युसाहेबांच्या सुधारणा कितीहि अपुऱ्या असल्या तरी पंजाब प्रकरण उद्‌भवले नसते. तर राष्ट्रात असंतोष माजला नसता व पुढील राजकारणाला निराळेच स्वरूप आले असते. हिंदुस्तानच्या राजकारणाला अप्रत्यक्षपणे ही सरकारची मदत झाली असे म्हटले तर ते फारसे वावगे होणार नाही.''

''कलकत्ता कॉंग्रेसनंतर चळवळीचा धूमधडाका सुरू झाला. टिळकांनी महाराष्ट्र, कर्नाटक व वऱ्हाड नागपूरकडे दौरा काढून लोकमत जागृत केले व आपल्या मागणीला पाठींबा मिळविला. हिंदूस्थानपेक्षा विलायतेस चळवळ करणे अधिक महत्वाचे आहे असे टिळक प्रभृतींना पटले. तिकडे सिडनेहॅम

इंग्लंडांतील लोकमत स्वराज्याला विरोध करण्यांकरितां तयार करीत होते. त्याला शह देण्याकरितां विलायत गाठलीच पाहिजे, असा विचार करून होमरूल लीगतर्फे टिळक, खापर्डे, करंदीकर प्रभृति मंडळी निघाली. पुण्यास जंगी सभा भरून टिळकांना ११ हजार रूपयांची थैली अपर्ण करण्यात आली.''[५१] टिळकांच्या या तत्कालीनं राजकीय चळवळीविषयी समकालीन व्यक्तींनी आपले विचार व मते मांडलेली दिसून येतात. त्यांच्यां या चळवळीचा परिणाम देशातील इतर भागांवर देखील झालेला दिसून येतो. लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रीय पातळीवरील राजकीय भूमिका व उद्‌दिष्टांविषयी योगी अरविंद टिळकांच्या कार्याचा गौरव करताना ते असे लिहितात की, ''काँग्रेसने चालविलेल्या चळवळीला एक जिवंत व महान शक्तीचे स्वरूप यावे याकरता अखिल राष्ट्रात प्रचंड जागृति करणे खळबळ उडवून देणे हेच नेहमी श्री टिळकांचे उद्‌दिष्ट होते.''

''श्री. टिळकांच्या राजकीय जीवनातील पूर्वार्ध महाराष्ट्रांत राष्ट्रभावना जागृत करून त्याचा राष्ट्रीय जीवनास संघटीत स्वरूप देण्यांकरिता जोरदार प्रचार करण्यांत वेचला गेला. त्याचप्रमाणे जेव्हां स्वदेशी चळवळीच्याच धर्तीवर अखिल राष्ट्रव्यापी चळवळीची संधी प्राप्त झाली तेव्हां तिचा त्यांनी मोठया हिरिरीने उपयोग करून घेतला. त्यापूर्वी त्यांनी महाराष्ट्रासाठी जे कार्य केले होते. पूर्वीच्या कॉग्रेसच्या राजकारणातील एक पुरोगामी पक्षाचे नेते म्हणून जी कामगिरी बजावली होती, त्यामुळे त्याचप्रमाणे त्यांचा स्वभाव, त्यांचा स्वार्थत्याग आणि त्यांनी देशासाठी सोसलेच्या हालअपेष्टा या सर्वामुळे नव्या पक्षाचे धुरीणत्व जणु पूर्वीच नियोजित असल्याप्रमाणे आपोआपच त्यांच्याकडे आले. त्यांच्यापुढे त्यांनी जे प्रभावी ध्येय ठेवले होते. त्यामुळेच स्वराज्य, स्वदेशी रा. शिक्षण आणि बहिष्कार या चतु:सूत्रीचा पुरस्कार करून त्यांनी एक निश्चित कार्यक्रम आखला. या

चतु:सूत्रीला काही निश्चित स्वरूप येण्यास बंगालमध्ये हि सुरूवात झाली होती.''[५२]

लोकमान्य टिळकांच्या विचारांचा मागोवा घेता योगी अरविंद टिळकांच्या वैचारिक जडणघडणीचा मागोवा घेताना याचे तीन टप्पे करतात तसेच लोकमान्य टिळकांच्या राजकीय विचारांच्या जडणघडणीविषयी अरविंद असे लिहितात की, पाहिला कालखंड,''त्यांच्या जीवनातील पाहिला कालखंड हा त्यांच्या स्वत:च्या दृष्टीने आत्मविकासाचा, महाराष्ट्राच्या दृष्टीने नवनवीन कल्पना व कार्ये यासाठी करावयाच्या प्रगतीचा आणि राष्ट्राचे भवितव्य घडविण्याचा ठरतो.''

''दुसरा कालखंड – दुसऱ्या कालखंडात टिळकांची दृष्टी त्यांचे ज्ञान अधिक व्यापक झाले व त्यांच्या कार्याचे स्वरूपहि अधिक गंभीर झाले. कारण आता केवळ राजकीय मनोवृत्ती जागृत करावयाची नव्हती तर समाजाचे भवितव्य आणि त्याचा भूतकाळ यांची सांगड घालून जनतेचा आत्मा पुर्नजागृत करावयाचा होता. हे कार्य त्यांनी अधिक चिकाटीच्या प्रयत्नांनी आणि सर्वमान्य प्रचारतंत्राचेंद्वारा केले. त्यांचे अखरचे परिणत स्वरूप म्हणजे सार्वजनिक स्वरूपांतील शिवजंत्युत्सव व गणेशोत्सव हे होय.''

**महाराष्ट्रातील कार्य**

''टिळकांनी महाराष्ट्रामध्ये जे काही कार्य केले त्याचीच दीक्षा स्वदेशी चळवळीच्या निमित्ताने जणू अखिल भारतास दिली गेली. अखिल जनतेस राष्ट्रकार्यात गोवणे, भूतकालीन थोरवीच्या पायावर उज्वल भवितव्याचा प्रासाद बांधणे, धार्मिक व आध्यात्मिक बाबतीत दिसून येणारा उत्साह भारताच्या राजकीय चळवळीतही चेतविणे या गोष्टी भारतात व्यापक व सामर्थ्यसंपन्न अशी राजकीय जागृती करावयाय अपरिहार्य आवश्यक आहेत ही गोष्ट आजवरच्या इतर लेखकांनी विचारवंतांनी व अध्यात्म

संपन्न संतानीहि जाणली होतीच. परंतु राजकीय चळवळीच्या प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात या सत्याचा अनुभव श्री. टिळकांनीच प्रथम घेतला.''

तिसरा कालखंड –

'' टिळकांच्या जीवनातील तिसरा कालखंड 'स्वदेशी चळवळीचा.' यावेळी ते प्रामुख्याने 'अखिल भारतीय पुढारी म्हणून जनतेसमोर आले याचा परिणाम म्हणजे शेवटी त्यांना अधिक व्यापक क्षेत्र मिळाले. जनतेला योग्य मार्गाने नेण्याचे सामर्थ्य त्यांना प्राप्त झाले. भारत स्वातंत्र्य करण्याचे त्यांचे जे जीवनकार्य ते अधिक शीघ्रगतीने तडीस नेण्यास आवश्यक असलेला मोठा आधार त्यांना मिळाला आणि त्याप्रमाणे केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संबध राष्ट्रात त्यांचे हे कार्य पुढे आले.''[५३]

अशा प्रकारे टिळककाळात १९ व्या व २० व्या शतकातील महाराष्ट्रातील राजकारण टप्प्याटप्प्याने प्रगत झालेले दिसून येते.

**सारांश**

- लोकमान्य टिळकांच्या पूर्वसुरींनी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धर्मविषयक जागृती इत्यादी क्षेत्रात कार्य केल्याचे आढळून येते. टिळकांच्या पुर्वसुरींचे व समकालिनांचे लोकमान्य टिळकांच्या राजकारणात योगदान असल्याचे आढळून येते.
- त्या काळामध्ये महाराष्ट्रातील ब्राम्हण व ब्राम्हणेतर सांस्कृतिक चळवळीविषयीचे वृत्तपत्रांतून परस्परविरोधी लेखन केल्याचे आढळते.
- ब्राम्हणी धर्माच्या शोषणाचे बळी ठरलेल्या स्त्री शुद्रांना माणूस म्हणून जगण्याची प्रेरणा व शक्ती महात्मा फुले यांचा विचार, लेखन व कार्य यामुळे मिळाली. त्यामुळे महाराष्ट्रात ब्राम्हणी सांस्कृतीला पर्याय देणारी अब्राम्हणी संस्कृति महाराष्ट्रात रूजली गेल्याचे आढळते.
- महात्मा जोतीबा फुले यांनी सुरू केलेल्या ब्राम्हणेतर चळवळीचे वाहक या नात्याने कोल्हापूरचे धत्रपती शाहू महाराज यांचे विचार व कार्य यांचा उल्लेख करता येतो. कोल्हापूरच्या दरबारात निर्माण झालेले विविध धार्मिक प्रश्न आणि त्यात ब्राम्हणी धर्म व संस्कृतीची असलेला संबंध विचारात घेता ही बाब ही समस्या ब्राम्हणी संस्कृति आणि अब्राम्हणी संस्कृती यांच्या संघर्षाचे प्रतीक मानावी लागते.
- हिंदू धर्म व संस्कृतीवर ख्रिस्ती मिशनऱ्यांकडून होत असलेल्या आघाताला प्रत्युत्तर म्हणून महाराष्ट्रातील विव्दान विचारवंत आपल्या परीने विविध प्रयत्न करताना आढळून येतात.
- इंग्रजांच्यां आगमनामुळे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली. त्यामुळे भारतीय संस्कृतीतील वैगुण्य, खुळचट चालीरीती याबाबत आत्मचिंतन करत सुधारणा घडवू पाहणारा शिक्षितांचा नवा वर्ग

समाजात उदयाला आला. त्यामुळे महाराष्ट्रातील सांस्कृतिक जिवनाचा नवा पैलू पुढे आलेला दिसून येतो.

- लोकमान्य टिळकांच्या वैचारिक जडणघडणीवर व लेखनावर तत्कालीन धार्मिक परिस्थितीचा प्रभाव पडलेला दिसून येतो.
- धर्म ही समाज परिवर्तन करणारी, समाजाला वळण लावणारी, नैतिक मार्गदर्शन करणारी संस्था आहे अशी टिळकांची भूमिका होती.
- टिळकांचे धर्माविषयी सहिष्णुतावादी विचार होते. इतर धर्माचे सहआस्तीत्व ते मानीत.राष्ट्राच्या प्रगतीला धार्मिक शिक्षणाची अत्यंत जरूर आहे असे त्यांचे मत असल्याचे दिसून येते.
- लोकमान्यांच्या राष्ट्रीयत्वात 'हिंदूत्वरक्षण' हे प्रमुख तत्व व्यापक धर्मभावनेच्या आधारावर असलेले दिसून येते.
- लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीयदृष्टया उत्सवांना महत्व दिलेले दिसून येते व धार्मिक उत्सव हे समाजकल्याणाच्या व लोकजागृतीच्या प्रक्रियेतील महत्वाचे घटक आहेत असे त्यांचे मत होते.
- राष्ट्राची उन्नती होण्यास धर्मोन्नति अत्यंत आवश्यक आहे. स्वधर्मअभिमान व परधर्मसहिष्णुता या गोष्टीद्वारे हिंदुस्थानात धर्मेक्य होऊ शकते असे त्यांचे मत होते.
- १९व्या व २० व्या शतकातील सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय विचारप्रवाहात लोकमान्य टिळकांनी तत्कालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपली राजकीय चळवळ चालविताना तत्कालीन सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परिस्थितीचा आपल्या राजकीय चळवळींसाठी उपयोग करून घेतला असे दिसते. याबाबत प्रकाशित, अप्रकाशित साधनामध्ये त्याबाबतची माहिती मिळते.

- लोकमान्य टिळकांच्या सांस्कृतिक, राजकीय व वैचारिक जडणघडणीमध्ये त्यांच्या पूर्वसुरीचां व समकालीन विचारवंतांचा प्रभाव असल्याचे आढळून येते.
- विष्णुशास्त्री चिपळूकरांनी निबंधमालेतून तत्कालिन समाजाचे राजकारणाविषयी प्रबोधन केलेले दिसून येते.
- भारताच्या दरिद्रयाची मिमांसा दादाभाई नौरोजी, न्या.रानडे, जी.व्ही. जोशी, आर.एन. मुधोळकर यांनी केलेली दिसून येते.
- लोकमान्य टिळकांनी भारताच्या द्ररिदयांची मिमांसा करताना 'परकीय राज्य' हेच भारताच्या गरीबीचे कारण आहे असे प्रतिपादन केलेले दिसून येते.
- १८८५ ते १९०५ या २० वर्षांत काँग्रेसने केलेल्या कार्याचा परिणाम दिसून येतो. याकाळात संपूर्ण देशात सरकारविरोधी असंतोष उत्पन्न होवून, एकराष्ट्रीयत्वाची भावना जागृत करण्याची महत्वाची कामगिरी काँग्रेसने केलेली दिसून येते.
- १८८५ ते १९०५ या २० वर्षांत कॉग्रेसमध्ये महाराष्ट्रातील विविध व्यक्तींनी भाग घेतलेला दिसून येते.
- महाराष्ट्रात लोकमान्य टिळकांच्या 'स्वदेशी बहिष्कारयोग' चळवळीमुळें एका नवीन युगाला आरंभ झाला असे दिसून येते.
- १९१६ ते १९२० या चार वर्षात लोकमान्य टिळक काँग्रेसचे प्रमुख सुत्रधार रहिलेले दिसून येतात. हा काळ काँग्रेसमधील 'टिळकयुग' होते, असे दिसून येते.

**संदर्भ**


१) जावडेकर शं.द., आधुनिक भारत, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे, १९५३ , पृ.२४.

२) केळकर न.चिं., लोकमान्य टिळकांची धर्मबुध्दी व धर्मविषयक मते, १९२५, पृ. १४६.

३) कित्ता , पृ. ४ ते ६.

४) टिळक दि.ज., आधुनिक भारताचे शिल्पकार, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, केसरी प्रकाशन, पुणे, पृ.९३.

५) बापट स.वि., लोकमान्य टिळकांच्या आठवणी व आख्यायिका, खंड २, प्रथमावृत्ती, पुणे, १९२५, पृ. १०८, १०९.

६) फडके य.दि.,विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, ३० जाने १९८९, पृ. ६८.

७) केळकर न.चिं., बुध्दिप्रामाण्य, सहयाद्री, पुणे, खंड १० वा, अंक १ला, जुलै १९३९, पृ. ५३०.

८) जावडेकर शं.द., उपरोक्त, पृ. ३४२,३४३.

९) तर्कतीर्थ जोशी लेखसंग्रह, खंड क्र.१, श्रीविद्याप्रकाशन, प्रथमावृत्ती, २० ऑगस्ट १९८२, पृ.३३१.

१०) सहस्त्रबुध्दे द.ल., रानडे आणि सामाजिक सुधारणा, सहयाद्री, रानडे विशेषांक, खंड १५ वा, जाने १९४२, पृ.४१.

११) केळकर न. चिं., उपरोक्त, पृ. ५३१.

१२) कर्वे द.गो., रानडे यांची राष्ट्रोध्दाराची योजना, सहयाद्री, खंड १५, अंक १ला, जाने १९४२, पृ. ६१.

१३) केळकर न.चिं., टिळक व बडे देशी लोक, सहयाद्री, खंड १४वा, वर्ष ७ वे, अंक ८ वा, ऑगस्ट १९४१, पृ. ५८६.

१४) बनहट्टी श्री.ना.,नवभारत ग्रंथमाला २२, टिळक आणि आगरकर, सुविचार प्रकाशन, नागपुर, १९५६, पृ. २३,२४.

१५) तर्कतीर्थ जोशी लेखसंग्रह, खंड १, श्रीविद्याप्रकाशन, प्रथमावृत्ती, २० ऑगस्ट १९८२, पृ. ३३९.

१६) कित्ता, पृ.४०६,४०७.

१७) कित्ता, पृ.९९४ ते ९९७.

१८) कित्ता, पृ.३९८ ते ४००.

१९) कित्ता, पृ. ४०७ ते ४११.

२०) कित्ता, पृ. ३३६, ३३७.

२१) कित्ता, पृ. ३८६ ते ४०३.

२२) कित्ता, पृ. ३२९, ३३०.

२३) फडके.य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १, श्रीविद्याप्रकाशन, पुणे, ३० जाने १९८९, पृ.४६ ते ४८.

२४) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, उपरोक्त, पृ. ३३२, ३३३.

२५) फडके य.दि., उपरोक्त, पृ. ३१.

२६) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, उपरोक्त, पृ.३३९ ते ३४०.

२७) बनहट्टी श्री.ना., नवभारत ग्रंथमाला २२, टिळक आणि आगरकर, सुविचार प्रकाशन, नागपूर, १९५६, पृ. २२.

२८) केळकर भा. कृ., 'टिळक विचार', श्री विद्या प्रकाशन पुणे १९८१ पृ. २५४,२५५

२९) बापट स. वि.,'लोकमान्य टिळक सुक्ती संग्रह', केसरी कचेरी पुणे १९२६ पृ. ११३

३०) केळकर भा. कृ.,उपरोक्त पृ. २५८,२५९

३१) टिळक ज. श्री., (संपा.), समग्र लोकमान्य टिळक, 'जीवन ध्येय' खंड क्र ६, केसरी प्रकाशन, पुणे, १९७६, पृ. ७८५ ते ७८७.

३२) केळकर भा. कृ., 'टिळक विचार', श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८१ पृ. २५८,२५९.

३३) जावडेकर शं. द., 'लोकमान्य टिळक व महात्मा गांधी', राजहंस प्रकाशन पुणे १९४६ पृ. २४, २५

३४) टिळक ज.श्री. (संपा.), समग्र लोकमान्य टिळक, खंड क्र ६, केसरी प्रकाशन, पुणे, १९७६, पृ. ९५७, ९५८

३५) केळकर न. चिं., लोकमान्य टिळकांची धर्मविषयक मते, १९२५, पृ. ५३, ५४.

३६) बकाणे, छा.सु., विष्णुशास्त्री चिपळूकर, श्रीविद्याप्रकाशन, पुणे, १५ ऑगस्ट १९९९, पृ. १०५.

३७) कित्ता, पृ. १०८.

३८) कित्ता, पृ. ११३.

३९) कित्ता, पृ. १४९.

४०) देवगिरीकर त्र्यं.र., काँग्रेसचा उग्दम व प्रारंभ', चित्रमयजगत, वर्ष २६ वे, अंक १ ला, जाने १९३५, पृ.१,४.

४१) देवगिरीकर त्र्यं.रं.,कलकत्ता ते बनारस, चित्रमयजगत, वर्ष २६ वे, अंक १ला, जाने १९३५, पृ.६.

४२) कित्ता, पृ. १०.

४३) कित्ता, पृ. १०.

४४) भिडे रा.गो.,नवयुगारंभ, चित्रमयजगत, वर्ष २६ वे, अंक १ला, जाने १९३५, पृ. १२, १३.

४५) कित्ता, पृ. १३.

४६) Parvate T.V., Tilak: The Economist , Maharashtra state Board for Literature and culture, first edition, yeravada , prision press, Pune , dec 1985, p. 7 , 8.

४७) Parvate T.V., Tilak: The Economist , Maharashtra state Board for Literature and culture, first edition, yeravada , prision press, Pune , dec 1985, p 117, 01.

४८) भिडे रा.गो., नवयुगारंभ, चित्रमयजगत,वर्ष २६ वे, अंक १ला, जाने १९३५,.पृ.१३.

४९) कित्ता, पृ. १३, १४.

५०) कित्ता,पृ. १५.

५१) देवगिरीकर.त्र्यं.रं.(संपा.), युध्दकालीन कॉंग्रेस, चित्रमयजगत, वर्ष २६ वे, अंक १ला, जाने १९३५,पृ.२९ ते ३२.

५२) श्री.अरविंद,बाळगंगाधर टिळक, संजीवन कार्यालय, श्री.अरविंद आश्रम पांडीचेरी, श्री.अरविंद आश्रम प्रेस, पांडीचेरी, १९१८, पृ. २८,२९.

५३) कित्ता, पृ. ११ ते १४.

**<u>संदर्भ ४ नुसार — सत्यभामाबाई टिळक व सिध्देश्वरशास्त्री चित्राव यांची आठवण</u>**

१)''सत्यभामाबाईंच्या जीवनातील असाच खडतर काळ म्हणजे 'ब्राम्हण्यांचा टिळकांनी खंडकमाळ आळीतील पंचहौद मिशनच्या चर्चमधील सभेत ख्रिश्चनांच्या हातचा चहा घेतला, अशी आवई उठली होती. आगरकर इत्यादी सुधारकांनी त्याकडे दुर्लक्ष केले, पण टिळकांना सर्व समाजाला बरोबर घेऊन जावयाचे होते. त्यांनी कोणाच्या नकळत काशीला जाऊन प्रायश्चित घेऊन तसे पत्र पुरावा म्हणून स्वत:जवळ ठेवले पण पुण्यातील ब्राम्हणांचे पुढारी नातू यांना टिळकांचे नेतृत्व डसत होते. त्यांनी टिळकांच्या घरावर बहिष्कार टाकला. कोणाही ब्राम्हणाला टिळकांच्या घरी धार्मिक कार्यात भाग घेण्यावर बंदी घातली.''

२) <u>सिध्देश्वराची चित्राव (विलायतला जाऊन आल्यानंतर — प्रायश्चित्ताबाबत आठवण)</u>

'' लोकमान्य टिळक जाऊन परत आल्यानंतर ते प्रायश्चित्त घेतात की नाहीत इकडे जुन्या लोकांचे लक्ष वेधले होते. आपण प्रायश्चित्त घ्यावे असे मी त्यांस म्हटले त्याबरोबर मे म्हणाले '' मला प्रायश्चित्त घेण्यांस तुम्ही का सांगता? मी काही तुमच्यांत जेवावयास येत नाही. माझा व्यवहार लोकापासून सर्वस्वी निराळा आहे. घरांतसुध्दा माझा काही संबंध नसतो. माझ्याबरोबर मी एक आचारी ठेविला आहे. असा स्थितीत तुम्ही मला प्रायश्चित्त घ्यावयास का सांगावे हे मला समजत नाही.''

'' तुम्हाला मी एवढेच सांगतो की मी प्रायश्चित्त घेणार आहे ते केव्हा घेणार हे आताच मला सांगता येणार नाही. माझे असे असे कार्यक्रम ठरले आहेत. तथापि तुम्ही प्रायश्चित्ताचे इतके स्तोम माजवू नका.''

# प्रकरण ४ थे

## लोकमान्य टिळकांचे राजकारण आणि महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळीचे अनुबंध

लोकमान्य टिळकांच्या विचारांचा मागोवा घेता, योगी अरविंद टिळकांच्या वैचारिक जडणघडणीचा मागोवा घेताना, याचे तीन टप्पे करतात तसेच लोकमान्य टिळकांच्या राजकीय विचारांच्या जडणघडणीविषयी अरविंद असे लिहितात,'' पुराणमतवादी आणि सनातन प्रवृत्तीच्या धर्मनिष्ठ भारताचे एक श्रध्देय व प्रतिनिधिरूप पुढारी या भूमिकेने, लोकशाही प्रधान राजकारणाच्या मार्गाने जनतेस नेण्याची विशेष कामगिरी टिळकांनी बजावली. ही नवीन भूमिका घेतल्यामुळे राष्ट्राच्या प्राचीन परंपरा व ऐतिहासिक कालांत निर्माण झालेल्या विशिष्ट भावना यांच्यांशी या नवीन राजकारण वृत्तीचा मेळ ते घालू शकले. त्याचप्रमाणे गणपती व शिवाजी ही दोन प्रतिके निवडून त्यांचे सार्वजनिक उत्सव, प्रचलित करून टिळकांनी जनमनांत खोलवर रूजलेल्या धार्मिक वृत्तीशी या सर्वांची यशस्वी रितीने सांगड घालून दिली.

''... टिळकांनी महाराष्ट्रामध्ये जे काही कार्य केले त्याचीच दीक्षा 'स्वदेशी चळवळीच्या' निमित्ताने जणु अखिल भारतास दिली गेली. अखिल जनतेस राष्ट्रकार्यात गोवणे,भूतकालीन थोरवीच्या पायावर उज्वल भवितव्याचा प्रासाद बांधणे, धार्मिक व आध्यात्मिक बाबतीत दिसून येणारा उत्साह भारताच्या राजकीय चळवळीतही चेतविणे या गोष्टी भारतात व्यापक व सामर्थ्यसंपन्न अशी राजकीय जागृती करण्यास अपरिहार्यता आवश्यक आहे परंतु राजकीय चळवळीला प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात या सत्याचा अनुभव श्री टिळकांनीच प्रथम घेतला.''

'' टिळकांच्या जीवनातील तिसरा कालखंड 'स्वदेशी चळवळीचा' यावेळी ते प्रामुख्याने अखिल भारतीय पुढारी म्हणून जनतेसमोर आले

याचा परिणाम म्हणजे शेवटी त्यांना अधिक व्यापक क्षेत्र मिळाले. जनतेला योग्य मार्गाने नेण्याचे सामर्थ्य त्यांना प्राप्त झाले. भारत स्वातंत्र्य करण्याचे त्यांचे जे जीवनकार्य ते अधिक शीघ्रगतीने तडीस नेण्यास आवश्यक असलेला मोठा आधार त्यांना मिळाला.[१]

लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रीय पातळीवरील राजकीय भूमिका व उद्‌दष्टांविषयी योगी अरविंद टिळकांच्या कामाचा गौरव करताना दिसतात.[२] लोकमान्य टिळकांनी सर्व प्रकारच्या साधनांचा, 'स्वराज्य', संपादनाच्या कामी अवलंब केला यासंबंधी 'टिळकांनी प्रणीत केलेली स्वराज्याची साधने' या लेखात दामोदर गोखले असे लिहितात की,'' जनतेमध्ये राजकीय गुलामगिरीचा तिटकारा उत्पन्न करून त्यांच्यामध्ये स्वराज्य संपादनाची ईर्षा उत्पन्न करावी व या ध्येयाने प्रेरित झालेल्या लोकांची संघटना करून स्वावलंबनाच्या मार्गाने त्यांचे संघटित सामर्थ्य वाढवित वाढवित परिस्थिती प्रतियोगित्वाच्या तत्वावर, केव्हा बहिष्कार, अडवणूक यापासून नि:शस्त्र प्रतिकारापर्यंत,तर केव्हा कायदेमंडळे काबीज करण्यांपासून तो आंतरराष्ट्रीय राजकारणांत हिंदुस्थानच्या स्वराज्याचा प्रश्न घुसडविण्यापर्यंत सर्व साधने ते उपयोगांत आणीत. एकाच वेळी जरूर पडल्यास परिस्थित्यनुरूप सर्व बाजूंनी चौफेर हल्ला चढविण्यासहि त्यांनी कमी केले नाही. धर्माप्रमाणे राजकारणातही ते प्रवृत्तीमार्गी कर्मयोगी असल्यामुळे जसा अत्याचाराचा डोक्यात राग घालण्याचा मार्ग त्यांनी अवलंबिला नाही तसाच प्रतिपक्षांशी संबंध टाळून करण्याचा संन्यास मार्गहि त्यांनी आचरला नाही. राजकारणाच्या रणभूमीवर शत्रुशी सदैव दोन हात करीत आपल्या राष्ट्राचे सर्वांगीण सामर्थ्य वाढविण्याचा व त्या सामर्थ्यांच्या जोरावरच विजय संपादण्याच्या त्यांच्या कार्यक्रम होता हे स्पष्ट दिसते. जनतेत जितके सामर्थ्य अधिक व त्या सामर्थ्यांचा चळवळीला जितका पाठिंबा अधिक तितका स्वराज्याच्या लढयांत यश मिळण्याचा संभव

अधिक असा त्यांचा विश्वास होता. टिळकांनी अवलंबिलेल्या स्वराज्याच्या साधनांची चिकित्सा अशा प्रकारची आहे.[३]

लोकमान्यांच्या जिवितकार्याचे सार, जनतेला आर्थिक निष्पीडनांतून मुक्त करण्याचे होते, असे दिसून येते या संदर्भात, 'लोकमान्य टिळकांची अर्थिक विचारसरणी' या लेखात आत्माराम रावजी भट असे लिहितात की,'' लोकमान्यांच्या जीवितकार्याचे अधिभौतिकदृष्टया सार काढावयाचे तर ते जनतेला आर्थिक निष्पीडनांतून मुक्त करण्याची व प्रत्येक हिंदवासियाला पोटभर अन्न मिळवून देण्याची खटपट हे होय. अर्थिक विषमता शक्य तितकी कमी व्हावी या मताचे ते होते.'' [४]

## लोकमान्य टिळकांचे लेखन —

लोकमान्य टिळकांनी आपले विचार व विविध मतांचे विश्लेषण करण्यासाठी जे साहित्य निर्माण केले त्यात, ग्रंथांची नावे 'ओरायण', 'आर्याचे मुळ वसतिस्थान', 'गीतारहस्य' यांचा समावेश होतो. या ग्रंथातून त्याचे धर्मविषयक, सामाजविषयक व राजकीय विचारांचे व विव्दत्तेचे दर्शन होते.

'ओरायन' हे पुस्तक टिळकांनी १८९२ साली लिहिले व १८९३ साली 'ओरायन' पुस्तकरूपाने प्रसिध्द झाले. १८९२ साली भरलेल्या प्राचविद्यापरिषदेकडे या पुस्तकाचा सारांश त्यांनी पाठविला. परिषदेने टिळकांचा निबंध स्विकारला कारण या निबंधातील संशोधकाची नवी दिशा, संशोधक विव्दानाला स्तिमित करणारी होती. ओरायन ची मध्यवर्ती कल्पना टिळकांना कशी सुचली हे जाणून घेणे ही उद्‌बोधक आहे. टिळकांना 'मासांनामार्गशीर्षोहमं' या भगवतगीतेतील वचनचा अर्थ गुढ वाटला. परंतू धर्मग्रंथात काही भाग गुढ असणारच, असे मानून त्यांनी तिकडे दुर्लक्ष केले नाही. बुध्दिने प्रत्येक गोष्टीचा उलगडा करून सांगितलेल्या कथेलाहि

अदययाक्त भूगर्भशास्त्रीय संशोधनामुळे दुजोरा मिळत आहे. एवढेच नव्हे तर त्याच्या आधारे आपल्याला या स्वर्गाच्या अस्तित्वाचा काल अखेरच्या हिमौघ कालापर्यंत मागे नेता येणार आहे. [५]

**<u>ग्रंथ लिहिण्याचे हेतू —</u>**

'ओरायन' आणि 'आर्क्टिक होम' हे दोन ग्रंथ लिहिण्यामागे टिळकांची काय प्रेरणा होती, हे सांगताना ग.प्र.प्रधान आपल्या व्याख्यानात असे म्हणतात की, '' टिळकांना आपल्या संस्कृतीच्या प्राचीनतेबद्दल मोठा अभिमान होता. प्राचीन भारतीय संस्कृती हे त्याने स्फूर्तिस्थान होते. आपल्या देशाच्या सांप्रतच्या अवनतदशेमुळे या आपल्या दिव्य भूतकालाकडेही जगाचे दूर्लक्ष झाले आहे याबद्दल त्यांना खंत वाटे. मागासलेल्या पौर्वात्य राष्ट्रांना सुधारणे त्यांचा उध्दार करणे हे गोऱ्या माणसाने शिरावर घेतलेले ओझे आहे. या इंग्रजांच्या दर्पोक्तीने टिळकांच्या स्वाभिमानी मनाला डंक होत असे. ब्रिटीश साम्राज्याबरोबर राजकीय आघाडीवर दोन हात करण्यापूर्वी सांस्कृतिक क्षेत्रात आर्यांचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करून इंग्रजांना त्यांच्या सुधारणेबाबतचा नक्षा उतरावयास हवा असे टिळकांना व्रीवतेने वाटे, ज्या भारतीयांचे पूर्वज सुधारणेच्या शिखरावर होते, त्यांना सुधारण्याच्या वल्गना करणारे इंग्रज हे उथळ वृत्तीचे व राजकीय यशामुळे घमेंडखोर बनलेले आहेत, असा टिळकांच्या मनचा पीळ होता. एक गोष्ट मात्र लक्षात ठेवली पाहिजे की, केवळ आपल्या प्राचीन संस्कृतीचे श्रेष्ठतव सिध्द करावयाचे या भूमिकेतून त्यांनी संशोधन केले नाही. सत्यशोधन करताना ज्योर्तिर्गणित, भूगर्भशास्त्र यांचा शास्त्रीय आधार त्यांनी घेतला आणि शास्त्राच्या कसोटीस उतरले असे पुरावे त्यांनी आधारभूत मानले.

वेद, पारशी लोकांचा अवेस्ता आणि ग्रीक पुराणे यांच्यातील पुराणकथांचा तैलानिक अभ्यास करताना त्यातील जी साम्यस्थळे त्यांना दिसली. त्यांच्यावर भाष्य करताना टिळकांची सत्यनिष्ठा कधी ढळली नाही. वेदकालीन संस्कृतीचा अभ्यास करताना तिच्या उत्तुंगतेने टिळकांचे मन उंचबळून गेले आणि आपल्या संस्कृतीच्या या उदात्त रूपाचे दर्शन जगाला घडविण्यात त्यांच्या मनाला अपूर्व साफल्य लाभले.

लोकमान्य टिळकांनी 'ओरायन' व 'आर्क्टिक होम इन दि वेदाज' हे दोन संशोधनपर ग्रंथ इंग्रजीत लिहिले आणि 'गीतारहस्य' मात्र मराठीत लिहिले. याचे कारण सांगताना ग.प्र.प्रधान असे म्हणतात की,''आर्य संस्कृती व वेद यांच्या विषयीचे संशोधन केवळ मराठीत प्रसिध्द झले असते, तर जगातील संशोधकापर्यंत ते पोहोचलेच नसते. टिळकांना आपल्या संशोधनविषयक ग्रंथाच्या दर्जाची जाणीव होती आणि ते इंग्रजीत प्रसिध्द झाल्यावर जगातील विव्दानांना त्यांची दखल घ्यावी लागेल. असा आत्मविश्वास त्यांना वाटत होता. ज्ञानाच्या क्षेत्रात स्वभाषेचा अभिमान धरून जगातील सत्यशोधनाच्या प्रवाहापासून बाजूला पडणे टिळकांना चूकीचे वाटत होते. आपल्या संशोधनावर आक्षेप घेतले जातील. काही भागांचे खंडनही होईल परंतु त्यामुळे त्या विषयावर नवा प्रकाश पडेल ही टिळकांची दृष्टि होती तसेच वेदांची व आर्यसंस्कृतीची प्राचीनता व तिचे श्रेष्ठत्व विव्दानांच्या जगात प्रस्थापित केल्याने पाश्चिमात्यांचा व विशेषत: इंग्रजांचा नक्षा उतरेल असेही त्यांना वाटत होते. या विविध कारणामुळे टिळकांनी हे दोन ग्रंथ इंग्रजीत लिहिले.'' [६]

## <u>लोकमान्य टिळकांचे अन्य संशोधन</u>

लोकमान्य टिळकांनी 'खाल्डिअन व भारतीय वेद' या विषयावर १९०४ साली व्याख्यान दिले व पुढे डॉ. भांडारकर स्मारक ग्रंथाकरीता

निबंध लिहून टिळकांनी खल्डियन व आर्यसंस्कृती बाबत आपले विचार मांडले आहेत.

ईश्वरकृष्ण यांच्या 'सांख्यकरिका' हा सांख्य व तत्वज्ञानावरील सर्वांत जुना ग्रंथ होय. मूळ ग्रंथ ७० आर्यांचा आहे, असे ईश्वरकृष्ण म्हणतो. परंतू त्यात ६९ आर्या आहेत.याबाबत टिळकांनी अभ्यास करून एक सांख्यकरिका बनवून दिली आहे. अनेक पंडितांच्या मते लोकमान्यांचा सांख्य तत्वज्ञानाचा अभ्यास किती सूक्ष्म होता आणि त्यांच्या प्रज्ञेचे स्वरूप किती भव्य होते ते या नव्या सांख्यकरिकेवरून प्रत्ययास येते.

'वेदांग जोतिष' हा लोकमान्यांनी लिहिलेला प्रबंध छापील १०० पानांचा आहे, कै.शंकर बाळकृष्ण दिक्षित यांनी 'भारतीय ज्योतिशास्त्र' या ग्रंथात वेदांग ज्योतिषातील गणितातील उपपत्ती मांडली होती. परंतू १२ श्लोकांचा अर्थ त्यांना लावता आला नाही. लोकमान्य टिळकांनी या विषयाचा अभ्यास करून न लागलेले १२ श्लोक व श्री दिक्षित यांनी स्पष्ट केलेले काही श्लोक यांच्या आधारे वेदकालीन पंचागाची माहिती दिली आहे. गणितातील काव्यात रमणाऱ्या टिळकांच्या बुध्दीला वेदकालीन ज्योतिर्गणित समजून घेण्यात व विशद करण्यात एक अवर्णनीय आनंद लाभला. [७]

लोकमान्य टिळकांनी 'आर्क्टिक होम' व 'ओरायन' तसेच 'वैदिक क्रॉनॉलजी' हे सर्व वेदसंशोधन इंग्रजीमधून करण्याचा लोकमान्य टिळकांचा हेतू, तसेच सामान्य लोकांसाठी गीतारहस्य होते, हे सांगताना आपल्या 'लोकमान्य टिळकांचे ग्रंथकर्तृत्व' या लेखात ग.वि.केतकर असे लिहितात की,'' आर्क्टिक होम व ओरायन या दोन ग्रंथांना व तिसऱ्या वैदिक क्रॉनॉलजी' मधील अपुऱ्या टिपणांना मिळून टिळकांचे 'वेदकाल संशोधन' असे नाव देता येईल हे सर्व वेदसंशोधन इंग्रजीमधून केले आहे. शुध्द संशोधकी बाण्यांने ते लिहिले आहे. या संशाधेनाचा सर्व पौर्वात्य व

विशेषत: पाश्चिमात्य संशोधकांनी काळजीपूर्वक विचार करावा असा टिळकांचा हेतू आहे. उलट 'गीतारहस्य' हा ग्रंथ त्यांनी मराठीत लिहिला त्याचे इंग्रजीत भाषांतर करण्याऐवजी गुजराथी, कानडी, बंगाली तामीळ, हिंदी इत्यादी भाषांतून त्यांची भाषांतरे प्रसिध्दे व्हावी याबद्दल लोकमान्यांचा जास्त कटाक्ष होता.''

''... प्रत्येक हिंदू धर्मिक प्रचारकाजवळ 'गीतारहस्य' हे संदर्भ आधार पुस्तक म्हणून राहावे असे त्यांना वाटे टिळकांचे 'वेदसंशोधन' हे इंग्रजी जाणणाऱ्या संशोधकासाठी होते तर 'गीतारहस्य' हे सामान्य जनांसाठी व हिंदी शास्त्रीपंडीतांसाठी होते.''[८]

## 'गीतारहस्य' —

''गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र'' हा ग्रंथ लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या तरूंगात लिहिला. 'भगवदगीतेमुळे' लोकमान्य टिळकांचे मत प्रवृत्तीवर आणि पुरूषार्थी बनले. गीतेमुळे त्यांना प्रकाश मिळाला आणि स्वातंत्र्य समरात लढताना त्यांना 'भगवद्‌गीतेच्या' संदेशाच्या दिव्यत्वाची प्रचिती आली. चिंतन आणि अनुभव यामधून 'भगवदगीतेचे' जे रहस्य लोकमान्यांना उलगडले ते रहस्य जनसामान्यांना सांगावे आणि त्यांच्या मनाला 'भगवदगीतेचा' स्पर्श घडवावा या उद्‌देशाने लोकमान्यांनी 'गीतारहस्य' मराठीत लिहिले. 'गीतारहस्य' हा लोकमान्यांच्या परिणत व्यक्तिमत्वाचा अविष्कार आहे, हा ग्रंथ त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. 'गीतेत' सांगितलेल्या निष्काम कर्मयोगाचा आचार करण्याचा प्रयत्न करताना लोकमान्यांना जे सामर्थ्य लाभले ते सामर्थ्य आपल्या देशबांधवाना लाभावे आणि त्यांच्या जीवनातील मोह नष्ट होवून त्यांचा पराक्रम जागृत व्हावा ही उत्कट प्रेरणा 'गीतारहस्य' लिहिण्यामागे होती.

'गीतारहस्याची' मध्यवर्ती कल्पना लोकमान्य टिळकांनी १९०२ साली मॅरिस कॉलेजमधील विद्यार्थ्यांसमोर मांडली. या भाषणात त्यांनी निष्काम कर्म म्हणजे काय हे ज्याप्रमाणे समजावून सांगितले, त्याचप्रमाणे 'गीता' ही प्रवृत्तीपर असून भगवतांनी अर्नुनाला 'मामनुस्मर युध्दच' हा दिलेला संदेश आचरणात आणावयास हवा असे प्रतिपादन केले.[९]

'भगवदगीतेवर' जो ग्रंथ लिहावयाचा त्याची मनात व्यवस्थित जुळणी झाल्यावर २ नोव्हेंबर १९१० ला त्यांनी लेखनास सुरूवात केली. अवघ्या साडेतीन महिन्यात त्यांनी संपूर्ण 'गीतारहस्य' स्वहस्ते लिहून काढले. २ मार्च १९११ च्या पत्रात ते लिहितात,'' गीता हा व्यावहारिक नितिशास्त्राचा अध्यात्म ज्ञानावर आधारलेला ग्रंथ आहे. ग्रीनच्या 'प्रोलिगोमेना टु एथिक्स' या पुस्तकाच्या धर्तीवर तो लिहिला आहे. येथे माझ्याजवळ जी पुस्तके आहेत, त्या सर्वांचा मी उपयोग केला. जी जवळ नव्हती त्यांचे संदर्भ स्मरणाने दिले आहेत. विवेचनाचा मुख्य आधार कान्ट याचा 'क्रिटिक ऑफ प्यूअर रोझन' हा ग्रंथ ग्रीन, शंकरभाष्यासह ब्रम्हसुत्रे,महाभारत आणि गीता हा विषय माझ्या डोक्यात गेली वीस वर्षे होता, हे पुस्तक अगदी स्वतंत्र आणि सर्वस्वी नवे आहे. मी सध्या गीतेतील श्लोकांचे भाषांतर करीत आहे, ते दोन महिन्यांत संपेल. गीतेत कर्तृत्वशाली जीवनाचे हिंदू तत्वज्ञान आलेले आहे असा उल्लेख ग.प्र.प्रधानांच्या पुस्तकांत येतो. [१०]

'गीतारहस्याच्या' पहिल्या प्रकरणात विषय प्रवेशात टिळकांनी 'गीता' हा आमच्या धर्मग्रंथापैकी एक अत्यंत महत्वाचा ग्रंथ असून संसारातील समस्या व निष्काम कर्म करण्यास प्रवृत्त करणारा जगातील अत्यंत दुर्मिळ ग्रंथ आहे असे सांगितले आहे. (संदर्भ –परिशिष्ट क्र. १ पहाणे, पृ. २२०) टिळकांनी 'गीता रहस्याची' मांडणी राजकीय, सामाजिक व धार्मिक अंगांने केलेली दिसून येते.[११]

**गीतेचे स्वरूप —**

'गीतारहस्याच्या' प्रस्तावनेत टिळकांनी जी चर्चा केली आहे. ती हा ग्रंथ समजून घेण्याच्या दृष्टिने उपयुक्त आहे. त्यात पुढील मुदयांची चर्चा आहे.

१. ऑरिस्टॉटलने नितीशास्त्रावरचा पहिला पध्दतीशीर ग्रंथ लिहिला हे पाश्चात्य विव्दानांचे म्हणणे. टिळक म्हणतात की, 'गीता' त्या पूर्वीची आहे व 'गीतेत' धर्म की अधर्म, कर्म की अकर्म यांची चर्चा आहे त्यांस पूर्वी धर्मशास्त्र म्हणत, आता नितिशास्त्र म्हणतात.

२. गीतेचे महत्व इतकेच नाही त्यात आत्मविद्येची मूलतत्वे थोडक्यात व असंदिग्ध रितीने सांगितलेली आहेत. अध्यात्मीक पूर्णावस्था कोणती हे सांगितले आहे. भक्तीची ज्ञानाशी जोड करून दाखविली आहे. संसारात भाबांवून गेलेल्या मनास शांत व निष्काम कर्तव्याचरणास प्रवृत्त करणारा हा ग्रंथ आहे.

३. गीतेचा प्रारंभ क्षात्रधर्म की बंधूप्रेम या समस्येने झालेला आहे. पण असेच इतर प्रश्न संसारात उपस्थित होतात ते सोडविण्याचे काही तत्वज्ञान आहे काय? हा प्रश्न पडतो. कारण अशा प्रसंगी योग्य निर्णय झाला नाही तर आपल्या हातून अधर्म किंवा गुन्हा होईल काय अशी सामान्य माणसास भिती वाटते.[१२]

**'गीतारहस्याची' प्रस्तावना लोकमान्य टिळकांचे मत —**

''केल्याविण काही होत नाही'', हा सृष्टीचा नियम लक्षात आणून तुम्ही मात्र निष्काम बुध्दीने कर्ते व्हा म्हणजे झाले. निव्वळ स्वार्थ परायण बुध्दीने संसार करून थकल्या भागल्या लोकांच्या कालक्रमणार्थ, किंवा संसार सोडून देण्याची तयारी म्हणनही, 'गीता' सांगितलेली नसून संसाराच मोक्षदृष्टा कसा केला पाहिजे व मनुष्यमात्राचे संसारातले खरे कर्तव्य काय

याचा तत्विकदृष्टा  उपदेश करण्यासाठी 'गीतारहस्याची' प्रवृत्ती झालेली आहे म्हणून पूर्ववयांतच गृहस्थाश्रमाचे किंवा संसाराचे हे प्राचीन शास्त्र जितक्या लवकर समजून घेणे  शक्य असेल तितक्या लवकर प्रत्येकाने समजून घेतल्याखेरीज राहू नये, एवढीच आमची शेवटी विनंती आहे.''[१३]

लोकमान्य टिळक आपले भाचे धोंडो विव्दांस यांस दि. २ मार्च १९११ रोजी मंडालेहून पाठविलेल्या पत्रात 'गीतारहस्याचा हेतू' व त्याबद्दल माहीती सांगताना असे लिहितात की, About the gita , I have finished what I call Gita Rahasya an independent and original book investigating the purpose of Gita and showing how our religious philosophy is applied there into the solution of the ethical problem. For my view of Gita is that it is a work on ethics not utilitarian nor intuitional but transen-dental some what on the lines followed in Green's  prologomere to Ethics. I have compared throughout the Gita philosophy with the western, both religious and ethical and have tried to show that our system is, to say the least, not inferior to any of the western methods. This Rahasya is made up of  15 chapters with an appendix devoted to a  critical examination of Gita, as part of Mahabharat and discussing its age etc. It is impossible to give you any further idea of the book in this letter. [14]

लोकमान्य टिळकांच्या 'गीतारहस्यविषयी' तत्कालीन देशी, परदेशी विचारवंतानी तसेच तत्कालीन वृत्तपत्रांनी त्याविषयी आपले मत व्यक्त केल्याचे दिसून येते. लोकमान्य टिळक यांच्यां 'गीतारहस्याचे परीक्षण' या चित्रमयजगत,ऑ. १९१५ मधील लेखात दादासाहेब खापर्डे असे लिहितात की,''रहस्यकारांनी नवा शोध लावून तिसऱ्याची भर घातली आहे. व ती फार विचार करण्यासारखी असून हदयसंगम आहे. त्यांनी पुरातन ग्रंथाचे पुरावे देवून असे सिध्द केले आहे की, 'गीतेतील' उत्तम भाग महायान पंथीय बौध्द लोकांनी आपल्या ग्रंथांत घेतले व त्यापासून ते ग्रीक लोकांनी व तदव्दारा यहुदी लोकांनी मिळविले आणि यहुदी लोकांपासून ख्रिस्ती

मंडळींनी आपल्या धर्मग्रंथात उतरून घेतले. ख्रिस्ती बायबलच्या आधारेच महंमदाने आपल्या धर्मातील बराच भाग प्रतिपादाला ही गोष्ट सर्वमान्य आहे. या दृष्टीने पाहता आजमितीस जगांतील सुधारलेल्या देशांत प्रचलित असलेले सर्व धर्म गीतेतून निघाले असल्यामुळे या सर्व धर्मांची 'गीता' ही माता आहे असे सिध्द होते हा सिध्दात फार महत्वाचा आहे, आणि याचा उपयोग केवळ महात्म दाखविण्याचाच नसून यापासून फार मोठी अनुमाने निघतात हे पुढे दाखविण्यात येईल. त्याशिवाय यापासून विश्वबंधुत्वाच्या मताची उपपत्ति लागते आणि धर्मासाठी परस्परांत वैमनस्य वाढवूं नये किंबहूना ते सर्वथैव काढून टाकावे असे उदात्त मत प्रतिपादणारांस दुजोरा मिळतो व सर्व शांतताप्रिय जनतेवर उपकार केल्याचे श्रेय 'गीतारहस्यकारांस' मिळते. तसेच भारतवर्षात राहणाऱ्या सर्व आर्यांस सभिमान आनंदास उत्तम कारण होते.'' [१५]

**<u>गीतारहस्य व राजकारण</u> —**

मंडाले तुरूंग अधिक्षक कॅ.पी.के.तारापोर यांनी ब्रम्हदेश सरकारला पत्र लिहून 'गीतारहस्याच्या' हस्तलिखिताबद्दल कळविले, मात्र हा ग्रंथ पूर्णपणे धार्मिक असल्याचे आपले मत नोंदवण्याचे धाडसही त्यांनी दाखवले.

सरकारने ओरिएन्टल ट्रानस्लेटर एस.एम.भरूचा यांना त्याची तपासणी करून त्यात काही अक्षेपार्ह मजकूर आहे काय? याची शहानिशा करायला सांगितली. भरूचांनी सादर केलेल्या गोपनीय, परंतू अभ्यासपूर्ण अहवालात काही भागांवर खुणा करून त्यांच्या आक्षेपार्हतेबद्दल संबंध व्यक्त केला पण एरवी हा ग्रंथ विव्दत्तापूर्व, धार्मिक व तात्वीक असल्याचे नमूद केले.

भगवदगीता आणि राजद्रोह याबद्दल रॅम्से मॅक्डोनॉल्डनी असे लिहिले की,'' राजद्रोही देशी पत्रकरितेची एकही शाखा, नियंत्रयणाबाहेरील

अमृतबझारपत्रिका किंवा वंदेमातरम यातील काहीही भगवंताच्या गीतेइतके धोकादायक, इतके राजद्रोही नाही.

'गीतारहस्यांत' माझे राजकारणही आहे, असे टिळक का सांगत याचे वेगळे स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाही.[१६] अशाच प्रकारचे उल्लेख तत्कालीन वृत्तपंत्रात दिसून येतात. दि.८ ऑगस्ट १९२० रोजीच्या लोकसंग्रह असे लिहितो की,'' इतके विविध व्यवसाय जरी ते सांभाळून होते तरी लोकमान्यांचा सर्वात आवडता विषय म्हणजे राजकारण. लोकमान्य टिळक म्हणजे 'गीतेतील 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचनं ' या वचनाचे मूर्तिमंत उदाहरण होय. त्यांचे आयुष्य म्हणजे कर्मयोग्याचे होय. जन्मभर सतत निरलसपणे देशकार्य करीत राहणे हेच त्यांच्या 'गीतारहस्याचे' सार होय आणि हेच त्यांनी स्वत: करून दाखविले रामदासांनी म्हटल्याप्रमाणे टिळकांनी आधी केले मग सांगितले 'गीतरहस्य' वाचणे म्हणजे त्यांच्या आयुष्याचे मर्म समजून घेणे होय.''[१७]

महात्मा गांधीनी 'गीतारहस्याचे' सांस्कृतिक महत्व विषद केले आहे त्याचबरोबर कर्माच्या अंगाने 'गीतारहस्याचे' महत्व विशद केले आहे.[१८]

बाबू अरविंद घोष 'गीतारहस्यांविषयी' आपले मत व्यक्त करताना असे लिहितात की, '' एका राष्ट्राचे आणि संस्कृतीचे पुनरूज्जीवन गीतेची शिकवण प्रत्यक्ष घडवित आहे. या राष्ट्राचे महान भवितव्य त्याच्या उज्वल गतेतिहासास साजेसे व्हावे या हेतूशी टिळकांच्या प्रतिमेचे हे गौण अविष्कारसुध्दा सुसंगतच आहेत. 'गीतारहस्यचा' विषय झालेला 'गीताग्रंथ' भारतीय आध्यात्मिकतेचे परिपक्व सुमधुर फल होय. नव्या मनूंतील ध्येय वादास आवश्यक असलेल्या मानवी श्रम, जीवन व कर्म यांच्या महत्तेची जाणीव आपल्या अधिकारवाणीने देवून खऱ्या अध्यात्माचा सनातन संदेश गीता सांगत आहे.'' [१९]

त्याचबरोबर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आपल्या 'गीतारहस्य व साधनाशुचिता या लेखात 'गीतारहस्यांविषयी आपले मत व्यक्त करतांना असे लिहितात की, '' टिळकांनी शब्दप्रामाण्य व बुध्दिप्रामाण्य या दोन्ही बाजूंना सारखेच महत्व देवून गीतेचे विवेचन केले आहे. शब्द प्रामाण्याकरीता 'गीतेतील शब्द, वाक्य व अध्याय यांची संगती लावून व आभासमान विसंगती काढून टाकून समुच्चित असे तात्पर्य काढण्याकरीता विस्तृत टीका लिहिली आहे. युरोपातील कांट, ग्रीन इत्यादी अध्यात्मवादी नीतिशास्त्रज्ञांच्या विचारसरणीशी तुलना करून 'गीतेतील नीतिशास्त्रीय उपपत्ती तर्कशुध्द पध्दतीने पंधरा प्रकरणांस आपल्या 'गीतारहस्य' या निबंधात त्यांनी मांडली आहे.[२०]

त्याचबरोबर दौर्बल्यास कारण होणारी आगतिकता नष्ट करण्यासाठी गीतारहस्याचे विवेचन लोकमान्यांनी केलेले आहे. असे मत मांडतांना तर्कतीर्थ जोशी 'लोकमान्य टिळकांचे गीतारहस्य' या लेखात या संबंधी असे लिहितात की,''आदय शंकराचार्यांचे परंपरागत भारतीय तत्ववेत्यांमध्ये उच्चतम स्थान गणले गेले असून हिंदी संस्कृतीवर त्यांच्यांच विचारसरणीचे १९ व्या शतकापर्यंत अधिराज्य होते. या निवृत्तीवादी विचारांच्या छायेतून हिंदू मनाची सुटका करण्याकरिता टिळकांनी गीतेचे प्रवृत्तीवादी किंवा कर्मयोगपर भाष्य लिहिले. कर्तृत्वशून्यता निर्माण करणाऱ्या निवृत्तिवादी विचारसरणीने हिंदू समाजाची प्रगती थांबवून जागतिक व दुर्बल बनविले. ही दौर्बाल्यास कारण होणारी आगतिकता नष्ट करण्याकरिता 'गीतारहस्याचे' विवेचन आहे ही गोष्ट 'गीतारहस्याच्या' प्रस्तावनेत टिळकांनी सुचविली आहे.

साधकावस्थेपासून ते सिध्दावस्थेपर्यंत म्हणजे जीवन समाप्तीपर्यंत कर्ममार्गाचे सतत अनुकरण करणे अत्यंत प्रशस्त होय असा गीतेचा अभिप्राय किंवा रहस्य प्रतिपादले आहे.

टीळकांनी 'गीतारहस्यांत' मानवी बुध्दीच्या कक्षेत असलेली समाजधारक कर्मे निष्काम बुध्दीने आचरणे हाच मुख्य कर्मयोग होय असे सांगितले आहे. टिळकांच्या दृष्टीने समाजधारणेचे कर्म म्हणजे यज्ञ यागादी कर्म नव्हे. सृष्टी व्यापाराचा वैज्ञानिक अर्थ ध्यानात होऊन निश्चित होणारे समाजधारणेचे कर्म हेच सिध्द व ज्ञानी पुरूषाने आचरावयाचा कर्मयोग होय असे टिळकांना सांगावयाचे आहे.[२१]

कर्मयोगसिध्दान्त हा गीतारहस्यांतील चिंतामणी आहे त्याचे महत्व विशद करतानां टिळकांच्या धार्मिक सुधारणेतील रहस्य' या सहयाद्री १९३५ मधील लेखात मारूती सोमण असे लिहितात की,''कोणत्याही देशांत झाले तरी कर्ते पुरूष म्हटले म्हणजे ते कर्ममार्गाचेच पुरस्कर्ते असले पाहिजेत हे उघड आहे. परंतू कर्ते झाले तरी ब्रम्हज्ञान न सोडिता त्याला जोडूनच कर्तुत्व कायम ठेवणे' हे आमच्या कर्म योगांचे मुख्य तत्व आहे.''

''कर्मयोगसिध्दान्त हा 'गीतारहस्यांतील' चिंतामणी असून हिंदूसमाजाला संन्यासपर किंवा निवृत्तीपर तत्वज्ञानाच्या शिकवणुकीने आलेले वैक्लव्य आणि नैराश्य घालविण्यासाठी तो चिंतामणी टिळकांनी उपलब्ध करून दिला आहे. लोकमन्यांनी आयुष्यभर कर्मयोगाचे पालन संकटाच्या पर्वतराशी कोसळत असताहि, एकनिष्ठपणे केले कारण त्यातच भारताच्या भाग्योदय आहे अशी त्यांची श्रध्दा होती.''

''...शाळा कॉलेजांतून धर्मशिक्षणाची प्रथा पडून सुशिक्षित धर्मप्रसारक बाहेर पडावे व त्यांनी जनमनांत निष्काम कर्मयोगाचे बीजारोपण करून अखिल हिंदू समाजाला स्वराज्योन्मुख करावे हीच लोकमान्यांची इच्छा होती.'' [२२]

लोकमान्य टिळकांच्या राजकीय चळवळीशी असलेल्या गीतेच्या संबंधाबद्दल भाष्य करताना सदानंद मोरे आपल्या 'लोकमान्य ते महात्मा' या ग्रंथात असे मत मांडतात की, '' टिळकांच्या कर्मयोगाचा संबंध त्यांच्या

राजकीय चळवळीशी आहे हा मुद्दा आहे. आपण स्वातंत्र्याची चळवळ करीत असलो,तरी निदान आपल्या पिढीला स्वातंत्र्याचे फळ मिळणे कठीणच, हे टिळकांना समजत होते, पण त्यातून काय निष्पन्न होते? निष्क्रियता आणि नैराश्य या शृंगपत्तीपासून मार्ग काढण्यासाठी

'' कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।

म कर्मफलहेतुर्भ । माते संगसत्वकर्मणि।।''

हा 'गीतेचा' कर्मयोग उपयोगी पडतो. स्वांतत्र्यचळवळीतील कितीतरी क्रांतीकारकांना 'गीतेने मायभुमीच्या मुक्ततेसाठी हसतमुखाने फासावर चढण्याची प्रेरणा दिली हे विसरणे अशक्य आहे.''[२३]

मिरजेतील संस्कृत पंडित विश्वनाथशास्त्री कबाडे यांनी लिहिलेल्या 'विवेकवाणी' अथवा 'गीतार्थ कथा' या पुस्तकाबाबत लिहिलेल्या दि. १० ऑक्टो १९१५ पत्रात गीतेबाबत दोहोंकडे मत एकच असून त्यातील भेद स्पष्ट करताना लोकमान्य टिळक लिहितात की, ''पुस्तकात आपण जे गीतेचे तात्पर्य काढले आहे. तेच माझे मते ही गीतेचे तात्पर्य आहे व मी ते आपल्या नवीन ग्रंथांत प्रतिपादले आहे तथापि आपला लेख तत्पूर्वी लिहिलेला व त्यात गीतार्थ माझे प्रमाणे प्रतिपादलेला आहे हे पाहून मला आनंद झाला आपण गीतार्थाला ज्याप्रमाणे थोडक्यात मनोरंजक रूप देण्याचा प्रयत्न केला आहे. तसे न करीता मी तोच विषय सप्रमाण प्रतिपादला आहे. पण मत दोहोंकडेही एकच आहे व आपल्या ग्रंथावरून सामान्य लोकांच्या ते पटकन लक्षात येईल अशी त्याची योजना आहे.''[२४]

लोकमान्य टिळकांनी 'भगवदगीता' आणि 'विष्णुसहस्त्रनाम' यांचे महत्व विशद केले आहे. दि.२२ मार्च १९१८ रोजी 'विष्णुसहस्त्रनामाबद्दल' लिहिलेल्या टिपणांमध्ये ते असे लिहितात की,''थोडक्यात सांगावयाचे असल्यास 'विष्णुसहस्त्रनाम' हे म्हणजे परमेश्वराचे गुण मनांत बिंबून त्याच्या ठायी मनुष्याची भक्ती दृढ करण्यांस

साधनीभूत असा एक भक्ती कोश होय.''हा भक्ती कोश जेव्हा असा तयार झाला तेव्हा तो 'भगवदगीतेप्रमाणे तोहि इतका लोकप्रिय झाला की त्याचे अनुकरण करण्याची इच्छा होवून इतर सांप्रदायिकांनिही आपापल्या देवतांची इतर सहस्त्रनामे हया प्रमाणे तयार केली.''

''...तथापि कलिदासाच्या मेघदूताचे पुष्कळांनी पुढे अनुकरण केल्याने ज्याप्रमाणे कालिदासाच्या मेघदूताची योग्यता स्थापन होते तव्दतच हया दुसऱ्या अनेक सहस्त्रनामांमुळे 'विष्णुसहस्त्रनामाची' महति व योग्यता मात्र अधिक स्थापन होते असे आम्हांस वाटते.''[२५]

लोकमान्य टिळकांच्या धार्मिक विचारांचा मागोवा घेता, टिळकांनी स्वराज्य स्थापनेच्या कार्यास आमची संस्कृति पुर्णपणे लायक आहे, असा आत्मविश्वास लोकांत निर्माण केला त्यासाठी त्यांनी धार्मिक उत्सवांचा आधार घेतला त्यांनी केलेल्या राजकीय चळवळींचा विचार करता, त्यांच्या राजकीय चळवळींना त्यांच्या धार्मिक विचारांचा आधार होता असे दिसून येते. २ मार्च १९११ रोजी एका मंडालेहून पाठविलेल्या पत्रात ते असे म्हणतात की, ''माझा गीतेवरचा ग्रंथ पुर्ण झाला आहे. मी त्यात कित्येक नव्या कल्पनांचे विवरण केले असून दैनंदिन जीवनात उद्‌भवणारे गुंतागुंतीचे नैतिक प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने हिंदूचे धार्मिक तत्वज्ञान कसे उपकारक पडते हे मी त्यात दाखवून दिले आहे.''

लोकमान्य टिळकांच्या राजकीय चळवळीमध्ये खालील चळवळींचा समावेश होता.

१. गणेशोत्सव —गणेशोत्सवाचे एक अंग मेळे

२. शिवजयंती उत्सव

३. दुष्काळातील चळवळी (शेतकरी चळवळ)

४. स्वदेशी व बहिष्कार चळवळ,(सविनय प्रतिकार चळवळ)

५. होमरूल चळवळ

**गणेशोत्सव –**

लोकमान्य टिळकांनी १८९३ साली सामुहिक स्वरूपात गणेशोत्सव साजरा करण्यास सुरूवात केली, त्यामागे सामाजिक सलोखा प्रस्थापित करणे,हिंदूसाठी एक धार्मिक उत्सव सुरू करणे हा प्रमुख उद्‌देश होता असे दिसून येते. याबाबत जोग असे लिहितात की, ‘‘ वार्षिक गणेश उत्सव तसा परंपरागत आहे, त्याचेच रूपांतर टिळकांनी सार्वजनिक महोत्सवात केले. गणेश वा गणपती हे हिंदूचे एक लोकप्रिय दैवत आहे. तो विद्येचा अधिष्ठाता आणि विघ्नहर्ता मानला जातो. हिंदूना मोहरमच्या सणात भाग घेण्यापासून परावृत्त करण्याच्या दृष्टीने गणेशाहून अधिक लोकप्रिय देवता टिळकांना शोधून सापडली नसती. १८९३ साली गणशोत्सवाला चालना देण्यामागे तात्कालिन हेतू हाच होता. परस्परांच्या महोत्सवात सहभागी होणे हा जातीय सलोखा निर्माण करण्याचा आणि टिकविण्याचा चांगला मार्ग आहे. पण त्या सुमारास १८९० सालच्या आणि नंतरच्या ही भीषण जातीय दंगलीपायी, हिंदू मुसलमानांचे संबंध पार बिघडून गेलेले होते. सगळयात भीषण दंगा ११ ऑगस्ट १८९३ रोजी मुंबईत उसळला काही मुसलमानांनी चालविलेल्या हिंदू द्रोही कारवाया इतकाच सरकारच्या मुसलमान धार्जिण्या पक्षपाती धोरणाचाही निषेध करणे हाच गणेशोत्सवाच्या कल्पनेमागील मुख्य उद्‌देश होता.[२६]

**शिवजयंती व गणपती उत्सवांमागील टिळकांची भूमिका**

गणेशोत्सवाला मोठया प्रमाणात ज्ञानसत्राचे स्वरूप देण्याचा मान लोकमान्य टिळक यांनाच आहे. इंग्रजी शिक्षणामुळे हिंदूचे आचार नष्ट होवू लागले होते, विचार भ्रष्ट होवू लागले होते. धर्माबद्‌दल लोक उदासीन होवू लागले होते, ही गोष्ट काही बरी नाही, तरी त्यास तोड काय काढावी असा विचार पुष्कळ विचारवंताच्या मनात घोळत असता ‘गणपती

उत्सवास' सार्वजनिक स्वरूप दिले तर त्याचा परिणाम चांगलाच होईल असे लोकमान्यांना वाटे हा उत्सव दहा दिवस करावा म्हणजे त्यात किर्तने, प्रवचने,व्याख्याने ,मेळे वगैरे विविध प्रकारांनी हिंदूच्यामध्ये चांगली जागृती करता येईल ही कल्पना त्यांना पटली व गणेशोत्सवाला अभिनव सार्वजनिक स्वरूप देवून कै.लोकमान्य टिळकांनी स्वत: सार्वजनिक गणपती सन १८९४ साली श्री.स.विंचुरकर यांच्या वाडयात बसविला. हया उत्सवास सार्वजनिक स्वरूप देण्यात लोकमान्यांचा हेतू असा होता की, या योगाने हिंदू समाज जो विस्कळीत होत चालला आहे, तो संघटित होईल व त्यामुळे राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीत जास्त पुढे पाऊल टाकता येईल. लोकमान्यांच्या पुरस्कारामुळे या उत्सवाचा त्वरीत सर्वत्र प्रसार झाला आणि लोकमान्यांच्या हयातीत हा उत्सव हे एक चळवळीचे साधन ठरले अशा रितीने हा उत्सव सार्वजनिकरित्या साजरा होवू लागला.[२७]

लोकमान्य टिळकांनी गणेश उत्सवाच्या माध्यमातून स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार,राष्ट्रीय शिक्षण या चतु:सुत्रीचा प्रचार व प्रसार केला. महाराष्ट्रात व देशाच्या इतर भागांमध्ये निरनिराळया उपक्रमाच्या माध्यमातून विविध भागात त्यांनी जागृती निर्माण केली. याबाबत करंदीकर असे लिहितात की, ''स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण या त्रयीचा उपदेश खेडयापाडयातून राष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अखिल जनतेच्या कानी पडण्याचा गणेशोत्सव हे स्वाधीनचे सुलभ साधन आहे, हे ताडून त्यांनी त्या उत्सवाला सार्वजनिक आणि राष्ट्रीय स्वरूप तात्काळ दिले आणि गणपती उत्सवाचा प्रसार सर्वत्र व्हावा अशी योजना केली, या योजनेनुसार दहा वर्षातच गणेशोत्सवाचा प्रसार दुरदुरच्या खेडयापाडयातूनही झाला.''

''कोठेही गणेशोत्सव चालू होणे म्हणजेच चतु:सुत्रीचे बीजारोपण होय. असल्या सार्वजनिक उत्सवाचा पुढाकार घेणे हेच एक प्रकारचे राष्ट्रीय शिक्षण असून उत्सवाच्या अनुषंगाने 'स्वदेशी' आणि 'बहिष्कार' यांचे पाठ

खेडूतानांही मिळत. उत्सवाची ही जंत्री जो कोणी सहजासहजी वरवर चाळून पाहिल त्यांना देखील आढळून येईल की, उत्सवांत स्वदेशी मालच वापरणे, परदेशी मालावर बहिष्कार घालणे, स्वदेशी व्रतपालनाच्या शपथा घेणे, इत्यादी बाबतीतला बाणेदारपणा उत्सवकर्त्यांच्या अंगी लागला. या उत्सवाने कविंनां काव्यस्फुर्ति दिली. व्याख्यात्यांना वाग्देवता प्रसन्न झाल्याचा अनुभव येवू लागला. किर्तनकार व प्रवचनकार यांना नवी दृष्टी आली. कृपणांनहि राष्ट्रकार्यार्थ आर्थिक झीज सोसण्याचे वळण लागू लागले या सर्वापेक्षा उत्सवकर्त्यांना पुढारीपणा पेलण्याचे बाळकडू मिळाले आणि स्वत:च्या हक्कासाठी  झगडणाचा धीटपणा त्यांच्या अंगी येत चालला, याला भावी चळवळीच्या दृष्टीने विशेष महत्व आहे.''[२८]

## <u>होमरूल लीगची चळवळ</u> —

होमरूल लीगच्या प्रचारासाठी टिळकांनी गणेशउत्सवाचा उपयोग करून राजकीय विचारांचा प्रसार केला असे दिसून येते. यासंदर्भात करंदीकर असे लिहितात की, ''१९०५ ते १९१० पर्यंतच्या उत्सवांत स्वदेशी बहिष्कार, मद्यपान निषेध या विषयांवर भर होता. १९१६ ला होमरूल लीग स्थापन होवून टिळकांचा होमरूलचा दौरा सुरू झाला होता. त्याबरोबर उत्सवातील व्याख्यानांचा मोर्चाही स्वराज्याकडे वळाला. 'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे.' ही घोषणा याच कालखंडातील असुन तिच्या योगाने राजकीय चळवळ फोफावत चालली. याच कालखंडात काँग्रेस लीग पॅक्ट झाल्याकारणाने मुसलमानांचा विरोध लुप्त होवून त्यावेळच्या चळवळीत मुसनमानहि भाग घेऊ लागले. अनेक ठिकाणी मुसलमान वक्तांची उत्सवात व्याख्याने झालेली आढळून येतील. स्पृश्यास्पृशांचा वाद पूर्वीपासूनच नव्हता, आणि जर कोठे थोडासा असला तर तोही मिटून जाऊन अस्पृश्य वर्गहि गणेशोत्सवात सामील होऊ लागला.

स्पृश्य वर्गांचे मेळे अस्पृश्यांचा गणपतीपुढे आणि अस्पृश्यांचा मेळा स्पृश्यांचा गणपतीपुढे अशी देवघेव चालू झाली. मिरवणुकीत तर सर्वच मेळे सारख्या हक्काने पूर्वीपासूनच सामील होत असत. काही ठिकाणी अस्पृश्यांचा गणपती आघाडीला असे.''[२९]

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव व शिवाजी उत्सव सुरू करण्यामागचे उद्‌देश स्पष्ट करताना शंकर दाते 'साप्ताहिक काळ' मधील लेखात असे लिहितात की, '' हिंदूचे हिंदू म्हणून संघटन वाढविण्याचा एक मार्ग म्हणून त्यांनी गणेशोत्सवास सुरूवात केली त्यामुळे हिंदू हे हिंदू म्हणून एकत्र आले. टिळकांनी या उत्सवाला राष्ट्रीय स्वरूप दिले व अशा रीतीने गणेशोत्सवाच्या रूपाने हिंदुराष्ट्रवादाच्या विचारास त्यांनी बळकाटी आणली.

याचबरोबर हिंदूराष्ट्रवादाचे दुसरे प्रतीक म्हणून त्यांनी शिवराज्याभिषेकोत्सव सुरू केला. छत्रपती शिवाजी हे हिंदू धर्माचे व हिंदुराष्ट्राचे सरंक्षक म्हणून प्रसिध्द असल्याचे गणेशोत्सव व शिवाजी उत्सव या दोन्ही उत्सवांच्या सहयाने टिळकांनी हिंदुधर्म व हिंदुराष्ट्रवाद या पायावर हिंदु समाजाची संघटना उभारली मुसलमानांच्या आक्रमक धोरणास व इंग्रजांच्या साम्राज्यसत्तेस या चळवळींनी धक्के दिले.''[३०]

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून विविध विषयावर लोकजागृती, लोकशिक्षण, लोकप्रबोधन, राष्ट्रीय जागृती केलेली दिसून येते. यातून त्यांनी संस्कार, धर्म, राजकारण, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य, गायन, वादन, संस्कृतीरक्षण, किर्तनप्रवचन इत्यादींचे महत्व त्यांनी विशद केलेले दिसून येते. गणेशोत्सव हा विद्यार्थ्यांवर संस्कार करण्याचे एक साधन आहे, अशी टिळकांची या उत्सवामागील भूमिका होती असे दिसते. दि. १६ सप्टेंबर १८९६ च्या व्याख्यांनात लोकमान्य टिळक असे म्हणतात की,'' हया दहा दिवसांत विद्यार्थ्यांच्या मनावर जे संस्कार होतील

ते शाळेतील वर्षाच्या शिक्षणाहून अधिक किमतीचे खास आहेत अशा उत्सवांच्या वेळींच उत्पन्न झालेल्या धर्म बुध्दीचाच सर्व आयुष्यभर उपयोग व्हावयाचा असतो. उदात्त विचार व उच्च मनोवृत्ती हयाच वेळी जागृत होतात. ज्यामुळे जिवंत राहण्यांत एक प्रकारचा थोरपणा आहे. त्या गोष्टी शिकण्याच्या शाळा हे उत्सव आहेत.''[३१]

लोकमान्य टिळक ४ सप्टें १९०० रोजीच्या पुणे गणपती उत्सवांत हिंदू धर्माची समर्पक व्याख्या करतात व धर्म हा राजकारण व अर्थशास्त्र यांच्याप्रमाणे राष्ट्रीय स्वरूपाचा असा व्यवहारात असावा असे प्रतिपादन करताना दिसतात. त्यांच्या या धार्मिक विचारांचा मागोवा घेता न.चिं. केळकर असे लिहितात की, 'दि. ४ सप्टें १९०० च्या 'हिंदू धर्माचे लक्षण' या व्याख्यानात त्यांनी 'हिंदू धर्मलक्षणाचे वर्णन' ज्या एका लहानश्या श्लोकात केले, तो श्लोक आता प्रसिध्द असून त्यातील लक्षण प्राय: सर्वसंमत झाले आहे तो श्लोक असा,

'' प्रामाण्यबुध्दिवैदेषु साधनानामतेकता
उपास्यानामनियमश्चेत ध्दर्मस्य लक्ष्मणम्।।''

यावरून टिळकांची हिंदूधर्माची कल्पना किती समर्पक होती हे दिसून येईल. टिळक हे नुसते तात्विकदृष्टा अस्तिक नव्हते, तर ईश्वरावर त्यांची निष्ठा असे पण ईश्वर हा पुराणांतरी वर्णिलेला तसा ते मानीत नसत. तर तर्क व निष्ठा यांच्या मिश्रनाने त्यांची ईश्वराची कल्पना बनलेली होती. ही कल्पना उदात्त होती. तथापि धर्म हा राजकारण व अर्थशास्त्र यांच्याप्रमाणे राष्ट्रीय स्वरूपाचा असा व्यवहारात मानला पाहिजे असे ते समजत.'' [३२]

गणपत्युत्सवाचा राष्ट्रदृष्टा उपयोग कसा आहे, याचे प्रतिपादन लोकमान्य टिळक करताना दि.१६ सप्टें १९०१ रोजीच्या व्याख्यानात टिळक म्हणाले की,''हया गणपत्युत्सवाला अलीकडे जे नवीन वळण लागले

आहे, त्याचा राष्ट्रदृष्टा फार उपयोग आहे. सध्या आमच्या लोकांत धर्मग्लानी अली आहे. पण अशा महोत्सवांच्या वेळी वर्षातून एकदा तरी आम्ही धर्माचा विचार करतो हया दृष्टीने पहिले म्हणजे गणपत्युत्सवाचे महत्व आपल्या लक्षात येईल उत्सवाच्या दिवसांत मनाची प्रसन्नता असते तेव्हा धर्माची चर्चा करणे चांगले अशा धार्मिक उत्सवांमुळे धर्माचा विचार करण्यांस चांगली मदत होते.''[३३]

गणपती उत्सवाच्या प्रधान हेतू राजकीय प्रश्नांचा व राजकीय शिक्षणांचा जनसमुंहात प्रसार करणे हा होय अशी त्याची भूमिका दिसून येते. त्यासंबंधी लोकमान्य टिळक पुण्यातील दि. १८ सप्टेंबर १९०५ रोजीच्या शुक्रवार पेठेतील गणपतीपुढील व्याख्यानात असे म्हणतात की, ''गणपतीच्या मेळयांतून राजकीय पदे म्हणण्यात येतात व राजकीय विषयांचे उदघाटन चालते व तेणेकरून भक्तिरसाचा भंग होतो. परंतू सदरहू गणपती उत्सवास जे सार्वजनिक स्वरूप देण्यात आले, त्याचा हेतू प्रमुख आक्षेपकांच्या ध्यानात आलेला नाही. भक्ती ही प्रत्येक मनुष्य आपपल्या घरी करीतच असतो. भक्ती करावयास आमच्या धर्मात ख्रिस्तांप्रमाणे फक्त रविवारी एका ठिकाणी जमावयास नको आहे. गणपती उत्सव हा एक धार्मिक उत्सव तर खराच पण त्यात नुसती भक्ती प्रधान नसून राजकीय प्रश्नांचा व राजकीय शिक्षणाचा जनसमूहांत प्रसार हा हेतू प्रधान होय. तो हेतू साध्य होण्यासाठीच मेळयात राजकीय विषय गोवण्याचा यत्न आहे.[३४]''

उत्सव का करावा? विचार करण्याची संधी उत्सवामधून मिळते. देशाला दरिद्रय कसे आलेले आहे व दरिद्रयाच्या प्रतिकार कसा केला पाहिजे या संबंधी लोकमान्य टिळक बेळगाव व शहापूर येथील १९०६ साली गणेशोत्सवानिमित्त दिलेला व्याख्यानांत प्रतिपादन करताना असे म्हणतात की,'' या उत्सवासंबधाने असा एक आक्षेप घेण्यात येतो की, हे उत्सव का करावेत? याचे या उत्सवाला आज जमले आहेत असे लोक

जमत असतात.'' असे उत्तर दिल्याने त्या आक्षेपांचे सहज निरसन होणार आहे असे लोक जमले असतां व्यक्तींच्या, जातीच्या व देशाच्या हितहितासंबंधाने सर्वांनी मिळून एके ठिकाणी विचार करण्याची संधि मिळावी हा अशा उत्सवापासून मोठा उपयोग होतो.''

''...देशाला दरिद्रय कसे आलेले आहे व त्या दरिद्रयाच्या प्रतिकार करण्याचे कोणते नियम विचारी लोकांनी ठरविले आहेत, त्यासंबंधी दोन शब्द मला सांगावयाचे आहेत, देशात शांतता नांदत असता व व्यापरवृध्दीच्या साधनांची भरपूर वृध्दी देशात झाली असता देशाची संपत्ती सालोसाल कमी का होत आहे, हा? मुख्य विचार करण्याचा प्रश्न आहे.''

हिंदू मुसलमानांतील किंवा पारखी व आम्ही यांजमधील तंटे आम्ही तुर्त बाजूला ठेवले पाहिजेत. द्रव्याचा प्रवाह जो बाहेर देशी जात आहे तो अगोदर सर्वांनी मिळून बंद केला पाहिजे, मग फुरसतीने आम्ही आमची भांडणे खुशाल भांडत बसु.''[३५]

लोकमान्य टिळक स्वदेशी चळवळीचे महत्व बेळगांव व शहापूरच्या १९०६ च्या गणपती उत्सवात सांगतात. स्वदेशीचे मुख्य तत्व आमची स्थीती सुधारावी, व्यापारधंदयांचा उत्कर्ष स्वदेशी चळवळीतील पहिली गोष्ट आहे. अशी भूमिका घेताना लोकमान्य टिळक असे म्हणतात की, ''आज तुमच्या व्यापाराची, तुमच्या संपत्तीची स्थिती अगदी कनिष्ठ प्रतिची झालेली आहे. तशी स्थिती होण्याला पेशवाई जावून इंग्रजी आली हेच प्रमुख कारण आहे.''

''... स्वदेशी चळवळ हे एक बंड आहे, असे कित्येकजण म्हणतात, म्हणा बंड म्हटले म्हणून काही फरक होत नाही. या स्वदेशीचे मुख्य तत्व आमची स्थीती सुधारावी असे आहे. व्यापारधंदयाचा उत्कर्ष करणे ही स्वदेशी चळवळीतील पहिली गोष्ट आहे.''[३६]

लोकमान्य टिळक 'राष्ट्रीय शिक्षण' का आवश्यक आहे हे सांगून राष्ट्रीय शिक्षणाचे महत्व स्पष्ट करताना १४ सप्टें १९०७ रोजीच्या गायकवाडवाडा पुणे येथील गणपती उत्सवांतील व्याख्यानांत असे म्हणतात की,'' आम्हाला पहिजे तसे शिक्षण परकीय राज्यकर्ते आम्हाला देवू शकत नाहीत, तसा त्यांचा हेतू नाही इच्छा नाही. बुध्दी कमी जास्ती असली तरी सर्वांवर राष्ट्रीय विचाराचा ठसा उमटला पाहिजे आणि ते राष्ट्रीय शिक्षणावाचून व्हावयाचे नाही. सरकारी धोरणाने आम्ही दरिद्री झालो याचे शिक्षण आम्ही राष्ट्रीय शाळेत देणार आहे. ते का देवू नये? ते देण्याचा आमचा आम्हाला पूर्ण अधिकार हवा.''[३७]

लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाची व्याख्या अगर स्वरूप स्पष्ट केलेले दिसून येते. ''राष्ट्रीय शिक्षणाची व्याख्या अगर स्वरूप सांगावयास समर्थांनी केलेले उपक्रम लक्षांत आणला पाहिजे. आपण कोण, आपली स्थिती काय आहे, पुढच्या पिढीने काय करावे, पोट कसे भरावे, देशाची कामगिरी काय आहे, याची ओळख करून देणारे शिक्षण राष्ट्रीय शिक्षण होय. देश ओळखण्यास शिकणे यास राष्ट्रीय शिक्षण म्हणावयाचे.''[३८]

सामान्यांचा सर्व बाजूने विचार करण्यांकरिता उत्सवाचा कार्यक्रम स्वातंत्र्य, धर्म, सामाजिक व राजकीयदृष्टया पहिजे असे प्रतिपादन करताना १९ सप्टे १९०७ रोजीच्या पुणे येथील रै.मार्केट गणपतीपुढील व्याख्यानांत लोकमान्य टिळक असे म्हणतात की,'' राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि धर्मातील एकी याविषयी व सामाजिक बाबींविषयींही उहापोह उत्सवांत झाला आहे. सामान्नांचा सर्व बाजूने विचार करण्याकरीता या विषयांच्या खल व्हावा, आढावा घ्यावा म्हणून नुसती इच्छाच नव्हे, नुसता हेतूच नव्हे, तर उत्सवाच्या कार्यक्रमही तसाच ठरविण्यांत येत असतो.''

‘‘ स्वातंत्र्य धर्मदृष्टा, सामाजिक व राजकीय दृष्टा पाहिजे आहे. निवळ गंमत, मौज करण्याकरिता आम्ही उत्सव करीत नाही, ज्ञान मिळावे म्हणून ही खटपट आहे. उत्सवांतील व्याख्यानांतून यासंबंधी सांगितले आहे तुम्ही जीवंत रहावयास योग्य आहात की नाही हे निश्चयाने दाखवावयाचे आहे.’’

‘‘ मला या प्रसंगी तुम्हांला एक उपदेश करावयाचा आहे आणि तो उपदेश म्हणजे अश्वत्याम्याने कौरव सेनेला केलेला उपदेश होय. अश्वध्याम्याने सांगितले, ‘यदि समरमपास्य नस्ति—मृत्योर्भयाभिती युक्तिमितोडन्यातः प्रयातुम! अथ मरणमवश्यमेव जंतोः किमिति वृथा मलिनं यशः करूध्वें ।। मरण आणि दुःख चुकलेले नाही. मरण घरी बसून येईल व दुःख तर मागे लागलेलेच असते मग लढाईत यशस्वी होणे चांगले का घरी मरणे चांगले?’’

‘‘ सरकारने उग्र स्वरूप धारण केले आहे, त्याने आम्ही भिणार की त्यांचा प्रतिकार करणार? इतकी वर्षे दृढनिश्चयाने व निकराने प्रयत्न कराल तर तुम्हांला स्वराज्य मिळालेच पाहिजे. परमेश्वर तुमच्यामागे उभा आहे. ‘‘महाराष्ट्र केव्हा निश्चय करणार? सरकारने काही केले तरी स्वदेशी व बहिष्काराचे व्रत आम्ही पुढे चालविणार असा आमचा निश्चय पाहिजे तुमच्या धर्मातील जिवंतपणा व तेज आणि तुमची ऐतिहासिक परंपरा लक्षात घेता तुम्हांला अपयश कधीही येणार नाही अशी माझी खात्री आहे.’’[३९]

गणपतीपुढे राजकीय विषयावर व्याख्यान देण्यांला हरकत नाही अशी भूमिका घेताना लोकमान्य टिळक २६ सप्टें १९०७ रोजीच्या गायकवाड वाडा, पुणे येथील गणपतीपुढील ‘सद्यस्थिती’ व्याख्यानांत असे म्हणतात की,‘‘परवांचे दिवशी नायकांच्या गणपतीपुढे व्याख्यान दिले तेव्हा समाजाच्या धार्मिक स्थितीचे मी वर्णन केले, आमचे वर्तन परकीयांशी सहिष्णुतेचे असले तरी आपसांत फुट आहे हे ते दिवशी सांगितले ते

व्याख्यान जुन्या व नव्या मंडळीस पसंत पडले. सुधारकांना वाटले मी जातिभेदांविरूध्द व्याख्यान दिले. दोघांसही व्याख्यान पसंत पडले, हे अभिनंदनीय आहे. धार्मिक बाबतीत जशी फुट आहे त्यांची कारणे काय, त्यांचा प्रतिकार होणे शक्य आहे की नाही, त्याला काय उपाय आहेत हे मी आज सांगणार आहे. ''.. गणपतीपुढे राजकीय विषयावर व्याख्यान देण्यांस हरकत नाही. असे माझे मत असल्याचे मजसंबंधीच्या १२ — १३ वर्षाच्या अनुभवाने लोकांस माहित आहेच. धर्माने जसा समाज बांधला गेला आहे. तसा तो राजकीय बंधनानेही बांधला गेला आहे व सर्व बाजूने विचार करण्याची आपली पध्दत आहे. पंजाब्यात, बंगाल्यात, नागपूर प्रांतात महाराष्ट्रात सध्या काय चालले आहे याची माहिती आपल्याला असेलच राजकीय बाजू सामाजिक आणि धार्मिक बाजू पासून कोणी भिन्न करीत असतील तर ते आपल्या सोयींसाठी तसे करीत असतील. सामाजिक राजकीय, सांपत्तीक या सर्व देशाच्याच बाजू असून त्या एकमेकांत इतक्या मिसळल्या आहेत की जो सामजिक बाबतीत न्याय तोच राजकीय बाबतीतही लागू आहे. घराला चार दारे असून त्यांतील तीन दारे बंद करून एकाच दाराने वापर कर म्हणून एखादया घरवाल्यास सांगावे म्हणजे त्याचे स्वातंत्र्य कमी करणे आहे तसेच या संबंधानेही आहे. राजकीय व सामाजिक यांत आधी कोणता असा प्रश्न अजुनही होत असतो.'' [४०]

गणपती उत्सव पुण्यापुरता नसुन त्याचा निरनिराळया ठिकाणी प्रसार झाला होता. त्यात कीर्तन, व्याख्याने होत असत. असा उल्लेख कलिकिंकर वर्धा, यांनी 'मुमुक्षुस' दि.१२ सप्टेंबर १९०८ रोजी पाठविलेल्या पत्रावरून दिसून येते.[४१]

गणपत्युत्सवापासून राजकीय, सामाजिक, धार्मिक, इहलौकीक, पारलौकिक असे अनेक फायदे झालेले दिसून येतात. या संदर्भात, 'हिंदु धर्माचे सध्याचे स्वरूप व सार्वजनिक गणपत्युत्सव,' या दि. २८ सप्टें

१९०९ च्या लेखात ज्ञानप्रकाश असे लिहितो की,''उत्सवाचे पुढारी लोक खोल पोलिटिकल धोरणाचे आहेत. त्यांचे म्हणणे हा उत्सव '' धार्मिक राजकीय'' आहे. आपली दुखद स्थीती विघ्नहार्ता गणरायाच्या कानांवर घालून आपली संकटे दूर करण्याचा हा सार्वजनिक उपाय आहे खरे आहे गणपत्युत्सवाचे राजकीय कार्य मात्र स्पष्ट दिसत आहे.''

''भाई अपने हिंदू की तो बानि है, पुराणि है' हे पद—पोरांनी म्हटल्या जाणाऱ्या पदांनां हाजारो तमासगिरांपुढे झाल्याने मोठी लोकजागृती होत असे.वर्तमानपत्रांची काही जरूरी नाही व राष्ट्रीय सभेची दरवर्षी बैठक करण्याचा अटटाहास करण्याची आवश्यकता उरलेली नाही. शेबंडी पोरसुध्दा आर्यमाता ,काँग्रेस, मायदेश, राष्ट्रोध्दार असल्या गहन विषयांवरही नाटकी सुरावर गाणी म्हणू लागली. गणपतीच्या मेळयांत व उत्सवात लागणाऱ्या शिस्तीने राष्ट्रीय शाळांचे शिक्षण देण्यांस जरूरी रहिली नाही. सदरहू उत्सवाने कित्येक दे.भ.स.सहज पुढारी होण्यास जी संधी मिळते तोहि राष्ट्रांस कमी महत्वाची नाही. पुण्याचे पुढारी मुंबईस व मुंबईचे पुण्यास असे येवून व्याख्याने झाली. दळणवळण वाढले. ख्रिस्ती होण्यास निघालेल्या ''बाळ'' चे पद ऐकून हिंदू लोक  ख्रिस्ती होण्याचे बहुतेक बंद झाले असले पाहिजेत.अशा तऱ्हेने गणपत्युत्सवापासून राजकीय, सामाजिक, धार्मिक, इहलौकिक, पारलौकीक अनेक फायदे दाखविता येतील व येताहेत.आम्हांस एका राजकीय, धार्मिक कडबोळांत हिंदू धर्माची व समाजाची वर वर्णिलेली अवनत आणि विस्कळीत स्थीती दिसत आहे.''[४२]

लोकमान्य टिळक गणेशोत्सवाच्या माध्यामतून 'गीता' हे मोक्षदृष्टा संसार कसा करावायाचे शास्त्र आहे असे प्रतिपादन करतांनां दिसतात. १९१४ साली गणेशोत्सवात 'गीतारहस्यांवरील' प्रवचंनांत त्यांनी स्वत: त्याचा सारांश सांगितलेला आहे त्यात ते असे म्हणतात की, ''मोक्ष ही एक विशिष्ट प्रकारची अध्यात्मीक मनोवस्था आहे, इदलोकाच्या पलीकडे

ठेवलेला गडडा आहे.— मोक्षस्य नहि वसोस्ति न ग्रमांतरमेववा। अज्ञानहदयग्रंथिनाशो मोक्ष इति स्मृत:।।' असे शिवगीतेत म्हटले असून भगवदगीतेश्च व उपनिषदाचा सिध्दांत तसाच आहे. ही आध्यात्मीक स्थिती ज्या पुरूषास प्राप्त झाली त्यास जीवन्मुक्त असे म्हणतात व अशा प्रकारची जीवन्मुक्तावस्था संपादन करून त्यात सिध्द झालेल्या निष्काम बुध्दीने लोकसंग्रहार्थ आमरणान्त निष्काम कर्मे करीत राहणे हेच गीतेतील सर्व उपदेशांचे सार होय.''

''.. गीता हे मोक्षदृष्टा संसार कसा करावा याचे शास्त्र आहे. संसार सोडून देण्यासाठी गीता सांगितलेली नाही.''

''....थोडक्यात सांगणे असल्यास ब्रम्हविद्यामुलक भक्ती गीतेत प्रतिपाद्य आहे, इतकेच नव्हे तर त्याचबरोबर तितक्यात योग्यतेचा निष्काम कर्मयोगहि आवश्यक म्हणून प्रतिपादला असल्यामुळे गीता हे ब्रम्हणविद्यामूलक भक्तिसहचारी नीतिशास्त्र होय, असे माझे मत आहे.''[४३]

लोकमान्य टिळक गणेशोत्सवाच्या माध्यमातून संगीत, कला, गायन, वादय इत्यादींचा आदर करून त्यांस प्रोत्साहित करण्यांची त्यांची भूमिका दिसून येते. या संदर्भात आपली आठवण सांगातांनां कृष्णाजी गणेश कुलंबीकर उर्फ मास्तर कृष्णा अशी आठवण सांगतात की, ''सन १९१४ च्या गणपत्युत्सवांत गायकवाड वाडयांत श्रीगजाननासमोर बुधवार ता. २ सप्टेंबर रोजी गुरूवर्य भास्करबोवा बखले, श्रीयुत नारायणराव राजहंस व मी असा तिघांचे गायन झाले. प्रथम मी गायलो, नंतर बालगंधर्व यांचे गाणे झाले व शेवटी गुरूवर्य बोवासाहेब गायनास बसले, त्यावेळी गर्दी अतिशय झाल्यामुळे लोक गडबड करू लागले. तेव्हा स्वत लोकमान्य उठून त्यांनी लोकांना आपल्या खणखणीत आवाजात सांगितले की, ''ठरलेला कार्यक्रम हा यथासांग पार पाडलाच पाहिजे, ज्यांना बसावयाचे नसेल त्यांना रस्ता मोकळा आहे, बोवांच्या गाण्यांची प्रशंसा करून ते म्हणाले, भास्करबोवा

मला जरी गाण्याची विशेष आवड व शोक नाही, तरी एकेकाळी आपल्या या भारतवर्षांत उत्कर्षाच्या शिखरास पोहोचलेल्या या पंचम वेदाबददल मला फार आदर आहे आणि या गहन व ईश्वरदत्त कलेमध्ये आपण परिश्रमपूर्वक यश मिळविल्या बददल मला फार आनंद होवो व अभिमान वाटतो.''[४४]

याच प्रकारचा उल्लेख केसरी मराठा ट्रस्टने प्रकाशित केलेल्या केसरी गणेशोत्सव दि.२१सप्टेंबर १९१५ रोजीच्या सन १९१५ च्या गणेशोत्सवातील साक्षात लोकमान्य टिळकांचा आवाज या सी.डी.व्दारे दिसून येतो.[४५]

गणेशोत्सवासंबंधी केसरीने केलेल्या प्रतिपादनाचा 'केसरी प्रबोध' या ग्रंथामध्ये मागोवा घेताना शंकर रामचंद्र दाते गणेशोत्सवासंबंधी असे लिहितात की, ''केसरीकर पुढे म्हणतात, राजकीय उपादयदैवत एक असल्याने जितका फायदा व्हावयाचा, तितका हल्ली होत आहे व आमच्या मतें धार्मिक उपास्यदैवत एक असल्याने तोच फायदा दुप्पट होण्यांचा संभव आहे.''

''.. लोकांना व्याख्याने, प्रवचने, कथा किर्तने, मेळे व त्यांतील पदे इत्यादिकांच्या सहयाने लोकांना धर्मशिक्षण व देशपरिस्थीतीचे ज्ञान देवून विचार करण्यास लावावे हाहि दूसरा प्रमुख हेतू होता. केसरीकर म्हणतात, '' श्रीगणेशोत्सवांत ज्ञानसत्रे सुरू करून अन्य देशबांधवांना सज्ञान करण्याचा दुसरा हेतू हा उत्सव सुरू करण्यात होता, तोहि फलदरूप होवू लागण्यासारखी चिन्हें दिसू लागली आहेत.''

उत्सवांत धार्मिक उन्नतीबरोबरच सामाजिक सुधारणेच्या धोरणानुसार केसरीने पुढकार घेवून अग्रेसरत्व मिळविले होते. अस्पृश्यांच्या मेळयांना आपल्या गणपतीपुढे येवू देणे, त्यांच्या गणपतीपुढे केसरीकरांनी व्याख्याने देणे, मिरवणुकीस त्यांच्या गणपतीस महत्वाचे स्थान प्राप्त करून देणे या

बाबतींत केसरीचे सहाय्य असे. १९२४ साली अस्पृश्यनिवारक मंडळातर्फे गणपतीची स्थापना करण्यांत आली व पुढे अस्पृश्यांचा एक मेळाही निघाला होता.''[४६]

लोकमान्य टिळकांच्या गणेशोत्सवाविषयी सर व्हॅलेंटाईन चिरोलच्या विचारांच्या आधारे रामकृष्ण गोपाळ भिडे 'लोकमान्य टिळक व हिंदु संघटन' या सहयाद्री लोकमान्य टिळक विशेषांकात असे लिहितात की, ''महाराष्ट्रात गणेशोत्सव जुन्या काळापासून घरोघरी व थाटामाटाने होते. त्यांच उत्सवाला लोकमान्य टिळकांनी सामुदायिक स्वरूप दिले त्यात सर्व हिंदुसमाजाचा समावेश होवून आज विस्कळीत झालेल्या समाजाला सुसंघटित स्वरूप आल्याखेरीज राहणार नाही अशा दुरदर्शी योजनेने त्यांनी हा उत्सव सुरू केला. त्यांचा हा हेतू कितपत साध्य झाला याचा कबुलीजबाब त्यांचा हितशत्रु सर व्हॅलेंटाईन चिरोल यानेच पुढीलप्रमाणे दिला आहे.,''आपल्या राजकीय चळवळीस धर्माचा पाठिंबा असला म्हणजे चांगले या हेतूने हिंदुस्थानातील अत्यंत लोकप्रिय देव गणपती तो आपल्या चळवळीचे आदिदैवत करण्याची कल्पृप्ति टिळकांनी काढली. गणपती उत्सवाची नवी टूम काढून त्यांनी गणेशमंडळया स्थापून केल्या व तरूण तालीमबाजांचे मेळे तयार करून लोकांवर आपली छाप बसविण्याची युक्ती टिळकांनी काढली ती अव्दितीय होती. गणपती उत्सवामुळे टिळकांच्या चळवळीचे क्षेत्र फारच विस्तृत झाले.''[४७]

केळीच्या खुटांनी सजविलेल्या अश्वरथात श्रींची मिरवणुक लोकमान्य टिळक, श्रीमंत दगडूशेठ हलवाई, काळकर्ते परांजपे इत्यादी.
(संदर्भ परिशिष्ट क्र. २ पाहणे. पृ.क्र. २२१)

**<u>शिवाजी उत्सवाची सुरूवात व स्थापना</u> —**

श्री.आर.पी.करकेरिया यांचे मुंबईस रॉयल एशियाटीक सोसायटीपुढे, दि.२० एप्रिल १८९४ रोजी भाषण झाले.या भाषणावरून प्रेरणा घेवून लोकमान्य टिळकांना शिवाजी उत्सवाची प्रेरणा सुचली. लोकांचे शिवाजीशी असलेले नाते दृढ करण्यासाठी लोकवर्गणीतून समाधी उभारावी अशी टिळकांची इच्छा होती. दि.३० मे १८९५ रोजी सायंकाळी पुण्यात हिराबागेच्या मैदानात स्मारकाप्रित्यर्थ सभा भरली. सभेला अनेक सरदार व प्रतिष्ठित जहागिरदार हजर होते. सरकारी दरबारात न होणारी गोष्ट म्हणजे सरदार लोकांनी सभेत भाषणेही केली. उच्च स्थानी चाफळकर स्वामी बसले होते. प्रारंभी सेनापती दाभाडे यांनी टिळकांच्या व आपल्या सहीने निघालेली निमंत्रणपत्रिका वाचून दाखविलया.

श्रीमंत पंत प्रतिनिधी यांस अध्यक्ष नेमण्यात आले. न्या रानडयांनी कायमचा फंड उभारण्याची कल्पना सुचविली होती. टिळकांनी असा खुलासा केला की, कोल्हापूर सारख्यांनी मनावर घेतल्यास ते एकटेच समाधीची दुरूस्ती करूत शकतील पण सर्व दर्जाच्या व सर्व जातींच्या लोकांकडून पै पैशापासून वर्गणी गोळा होवून ती या कामी खर्च व्हावी अशीच सर्वाची इच्छा आहे. सभेच्या शेवटी कोल्हापूरच्या छत्रपती महाराजांकडे याबाबतीत डेप्युटेशनही पाठविण्याचे ठरले व स्वामींच्या आशिर्वादाने सभा विर्सजन व्हावयाची तोच करवीरकर छत्रपती यांची सभेस सहानुभूति असण्याची तार टिळकांच्या हाती पडली. शिवाजी उत्सव कसा साजरा करावा याबाबतची नियमावली निश्चित करण्यात आली होती. त्याबाबत दि ३ मार्चच्या केसरीत उत्सवाचे नियम प्रसिध्द झाले, सर्वास प्रसादाचे भोजन दिले जाईल, उत्सवास लागणारे सर्व सामान देशीच वापरले जाईल, शुध्द स्वरूपाची कथा, किर्तने, नाटके, गोंधळ, पोवाडे व

त्यात चांगले शिववर्णन असेल तर या नव्या संस्थानचे मानकरी समजले जावून इतर मानकऱ्याबरोबर त्यास मानाचे नारळ देण्यात येतील.[४८]

शिवजयंतीचा पहिला उत्सव रायगडावर दि १५ एप्रिल १८९६ रोजी घेण्यात आला. 'उत्सवाची आवश्यकता स्पष्ट करताना टिळक असे म्हणतात की, '' अशा या उत्सवास आपले राज्यकर्ते कधीही आड येणार नाहीत, हे उत्सव करण्याची लालसा आपणांमध्ये प्रादुर्भूत होणे हे आपल्या राज्यकर्त्यांनी मोठया उदार बुध्दीने जे शिक्षण दिले आहे, त्याचेच फल आहे व अशा प्रकारे आपल्या महाप्रतापी पूर्वजांचे आपणांमध्ये चिरकाल स्मरण रहण्याबद्दल प्रतिवर्षी आपण करावा. पूर्वजांचा उत्सव करणे म्हणजे ज्याप्रमाणे आपण आपले राज्यकर्ते महाराणी एंप्रेस ऑफ इंडिया यांच्या जन्मदिवसाचा उत्सव करीतो. आपल्या या म्हणण्यास पुष्टी देताना टिळक इंग्लंड, फ्रान्स या ठिकाणच्या नेत्यांच्या स्मारकांची उदाहरणे देतात व शिवजयंतीचे महत्व लोकांना सांगताना दिसून येतात.''[४९]

श्री.शिवाजी महाराजांचे चरित्र हे राष्ट्रीयत्व कायम राखण्यास एक चांगले साधन आहे, हे स्पष्ट करताना लोकमान्य टिळक असे लिहितात की, ज्या प्रमाणे आम्ही आपल्या वडीलांचे स्मरण कायम ठेवून त्यांच्यायोगे आपल्या घराण्याचा पूर्वापार चालत आलेला लैकिक राखण्याचे एक साधन करून ठेवितो, तव्दतच राष्ट्रातील महापुरूषांचे स्मरण हे राष्ट्रीयत्व कायम राखण्यास एक चांगले साधन आहे. एक राष्ट्रीयत्व म्हणजे काही दृश्य पदार्थ नव्हे, ही एक प्रकारची कल्पना असून ती सतत जागृत ठेविली तरच ती टिकण्यासारखी आहे व ज्या ज्या राष्ट्रांनी ती कायम राखिली आहे, त्यांनी आपल्या ऐतिहासिक थोर पुरूषांच्या इतिहासाची याकामी योग्य मदत घेतली असे लक्षात येईल. श्री.शिवछत्रपतींचे चरित्र अशाच प्रकारचे होय. महाराष्ट्रातील निरनिराळया जातीचे प्रेम एकच ठिकाणी बसण्यासारखे जर कोणतेही स्थळ असेल तर, ते छत्रपतींचे चरित्र हेच होय. हे

शिवछत्रपतींच्या उत्सव करणाऱ्या सर्व लोकांनी नेहमी ध्यान्यात बाळगायलाच पाहिजे. या उत्सवात मराठे आणि ब्राम्हण अगर परभू अशा प्रकारच्या कोणताही भेद ठेवणे अगदी गैरशिस्त आहे. यंदाचे उत्सवात एक दोन ठिकाणी असला प्रकार झाल्याचे ऐकिवात आहे ही जर गोष्ट खरी असेल तर वेळीच तिचा बिमोड केला पाहिजे.''[५०]

'शिवजंयती उत्सवाच्या' समारोपाच्या भाषणात लोकमान्य टिळक उत्सवाचा मूळ हेतू 'राष्ट्रीयत्व जागृत' करण्याचा आहे, असे सांगून देशाविषयी, परदेशाविषयी, स्वदेशीविषयी व जागतिक राजकारणाविषयी बदलते संदर्भ देतात व लोकांत राष्ट्रीयत्वाचा अभिमान जागृत राहिला पाहिजे हे सांगताना म्हणतात की, '' उत्सवाचा मूळ हेतू राष्ट्रीयत्व जागृत करण्याचा असून असे राष्ट्रीयत्व जागृत करणे यात काही गैर नाही, असे खुदद लॉड कर्झन यांनीही तोंडानेच नव्हे तर, कृतीने दाखविले आहे. शिवाजी उत्सवाबद्दल लोकांचे व सरकारचे यापूर्वीचे गैरसमज दूर होत चालले आहेत ही समाधानकारक गोष्ट आहे. हिंदूस्थानातीलच नव्हे तर आशियातील लोक शौर्याने किंवा हिमतीने गोऱ्या लोकांपेक्षा कमी नाहीत, ही गोष्ट जपानच्या विजयानेच सिध्द झाली आहे. अशा स्थितीत युरोपियन लोकांनी यापासून काय बोध घ्यावयाचा याचे उत्तम वर्णन 'रिव्हयू ऑफ रिव्हयूज'च्या ताज्या अंकात आले आहे.यावेळी आपल्यात राष्ट्रीयत्वाचा अभिमान जर जागृत राहिला तरच आपली उन्नती होणार हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.लॉर्ड कर्झनसारख्या शहाण्या मुत्सद्यासहि असे वाटू लागले आहे की, यावेळी हिंदुस्थानातील प्रजेस त्यांचा अभिमान वाटेल असे काही तरी समोर ठेवले पाहिजे. परंतु हा अभिमान केवळ आपल्यापुरताच नसुन गोरे व काळे या दोघांकरिता असावा,असे त्यांचे म्हणणे आहे हे म्हणणे खरे असो वा खोटे असो त्यांचा आपणास सध्या विचार कर्तव्य नाही. पण जगात ज्या कालगतीने क्रांती घडून येत आहे त्याचा परिणाम आमच्यावर

नव्हेच तर आमच्या राज्यकर्त्यावरही होत आहे, एवढे यावरून व्यक्त होते.''[५१]

पुण्यातील श्री शिवराय जन्मोत्सवामध्ये विविध विषयावर भाषणे होत तसेच निबंधवाचन त्याचबरोबर धर्मावर विशेष व्याख्याने होत असत, दि. २७ एप्रिल १८८९ च्या वार्तानिधी, पुणे मधील 'पुण्यांतील श्री शिवराय जन्मोत्सव' या लेखांवरून दिसून येते.[५२]

निसर्गतहाच माणुस उत्सवप्रिय असतो. कलकत्ता येथील शिवाजीउत्सवात लोकमान्य टिळक लोकांना राजकीय शिक्षण देण्यासाठी शिवाजीउत्सव सुरू केला आहे असे प्रतिपादन करतांनां दिसतात. शिवाजी उत्सवांत कलकत्ता येथील दि. ५ जून १९०६ रोजीच्या व्याख्यांनांत लोकमान्य टिळक असे म्हणतात की,''it is nature of man to love festival man concentrate their moral and intellectual ideas once a year. That is the meaning of the word festival the people of india have no political festival except perhaps the Indian national congress this is the reason why festival was introduced." [५३]
शिवाजीमहोत्सवाच्या टिळकांच्या उत्सवाविषयी, सर्व समाजाला संघटित करणे व राष्ट्रजागृती करणे व समाजाला कार्यप्रवण करणे, यासाठी हे उत्सव होते असे दिसून येते याबद्दल 'दुसरा राष्ट्रीय महोत्सव' या लेखात रामकृष्ण भिडे असे लिहितात की, गणपत्युत्सवाला सामुदायिक स्वरूप देवून बहुजन समाज संघटित करण्याचा प्रयत्न लोकमान्यांनी केला त्याचप्रमाणे त्यांनी दुसरा त्याहीपेक्षा महत्वाचा केलेला उपक्रम म्हणजे शिवाजीमहोत्सवाचा हा उत्सव उघडउघड राष्ट्रीय जागृतीसाठीच होता. मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा अशी गर्जना समर्थांनी करून हिंदु समाज गदागदा हालवून जागा केला व त्याला राष्ट्रकार्यास जुंपून त्याच्याकरवी हिंदवी स्वराज्याची उभारणी केली. ही इतिहास विख्यात गोष्ट महाराष्ट्र विसरला स्वत्वाला, स्वाभिमानाला पारखा झाला, परकीयांच्यां मोहजालांत गुरफुटुन गेला, त्याला स्वस्थितीची जाणीव करून देण्यांसाठी

लोकमान्यांनी विदयालये, वृत्तपत्रे इत्यादी विविध साधनांनी समाजाच्या मोहनिद्रेवर प्रखर प्रहार केले. त्यापैकीच राष्ट्रीय महोत्सव हे प्रमुख अंग गणले जाते. समाज उददीपित होवून तो कार्यप्रवण होण्यासाठी हे दोन उत्सव सुरू केले.

या उत्सवांसंबंधी व्हॅ.चिरोल म्हणतात, ‘‘मराठे मंडळीस आपल्या बाजूला आणण्याचे काम टिळकांस करावयाचे होते म्हणून ज्या शिवाजीने मुसलमानांचा पराभव करून महाराष्ट्रांत हिंदुपदपातशाही स्थापन केली, त्याचा जन्म एका मराठा सरदाराच्या कुळांत झाला असल्याने त्याच्या पराक्रमाचे पोवाडे गाऊन शिपाई बाण्याच्या मराठे लोकांच्या मनांत इंग्रजी राज्याविषयी असलेले प्रेम नाहीसे करून त्यांना आपल्या बाजूला आणण्याच्या प्रयत्नांस टिळक लागले.’’[५४]

**मेळे** —

मेळे हे गणेशोत्सवातील लोकजागृतीचे एक प्रमुख साधन होते. त्यामुळे टिळकांनी गणेशउत्सवात मेळयांच्या प्रथांना उत्तेजन दिले. मेळा हा एक लोककलेचा प्रकार असून त्यात १० — १५ लोक एक सारखा पोषाख करून घुंगरू बांधलेल्या काठीच्या ठेक्यावर, सामाजिक, राजकीय प्रश्नांवर पदे म्हणत असत. मनोरंजनाबरोबरच समाजजागृती व राजकीय जागृतीचे कार्य मेळे गावोगावी करत असत. मेळयांच्या माध्यमातून पदे काव्य रचणाऱ्या कवींनी अनेक दिव्य संदेश लोकांना दिले. मेळयांमुळे ब्रिटीशांविरूध्द जनक्षोभ वाढण्यास मोठी मदत झाली. त्याकाळात निरनिराळे मेळे अधिक अस्तित्वात होते त्यात यांचा समावेश होता.

मेळयांची नावे सन्मित्र समाज मेळा, वज्रदेही शुर मेळा, ऐक्यवर्धक मेळा, बाल सन्मित्रपथक मेळा, रणसंग्राम मेळा, अ.वि.ग्रह मेळा नाशिक मेळयाचे महत्व विाद करताना अग्रलेखात लोकमान्य टिळक असे लिहितात

की, '' मेळयातील राजकीय पदासंबंधात असे सांगतो की, राजकीय बाबी ज्यांत आहेत व ज्यावर लोकांचे हिताहित अवलंबून आहे अशी पदे म्हणण्यास काहीही हरकत नाही कारण राजाने लोकांना विघातक अशा एखादया प्रश्नांबंधीच्या लोकांच्या गाऱ्हाण्यांकडे जर बिलकुल लक्ष दिले नाही तर राजांचा राजा जो परमेश्वर त्यास अनन्यभावे शरण जावून आमच्या राजास सुबुध्दि दे व आमचे कल्याण त्याच्या हातून होवो अशी करूणा भाकायला काहीच हरकत नाही.''

अशा प्रकारे मेळयांच्या निमित्ताने तरूणांमधील वत्कृत्व, गायन व अभिनय या गुणांना वाव मिळाला. मेळयांमध्ये सामाजिक व राजकीय प्रश्नांचा समावेश झाला व त्यातून लोकजागृती होवू लागली म्हणून टिळकांनी मेळयांना प्रोत्साहन दिले.[५५]

**<u>१) सन्मित्र समाज मेळा</u>**

१८९८ साली सन्मित्र ची स्थापना झाली. श्री. तिखे, लवाटे, शंकरराव महाराज, अहिताग्नि राजवाडे, कानडे, करंदीकर, नीळकंठराव भिडे, दाते व देवधर इत्यादी सहभागी झाले, राजकीय व सामाजिक हे या मेळयांचे विषय असत हा मेळा पुणे व मुंबई येथे लोकप्रिय झाला.[५६]

**<u>२) वज्रदेही शुर मेळा</u>**

या मेळयाचा जन्म वज्रदेही आखाडयातून व संघातून झाला हा शिस्तीचा अत्यंत भोक्ता असून सारे लोक श्रीहनुमंताचे नि:सिम भक्त असत. श्री तुकाराम व अनंत मेमाणे बंधू यांनी हा मेळा काढला. पुणे जिल्हयात हा मेळा खुप गाजला.[५७]

## ३) ऐक्यवर्धक मेळा

भवानी पेठेत कै.बळवंतराव डावरे यांनी १८९० साली याची स्थापना केली. कै.केशवराव डावरे, रामशाहीर दाते, नाशिकचे कवि गोंविद, सेनापती बापट यांच्याकडून या मेळयाला पदे मिळत.[५८]

## ४) रणसंग्राम मेळा

श्री. सीताराम काशिराम औरंगाबादकर तथा कोळी मास्तर यांच्या नेतृत्वाखाली तान्हाजी आखाडयाच्या वतीने या मेळयाची स्थापना झाली. वैदय, मोहिते, सोरटे, भालेकर मुळे यांनी यासाठी पदयरचना केली.[५९]
(संदर्भ परिशिष्ट क्र. ३ पाहणे. पृ.क्र २२२ ते २३१)

राष्ट्रीय वळण लावण्यांस मेळयांनी केलेली कामगिरी सर्वात मोठी होती असे दिसून येते. यासंबंधी 'केसरी प्रबोधमधील, 'श्रीगणेशोत्सव', या लेखात मेळयांच्या कामगिरीविषयी श्री शंकर दाते असे लिहितात की, गणेशोत्सवाची मुख्य अंगे तीन, व्याख्याने, प्रवचने मेळे व मिरवणुक पैकी व्याख्यानांना सरकारने हरकत घेतल्याचे फारसे कोठे दिसत नाही. व्याख्यांनांचे विषय बहुतांशी धार्मिक, सामाजिक किंवा अर्धराजकीय असत परंतु मेळे व मिरवणुकी यांना मात्र सरकारने मनसोक्त धळले.''

'' गणेशोत्सवात लोकांचे चित्त वेधणारा जर कोणता एखादा विशेष महत्वाचा भाग असला तर मेळयांच्याच होय. पुण्यास सन्मित्र समाज मेळा पहिल्याने निघाला व त्याने त्यावेळी जे राष्ट्रीय वळण घालून दिले ते इतका वर्षानंतर आजही जवळजवळ अबाधित आहे. लोक समुदाय एकत्र जुळवून त्यास गणपतीच्या भजनी लावण्यास लोकांचे चित्त आकर्षण करून त्यांस राष्ट्रीय वळण लावण्यांस मेळयांनी केलेली कामगिरी ही सर्वात मोठी होय. मेळयांतील पदे गानप्रधान नसुन अर्थप्रधान असत. धार्मिक, सामाजिक व राजकीय जागृती करण्याचे कार्य सभा मेळयांनी

पोवाडयांप्रमाणे केले असे म्हटले म्हणजे मेळयांचे खरे स्वरूप वाचकांच्या घ्यानांत येईल.[६०]

लोकमान्य टिळकांच्या विचारप्रक्रियेमुळे तत्कालीन मराठी प्रदेशांत व त्याला लागून असलेल्या गुजरात व कानडी भाषिक प्रदेशांत निरनिराळया स्तरांवर मेळयांच्या माध्यमातून स्वांतत्र्याचे विचार पसरविण्याचे काम व संस्कृती संवर्धनाचे काम केले जात होत असे तत्कालीन साधनांवरून दिसून येते. (संदर्भ परिशिष्ट क्र. ४ पाहणे. पृ.क्र. २३२ ते २३८)

या सारखेच संदर्भ सदानंद मोरे यांच्या 'लोकमान्य ते महात्मा' या ग्रंथात मांडलेले दिसून येतात या संबंधात ते असे लिहितात की, ''महाराष्ट्राच्या राजकारणात मेळा या लोकमाध्यमाला फार महत्व आहे. मेळा ही लोकांनी आपण होवून स्वयंस्फुर्तीने स्वखर्चाने केलेली चळवळ होती. या अर्थाने ते लोकमाध्यम होते. मेळयात सहसा धंदेवाईक वा व्यावसायिक कलाकार नसत. कलापथकाप्रमाणे मेळयामुळे घडलेला कोणी तरूण पुढे मोठा नट, गायक व कवी झालेला आहे असेही दिसत नाही. खात्यापित्या घरची तरूण मुले अभ्सासाकडे दुर्लक्ष करून राजरोषाचा धोका पत्करून मेळयांत जात.

नसिकमधील सावरकर प्रभृतींचां मित्रमेळा आणि पुण्यांतील टिळकभक्तांचा सन्मित्र समाज मेळा यांच्या धर्तीवर महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर अन्यत्र ही मेळयाचे प्रयोग झाले, अगदी कराचीपर्यंत. पण शेवटी मेळा ही पुण्याचीच खासीयत ठरली. मेळयाला जन्म दिला सार्वजनिक गणेशोत्सवाने. एका बाजूला नामवंत वक्तांच्या व्याख्यानांची मेजवानी आणि दुसऱ्या बाजूला करमणूकीचा मसाला भरलेली राजकीय पानपटटी पुरवणारे मेळे यांनीं पुणे गजबजून जाई.''

'' टिळकांचे मेळयांना प्रोत्साहन, आशीर्वाद व मदत असे सन्मित्र मेळयांत १९०४ मध्ये तिखेकृत 'कर्झनकाव्य' हा फटका म्हणण्यात आला

त्याची पहिली ओळ 'कर्झनशाही कुटिल सवाई' अशी होती. तिच्यात टिळकांनी स्वहस्ते 'कर्झनशाही लिटन सवाई' अशी दुरूस्ती केल्याचे अहिताग्नी शं.रा.राजवाडे यांनी सांगितले आहे. १९०५ च्या मेळयांत बहिष्कार व स्वदेशी यांवर पदे असून मुख्य पद स्टेट सेक्रेटरी मोर्लै यांच्यावर होते.[६१]

## <u>लोकमान्य टिळकांच्या दुष्काळातील चळवळी</u>

### <u>शेतकरी चळवळ –</u>

दुष्काळाच्या परिस्थितीमध्ये दुष्काळ निवारण्याच्या उपाययोजना लोकमान्य टिळकांनी सुचविल्या होत्या. त्या योजना सार्वजनिक सभेमार्फत गावोगाव पोचवून लोकांना त्यांच्या हक्कांची व सरकारी मदतीची माहिती लोकांना लोकमान्यांनी करून दिली. दुष्काळ निवारण्याच्या प्रश्नाबरोबरच टिळकांनी लोकशिक्षण, हक्कांची जागृती इत्यादी बाबतही केसरीव्दारे लोकप्रबोधन केलेले दिसून येते. राष्ट्रीय जीवनात शेतकरी वर्गाला असलेले महत्व टिळक केसरीत विशद करताना असे म्हणतात की,''अडाणी खेडूतांना आपण शक्य तितके उत्कृष्ट शिक्षण दयायला हवे. बरोबरीच्या नात्याने त्यांच्या गाठीभेटी घेवून त्यांच्या हक्कांची जाणीव त्यांना करून दयायला हवी आणि सनदशीर मार्गांनी लढा कसा दयायचा हेही त्यांना शिकवायला हवे.''[६२]

## <u>राष्ट्रीय उत्सवाच्या माध्यमातून  टिळकांनी मांडलेली चतु:सुत्रीची संकल्पना</u>

### <u>स्वदेशी व बहिष्कार –</u>

लोकांना स्वदेशीच्या लढयात सामील करून घेण्यासाठी लोकमान्य टिळक असे म्हणतात की, ''सरकारने जरी अन्याय केला तरी त्याचा प्रतिकार करणे काही अंशी तरी तुमच्या स्वाधीन आहे तो प्रतिकार कोणता

म्हणाल, तर सर्वांनी देशी कपडा वापरावयास लागावे हे होय. स्वदेशीची उपयुक्तता सर्वांना आहे हे स्पष्ट करताना लोकमान्य टिळक १५ डिसेंबर १९०७ रोजी चिंचपोकळी येथील भाषणात म्हणतात की, स्वदेशी काही केवळ भटांची अथवा तुमचीच बाब नाही. केवळ हिंदू मुसनमानांचाही तो प्रश्न नाही. या देशांत जन्मास येवून परंपरेने ज्यांची हितानाहिते हिंदुस्थानच्या सुख:दुखावर अवलंबून राहत आली आहेत, त्या कोणाच्याही स्वदेशी हा पोटापाण्याचा प्रश्न आहे. स्वदेशीपासून तादृश फायदा तुमचा आहे भटांचा नाही. गिरण्यातून कामे करायला भट नाहीत असले तरी फार थोडे आहेत. फायदा तुमचाच आहे हा माझ्या अंगात जो अंगरखा आहे तोच मी तयार केलेल्या कापडाचा केला तर कापड विणण्याची मजुरी व इतर कित्येक फायदे तुम्हाला मिळतील आणि जर मी हे कापड विलायतेतील मॅचेस्टर येथे गोऱ्या कारखानदारांनी गोऱ्या मजुरांनी केलेले घेतले तर मागे सांगितलेल्या सर्व फायदा गोऱ्यांच्या घशात जाईल मी तुमच्या गिरण्यातील कापड घेतो म्हणून त्याची मजुरी तुम्हाला मिळते म्हणजे स्वदेशी पासून प्रत्यक्ष फायदा तुमचाच आहे.''

स्वदेशीचा अर्थ आणि स्वदेशी व बहिष्कार या एकाच नाण्याचा दोन बाजू आहेत हे सांगताना बेळगाव शहापूरच्या १९०६ च्या गणपती उत्सवातील तिसऱ्या व्याख्यानात लोकमान्य टिळक म्हणाले होते की, ''स्वदेशी चळवळ आजच नव्याने उपस्थित झाली आहे असे नाही. आजचा अर्थ निराळा आहे. आम्हास हरएक बाबतीत गुलामाप्रमाणे वागविले जात आहे. ती स्थिती नष्ट होवून व्यापार, उदयोगधंदे वगैरे सर्व बाबी आमच्या हाती याव्यात असा आजच्या स्वदेशी चळवळीचा अर्थ आहे. आजची स्वदेशी चळवळ अधिक व्यापक आहे. फक्त मॅचेस्टरची धोतरे बंद करण्यापुरती आजची चळवळ नाही तर आम्हाला गोऱ्यांचे सर्व हक्क

मिळावेत व ते त्यांनी न दिल्यास त्यांच्याकडून आम्ही अडवून घ्यावे म्हणून आजची स्वदेशी चळवळ निघाली आहे.[६३]

स्वदेशी बहिष्काराचे महत्व खेडयापाडयातील जनतेला पटवून देण्यासाठी पंढरपूर येथे दि १६ नोव्हेंबर १९०७ रोजी सुमारे पंधरा हजार लोकांपुढे भाषण करताना लोकमान्य टिळक म्हणाले की, गेल्या साली याचठिकाणी चंद्रभागेच्या वाळवंटावर मी दोन शब्द सांगितले होते व आपण ऐकले होते, त्याला एक वर्ष होवून गेले, त्यावेळचे लोक आज पुन्हा आले असतील त्यांना आता मी जे सांगणार आहे ते विचार नवीन वाटणार नाही, पण पांडुरंगाचे दर्शन कितीही वेळा घेतले तरी ते जसे इष्टच आहे. त्याप्रमाणे मी सांगणार आहे ते विचार ऐकून अंत:करण उतरेपर्यंत त्यांचे निरूपण झाले पाहिजे तेव्हा पुन्हा तेच विचार बोलल्याबद्दल आपण माफी कराल अशी आशा आहे.

(संदर्भ परिशिष्ट क्र. ५ पाहणे. पृ.क्र. २३९ ते २४४)

<u>**स्वदेशी व्रत —**</u>

स्वदेशीचे महत्व पटवून देताना लोकमान्य टिळक आपल्या भाषणात साधू, परव्देष, स्वर्ग या संकल्पना आवर्जुन वापरतात. बार्शी येथील ४ मार्च १९०८ रोजीच्या भाषणात टिळक असे म्हणतात की, ‘‘स्वदेशी मालच वापरावयाचा असा निश्चय करण्यात, स्वदेशी मालास उत्तेजन देण्याचाच हेतू आहे. परकीयांचे नुकसान व्हावे हा हेतू नाही. माझे पोट प्रथम भरले पाहिजे, मग लोकांचे भरले तर हरकत नाही. लोकांचे पोट आधी भरावे व मी उपाशीच रहावे इतके साधु आम्ही अदयाप बनलो नाही हा स्वसंरक्षणाचा उपाय आहे परव्देषाचा हा प्रयत्न नव्हे हल्ली आपले दिवस फिरलेले आहेत, आपण जर साधु बनु तर साधुस योग्य असे जे ठिकाण, तेथे म्हणजे स्वर्गांत आपणांस लवकरच जावे लागेल व्यापारी साधु

झाला की, बुडालाच म्हणून समजावे ही स्थिती सुधारण्याचा उदयोग शुध्द अंतकरणाने केला पाहिजे.''

'' आपला देश अशा स्थितीस यावा ही गोष्ट मनास एकसारखी टोचली पाहिजे. या विचारांचा परिणाम वृध्दांवर फारसा होणार नाही. पण पुढच्या पिढीच्या मनावर तरी हे विचार उत्कृष्ट रितीने व्हावे म्हणून हा प्रयत्न आहे. आपण उदयोग करा म्हणजे परमेश्वर साहय करील. परमेश्वराची कृपा केवळ इंग्रजांवरच आहे असे नाही आपल्या देशावर प्रेम करण्यास कोणास भिण्याचे कारण नाही अथवा त्यात कोणाचा रोषही होत नाही. मी दुसऱ्या प्रसंगी एक दृष्टांन्त देवून सांगितलेच आहे की, आपल्या बायकोवरच प्रिती करा असे सांगितल्याने दुसऱ्या बायकांचा व्देष करा असे होत नाही. एकपत्नीव्रताप्रमाणे हे स्वदेशी व्रत आहे. हा पोटापाण्याचा प्रश्न आहे. आमच्या पोटावर प्रेम करणे हे आमचे कर्तव्य आहे. त्यामुळे दुसऱ्याचे पोट भरले नाही, त्याबददल आम्ही जबाबदार नाही. शुध्द अंतकरणाने आपण काम केले म्हणजे परमेश्वर साहय करीलच करील. म्हणून राष्ट्रीय इमारतीचे चार खांब स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण यांचे अवलंबन करण्याविषयी प्रार्थना करून मी आपले भाषण संपवितो.[६४]

४ मे १९०८ रोजी अकोला याठिकाणी झालेल्या शिवजयंती उत्सवाच्या कार्यक्रमास श्री गजानन महाराज शेगावचे सत्पुरूष उपस्थित होते या सभेत भाषण करताना लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज त्यांचे गुरू रामदासस्वामी यांचा संदर्भ गजानन महाराजाशी जोडताना व लोकांचे प्रबोधन करताना असे म्हणतात की,

(संदर्भ परिशिष्ट क्र. ६ पाहणे. पृ.क्र. २४५ ते २५४)

**बहिष्काराची चळवळ**

**सविनय प्रतिकार चळवळ —**

कलकत्ता येथील डिसेंबर १९०६ मध्ये नव्या पक्षाची विचारसरणी या भाषणात बहिष्काराचे राजकीय महत्व पटवून देताना लोकमान्य टिळक असे म्हणतात की, ''तडफदार असहकार करण्याइतके सामर्थ्य तुमच्याजवळ नसेल तरी परकी सरकारला आपल्यावर सत्ता गाजवणे अशक्य व्हावे यासाठी स्वसुख पराङ:मुख आणि विरक्त बनण्याचीही शक्ती तुमच्यात नाही काय? आम्ही बहिष्काराला राजकीय शस्त्र म्हणतो याचा अर्थ हाच आहे.''[६५]

**होमरूल चळवळ —**

८ मे १९९१५ ला पुण्यात बॅ.बॅटिस्टा यांच्या अध्यक्षतेखाली जी प्रांतिक परिषद झाली त्यात त्यांनी होमरूलची कल्पना मांडून तिचे जोरदार समर्थन केले. त्यासाठी होमरूल लीग काढावी असे त्यांनी टिळकांना सुचविले तेव्हा टिळकांनी ते मान्य केले. बेझंटबाई ही त्याच विचारात होत्या त्यांना २५ सप्टेंबर १९१५ ला 'न्यू इंडिया' या आपल्या वर्तमानपत्रात होमरूल लिगची उददेशपत्रिका प्रसिध्द केली आणि 'होमरूल लीग' (स्वराज्य संघ) ची स्थापना केली.

त्यानंतर लोकमान्य टिळकांनी २८ एप्रिल १९१६ रोजी बेळगाव येथे 'होमरूल लीगची' रितसर स्थापना केली. सर्व सनदशीर मार्गांनी ब्रिटीश सम्राज्यातर्गत स्वराज्य मिळविणे आणि ते मिळविण्याच्या दृष्टीने शिक्षण देवून जनमत सुसंघटीत करणे हा या लीगचा उद्देश होता. या लीगमागची प्रेरकशक्ती स्वत: टिळक होते तरी पण त्यांनी त्यात कोणतेही अधिकारपद स्विकारले नव्हते. लीग संघटित करण्यात सक्रीय हातभार लावणाऱ्या जोसेफ बॅटिस्टांनां अध्यक्ष आणि न.चि. केळकरांना चिटणीस निवडण्यात

आले. नियामक मंडळाच्या सदस्यांत दादासाहेब खापर्डे, डॉ.मुंजे आणि र. पा. कंरदीकर व बेळवी यांचा समावेश केलेला होता.[६६]

लोकमान्यांच्या प्रेरणेने स्वदेशी बहिष्काराची चळवळ हिंदुस्थानभर पसरली. कलकत्ताच्या राष्ट्रीय सभेत लोकमान्यांच्या खटपटीला यश येवून स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार, रा.शिक्षण या चतु:सुत्रीला राष्ट्रीय सभेने मान्यता दिलेली दिसून येते या बददल 'राष्ट्रधर्मप्रवर्तक बाबू अरविंद घोष' या लेखात प्रभाकर खाडीलकर असे लिहितात की,''लोकमान्यांच्या राजकारणाचे धडे बाबू सुरेद्रनाथ बानर्जी व बाबू बिपिनचंद्रपाल बंगालला देत होते. राष्ट्रीय सभेने बंगलाचा प्रश्न हाती घेवून तडीस न्यावा व त्यासाठी हिंदुस्थानभर स्वदेशी बहिष्काराची चळवळ राष्ट्रीय सभेने करावी अशी लोकमान्यांची इच्छा होती.''

''कलकत्त्यास भरलेल्या राष्ट्रीय सभेत लोकमान्यांच्या खटपटीला यश येऊन स्वराज्य, स्वदेशी बहिष्कार व रा.शिक्षण या चतु:सुत्रीला राष्ट्रीय सभेने मान्यता दिली. या चतु:सुत्रीने militant Nationalisam म्हणजे वीरवृत्तीच्या राष्ट्रधर्माला हिंदुस्थानात नांवरूप दिले व या राष्ट्रधर्माचे प्रवर्तन अरविंद बाबूंनी आपल्या ओजस्वी लेखणीने 'वंदेमातरम्' मधून करण्यास सुरूवात केली.''[६७]

लोकमान्य टिळकांनी स्वदेशीचा निरनिराळया रीतीने उपयोग करून घेतला धर्मदृष्टा स्वदेशी चळवळीचा उपयोग, राष्ट्रीयवृत्ती उत्पन्न करण्यासाठी उपयोग, याबद्दल न.चिं.केळकर असे लिहितात, ''टिळकांनीं स्वदेशी चळवळीचा जितक्या निरनिराळया रितीने उपयोग करून घेता येण्यासारखा होता, तितका करून घेतला राष्ट्रीय वृत्ती उत्पन्न करणे हे मुख्य काम त्यांनी केले व ती निरनिराळया वर्गांमध्ये निरनिराळया मार्गांनीच उत्पन्न होवू शकते म्हणून विद्यार्थ्यांच्या परीने त्यांना उत्साह येईल असे बोलावयाचे लिहावयाचे. धर्मदृष्टा, स्वदेशी चळवळीचा उपयोग आहे हे

परदेशी सारखरेचे उदाहरण देवून दाखववायचे व्यापाऱ्यांच्या धंदयांच्या दृष्टीने व्यापाऱ्यांना व विणकर वगैर कामगार लोकांना उपजिविकेचे साधन म्हणून स्वदेशी चळवळीचा उपयोग सांगावयाचा आणि बहिष्काराची भिती दाखवून इंग्रजी लोकांच्या मनावर परिणाम करावयाचा अशा अनेक रितींनी हा फायदा त्यांना घेता आला आणि या वेळचा केसरी चाळून पाहाणारास असे दिसून येईल की टिळकांच्या या स्फुर्तिदायक धोरणामुळे निदान महाराष्ट्रात तरी असे गाव उरले नव्हते की जेथे एखादी स्वदेशीची सभा झाली नाही. हरिदास पुराणिक यांच्याव्दारे स्वदेशीचा उपदेश करण्याचे यशस्वी मार्ग अनुसरणारे अनेक लोक या वेळी निघाले.[६८]

लोकमान्य टिळकांनी बहिष्काराला धार्मिक किंवा तत्वज्ञानविषयक स्वरूप दिले यासंबंधी न.चिं.केळकर लोकमान्य टिळकांच्या बहिष्काराविषयक विचार व कार्याचा मागोवा घेताना 'टिळक व स्वदेशी चळवळ' या लेखात असे लिहितात की, '' बहिष्काराला धार्मिक किंवा तत्वज्ञानविषयक असे काही स्वरूप दिल्याशिवाय तो लोकांच्या मनात बिंबावा तसा बिंबणार नाही म्हणून त्याही दृष्टिने सहजच प्रयत्न सुरू झाले. बहिष्कार तोच पण त्याला नुसते बहिष्कार हे लौकिक किंवा राजकीय नाव न ठेवता 'बहिष्कारयोग' असे दिले तर एकदम त्याचे रूप पालटते व त्याची शक्यता वाढते म्हणून यापुढे बंगाल्यातील बहिष्काराला नुसते कपडयाच्या बहिष्काराचे स्वरूप न राहता बंगल्यात काय किंवा इतरत्र काय सार्वत्रिक राजकीय असे बहिष्काराचे स्वरूप प्राप्त झाले. संस्कृतीचे ज्ञान व राजकारणाची तळमळ असणाऱ्या काही लोकांनी नवे मंत्र हुडकून काढण्याकडे आपली बुध्दी खर्चली. टिळकांनींही बहिष्काराचे धार्मिक स्वरूप चांगले सजविले ते म्हणतात, '' नेहाभिक्रमनाशोस्ति प्रत्यव्ययो न विद्यते स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात'' हा गीतेतील श्लोक बहिष्कारायोगाला चांगला लागू पडणारा आहे.''[६९]

तत्कालीन गणेशोत्सवात विविध प्रकारच्या जाहिरातीमधून स्वदेशीचा प्रचार व प्रसार झाल्याचे दिसून येते.[७०]

१) उंट छाप शाईने जग जिकंले !

२) सुती गंजीफ्रॉक व स्वदेशी शिंगाची व शिपांची फॅशनेबल बटनांची जाहिरात. [७१]

**<u>किर्तन —</u>**

किर्तनपरंपरा ही महाराष्ट्रातील लोकप्रिय अशी पंरपरा आहे. ते प्रबोधनाचे एक उत्तम साधन आहे.त्याचे महत्व ओळखून टिळकांनी किर्तनाविषयी विशेष आपुलकी दाखवून त्याबाबतचे विचार त्यांनी मांडले आहेत.

गणेशोत्सवामुळे समाजातील सर्व स्तर एकत्र येत होते. एकदिलाने उत्सवात सहभागी होत होते. त्याच्यात एकत्वाच्या भावनेतून विशाल राष्ट्रभक्ती निर्माण होत होती. सहकार्याची भावना वाढीस लागत होती. लोकप्रबोधन व राष्ट्रजागृती निर्माण करण्याचे सामर्थ्य किर्तनात आहे, हे टिळकांनी जाणले होते म्हणून त्यांनी गणेशोत्सवांत, ‘राष्ट्रीय किर्तन’ हा नवा प्रवाह सुरू केला. अनेक किर्तनकारांना त्यांनी प्रवृत्त केले व त्यामधून त्यांनी राजकीय संदेश देण्याची सुचना केली. टिळकांनी डॉ. पटवर्धनबुवांना किर्तनक्षेत्राकडे आणले त्यांच्या पहिल्या किर्तनात टिळकांनी त्यांना हार घातला व म्हणाले की ‘‘ ही स्वदेशीची माळ आहे हे व्रत किर्तनात सांगा, लोक आचरतील, शिवाय कर्तृत्ववान क्रांतीकारकांची व ऐतिहासिक पुरूषस्त्रियांची आख्यान लावा. लोक तुमच्या सांगण्यांना स्वातंत्र्यासाठी उडया घेतील.’’ पटवर्धनबुवांनी टिळकांचे शब्द प्रमाण म्हणून किर्तन कार्य केले.

वाई, सातारा, कोल्हापूर, सांगली, कोकण, उत्तरमहाराष्ट्र विदर्भ, मराठवाडा या भागात बुवांची किर्तने गाजली. काही गावी बुवांनी गणशोत्सव मंडळे सुरू केली. त्या त्या भागातल्या ऐतिहासिक पुरूषांची आख्याने सांगितली. महाराष्ट्रातील तरूणपिढी ज्ञानबलाशिल संपन्न केली. बुवांनी राष्ट्रासाठी असा संकल्प तयार केला होता.

'अस्मत राष्ट्र बलसंवर्धनार्थ, दोन दु:खहरणार्थ, गोहत्याप्रतिबंधार्थ।

शीलसंरक्षणार्थ, लोकसंग्रहकार्यार्थ, श्रीरामनामजपं वय करिण्यम:।।

पटवर्धन बुवांसारखे अनेक राष्ट्रीय किर्तनकार पुढे आले. राष्ट्रीय किर्तनाबरोबरच अन्य किर्तनकारांनी प्रबोधनाच्या कार्यास मोठा हातभार लावला आहे.[७२]

दि.५ ते ८ जाने १९१८ पर्यंत नागपुरला पहित्या किर्तन संमेलनाचा समारंभ टिळकांच्या अध्यक्षतेखाली झाला तेव्हा टिळक किर्तनाचे उपयोग सांगून किर्तनकाराच्या अंगी कोणते गुण असले पाहिजे, हे सांगून समाजकर्तव्य हे किर्तनकाराचे मुख्य कर्तव्य असून किर्तनसंस्था देशोन्नतीच्या कामी उपयुक्त आणि पवित्र आहे असे सांगतात. किर्तनात ते धर्माला विशेष महत्व देतात धार्मिक आणि नैतिकदृष्टया नाटकांपेक्षा किर्तनास अधिक महत्वाचे मानतात. या संस्थेची सुधारणा केल्याने समाजातील सुशिक्षित वर्गाचे लक्ष लागेल असे देखील ते सांगतात.[७३]

**<u>किर्तन संस्थेविषयी व्दादश सूक्ति –</u>**

१. पिनल कोड हा मारका मास्तर होय, पण किर्तनकार हे सामोपचाराने शिक्षण देणारे गुरू होत.
२. किर्तन संस्था काही सामान्य संस्था नव्हे, शाळेतील शिक्षक किंवा वर्तमानपत्रकार यांच्यापेक्षाही किर्तनकाराचा अधिकार मोठा आहे. कारण समाजास वळण लावून देणे हे काही लहानसहान काम नव्हे.

३. आपव्दर्म म्हणून का होईना, इंग्रजीसारख्या पाश्चात्य भाषेचे अध्ययन करून त्यांतील धार्मिक व नैतिक ज्ञानभांडार श्रोतुवर्गास खुले करून देवून तव्दारा हिंदू धर्माची महती स्थापन करणे हे हल्लींच्या काळी उत्तम किर्तनकाराच्या लक्षणांपैकी एक लक्षण समजण्यास हरकत नाही.

४. हल्लींचा श्रोतुसमाज पाश्चात्य पध्दतीने सुसंस्कृत असल्यामुळे त्यावर जर किर्तनकाराला आपली छाप पाडावयाची असली तर ती नव्या संस्कृतीच्या व्दारेच पाडली पाहिजे.

५. समाजशिक्षण हे किर्तनकाराचे मुख्य कर्तव्य आहे म्हणून समाज जेथे पालटला किंवा समाजाला प्रस्तुत काळी ज्याप्रमाणे शिक्षण मिळत आहे त्याला धरूनच किर्तनकाराने आपल्या किर्तनाचा रंग उठवला पाहिजे, आणि हा फरक केवळ सामाजिक आणि नैतिक निरूपणांतच नव्हे तर धार्मिक निरूपणातही करणे जरूर आहे.

६. धर्माचा व नीतीचा उपदेश हा किर्तनाचा आत्मा होय. गायन वादनाची जोड ही जेवणाच्या वेळी उदबत्या लावण्याप्रमाणे आहे.

७. किर्तनाचा पुर्वरंग साधन कोटीतील लोकांना उपयोगी पडेल असा दाखविला जावून तो उज्वल स्वरूपाचा व प्रवृत्तिपर असा असावा.

८. विद्या, विवेक, वैराग्य, निस्पृहता व लोककल्याणाची प्रबल इच्छा हे किर्तनकाराचे मुख्य गुण होत.

९. दिवसभर संसारात गढलेल्या लोकांचे लक्ष हरिकथा निरूपणाने परमेश्वराकडे लावणे हे किर्तनकाराचे पहिले स्वरूप होय.

१०. संसारी मनुष्याच्या मनांत परमेश्वराबद्दल व धर्माबदद्दल उदात्त विचार जागृत करणे हे किर्तनाचे ध्येय होय.

११. किर्तनसंस्था ही नाटकापेक्षा जास्त उपयुक्त व महत्वाची आहे.

१२. नव्या शिक्षणांने विव्दान झालेल्या ग्रॅज्युएटांचेही लक्ष जर या किर्तन संस्थेकडे जाईल तर इष्ट सुधारणा लवकरच घडून येतील.[७४]

'राष्ट्रीय कीर्तन' ही संज्ञा लोकमान्य टिळकांनी प्रथम आस्तित्वात आणली असे दिसते डॉ. दत्तोपंत पटवर्धन यांना पहिले 'राष्ट्रीय किर्तनकार' असा गौरवपूर्ण उल्लेख बुवांविषयी लोकमान्य टिळकांनी केलेला दिसून येतो. त्याबरोबर राष्ट्रीय कीर्तनाने मोठी लोकजागृती झालेली दिसून येते. 'राष्ट्रीय कीर्तन' एक भावसंदर्भ' या 'केसरी शताब्दी' ग्रंथांतील आपल्या लेखात, डॉ.यशवंत पाठक 'राष्ट्रीय कीर्तनासंदर्भात' असे लिहातात की, 'राष्ट्रीय कीर्तन' ही संस्था लोकमान्य टिळकांनी प्रथम अस्तित्वात आणली. डॉ. दत्तोपंत पटवर्धन बुवा पाहिले 'राष्ट्रीय कीर्तनकार' असा गौरवपूर्वक उल्लेख पटवर्धनबुवांविषयी लोकमान्य नेहमी करीत. केसरी ही त्यांची संध्या बनली. टिळकांचे विचार गावोगावी पोहोचविणे ही मोठीच ईश सेवा ठरली. यातून ऐतिहासिक व राष्ट्रीय आख्यानांचा नवा वर्ग अवतरला नव्या पठडीतील किर्तनकारांनी इतिहासाचा चिकित्सपणे फारसा अभ्यास केला नाही. पण इतिहासातील असामान्य व्यक्तित्वांचा शोध घेण्यात हरिदासांची प्रतिभा रममाण झाली यातून 'राष्ट्रीय कीर्तन' ही नवीन संज्ञा दृढमुल होवू लागली. 'राष्ट्रीय कीर्तनाची' व्याख्या अशी झाली, " ज्या कीर्तनात पूर्वरंग निरूपणात जीवनात कोणत्या महत्वाच्या मूल्यांना स्थान दयावचाचे याचे निरूपण बुवा करतात, अन उत्तरंगात या निरूपणाच्या पुष्टयार्थ राष्ट्रीय वा ऐतिहासिक आख्यान सांगतात अशा किर्तन प्रयोगास राष्ट्रीय कीर्तन असे म्हणतात."

पटवर्धनबुवांनी ऐतिहासिक आख्यानांचे स्वतंत्र दालन उघडले. उत्कृष्ठ स्वकृत काव्यरचना केली. प्रत्येक ऐतिहासिक आख्यानात ग्रंथाधार वा इतिहासाचा पुरावा दिला.

टिळकांचा संकल्प 'राष्ट्रीय कीर्तनाचा आत्मा आहे.' तो असा, ''अस्मत राष्ट्रबलसंवर्धनार्थ, दीन:दुख हरणार्थ, गोहत्याप्रतिबंधनार्थ, शीलसंरक्षार्थ, लोकसंग्राहार्थ, श्रीरामनापजपं वयं करिष्याम: ।।'', गजलिश्रेष्ठा या निबिडतर कान्हार जठरी, या केसरी गर्जनेशी ही संकल्पगर्जना सुसंगत वाटते. या संकल्पाची राष्ट्रीय दिक्षा बुवांनी युवकांना दिली. राष्ट्रात ईश्वराचा साक्षात्कार दाखवून देणारे लोकमान्य व तो साक्षात्कार पाहणारे डॉ.पटवर्धनबुवा हा कीती अपूर्व मिलाफ होता.[७५]

राष्ट्रीयकिर्तनाचे स्वांतत्र्यआंदोलनातील योगदान, महत्व काय होते. राष्ट्रीय कीर्तनाने काय दिले याबद्दल, 'राष्ट्रीय कीर्तन : एक भावसंदर्भ' या लेखात डॉ. यशवंत पाठक असे लिहितात की, '' मानवी जीवनातील अस्मिता जागृत करून प्रत्येकाच्या मनात आत्मविश्वासाचे सामर्थ्य, राष्ट्रीय कीर्तनाने दिले. जीवन कसे जगावे याचा आदर्श परिपाठ घातला. सर्वसामान्यांपासून ते विव्दानांपर्यंत सर्वांना स्वातंत्र्याच्या प्रकाशवाटा 'राष्ट्रीय कीर्तनाने' दाखविल्या. माणसाच्या अहम ला वैश्विक पातळीवर आणले. स्वांतत्र्यासाठी आत्मसमर्पण करणाऱ्या प्रत्येक जीवात्म्यात ईश्वरी साक्षात्कारांचे सूर्यसोहळे उपभोगले. महाराष्ट्रधर्माची मशाल जनताजनार्दनाच्या प्रांगणात अखंड पेटती ठेवली. यातून प्रयत्नवादाच्या शिकवणीचा ओघ महाराष्ट्रात वाहू लागला. चैतन्याचे वातवरण सर्वत्र निर्माण झाले.

जुन्या नव्याच्या संघर्षापेक्षा 'राष्ट्रीय कीर्तनां ने समन्वयाची भूमिका घेतली. लोकमान्यांच्या राष्ट्रीय दिक्षेने पेटलेली ही सारी हरिदासमंडळी आपल्या कीर्तन ध्येयाशी एकनिष्ठ राहिली. काही हरिदासांनी स्वत:ला पूर्णपणे राष्ट्रीय चळवळीत झोकून दिले. प्रपंच व परमार्थ यांची सांगड घालणाऱ्या बुवांनी प्रत्येक भारतीयांस राष्ट्र प्रपंचास कटिबध्द केले. लोकमान्यांच्या केसरी ची हाळी बुवांनी समाजाला दिली. विविध प्रकारच्या व्याख्यानांतून ते मत समाजमनावर मोठया प्रमाणात ठरवू लागले. [७६]

डॉ.सदानंद मोरेंनी आपल्या, 'लोकमान्य ते महात्मा', या ग्रंथांत किर्तनाबाबत वर्णन करून तत्कालीन लोकमाध्यमांचा आपल्या कार्यासाठी लोकमान्य टिळक कसा उपयोग करून घेत याबाबत आपले विचार मांडलेले दिसून येतात. ते असे लिहितात की ,'' टिळकांच्या आग्रहावरून नारायण बापूजी कनिटकरांनी' पहिले किर्तन केले. त्या कीर्तनात टिळकांनी झांजा वाजवला होता. राष्ट्रीय कीर्तनकार दत्तोपंत पटवर्धन हे टिळकांच्या प्रेरणेने किर्तनकार झाले.नाशिकच्या पहिल्या किर्तन संमेलनाचे अध्यक्ष टिळकच होत. टिळकांनीच कीर्तन करावे, साथीचे काम आमच्या वारकारी मंडळी करतील असा प्रस्ताव विष्णुबुवा जोग महाराजांचा होता व टिळकांना तो तत्त्वता मान्यही होता. पटवर्धन बुवांनी पूर्वरंगाचा बाज जोगांच्यां वारकरी कीर्तनातून उचलला होता. उत्तरंगात ते राष्ट्रीय आख्याने लावीत. आपला मुलगा रामभाऊ याने कीर्तन शिकावे, अशी काही खटपट केल्याचे आढळते रामभाऊंनी टिळकांवर आख्यानही रचले होते. लोकमाध्यमांचा उपयोग करून घेण्यात टिळक किती दक्ष असत हे वेगळे सांगायला नको.''

''टिळकांच्या सहवासामुळे की काय शिवरामपंत परांजपे कीर्तन नाही, पण पुराण सांगू लागले. त्यांचे पुराण अर्थातच राष्ट्रीय असायचे.[७७]

लोकमान्य टिळकांनीं लोकप्रबोधनासाठी सांस्कृतिक घटकांच्यां वापराबरोबरच केसरीच्या माध्यमातून धार्मीक, राष्ट्रीय, शिक्षणविषयक, संस्कृतीविषयक, लोकजागृती व लोकशिक्षणाचे कार्य केलेले दिसून येते.

<u>१) केसरीचे धर्मविषयक धोरण</u>

''टिळकांच्या कारकिर्दित केसरीचे धर्मविषयक धोरण दोन तीन बाबींवर आधारलेले होते. ईश्वराविषयी श्रध्दा बाळगणे हे व्यक्तीच्या व समाजांच्या अंतिम हिताचे आहे. योग्य धार्मिक परंपरंचे रक्षण झाले पाहिजे मात्र हे कायदयाने न होता लोकांच्या स्वच्छेने त्यांच्या प्रत्यक्ष आचरणाव्दारे झाले पाहिजे. धार्मिक सुधारणा करावयाच्या त्या राष्ट्रीयत्वाच्या भूमिकेतून

झाल्या पाहिजे. राजकीय जागृती करावयाची, ही लोकांना बरोबर घेवून केली पाहिजे आणि लोकांना बरोबर घ्यावयाचे तर त्यांच्या योग्य धार्मिक भावनांचा यावच्छक्य मान राखला पाहिजे. स्वत: टिळक धार्मिक आचार शक्य तेवढे पाळीत असत. धार्मिक विषयातील टिळकांची कामगिरी अशी की, आधुनिक अर्थप्रधान संस्कृतीकडून धर्मावर होणाऱ्या आघातांचा त्यांनी प्रतिकार केला. स्वत: लोकांनी धर्माचरण करून त्यांच्या मर्यादा निश्चित कराव्यात असे प्रतिपादन केले आणि तत्वज्ञानाच्या क्षेत्रात प्रवृत्ती मार्गाची स्थापना केली. सारांश धार्मिक आणि तात्विक क्षेत्रातील विशुध्द परंपरंचे रक्षण त्यांनी लोकसंग्रहाची दृष्टी ठेवून केले.[७८]

२) केसरीचे राष्ट्रीय शिक्षण विषयक धोरण

'केसरी प्रबोध' मधील 'राष्ट्रीयशिक्षण' या लेखात श्री. राजाराम देसाई केसरीच्या राष्ट्रीय शिक्षणविषयक धोरणाबाबत असे लिहितात की,''केसरीने राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार १९०२ पासून ते १९३० पर्यंत प्रसंगानुरूप सारखा केला आहे. ज्यात राष्ट्रीय शिक्षणासंबंधी अग्रलेख, स्फुट विचार, इतरांचे लेख, व्याख्यानांचा सारांश चर्चा किंवा माहिती यांपैकी काहीही केसरीत आले नाही. अशी १९११, १९१५ व १९१६ ही केवळ तीनच वर्ष इतक्या कालावधीत गेली बाकीच्या कालांत सुमारे १५ अग्रलेख या प्रश्नावर आले आहेत.''

''पहिली दोन तीन वर्षे सराकरी शिक्षण पध्दतीतील व्यंगें व सरकारचे शिक्षणविषयक धोरण राष्ट्रीयत्वाला विघातक कसे होत चालले आहे, हया दोन गोष्टी उघड करून लोंकांना दाखविल्या आहेत.''

''शिक्षणक्रम सर्वथा सरकारचे हाती गेला म्हणजे त्याचे परिणाम राष्ट्रीयत्वास किती घातक होतील हे निराळे सांगावयास नको असे निदर्शनास आणले आहे.''

‘‘ पाश्चात्य व पौर्वात्य शिक्षणपध्दतींचा मिलाफ करून तरूण पिढी राष्ट्रीयदृष्टया समर्थ व व्यवहारदृष्टा स्वावलंबी करणाऱ्या संस्थेचा नमुना ‘समर्थ विद्यालय’ आहे. या वेळेपासून केसरीकारांनी स्वत: ‘महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळीचे सभासद होवून, ‘राष्ट्रीय शिक्षणाच्या’ चळवळीत प्रत्यक्ष भाग घेतला आणि वि.प्रसारक मंडळाच्या ‘राष्ट्रीय शिक्षणाचा’ प्रचार व निमसरकारी शाळांवर ... असा दुहेरी कार्यक्रम जोराने चालविला. ‘राष्ट्रीय शिक्षण व खासगी शाळांची जबाबदारी हे तीन अग्रलेख अनुक्रमे नोव्हेंबर व डिसेंबर १९०६ व जानेवारी १९०७ मध्ये लिहून त्याची परिसमाप्ती जुलैमध्ये ‘चतकोर भाकरीची गुलामगिरी’ या लेखाने केली आहे.

ठराव — ९ , ‘‘मुलींमुलींना शिक्षण देण्याचा प्रश्न कळकळीने हाती घेण्याचे व राष्ट्रीय दृष्टीने व राष्ट्रीय हुकमतीखाली देशाच्या सद्यस्थितीला अनुरूप असे शिक्षण देणाऱ्या सर्व शाखांच्या शाळा सर्व हिंदुस्थानभर स्थापन करण्याची वेळ आली आहे असे या सभेचे मत आहे.’’[७९] बाविसाव्या राष्ट्रीय सभेचे असा शिक्षणासंबंधीने ठराव केलेला दिसून येतो.

लोकमान्य टिळकांनी आपल्या राजकीय विचारांच्या प्रचार व प्रसाराचे कार्य ‘केसरीच्या माध्यमातून केले. ‘स्वदेशी व बहिष्कार’ या विषयी ‘केसरीची स्वराज्याची चतु:सुत्री’ या ‘केसरी प्रबोध’ मधील लेखात या विषयी श्री.पं.श्री.दा.सातवळेकर असे लिहितात की, ‘‘बहिष्कार हा कायदेशीर असला तरी अगदी निर्वाणीच्या वेळी वापरावयाचा असतो तशी निर्वाणीची वेळ सध्या आलेली नाही, असे देशांतील एकजात नरम नेते म्हणत होते. त्यावेळी केसरीने अनेक देशांची उदाहरणे देवून बहिष्कार घातल्याशिवाय आपला तरणोपाय नाही व बहिष्कार घालण्याची वेळ आलेली आहे असे सांगितले होते.’’

''..यात निशस्त्र स्थितीत दुर्बल प्रजेने सबळ राज्यकर्त्यांना आपले म्हणणे मानावयास कसे भाग पाडावे, ते स्पष्ट शब्दांनी प्रतिपादले आहे. निशस्त्र प्रतिकार करण्याचे हे तत्व केसरीने पंचवीस वर्षापूर्वी प्रतिपादले.''

'' स्वदेशीव्रताचा उगम पुण्यांत पुष्कळ वर्षापूर्वीच झालेला असला, तरी स्वराज्याच्या चतु:सुत्रीमध्ये स्वदेशीव्रताला प्रमुख स्थान देवून, त्याचा संबंध स्वराज्य — प्राप्तीशी कसा आहे, हे जनतेच्या मनावर बिंबविण्याचे काम केसरीने फारच उत्कृष्टरीतीने केले.''

''ज्यावेळी केसरीने ही चतुसूत्री सांगितली, त्या वेळी पुढाऱ्यांची विचारसरणी काही निराळीच होती. त्या वेळी असे प्रतिपादन केले जात असे की, स्वदेशीव्रत ही औद्यौगिक बाब आहे. हिचा राजकारणाशी संबंध नाही. बहिष्काराची बाब फक्त व्यापाराविषयक आहे, तिचा राजकारणाशी संबंध नाही पुष्कळ पुढारी अशी दिशाभुलीची भाषा बोलत असता केसरीनेच या सर्वांचा स्वराज्य प्राप्तीचा राजकारणांशी अगदी जवळचा संबंध आहे व जर स्वदेशी बहिष्काराच्या जोडगोळीने आपण प्रतिपक्षावर हल्ला केला नाही, तर स्वराज्याचा किल्ला कधीही सर व्हावयाचा नाही असे गर्जना करून सांगितले.''[८०]

स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण यांचा उपदेश केसरीने स्वराज्यप्राप्तीचे साधन म्हणून केला. 'स्वराज्य' हे आपले साधन आहे असे प्रतिपादन केसरीने केलेले दिसून येते. 'केसरीची स्वराज्याची चतु:सुत्री' 'केसरी प्रबोध' ग्रंथातील या लेखात श्री. दा.सातवळेकर असे लिहितात की, ''स्वदेशी बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण यांचा याप्रमाणे केसरीने उपदेश केला तो स्वराज्यप्राप्तीचे साधन म्हणून केला. 'स्वराज्य' हे आपले साध्य आहे व त्यांची ही तीन साधने आहेत. या तीन साधनांचे अनुष्ठान जितक्या त्रीव आपणांकडून होईल, तितके स्वराज्य जवळ येईल. या 'स्वराज्याची' व्याख्या केसरीने अशी केली आहे. ''स्व म्हणजे प्रजा, यांच्यां मताप्रमाणे

चालणारे राज्य ते ‘स्वराज्य’ (९—४—१९०७) प्रजेच्या अनुमतीप्रमाणे चालणारे जे राज्य असते, त्यास ‘स्वराज्य’ असे म्हणतात व जे राज्य चालवण्यात प्रजेची अनुमति नसते, ते स्वराज्य नव्हे, ते परराज्य होय.’’

‘‘ परकीय राज्यापासून होणाऱ्या तोटयाचे वर्णन केसरीने केले आहे. हे तोटे दूर होण्यासाठी ‘स्वराज्य’ प्राप्त करून घेणे हा एकच उपाय आहे व जर स्वराज्य लवकर मिळावे अशी इच्छा असेल तर स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या तीन सुत्रांनी दर्शविलेल्या मार्गांचे अवलंबन केले पाहिजे’’.[८१]

किर्तनकार ही सामान्य संस्था नसून समाजास वळण लावून देण्यांचे काम कीर्तनकारांस करता येईल. किर्तनकार कसा असावा याविषयी केसरीने प्रतिपादन केलेले दिसून येते, ‘कीर्तने व कीर्तनकार, या ‘केसरी प्रबोध’ मधील लेखात श्री.विष्णु सखाराम घाटे यांनी किर्तनकार कसा असावा याबाबत  केसरीचे प्रतिपादन कसे होते यासंदर्भात लिहितांना ते केसरीच्या किर्तनविषयक कामगिरीचा व विचारांचां मागोवा घेताना असे लिहितात की, ‘‘खरोखर ‘कीर्तन’ हे साधन इतके उत्तम आहे की, त्याचा जर उपयोग करणारा असेल तर त्याच्या हातून काय होणार नाही? धर्मकारण घ्या, राजकरण्या हया किंवा आणखी कुठलेहीं कारण हया त्याचा अंतर्भाव कीर्तनांतून होण्यास काय हरकत आहे? शाळा, कॉलेजें, वर्तमानपत्रे, नाटके इत्यादी साधनांत ‘कीर्तन’ हे साधन सर्वव्यापी व उच्च दर्जाचे आहे. केसरीच्या मते पिनल कोड हा जर मारका मास्तर तर किर्तनकार हे सामोपचारानें  शिक्षण देणारे गुरू होत. ‘कीर्तनकार’ ही सामान्य संस्था नसून समाजास वळण लावून देण्याचे काम किर्तनकारांस करितां येईल व या दृष्टीने शाळेतील शिक्षक किंवा वर्तमानपत्रकार त्यांच्यापेक्षाही किर्तनकारांचा अधिकार मोठा आहे असे त्यांचे म्हणणे आहे. धर्माचा व

नितिचा उपदेश हा कीर्तनाचा आत्मा होय व तसा उपदेश करण्यासाठी नाटकांपेक्षा कीर्तनच साधन अधिक समर्पक होय.''[८२]

सुशिक्षित वर्गाने कीर्तनाच्या धंदयांत पडून आधुनिक काळास योग्य अशी कीर्तने करून त्याव्दारे, धर्मप्रसार व देशसेवा करावी असे टिळकांचे मत दिसून येते. 'कीर्तने व कीर्तनकार' या 'केसरी प्रबोध' मधील लेखात श्री विष्णु घाटे, टिळकांच्या किर्तनविषयक विचारांच्या मागोवा घेताना असे लिहितात की, '' सुशिक्षित वर्गाने या कीर्तनाच्या धंदयात पडून आधुनिक काळास योग्य अशी कीर्तने करून धर्मप्रसार व तव्दारा देशसेवा करावी असे केसरीस वाटत आहे. नव्या सुधारणान्वये कौन्सिलांत गेल्यावर जर एज्युकेशन पोर्ट फोलिओ हातांत आला तर, पाहिल्याने मी जी गोष्ट करीन ती ही की आपल्यांतील पुराणे, किर्तने, प्रवचने इत्यादी जुन्या संस्था मी उर्जितावस्थेस  आणीन व हया धर्मप्रसाराच्या जुन्यासंस्थां काबीज करून मी आपल्या सुशिक्षित, सुसंस्कृत आणि स्वार्थत्यागी तरूणांनां पुराणिक, प्रवचनकार व कीर्तनकार म्हणून देशांतील खेडयांपाडयांमध्ये सोडून देवून सदयपरिस्थिती विषयीची लोकांना पूर्ण ओळख करून देईन आणि लोकजागृतीचे काम करीन. असे  एकदा टिळक म्हणाले होते. केसरी वर्तमानपत्रांत हजारो रकाने लिहून जे काम नीट झाले नसते ते एका 'गीतारहस्यांने' झाले. तुरूंगांत जाताच नारदीच परंपरेच्या हरिदासाच्या भूमिकेवर आरूढ होवून लोकमान्यांनी एक आधुनिक कीर्तन केले व ते त्यांचे त्यांसच इतके उत्तम वाटले. त्यांनी बोलून दाखविले की, ''समाजात विशिष्ट मताची परिस्थिती उत्पन्न करणे झाल्यास — मग ते मत राजकीय असो वा धार्मिक असो 'आपल्या मताचे प्रस्थापन समाजात करणे झाल्यास त्यास 'कीर्तन संस्थेसारखे' दुसरे साधन नाही, इतकेच नव्हे परंतु माझी असे ठाम मत आहे की, जर वर्तमानपत्राचा एडिटर झालो नसतो, तर कीर्तनकार झालो असतो.''[८३]

नमुनेदार हरिदास कसा असावा याबद्दल केसरीने प्रतिपादन केलेले दिसून येते. '' आजच्या काळाला नमुनेदार हरिदास कसा असावा, याबद्दल केसरीने मांडलेले मुद्दे ता. १८ डिसेंबर १९२८ च्या अंकात प्रसिध्द झाले आहेत व ते फारच मार्मिक आहेत.''

१. हरिदासांत वक्तृत्व हवे पण वावदुकी नको.

२. गाणें हवे पण वस्तादी गवयाइतके नको. कथेला गायन वादनाची जोड हवी, म्हणजे मेजवानीच्या वेळी उदबत्या लावण्याप्रमाणेच आहे. 'केसरीचा' हा दृष्टान्त फारच मार्मिक आहे.

३. अभिनय हवा पण नटाइतका नको

४. विनोद असावा पण तो विदूषकी नसावा.

५. उपमा, दृष्टान्त व गोष्टी या चटकदार असाव्यात, पण अतिशयोक्तीच्या नसाव्यात.

६. कोटींत विनोद व विव्दत्ता असावी पण शब्दाचा खेळ नसावा.

७. विव्दत्ता पाहिजे पण धडधड पाठांतर नको.

८. आचाराची श्रेष्ठता असावी पण व्युत्पत्तिप्रियता नसावी.

९. पदे जुनी असली तरी चाली नवीन असाव्यात.

१०. आख्याने शक्य तोवर पौराणिक अगर ऐतिहासिक कालातील लावावींत.

११. प्रचलित राजकारणाला किंवा इतर परिस्थितीला आधारभूत अगर पोषक असे प्रसंग महाभारतांतून वाटेल तेवढे सापडतात व त्यांचे विवरण जर कुशलतेने केले तर आडपडदयाने सध्याची बिकट परिस्थिती व त्यातून पार पडण्याचे मार्ग हे लोकांच्या डोळयांसमोर उभे राहतील व त्या योगाने किर्तनचे कार्य होईल.''[८४]

लोकमान्य टिळकांनी वेळोवेळी जी भाषणे, व्याख्याने दिली व लेख लिहिले त्यामधून त्यांचे संस्कृतिचे विविध घटक आणि राजकारण' यांचे

परस्पर संबंध दर्शविणारे किंवा संस्कृती व राजकारण यांचे अनुबंध यासंबंधी दर्शविणारे विचार व्यक्त होताना दिसतात व तत्कालीन समकालीन विविध व्यक्तींच्या आठवणीवरून लोकमान्य टिळकांच्या राजकारणाचे सांस्कृतिक अनुबंध आणि परस्पर संबंध असल्याचे दिसून येते. लोकमान्य टिळकांची भाषणे व व्याख्याने, तत्कालीन विविध धार्मिक व्यक्तींबरोबर असलेले फोटो, तत्कालीन समकालीन व्यक्तींच्या आठवणी, तिर्थक्षेत्रांतील धार्मिक यात्रेला जोडून व्याख्याने यावरून परस्परसंबंध दिसून येतात.

'' धार्मिक यात्रेला औद्योगिक यात्रेची जोड,'' या विषय न.चिं.केळकर असे लिहितात की, '' १९०६ या साली पंढरपूर येथे कर्तिकीच्या यात्रेच्या प्रसंगी एक मोठे 'स्वदेशी संमेलन' व प्रदर्शन भरविण्यांत आले. 'स्वदेशी चळवळ' सुशिक्षित समाजात प्रसृत होतीच. पण अशिक्षित असा समाज पुष्कळ शिवाय धार्मिक वृत्तीच्या लोकात कोणतीही चळवळ एकदा शिरली म्हणजे ती दृढमूल होते या हेतूने टिळकांनी पंढरपूर येथील पुढाऱ्यांच्यां सहकरितेने धार्मिक यात्रेला या औद्योगिक यात्रेची जोड दिली होती.''[८५]

पंढरपूर येथील चंद्रभागेच्या वाळवंटात ता. १७ नोव्हें १९०७ रोजी सकाळी भरलेल्या 'स्वदेशी संमेलनात' लोकमान्य टिळकांनी पुढील आशयाचे भाषण केले, '' कोणीही विचारले तरी या राज्यात आमची स्थिती सुखाची नाही असे न भिता स्पष्ट सांगत जा. स्वदेशी व्रत पाळा. आपआपल्या गावांतून हे विचार पसरवा. पांडुरंगाच्या कृपेने आम्हाला यश येईल पण मागे सरू नका, अशी माझी आपणास विनंती आहे नाही आग्रह आहे.''[८६]

४ मे १९०८ रोजी अकोला या ठिकाणी झालेल्या शिवजयंती उत्सवाच्या कार्यक्रमास ' श्री.गजानन महाराज' शेगावचे 'सत्पुरूष' उपस्थित होते.या सभेत भाषण करताना लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज त्यांचे गुरू रामदासस्वामीनी यांचा संदर्भ गजानन महारांजाशी जोडताना व

लोकांचे स्वराज्याच्या साधनत्रयींपैकीच ‘स्वदेशी व बहिष्कार’ ही दोन साधने आहेत असे प्रबोधन करताना दिसून येतात.[८७]

लोकमान्य टिळकांचे विविध धार्मिक व्यक्तीबरोबर असलेले फोटो आढळून येतात. दत्तात्रय हळबे, न.चिं.केळकर, बालगंधर्व, रामचंद्र पटवर्धन यांच्या आठवणी वरून तत्कालीन विविध धार्मिक क्षेत्रांतील व्यक्तीबरोबर लोकमान्य टिळकांचे संबंध दिसून येतात. कोणताही प्रसंग असो, त्याचा लोकजागृतीकडे कसा उपयोग करता येईल इकडे लोकमान्यांची भूमिका दिसून येते.

(संदर्भ परिशिष्ट क्र.७ पृ.क्र.२५५ ते २५६)

१. अकोला वऱ्हाड शेगावंचे संत गजानन महाराज अध्यक्षस्थानी असताना लोकमान्य टिळकांनी दिलेले व्याख्यान सचित्र (१९०८)
२. स्वामी विवेकानंद व लोकमान्य टिळक यांचे विंचुरकर निवासस्थानी १८९२ साली झालेली भेट.
३. सिध्दरूध्दस्वामी आणि लोकमान्य टिळक
४. लोकमान्य टिळक व कृष्णनंद स्वामी.

आठवणी — १) लोकमान्य टिळकांचा स्वदेशी वर भर होता <u>दत्तात्रय शितिकंठ हळबे (श्रीनरसोबावाडी)</u> आपली आठवण सांगताना असे म्हणतात की, ‘‘ श्री क्षेत्र नरसिंहवाडी येथे लोकमान्य टिळक १९०६ व १९०८ या दोन साली आले त्याचे एक व्याख्यान येथील नारायण स्वामींचे देवळा समोरील पटांगणात झाले त्यावेळी ‘स्वदेशी’ वर विशेष भर होता व हे संस्थान असल्याने त्यांनी राजकीय विषयावर फारसे भाषण केले नाही येथे श्री दत्तास नैवदयास पेढे वगैरे साखरेचे जिन्नस येत असत ते जिन्नस परदेशी साखरेचे केलेले असत. तेव्हा लोकमान्यांनी ‘श्रीं जवळ’ परदेशी साखरेचे जिन्नस नैवैदयास घेऊ नयेत. देशी साखरेचे जिन्नस घ्यावेत परदेशी साखर अपवित्र आहे, त्या साखरेत गाईच्या रक्ताचा संबंध येतो,

तेव्हा अपावित्र व किळसवाणा पदार्थ देवापुढे नैवैदय म्हणून घेणे हे फार पाप होय शिवाय तिचा त्याग केल्याने देशी साखरेचा खप वाढेल व देशी साखरेच्या कारखान्यांस उत्तेजन मिळेल.''[८८]

<u>नारायण श्रीपाद राजहंस उर्फ बालगंधर्व यांची शेगांवचे श्री.गजानन महारांजाबद्दलची आठवण,</u>

२)''सन १९०० च्या में महिन्यांत श्रीशिवजयंतीच्या उत्सवाकरीता लोकमान्य अकोला येथे गेले होते. लोकमान्यांच्या अकोला येथील मुक्कामाच्या वेळी काही मंडळी महाराजांच्या दर्शनास जावून त्यांनी लोकमान्य टिळक आपल्या दर्शनास येथे येणार आहेत असे त्यांस सांगितले तेव्हा चटकन श्रीगजानन महाराज म्हणाले, '' टिळक कसचा माझ्या दर्शनास इकडे येतो बाबा ! मलाच उठून त्याच्याकडे गेले पाहिजे.'' हे त्यांच्या तोंडचे उद्‌गार ऐकून सर्वांना फारच अचंबा वाटला. अकोला येथे तीन दिवस उत्सव झाला. शेवटच्या दिवशी सभेचे अध्यक्ष अर्थात श्रीमंत दादासाहेब खापर्डेच होणार होते. परंतू त्यावेळी अचानकपणे श्रीगजाननमहाराज सभास्थांनी अवर्तीर्ण झाल्याचे पाहून लोकमान्य म्हणाले, '' आपल्या सुदैवाने स्वत: श्रीगजानन महाराज आपण होवून आज येथे आले आहेत, तेव्हा आता अशा प्रसंगी अध्यक्षस्थानी विराजित होण्यास यांचेपेक्षा अधिक दुसरा कोण पात्र आहे?''

'' पुढे लोकमान्यांच्या विनंतीवरून अध्यक्षस्थानी महाराज विरजित झाले.सारांश वर सांगितल्याप्रमाणे श्रीगजानन महाराजांची वृत्ती लक्षात घेता ते आपण होवून येतात व लोकमान्यांच्या व्याख्यानाचे वेळी अध्यक्षस्थान अलंकृत करितम त्याअर्थी, श्रीसमर्थांनी म्हटल्याप्रमाणे 'अंतर स्थितीचिया खुणा ''अंतर्निष्ट जाणती'' हे यावरून सहज दिसून येते.''[८९]

३) धार्मिक म्हणून समजल्या जाणाऱ्या आचरणाच्या बाबतीत ते परंपरांचा आदर करत त्यासंबंधी <u>शिर्डीचे साईबाबा व लोकमान्य टिळक</u>

यांच्या एका प्रसंगासंबंधी आठवण लिहिताना, 'लोकमान्य टिळक चरित्र खंड ३', मध्ये न.चिं.केळकर असे लिहितात की, ''एकदा भाविक शिष्याला अशी इच्छा उत्पन्न झाली की साईबाबांचे उच्छित तीर्थ मंडळींना दयावे झाले ! तोच लोटा घेवून उष्टविलेल्या तोटीतून प्रत्येकाच्या हातावर आचमन घालण्याची सुरूवात झाली हे पाहताच टिळकांच्या डोळयांत संकट उभे राहिलेले दिसले. पण त्यांच्यांने तीर्थ नाही म्हणवेना व त्यांनी वाईट तोंड केलेले दिसू न देता आचमन प्राशन केले.

सत्पुरूष म्हणून मानलेल्या एका व्यक्तींच्या घरी आपण उठून गेलो, तेव्हा तेथे त्याचा अपमान होईल किंवा इतरांची भावना दुखविली जाईल असे आचरण आपण करू नये असा मनाचा कल.''

''तात्पर्य, धार्मिक म्हणून समजल्या जाणाऱ्या आचरणाच्या बाबतीत त्यांनी नित्यक्रमाविषयी स्वत:ला व्यक्तिस्वातंत्र हक्काने ठेवून घेतले होते तथापि दुसऱ्याचा हक्कही ते तितक्याच प्रांजलपणाने मानीत.''[९०]

४) कोणताही प्रसंग असो, त्याचा लोकजागृतीकडे उपयोग कसा करता येईल इकडे लोकमान्यांची भूमिका दिसून येते. यासंबंधी आठवण सांगताना रामचंद्र विनायक पटवर्धन असे म्हणतात की, ''श्रीगणेशोत्सवासंबधाने एकदा वाद निघाला. धार्मिक उत्सवात राजकीय परिस्थितीसंबधाने चर्चा व टिका करणे बरे नव्हे असा एक मुद्दा निघाला. लोकमान्य म्हणाले, तुम्ही चुकता. सरकार काय करते ते पाहा कोणतीही बाब असो, शिक्षणाची असो, आरोग्याची असो किंवा धर्माची असो त्यांचे खरे लक्ष एकाच गोष्टींकडे आणि ती ही की आपला अंमल येथे कायम कसा राहिला आणि आपला हुकुम बिनतक्रार कसा अमलांत येईल म्हणून आम्ही त्यांचेच अनुकरण करणार, कोणताही प्रसंग असो त्याचा उपयोग लोक जागृतीकडे कसा करता येईल इकडेच आम्ही पाहणार नाही तर सरकार आमच्या वर हा हा म्हणता मात करील.''[९१]

हिंदूधर्माचे वैभव इतरांपुढे प्रगट करणे व इतर धर्मियांचे हल्ले परतवने ही गोष्ट, लोकमान्य टिळक व केसरीने केलेली दिसून येते. यासंबंधी न.चि. केळकर लोकमान्य टिळक चरित्र खंड ३ मध्ये असे लिहितात की, ''टिळक व धर्मगुरूंची पीठे यांचा संबंध एकदंरीने पाहता मोठया गुंतागुंतीचा होता. एका बाजूने या पीठांना ही गोष्ट स्पष्टपणे दिसून येत होता की, सनातन धर्माचा अभिमान धरून त्याचा पुरस्कार करणे या बाबतीत टिळक व केसरी यांची मदत सर्वश्रेष्ठ आहे इतर धर्माचे हल्ले परतविणे व हिंदुधर्माचे वैरभाव इतरांपुढे प्रगट करणे ही गोष्ट टिळक जितक्या विव्दत्तेने व व्रीवतेने करितात तितके इतर कोणीही करीत नाही.''[९२]

लोकजागृती करण्याविषयी लोकमान्यांची भूमिका होती, असे ह.भ.प. साखरेबुवा यांच्या आठवणीवरून आढळून येते. साखरेबुवा आपली आठवण सांगतांनां असे लिहितात की, ''अध्यात्मिक ग्रंथ लेखनाबरोबरच धार्मिक विषयावर स्वदेशांचे कल्याण करण्याविषयी लोकांत जागृती उत्पन्न होईल अशी व्याख्याने देण्यास सुरूवात करा'' असे टिळकांनी साखरेबुवांना सुचविले. साखरेबुवांनी ते नाकारून उलट टिळकांनाही केवळ अध्यात्मज्ञान प्रसाराचा मार्ग पत्करण्याचा उपदेश केला.''[९३]

लोकमान्य टिळकांचे ध्येय राष्ट्रसंवर्धन होते हे बाबू अरविंद घोषांच्या आठवणीवरून दिसून येते. आपली आठवण सांगतांनां ते असे लिहितात की, '' हिंदी राष्ट्राचे पुनरूज्जीवन करणे त्याला त्याच्या गतकालाप्रमाणेच किंबहूना शक्य असल्यास जास्तच वैभवशाली व उज्वल करणे हा टिळकांचा जिवनोद्देश होता व तेवढयांकरीतां त्यांनी नुसती राजकीय जागृतिच करावयाची नसून, सुप्तावस्थेंत असलेल्या राष्ट्राच्या आत्माला खडबडून जागे करावयाचे होते. टिळकांनी आपल्या आयुष्यात जे जे उदयोग केले त्यांचा साक्षात अथवा परंपरेने या राष्ट्रसंवर्धानाकडेच संबंध पोचतो.'' [९४]

लोकमान्य टिळक पौर्वात्य विदयेस महत्व देत असत आपल्या अपूर्व ज्ञानाची जाणीव करून देवून लोकांत स्वाभीमान उत्पन्न करण्याची जबाबदारी ही नवीन पिढीची आहे. अशी भूमिका लोकमान्य टिळकांची होती या संदर्भात गणपत अंबादास जोशी आपली आठवण सांगताना असे म्हणतात की,‘‘तुम्ही संस्कृत विद्यालयांत शिकता हे ऐकून मला फार आनंद झाला केवळ इंग्रजी शिक्षण घेवून पौर्वात्य विद्येस नावे ठेवणाऱ्या सुशिक्षितांच्या डोळयांत अंजन घालून व त्यांना आपल्या ऋषिंच्या अपूर्व ज्ञानाची जाणीव करून देवून त्यांच्यांत स्वाभीमान उत्पनन करायाची जबाबदारी तुमच्यावर आहे हे लक्षात ठेवून अभ्यास करा. तुम्ही भावी समाजाचे वसिष्ठ नामदेव झाले पाहिजे. जुन्या शास्त्रीपंडिताप्रमाणे एकांगी शिक्षण घेवू नका. पुढच्या काळात समाजास तुमचा फार उपयोग होईल व ज्यावेळी जुन्या विद्येची आवश्यकता भासेल, तेव्हा ती विद्या शिकलेले लोक दुर्मिळ होतील. लवकरच लोकांत जागृती होईल, जेव्हा धार्मिक शिक्षणाच्या शाळा निघून त्या विषयास फार महत्व येईल. तेव्हा तुमचे फार महत्व वाटेल आमच्या कार्याचे खरे आधारस्तंभ विद्यालयांत पूर्व विद्येचे शिक्षण घेतलेले लोकच होत.’’[९५]

लोकमान्य टिळकांच्या चळवळीविषयी व कार्याविषयी व्हॅ.चिरोल आपले अखेरचे मत व्यक्त करतानां असे लिहितात की, ‘‘ ते उदयाला येण्याचे सुमारास रानडे, चंदावरकर, भांडारकर वगैरे प्रागतिकांनी काढलेल्या प्रार्थना समाजाचे बस्तान बरेच बसले होते. पण टिळकांच्या दृष्टिने असले लोक सरकारच्या भोवती गोंडा घोळणारे व इंग्रजी राज्याचे गुलाम होते. इंग्रजी राज्यावर हल्ला करण्यापूर्वी प्रथम या लोकांना चिरडून टाकले पाहिजे असे टिळकांना वाटे म्हणून त्यांच्या विरूध्द आपल्या वक्तृत्वाचा पहिला सपाटा टिळकांनी सुरू केला. १७ व्या शतकातील आमच्या रांउंडहेड लोकाप्रमाणे टिळकांच्या भाषणात धार्मिक विचार व कल्पना यांची रेलचेल

असे. वर्तमानपत्रे व सभा यातून टिळकांची गर्जना चालू होती आणि अनुयांयांच्या प्रचंड संख्येने व त्यांच्या धाकाने ते प्रतिपक्षाला दडपून व तुडवून टाकीत. संमतीविषयाच्या बिलाविरूध्द पुराणमतवादी लोकांचे मुख्य पुढारी म्हणून त्यांनी मोहीम केली. सरकारने धर्मात नव्या कायदयाने हात घातल्याने लोकांचे पारलौकिक अकल्याण होईल असे म्हणून टिळकांनी सरकारचा व्रीव निषेध केला या त्यांच्या विचारसरणीने ब्राम्हणांप्रमाणे, ब्राम्हणेतर देखील टिळकांना वश झाले. सरकारने कायदेमंडळात हे बील मंजुर केले, पण तो विजय नसून पराभव ठरला, कारण राष्ट्रात इतकी खळबळ झाली ही पुन्हा असे न करण्याविषयी सरकारने कानाला खडा लावून घेतला. मराठे जातीच्या चालीरिती व भावना यांची त्यांना पूर्ण ओळख होती आणि स्वत: श्रेष्ठ वर्णाचे म्हणून त्यांना गणपती उत्सवासारख्या प्रसंगातून व शिवाजी उत्सवातून मुसलमान व इंग्रज सरकार यांचे विरूध्द भावना जागृत करीता आल्या. युरोपातील राजकीय चळवळीचा अभ्यास करून त्यापासून बोध घेणे, त्यांचा उपयोग हिंदी राजकारणांत करणे ही गोष्ट टिळकांनीच प्रथम केली. १८९६ साली त्यांनी दुष्काळांच्या प्रसंगी शेतकऱ्यांना हाती धरून चळवळ केली ती आयर्लंडमधील लँडलीगच्या चळवळी वरूनच सुचलेली होती.''[९६]

आपल्या,'लोकमान्य ते महात्मा',या ग्रंथाच्या पहिल्या खंडात सदानंद मोरे स्वराज्याच्या चळवळीचा धर्माशी संबंध याविषयी असे लिहितात की, ''स्वराज्याच्या चळवळीचा धर्माशी संबंध जोडणे गोखल्यांना योग्य वाटत नव्हते. टिळकांनी तो लावला. बंगालमध्ये शाक्तग्रंथ, अवशिष्ट होता व कालीची पूजाही प्रचलित होती. काली जशी हिंसेची रूधिराद्रिय देवता. मवाळ मंडळींनी बंगालच्या कालीपूजेबद्दल नाक मुरडायला सुरूवात केली. तेव्हा कलकत्ताच्या सभेत टिळकांनी 'कालीच आमच्या शिवाजी

महाराजांची स्फुर्तिदायी वरदायिनी देवता होती. असे सांगून बंगाल व महाराष्ट्राचा संबंध अधिक दृढ केला.[१७]

लोकमान्य टिळकांचे तत्कालीन राजकारणातील महत्व जसे भारतीयांनी मान्य केले होते. तसेच तत्कालीन ब्रिटीश राजनितीतज्ञ यांनीही केलेले आढळून येते.

(संदर्भ परिशिष्ट क्र. ८ व ९ पृ. क्र. २५७ ते २७०)

लोकमान्य टिळकांच्या सांस्कृतिक व राजकीय कार्याविषयी अनेक समकालिकांनी आपल्या आठवणी लिहून ठेवल्या आहेत. याबाबत भट्ट्, विद्याभूषण तांबेशास्त्री असे म्हणतात,'' पुण्यांत माझ्या व्याख्यांनास लोकमान्य हजर होते, ते म्हणाले तुम्ही नोकरी न करता प्रवचाना धंदा करा, असा सल्ला दिला व्याख्यानांपेक्षा कीर्तन पुराणांनी समाजावर टिकावू परिणाम होतो. यास्तव धर्म व राजकारण यांचे ज्ञान असेलेल उत्कृष्ट प्रवचनकार निर्माण झाले पाहिजेत. असे ते म्हणाले मला 'प्रवचन' हा शब्द त्या वेळी नवीनच ऐकण्यास मिळाला मी 'प्रवचन' याचा अर्थ काय? असे त्यांस विचारले लोकमान्यांची समजूत करून दिली व तेथापासून मी प्रवचनास सुरूवात केली. महाराष्ट्रात मला पहिला 'प्रवचनकार' होण्याचा केवळ लोकमान्यांमुळे योग आला असे मी समजतो.''[१८]

लोकमान्य टिळक तत्कालीन विविध कलांना उत्तेजन देतांनां दिसतात. त्यांच्यां या विचारांविषयी नारायण श्रीपाद राजहंस उर्फ बालगंधर्व आपली आठवण सांगतांना असे सांगतात की, ''लोकमान्य मंडालेहून सुटून आल्यावर आम्ही नुकताच बसविलेला विद्याहरण नाटकाचा प्रयोग पाहण्यांस पुणे येथे एका रविवारी त्यांस बोलविले होते. लोकमान्यांस नाटकाची अगर गायनाची विशेष हौस नसतांहि व त्यावेळी कामाच्या गर्दीमुळे त्यास बिलकुल फुरसत नसतांहि, ज्याच्या त्याच्या उदयोगास उत्तेजन देण्याच्या त्यांच्या स्वभावास अनुसरून त्यांनी आमचे आमंत्रण मान्य केले व कबूल

केल्याप्रमाणे ते ठराविक वेळी नाटयगृहांत आले लोकमान्य म्हणाले, आमच्या कृष्णाजीपंतांनी अशीच नाटके लिहिली तर हल्लीच्या परिस्थितीला त्यांचा विशेष उपयोग होणार आहे.''[९९]

लोकमान्य टिळकांच्या या सांस्कृतिक कार्याविषयी सदानंद मोरे 'लोकमान्य ते महात्मा' या आपल्या ग्रंथांत असे लिहितात,''नाटक ही अशीच एक लोकसंस्था, संगीत, कीर्तन इत्यादींचा समावेश लोकसंस्थामध्ये होतो. अशा संस्था हाताशी असल्या म्हणजे लोकांपर्यंत पोहोचायला मदत होते.

रंगभुमीचा लोकमानसावर प्रभाव लक्षात घेवून तिचा उपयोग राजकीय जागृतीसाठी करता येईल, आपल्या सामाजिक, धार्मिक, मतांच्या प्रचारासाठी करता येईल ही जाणीव टिळकांना झाली.''

'' नारायण राजहंस या लहान मुलांचे मधुर गायन ऐकून टिळक सहजगत्या हा 'बालगंधर्वच आहे' असे म्हणाले, मुलाला त्याच्या पालकांनी किर्लोस्कर कंपनीत दाखल करावे, अशी भीड स्वत: टिळकांनी घातली त्याचे काही नुकसान झाल्यास ते भरून देण्यांची हमीही त्यांनी घेतली.[१००]

लोकमान्य टिळकांच्या नाटक, संगित, व लोकसंग्रह इत्यादी संबंधाबाबत या घटकांच्या संबंध लोकमान्यांच्या लेखी स्वातंत्र्यचळवळीचा भाग होता असे दिसून येते. असा उल्लेख सदानंद मोरेंच्यां ग्रंथातुन दिसुन येतो. लोकमान्यांच्यां विचारांच्या मागोवा घेता सदानंद मोरे असे लिहितात की,''टिळकांनी नाटके पाहिली. ते नाटकवाल्यांत मिसळले ते करमणुकीसाठी नव्हे तो त्यांच्या लेखी स्वातंत्र्याच्या चळवळीचा एक भाग होता व त्यात ते यशस्वी झाले एरवी त्यांनां नाटकातले फारसे कळतही नव्हते.

शास्त्रीय संगीताची टिळकांनां रूची होती का? नाही. हा सारा खटाटोप लोकांसाठी. या प्रकारास कृष्णाने गीतेत दिलेले नाव लोकसंग्रह.

लोकांसाठी काही गोष्टी करायच्या असतात. आपल्याला न पटल्या, न आवडल्या, तरी करायच्या असतात. परत त्या आवडल्या असे भासवायचे असते ही एक भूमिकाच असते. एक अभिनयच असतो. टिळकांनी तो जन्मभर केला.''[१०१]

लोकमान्य टिळकांनी  विशद केलेला जिवितध्येय व राजकारणाचा संबंध ग.वि.केतकरांनी सहयाद्री लोकमान्य टिळक १९३५ च्या विशेषांकांत केलेले दिसून येतो. टिळक म्हणतात, '' वेदांताचे ध्येय वरचे असले तरी त्यांतच राष्ट्रीयत्वाच्या खालच्या ध्येयाचा अंतर्भाव अपरिहार्यतेने होतो. त्या दोहोंचा विरोध नाही, मात्र त्यांचा समन्वय कसा करावयाचा, हे समजले असले पाहिजे. हजारामध्ये जशी पाचशे ही संख्या येतेच येते, त्याप्रमाणे एकांत दुसऱ्याचा अंतर्भाव होतो. दोन्ही एकमेकांशी जुळती आहेत व दोहोंसाठी एक प्रकारचा स्वार्थत्याग व आत्मसंयम लागतो. त्याखेरीज ज्या भावनेमुळे मनुष्य व्यक्तिस्वार्थासाठी बिलकुल संबंध नसलेल्या गोष्टीसाठी झटतो व व्यक्तिस्वार्थाला गौणत्व देतो ही भावना देखील दोन्हीं ध्येयांना आवश्यकता आहे. मनुष्याजातीवर दया व परमेश्वरापुढे सर्व मानव समान आहेत ही बुध्दी या स्वरूपाने ही परोपकारी भावना वेदान्ती व राष्ट्रीय अशा दोन्ही जीवित ध्येयांना व्यापून असते.''[१०२]

टिळकांच्या राजकीय कार्याचे समलोचन, सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीचे एक 'असोशिएट जे.एच.सी.ई झॅकेरियस यांनी 'रेनेसंट इंडिया' या नावाचे पुस्तक नुकतेच प्रसिध्द केले आहे. त्यात त्यांनी टिळकांच्या राजकीय विचारांचे व कार्याचे थोडे समालोचन केले आहे. त्याचा सारांश एकत्र खाली दिला आहे. ''राजकारणाला टिळक नेहमी अगदी पहिले स्थान देत असत.सामाजिक सुधारणा अप्रिय होत आहे, असे आढळताच त्यांनी ती दूर झुगारून दिली, मात्र लोकांच्या धार्मिक उत्साहाचा ते राजकारणाकडे उपयोग करून घेत. १८९६ साली निसर्गाने दुष्काळ व प्लेग यांच्या योगाने

त्यांना चांगलीच संधी आणून दिली. मि. ब्लंट यांनी दहा वर्षापूर्वीच लिहून ठेवले होते की, Agrictural distress is the major premise of revolution in india and political education unacompanied by political power its minor premise. टिळकांनी प्रथम या सिध्दांताप्रमाणे धोरण आखले. आयरिश लँड लीगचे अस्तित्व, कार्यपध्दती व ध्येय यांची त्यांस माहिती असल्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांत करबंदीच्या चळवळीची संघटना केली ते मोठे देशभक्त होते या गोष्टीस प्राधान्य न देणे चुकीचे व दिशाभूल करणारे होईल. राणीच्या ज्युबिलिच्या वेळी खुन झाले, टिळक खुनास अनुकूल होते असे म्हणण्यास केव्हाही पुरावा सापडला नाही, पण सरकारी अधिकारी घाबरून गेले विस्तृत असा एखादा कट आहे असा त्यांस संशय आला. १८५७ च्या पुढारी नानासाहेब चित्पावन, टिळकही चित्पावन नविन बंडाची ती तयारीच नव्हे काय? झाले जोरकस धोरण आखण्यांत आले व टिळकांना पकडून १८ महिन्यांची शिक्षा देण्यात आली. [१०३]

लोकमान्य टिळकांच्या सांस्कृतिक व राजकीय कार्याविषयी अनेक समकालीकांनी आपल्या त्यांच्या बद्दलच्या आठवणी लिहून ठेवलेल्या आहेत.त्यावरून लोकमान्य टिळकांची राजकीय चळवळ व तिचा असणारा सांस्कृतिक अनुबंध दिसून येतो.

लोकमान्य टिळकांनी सांस्कृतिक, राजकीय, वैचारिक व्यक्ती व संस्थांशी संबंध जोडले होते, त्याचा उपयोग त्यांना त्यांच्यां राजकीय वाटचालीत झालेला दिसून येतो.(संदर्भ परिशिष्ट क्र.१० पृ. क्र.२७१ ते २९०).

१९ व्या व २० व्या शतकातील सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय विचार प्रवाहात लोकमान्य टिळकांनी तत्कालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपली राजकीय चळवळ चालविताना तत्कालीन, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परिस्थितीचा आपल्या राजकीय चळवळीसाठी उपयोग करून

घेतला असे दिसून येते. या राजकीय व सांस्कृतिक चळवळीचे स्वातंत्र्य आंदोलनात फार मोठे योगदान झालेले दिसून येते.

१९ व्या, २० व्या शतकातील सामाजिक सांस्कृतिक व राजकीय विचारप्रवाहात लोकमान्य टिळकांनी तत्कालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपली राजकीय चळवळ चालविताना तत्कालीन सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परिस्थितीचा आपल्या राजकीय चळवळीसाठी उपयोग करून घेतला असे दिसते. याबाबत प्रकाशित, अप्रकाशित साधनांमध्ये त्याबाबतची माहिती मिळते.

लोकमान्य टिळकांच्या सांस्कृतिक, राजकीय व वैचारिक जडणघडणींमध्ये त्यांच्या पूर्वसूरींचां व समकालीन विचारवंतांचा प्रभाव असल्याचे आढळून येते.

## सारांश

- लोकमान्य टिळकांच्या जीवनाचा पहिला कालखंड महाराष्ट्राच्या दृष्टिने नवनवीन कल्पना व कार्य यासाठी करावयाच्या प्रगतीचा दिसून येतो. दुसऱ्या कालखंडात त्यांनी समाजाची राजकीय मनोवृत्ती जागृत केलेली दिसून येते. टिळकांच्या जीवनातील तिसरा महत्वाचा कालखंड स्वदेशी चळवळीचा प्रामुख्याने दिसून येतो.
- लोकमान्यांच्या जीवितकार्याचे अधिभौतिकदृष्टा सार काढले तर ते जनतेला आर्थिक निष्पीडनांतून मुक्त करण्याची व प्रत्येक हिंदवासियाला पोटभर अन्न मिळवून देण्याची खटपट होय असे आढळून येते.
- लोकमान्य टिळकांना भगवदगीतेतील,'मासांना मार्गशीर्षहम या वचनाचा अर्थ गुढ वाटून त्यांनी त्यावर संशोधन करून 'वेदकालनिर्णय' (ओरायण) हा ग्रंथ लिहिला. ' अक्टिर्क होम इन द वेदाज या ग्रंथाव्दारे टिळकांनी आर्य संस्कृतीचा जन्म प्राचीनतम वेदकालापूर्वी कित्येक वर्ष झाला असे मानायला हरकत नाही असा सिध्दांत त्यांनी प्रस्थापित केला.
- गीतारहस्यांमध्ये कर्तुत्वशाली जीवनाचे हिंदू तत्वज्ञान लोकमान्यांनी विशद केलेले दिसून येते. टिळकांनी 'गीतारहस्यांत' भारतीय नितीशास्त्राचा विचार करून भारताच्या राष्ट्रीय पुनरूत्थानासाठी कर्मयोगाचे तत्वज्ञान त्यांनी विशद केले व साऱ्या मानवजातीच्या महत्वाच्या प्रश्नांचा विचार या ग्रंथात त्यांनी केलेला दिसून येतो.
- लोकमान्य टिळकांनी आपल्या कार्याची दिशा राजकीय दिशा निश्चित केली. त्यासाठी त्यांनी राजकीय चळवळ करावयाची असा निर्धार त्यांनी केलेला दिसून येतो.

- टिळकांनी जुन्या समाजरचनेतील शक्तीचे पुनरूज्जीवन करून आधुनिक जीवनास अनुरूप अशा संस्था व चळवळी यांची जुळणी केली. शिवाजी उत्सव व गणपती उत्सव त्यांनी सुरू केला.
- छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे श्रध्दास्थान असून ते अक्षय स्फुर्तिस्थान रहावे व त्यांच्या उत्सवातून स्वराज्याची आकांक्षा जोपासावी हा टिळकांचा त्यापाठीमागचा हेतू दिसून येतो.
- गणपती उत्सवाला टिळकांनी एक सार्वजनिक स्वरूप देवून लोकशिक्षण व लोकजागृती करावी व त्याबरोबर या दहा दिवसात विद्यार्थ्यांना संस्कार होईल असे शिक्षण मिळावे, जनतेचे प्रबोधन व्हावे व लोक संघटित व्हावेत, लोकांत स्वसंस्कृती, स्वधर्म अभिमान उत्पन्न व्हावा, त्यांच्यात स्वराज्याची आकांक्षा जागृत होवून लोक निर्भय स्वावलंबी व्हावेत असा देखील विचार हे राष्ट्रीय महोत्सव सुरू करण्यामागे त्यांचा दिसून येतो.
- लोकमान्य टिळकांनी बुध्दीची अधिष्ठात्री देवता गणपती हिला सार्वजनिक अधिष्ठान देवून समाजातील शक्तीच्या झाऱ्यांना वाट मोकळी करून दिली व त्यामुळे लोकांचे समाजजीवन बहरून गेले असे दिसून येते. मेळे, संगीत, नाटक, किर्तन, प्रवचन, भजन, उत्सव इत्यादीमुळे स्वातंत्र्य चळवळ संगीतमय झालेली दिसून येते. मेळयांमुळे राष्ट्रभक्ती वाढीस लागून समाजातील सुप्त गुणांना वाव मिळून गायनात थोर परंपरा निर्माण झाली यात शंकाच नाही असे दिसून येते.
- १८९६च्या दुष्काळाच्या वेळी टिळकांनी शेतकऱ्यांना संघटित करून सरकारने आपले कर्तव्य केले पाहिजे, यासाठी प्रचंड चळवळ उभी केली. ती कायदयाच्या चौकटीत राहून केली. त्यासाठी त्यांनी सरकारवर जनमताचे दडपण आणले त्यामुळे कायदयाचे पालन करावयाचे ही त्यांची भूमिका दिसून येते.

- स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सुत्रीव्दारे त्यांनी असंख्य कार्यक्रमातुन लोकांना स्वराज्य साधनेत वाव मिळवून दिला व राजकीय चळवळ सतत कार्यरत ठेवली. कायदयाच्या चौकटीत राहून त्यांनी लोकांना बंडखोरीचा कार्यक्रम दिला व टिळकांनी स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या विधायक मार्गाने जनशक्तीचा अविष्कार देशभर घडवून आणला यात शंकाच नाही असे दिसून येते.
- लोकमान्यांनी गणपती उत्सव, शिवाजी उत्सव, शेतकरी चळवळ, चतु:सुत्री, होमरूल चळवळ इत्यादी चळवळ करून समाज सुसंघटित केला व या शक्तीचा वापर त्यांनी स्वातंत्र्य लढयात स्वराज्य स्थापनेच्या कामी केलेला दिसून येतो. लोकमान्यांच्या लोकशाहीवरील श्रध्देस आध्यात्मिक अधिष्ठान होते असे उपलब्ध साधनावरून दिसून येते.
- लोकमान्यांनी किर्तन हे प्रबोधनाचे एक उत्तम साधन आहे हे ओळखून त्यांनी गणेशोत्सवात 'राष्ट्रीय किर्तन' हा नवा प्रवाह सुरू करून त्यांनी अनेकांना प्रवृत्त केलेले दिसून येते.
- लोकमान्य टिळकांनी केसरीच्या माध्यमातून धर्मविषयक, संस्कृतीविषयक, राष्ट्रीयशिक्षणविषयक, स्वराज्य, स्वदेशी व बहिष्कारविषयक लोकजागृती व लोकशिक्षणाचे कार्य केले.त्याचबरोबर आपल्या राजकीय विचारांच्या प्रचार व प्रसाराचे कार्य केसरीच्या माध्यमातून उभे केलेले दिसून येते.
- लोकमान्य टिळकांनी राजकीय विचार लोकापर्यंत नेण्यासाठी यात्रा, उत्सव व सत्पुरूष यांचाही उपयोग करून घेतला. त्यामुळे लोकमान्य टिळकांच्या कार्याला राजकारणाबरोबरच धर्म कार्याचे ही स्वरूप प्राप्त झाल्याचे दिसून येते. किर्तन, प्रवचन, भाषणे, व्याख्याने या माध्यमातून राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी, बहिष्कार या राजकीय विचारांच्या प्रचार व

प्रसार करण्यासाठी अनेक किर्तनकार, प्रवचनकारांना त्यांनी प्रोत्साहित केले.

- कोणताही प्रसंग असो त्याचा 'लोकजागृतीकडे' उपयोग कसा करता येईल, इकडे लोकमान्यांची भूमिका दिसून येते, हे रामचंद्र विनायक पटवर्धन यांच्या आठवणीवरून स्पष्ट होते.
- हिंदी राष्ट्राचे पुनरूज्जीवन करणे त्याला त्याच्या गतकालाप्रमाणेच किंबहुना शक्य असल्यास जास्तच वैभवशाली व उज्वल करणे हा टिळकांचा जिवनोददेश होता व तेवढयाकरिता त्यांनी नुसती राजकीय जागृती करावयाची नसून सुप्तावस्थेत असलेल्या राष्ट्राच्या आत्माला खडबडून जागे करावयाचे होते, असे बाबू अरविंद घोषांच्या लिखानावरून दिसून येते.
- युरोपातील राजकीय चळवळीचा अभ्यास करून त्यापासून बोध घेणे, त्यांचा उपयोग हिंदी राजकारणांत करणे ही गोष्ट टिळकांनीच प्रथम केली. १८९६ साली त्यांनी दुष्काळाच्या प्रंसगी शेतकऱ्यांना हाती धरून चळवळ केली ती आयर्लंडमधील लँडलीगच्या चळवळीवरूनच सुचलेली होती असे व्हॅलेटाईन चिरोलने त्यांच्यां कार्याविषयी मत होते असे दिसून येते.
- लोकमान्य टिळकांचे तत्कालीन राजकारणातील महत्व जसे भारतीयांनी मान्य केले होते. तसेच तत्कालीन ब्रिटीश राजनितियज्ञ यांनीही केलेले होते. हे त्यांच्या विविध आठवणीवरून दिसून येते.
- लोकमान्य टिळकांच्या सांस्कृतिक व राजकीय कार्याविषयी अनेक समकालीनांनी आपल्या त्याच्यांबाबतच्या आठवणी लिहून ठेवल्या आहेत त्यावरून लोकमान्य टिळकांची राजकीय चळवळ व तिचा असणारा सांस्कृतिक अनुबंध दिसून येतो.

- किर्तन, नाटक, संगित हा लोकमान्यांच्या लेखी स्वातंत्र्य चळवळीच्याच एक भाग होता असे दिसून येते.
- १९ व्या व २० व्या शतकातील सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय विचार प्रवाहात लोकमान्य टिळकांनी तत्कालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमिवर आपली राजकीय चळवळ चालविताना तत्कालीन सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परिस्थितीचा आपल्या राजकीय चळवळीसाठी उपयोग करून घेतला असे दिसून येते या राजकीय व सांस्कृतिक चळवळीचे स्वातंत्र्य आंदोलनात फार मोठे योगदान झालेले दिसून येते.

## संदर्भसूची


१) श्री.अरविंद, बाळगंगाधर टिळक, संजीवन कार्यालय, श्रीअरविंदआश्रम, पांडीचेरी १९१८, पृ. १४.

२) कित्ता, पृ. २८ व २९.

३) गोखले. दा.वि., टिळकांनी प्रणीत केलेली स्वराज्याची साधने, सहयाद्री, लोकमान्य टिळक विशेषांक, केसरी प्रेस, पुणे, वर्ष १ ले, अंक ८ वा, ऑ. १९३५, पृ. ७४८.

४) भट. आ.रा., लोकमान्य टिळकांची अर्थिक विचारसरणी, सहयाद्री, लोकमान्य टिळक विशेषांक, केसरी प्रेस, पुणे, वर्ष १ ले, अंक ८ वा, ऑ. १९३५, पृ.७७१.

५) जोग.ना.गो., लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, प्रकाशन विभाग, दिल्ली, १९७२, पृ. २२५, २२६.

६) प्रधान ग.प्र.,लोकमान्य टिळक व्यक्ती आणि कार्य, केसरी प्रकाशन, पुणे, १९७१, पृ. ३०,३३.

७) कित्ता, पृ. ३२ व ३३.

८) केतकर ग.वि.,लोकमान्य टिळकांचे ग्रंथकर्तृत्व, सहयाद्री, लोकमान्य टिळक विशेषांक, केसरी प्रेस, पुणे, वर्ष १ले, अंक ८ वा, ऑ. १९३५, पृ. ७०१.

९) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ. ३१.

१०) प्रधान ग.प्र., लोकमान्य टिळक, एन.बी.टी., दिल्ली, १९९१,पृ. ८१.

११) केळकर भा.कृ., टिळक विचार, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८१, पृ.२८९, २९०.

१२) कित्ता, पृ.२९१, २९२.

१३) टिळक बा.गं., 'श्रीमग्दभवग्दीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र, आवृत्ती चोविसावी, केसरी मुद्रणालय, २०११, पृ.क्र.१६.

14 ) vidwans M.D. (Edited by), Letters of Lokmanmya Tilak, Firist Edition, Kesari Prakashan, Pune, August 1966, P. 101.

१५) खापर्डे दादासाहेब, लोकमान्य टिळक यांच्या गीतारहस्याचे परीक्षण, चित्रमयजगत, vol 6, वर्ष ६ वे, अंक ८ वा, ऑगस्ट १९१५,पृ. ३६७.

१६) मोरे सदानंद, लोकमान्य ते महात्मा, खंड १,आवृत्ती पहिली, राजहंस प्रकाशन, पुणे, २६ जाने २००७, पृ. १६४.

१७) भोपटकर लक्ष्मण बळवंत, लोकसंग्रह, पुणे, अंक ४८ वा, १९२०, पृ. क्र.३.

१८) टिळक बा.गं, 'श्रीमग्दभवग्दीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र, आवृत्ती चोविसावी, केसरी मुद्रणालय, २०११, पृ.क्र.७.

१९) कित्ता, पृ.क्र.६.

२०) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, लेखसंग्रह, खंड १, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २० ऑगस्ट १९८२, पृ.क्र. ३१५.

२१) कित्ता, पृ.क्र.३१३.

२२) सोमण मा.पं., टिळकांच्या धार्मिक सुधारणेतील रहस्य, सहयाद्री, लोकमान्य टिळक विशेषांक, ऑगस्ट १९३५, पृ. ७३३.

२३) मोरे सदानंद, उपरोक्त, पृ.२२३.

२४) टिळक बा.गं.,विवेकवाणी अथवा गीतार्थकथा याबाबत लिहिलेले पत्र, तरूण भारत, सांगली, दिनांक २५ मे २०११, पृ.४.

२५) टिळक बा.गं.,विष्णुसहस्त्रनामांबाबत टिपण, टिळक संग्रहालय,पुणे, पृ. २,३.

२६) जोग ना.गो., लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, प्रकाशन विभाग, दिल्ली, १९७२, पृ.४७.

२७) करंदीकर ज.स.,गणेशोत्सवाची ६० वर्षे, केसरी प्रकाशन, पुणे, १९७२, पृ. ०९.

२८) कित्ता,पृ.क्र.९,२१,२२.

२९) करंदीकर ज.स.,गणेशोत्सवाची ६० वर्षे, केसरी प्रकाशन, पुणे, १९७२, पृ. क्र. ३०.

३०) दाते शं.रा.,गणेशोत्सवाचा व शिवाजी उत्सवाचा उद्‌देश, काळ प्रकाशन, काळ मुद्रणालय, पुणे, साप्ताहिक काळमधील जुलै १९७०, मधील लेखांच्या आधारे, पृ.११.

३१) टिळक ज.श्री. (संपा),समग्र टिळक, खंड ६ वा, केसरी प्रकाशन, पुणे, १९७६, पृ. ७८४, ७८५.

३२) केळकर न.चिं.,लोकमान्य टिळकांचे चरित्र, खंड २, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, ऑक्टो २०१२,पृ. ६४०.

३३) टिळक बा.गं.,उपरोक्त, पृ. ७९२, ७९३.

३४) घोरपडे चंद्रकांत, गणेशोत्सवाची १०० वर्षे, केसरी प्रकाशन, १ ऑगस्ट १९९२, पृ. ११.

३५) टिळक बा.गं.,उपरोक्त, पृ. ६५३.

३६) टिळक बा.गं.,उपरोक्त, पृ. ६१९.

३७) केळकर न.चिं.,उपरोक्त, पृ.२९५.

३८) टिळक बा.गं., उपरोक्त, पृ. ८९६.

३९) टिळक बा.गं., उपरोक्त, पृ. ६९४ ते ६९६.

४०) टिळक बा.गं.,सदयस्थिती, गायकवाडवाडा गणपतीपुढे व्याख्यान, मुमुक्षु, पुणे, वर्ष १ ले, अंक ३५ वा, २६ सप्टेंबर १९०७, पृ.२.

४१) कलिकिंकर, वर्ध्याचा गणेशोत्सव, मुमुक्षु, पुणे, १७ सप्टेंबर १९०८, पृ. क्र.२.

४२) रानडे कृ.त्र्यं.,हिंदुधर्माचे सध्याचे स्वरूप व सार्वजनिक गणपत्युत्सव, ज्ञानप्रकाश, पुणे, अंक २२८ वा, दि. २८ डिसेंबर १९०९, पृ. ५.

४३) टिळक बा.गं.,उपरोक्त, पृ.८४३.

४४) टिळक इंदू, ढवळे मृणालिनी, लोकमान्य टिळकांच्या आठवणी, केसरी प्रकाशन, पुणे, १ ऑगस्ट १९९२, पृ. २८७.

४५) टिळक बा.गं., सप्टेंबर १९१५च्या गणपत्युत्सवांतील आवाज, टिळक स्मारक ट्रस्ट, पुणे.

४६) दाते शं.रा.,गणेशोत्सव केसरीचे प्रतिपादन, केसरी प्रबोध, केसरी प्रकाशन, पुणे, १९३१, पृ.२१५.

४७) भिडे, रा.गो., लोकमान्य टिळक व हिंदू संघटन, संघटनेसाठी गणेशोत्सव, सहयाद्री, लोकमान्य टिळक विशेषांक, ऑगस्ट १९३५, पृ. ६८१ – ६८२.

४८) केळकर न.चिं., लोकमान्य टिळक चरित्र, खंड क्र.१, पुणे, १९२३, पृ.क्र.४२९,४३०,४३४.

४९) टिळक ज.श्री. (संपा), समग्र टिळक, खंड क्र. ६, केसरी प्रकाशन, १९७६, पृ.क्र.६८२.

५०) जावडेकर शं.द., आधुनिक भारत, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे, १९५५, पृ.क्र. २३९.

५१) टिळक बा.गं., उपरोक्त, पृ.क्र. ६८४.

५२) पुण्यातील श्री.शिवराय जन्मोत्सव, वार्तानिधी, पुणे, दि.२७ एप्रिल १८८९, पृ.क्र.२.

53) Tilak B.G., samagra Lokamanya Tilak, Vol 7, Towards Independence, Kesari Prakashan, Pune , 1975, P- 628.

५४) भिडे रा.गो., दुसरा राष्ट्रीय महोत्सव, शिवाजी महोत्सव, सहयाद्री, लोकमान्य टिळक विशेषांक, ऑ.१९३५, पृ. ६८३.

५५) टिळक बा.गं., उपरोक्त, पृ. ६८९.

५६) करंदीकर ज.स., गणेशोत्सवाची साठ वर्षे, केसरी प्रकाशन, पुणे, १९७२, पृ.३७८ ते ७९, ३९५ते३९६.

५७) कित्ता, पृ. ४६५, ४६७.

५८) करंदीकर ज.स., गणेशोत्सवाची साठ वर्षे, केसरी प्रकाशन, पुणे, १९७२,पृ. ४७७.

५९) कित्ता , पृ. ४८१.

६०) दाते. शं.रां., श्रीगणेशोत्सव, मेळे, केसरी प्रबोध, केसरी प्रकाशन, पुणे, १९३१, पृ.२१६.

६१) मोरे सदानंद, लोकमान्य ते महात्मा, खंड क्र. १ , राजहंस प्रकाशन, पुणे, २६ जाने २००७, पृ.क्र.६१.

६२) जोग. ना.गो., लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, प्रकाशन विभाग, दिल्ली, १९७२, पृ. ५८ ते ६१.

६३) टिळक ज.श्री. (संपा),समग्र टिळक, खंड क्र. ६, केसरी प्रकाशन, पुणे, १९७६, पृ.६२५.

६४) कित्ता , पृ.क्र. ६४४, ६४५.

६५) जोग ना.गो., उपरोक्त, पृ.१८९.

६६) प्रधान ग.प्र., लोकमान्य टिळक, एन.बी.टी., दिल्ली, १९९१, पृ.क्र.८७ ते ९०.

६७) खाडिलकर प्र.ह., राष्ट्रधर्मप्रर्वतक बाबू अरविंद घोष, चित्रमयजगत, सप्टेंबर १९२२, पृ.३२१.

६८) केळकर न.चिं., लोकमान्य टिळकांचे चरित्र, खंड क्र. २, रिया पब्लिकेशनस्, कोल्हापूर, ऑक्टोबर २०१२, पृ. २४९.

६९) कित्ता, पृ. २५५.

७०) गद्रे ना.बा.,स्वदेशीचा प्रचार, उंट छाप शाईने जग जिंकले, सहयाद्री, लोकमान्य टिळक विशेषांक, केसरी प्रेस, पुणे, वर्ष १ ले,अंक ८ वा, ऑ १९३५, पृ. ७४४.

७१) यंदाचे श्रीगणेशोत्सव, स्वदेशीची जाहिरात, चिमयजगत, सप्टेंबर १९२२, पृ. ३७१.

७२) पाटील सु.गो., गणेश व शिवजयंती उत्सवांचे राष्ट्रीय चळवळीतील योगदान, एम.फिल प्रबंध, टि.म.वि.,पुणे, डिसेंबर २०००, पृ.५६.

७३) टिळक ज.श्री. (संपा)., समग्र टिळक, खंड क्र. ६, केसरी प्रकाशन, पुणे, १९७६,पृ.क्र. ८२० ते ८२७.

७४) कित्ता, पृ.क्र. ३२४, ३२५.

७५) पाठक यशवंत, राष्ट्रीय कीर्तन : एक भावसंदर्भ, केसरी शताब्दी ग्रंथ, (वैचारिक संदर्भ आणि वाटचाल),केसरीचा इतिहास म्हणजे राष्ट्राचा ज्वलंत इतिहास, केसरी प्रकाशन, पुणे, ४ जाने १९८१, पृ. ५११.

७६) कित्ता, पृ. ५१४.

७७) मोरे सदानंद, लोकमान्य ते महात्मा, खंड क्र. १, राजहंस प्रकाशन, पुणे, २६ जाने २००७ , पृ.१७५.

७८) गोखले शरच्चंद्र, केसरीचे धर्मविषयक धोरण, टिळकांची धार्मिक कामगिरी, केसरी शताब्दी ग्रंथ, केसरीचा इतिहास म्हणजे राष्ट्राचा ज्वलंत इतिहास, केसरी प्रकाशन, पुणे, ४ जाने १९८१, पृ. ४६५.

७९) देसाई राजाराम, राष्ट्रीय शिक्षण, केसरी प्रबोध, केसरी महोत्सव मंडळ, समर्थ भारत छापखाना, पुणे, १९३१, पृ. १६८ ते १७०.

८०) सातवळेकर श्री.दा., केसरीची स्वराज्याची चतु:सुत्री, केसरी प्रबोध, केसरी महोत्सव मंडळ,समर्थ भारत छापखाना,पुणे,१९३१,पृ.६४ते ६७.

८१) कित्ता, पृ. ७१ ते ७२.

८२) घाटे विष्णुसखाराम, किर्तनकार कसा असावा, केसरीचे प्रतिपादन, कीर्तने व किर्तनकार केसरी प्रबोध, केसरी महोत्सव मंडळ, समर्थ भारत छापखाना, पुणे, १९३१, पृ. २६९ ते २७०.

८३) कित्ता, पृ. २७१ ते २७२.

८४) कित्ता, पृ. २७०.

८५) केळकर न.चिं., लोकमान्य टिळक यांचे चरित्र, खंड क्र. २, रिया पब्लिकेशनस, कोल्हापूर, ऑक्टोबर २०१२, पृ. २४८.

८६) टिळक ज.श्री. (संपा).,समग्र लोकमान्य टिळक, जीवनध्येय, खंड क्र. ६, केसरी प्रकाशन, पुणे, १९७६, पृ. ६३३.

८७) कित्ता , पृ.क्र. ४२४ ते ४३१.

८८) बापट स.वि., लोकमान्य टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका, खंड ३, प्रथमावृत्ती, जगाव्दितेच्छु प्रेस, पुणे, १९२६, पृ. २७२.

८९) बापट स.वि.,लोकमान्य टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका, खंड २, प्रथमावृत्ती, जगाव्दितेच्छु प्रेस, पुणे, १९२५, पृ. ४३१.

९०) केळकर न.चिं., लोकमान्य टिळक यांचे चरित्र, खंड ३ रा, १९१४ पासून १९२० पर्यंत, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, ऑक्टो २०१२, पृ. ६४५.

९१) बापट स.वि.,लोकमान्य टिळकांच्या आठवणी, केसरी प्रकाशन, पुणे, १ऑगस्ट १९९२, पृ. २८३.

९२) केळकर न.चिं., उपरोक्त, पृ.६४५,६४६.

९३) विव्दांस धो.वा., सहयाद्री, लोकमान्य टिळक विशेषांक, केसरी प्रेस, पुणे, वर्ष १ ले, अंक ८ वा, ऑगस्ट १९३५, पृ. ७०८.

९४) घोष अरविंद,लोकमान्य टिळकांचे ध्येय, राष्ट्रसंवर्धन, सहयाद्री, लोकमान्य टिळक विशेषांक, केसरी प्रेस, पुणे, वर्ष १ले,अंक ८ वा, ऑ.१९३५, पृ.७०९.

९५) बापट स.वि., खंड क्र.२, उपरोक्त, पृ.३६४.

९६) केळकर न.चिं., उपरोक्त पृ.३०४.

९७) मोरे सदानंद, लोकमान्य ते महात्मा, खंड १ला, राजहंस प्रकाशन, पुणे, २६ जाने २००७, पृ.३९.

९८) बापट स.वि., खंड क्र.३, उपरोक्त, पृ. ७३.

९९) बापट स.वि., लोकमान्य टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका, खंड क्र.२,प्रथमावृत्ती, जगाव्दितेच्छु प्रेस,पुणे,१९२५,पृ.क्र.४३०,४३१.

१००) मोरे सदानंद, लोकमान्य ते महात्मा, खंड १ला, राजहंस प्रकाशन, पुणे, २६ जाने २००७, पृ. १७०.

१०१) कित्ता, पृ. १७७.

१०२) केतकर ग.वि., लोकमान्य टिळकांनी विशद केलेला जिवित ध्येय व राजकारणाचा संबंध, सहयाद्री, लोकमान्य टिळक विशेषांक, केसरी प्रेस, पुणे, वर्ष १ले, अंक ८ वा, पृ.७०२.

१०३) विव्दांस धो.वा., (संपा.) झॅकेरियस व टिळक, सहयाद्री, लोकमान्य टिळक विशेषांक, केसरी प्रेस, पुणे, वर्ष १ ले, अंक ८वा, ऑ.१९३५, पृ.७३७.

## प्रकरण ५ वे

## लोकमान्य टिळकांच्या विचार व कार्यावरील प्रतिक्रिया

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात लोकांना स्वाभिमानी आणि आत्मविश्वासू आणि निर्भय बनविण्याचे महत्वाचे कार्य लोकमान्य टिळकांनी केले. स्वराज्य हा भारतीयांचा जन्मसिध्द हक्क आहे, ही जाणीव लोकांत निर्माण करण्यासाठी, राष्ट्रीय भावना जागृत करून ती प्रभावशाली करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. ब्रिटींशाकडून होणा-या अन्यायाविरूध्द केसरीतुन निर्भयपणे आवाज उठविला. छत्रपती शिवाजी महाराज या राष्ट्रपुरूषाचा उत्सव सुरू केला. भारतीयांनी इतिहासातील उज्वल कालखंडापासून व पराक्रमी व्यक्तीपासून प्रेरणा घेऊन उज्वल भविष्यकाल घडविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, अशी प्रेरणा दिली. दुष्काळात शेतक-यांना संघटित केले. बंगालच्या फळणीविरूध्दच्या लढयाला अखिल भारतीय स्वरूप देताना स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण या कार्यक्रमात लोकांना सहभागी करून घेऊन स्वराज्याच्या चळवळीस व्यापक स्वरूप दिले. सरकारच्या जुलमजबरदस्तीला लोकांनी प्रतिकार केला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

कारावासातही ज्ञानोपासना चालू ठेवून कर्मयोगाची शिकवण देणारा 'गीतारहस्य' हा ग्रंथ टिळकांनी लिहून, स्वधर्माचे खरे ओजस्वी स्वरूप जनतेला पटवून दिले. 'ओरायन' आणि 'आर्टिक होम इन वेदाज' हे ग्रंथ लिहून आपल्या संस्कृतीचे प्राचीनत्व आणि श्रेष्ठत्व जगाला पटवून देण्याचे काम त्यांनी केले व हिंदी राजकारणाला लोकशाहीचे वळण त्यांनी लावले व लोकपक्षातर्फे नोकरशाहींशीं सतत सामना चालू ठेवला.

लोकमान्य टिळकांनी एकूण आपल्या आयुष्यात समाजकारण व राजकारण करताना धर्म या संकल्पनेचा व त्यांच्याशी निगडीत असलेल्या

विविध घटकांचा आधार आपल्या राजकारणाच्या हेतूपूर्तीसाठी/उद्देश पुर्तीसाठी करून घेतला होता असे दिसते. राष्ट्रीयभावना जागृत करण्यासाठी त्यांनी गणशोत्सव व शिवजयंती उत्सव चालू केला. गणेशोत्सवातून त्यांनी स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण ही चतु:सूत्री त्यांनी मांडली असे त्यांनी दिलेल्या व्याख्यानातून आपल्याला दिसून येते.

लोकमान्य टिळकांचे लेखन, त्यांचे विचार व कार्य याबाबत अनेक देशी व परदेशी विचारवंतानी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केलेल्या आहेत. त्यात गोपाळकृष्ण गोखले, गोपाळराव आगरकर, महात्मा गांधी, योगी अरविंदबाबु, टिळकांचे भाचे महादेव धोंडो विद्वांस, नागपुरचे श्रीयुत धुडिराजपंत ठेंगडी, तत्कालीन लोकमान्य मुंबई पत्राचे माजी संपादक रामचंद्र नारायण मंडलिक हे समकालीन, त्याचबरोबर नंतरचे यामध्ये डॉ राधाकृष्णन, श्रीनिवास बनहट्टी, गणेश आळतेकर, प्रभाकर बापट, रघुनाथ वैशंपायन यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. तर विदयमान लेखकांमध्ये ग. प्र. प्रधान, सदानंद मोरे, राम शेवाळकर इ. प्रतिक्रया व्यक्त केल्या आहेत.परदेशी विचारवंत/लेखकांत तत्कालिन एम. एस. एडवर्डस (पो. कमिशनर मुंबई), अहमदनगरचे डिस्ट्रीक्ट मॅझिस्ट्रेट, नाशिक जिल्हा पोलिस अधिक्षक व सर वेलेनटाईन चिरोल यांनी टिळकांच्या विचार व कार्याविषयी प्रतिक्रया व्यक्त केल्या आहेत.

१) समकालीनांच्या प्रतिक्रीया

२) त्यानंतरच्या विद्वानांच्या प्रतिक्रीया

**<u>लोकमान्य टिळकांच्या कार्यावरील प्रतिक्रिया</u> —**

१) समकालीन विचारवंत व लेखक

अ) परदेशी — परकियांच्या प्रतिक्रिया

२) विदयमान विचारवंत

ब) देशी विचारवंताच्या प्रतिक्रिया

**<u>अ) परदेशी विचारवंत</u>**

अ) परदेशी समकालीन लेखक/विचारवंतांच्या प्रतिक्रिया —

१) सर व्हेलेनटाइन चिरोल

२)एम. एस एडवर्डस,पोलिस कमिशनर मुंबई (१९०९— १९१६)

३) डिस्ट्रीक्ट मॅझिस्ट्रेट — १८९६ अहमदनगर

४) नाशिक जिल्हा पोलिस अधिक्षक — १८९५

५) कुलाब्याचे असिस्टंट कलेक्टर मि. ब्रुक १८९६ — ९७

६) द इंग्लीशमन या मुखपत्राचा अभिप्राय

७) प्रो. व्हिटने,

८) ए. ओ.हयुम

९) प्रो.ब्यूमफिल्ड

१०) प्रा. पिशेल

११) पॉल केरस.

१२) प्रो.वॉरन

**ब) <u>देशी विचारवंत</u> —**

समकालीन — गोपाळकृष्ण गोखले, गोपाळराव आगरकर, महात्मा गांधी, योगी अरविंदबाबु, रविंद्रनाथ टागोर, सुभाषचंद्र बोस, बॅ जिना,टिळकाचे भाचे महादेव धोंडो विद्वांस, नागपुरचे श्रीयुत धुंडिराजपंत ठेंगडी, क्रांतीकारक श्री खानखोजे, गंगाधर देशपांडे, स. वि बापट, रामचंद्र नारायण मंडलिक, शिवराम महादेव परांजपे.

२) नंतरचे (विदयमान) — विचारवंत/लेखक —

डॉ राधाकृष्णन, श्रीनिवास बनहट्टी, गणेश आळतेकर, प्रभाकर बापट, रघुनाथ वैशपायन, आचार्य जावडेकर, ग. प्र. प्रधान, राम शेवाळकर इ.

## लोकमान्य टिळकांच्या विचार व कार्यावरील प्रतिक्रिया —

समकालीन इंग्रज अधिकारी व लेखक यांच्या प्रतिक्रिया —

लोकमान्य टिळकांच्या गणेश उत्सवाच्या उपक्रमाबद्दल सर व्हॅलेंटाईन चिरोल यांच्या 'इंडियन अनरेस्ट' या ग्रंथाच्या आधारे न. चिं. केळकर असे लिहितात की, चिरोल साहेब आपल्या सुप्रसिध्द पुस्तकांत लिहितात, "आपल्या राजकीय चळवळीस धर्माचा पाठिंबा असला म्हणजे चांगले या उद्देशाने हिंदुस्थानातील अत्यंत लोकप्रिय देव जो गणपती तो आपल्या सर्व चळवळींचे अदिदैवत करण्याची क्लृप्ति टिळकांनी लढविली. वस्तुत: गणपती हा देव हिंदू लोकांच्या विद्याधिपति असून ग्रंथाच्या पाहिल्या पानावर त्याचे चित्र घालण्याने त्यांना मोठा आनंद होतो. खेडयात किंवा हमरस्त्याच्या बाजुला दगडास शेंदूर फासून कसातरी आकार आणलेल्या गणपतीचे देऊळ नाही, अशी गोष्ट सहसा व्हावयाची नाही. गणपती उत्सवाची नवीन टुम काढून गणेश मंडळ स्थापन करून व तरूण तालिमबाज मंडळीचे मेळे तयार करून लोकांवर आपली छाप बसविण्याची युक्ती टिळकांनी काढली ती अद्वितीय होती—गणपती उत्सवामुळे टिळकांच्या चळवळीचे क्षेत्र फारच विस्तृत झाले."

शिवाजी उत्सवासंबधाने हि चिरोल साहेबांनी अशीच कबुली दिली आहे, ते लिहितात. "मराठे मंडळीस आपल्या बाजुला आणण्याचे काम टिळकांस अदयापि करावयाचे होते. म्हणून ज्या शिवाजीने महाराष्ट्रात हिंदू पदपात- शाहीची स्थापना केली त्याचा जन्म एका मराठया सरदाराच्या कुलांत झाला असल्या कारणाने त्यांच्या पराक्रमाचे पोवाडे गाऊन शिपाईबाण्याचे जे मराठे लोक, त्यांच्या मनात इंग्रजी राज्यांविषयी असलेले प्रेम नाहीसे करून त्यांना आपल्या बाजूला वळवून आणण्याच्या उदयोगास टिळक लागले. काही लोकांचा असा तर्क आहे की, एका इंग्रज गृहस्थाने वार्णिलेल्या रायगडवरील शिवाजीच्या समाधीच्या शोचनीय स्थीतीची

हकीकत वाचुनच टिळकांच्या मनात प्रथमत: कल्पना आली की, शिवाजी उत्सव सुरू करून त्याचा फायदा राजकीय चळवळीस करून घ्यावा......... कसेही असो, टिळकांचे शिवाजीला पुढे आणून मोठी राष्ट्रीय धामधूम सुरू केली व सन १८९५ साली महाराष्ट्रात सर्व मुख्य ठिकाणी शिवाजीच्या जन्मदिनानिमित्त उत्सव करण्यात आले. ”

या दोन उता—यावरून या दोन्ही राष्ट्रीय उत्सवांच्या सुरूवातीचे यश टिळकांनाच दिले पाहिजे हे शत्रुपक्षाच्या कबुलीवरूनही उघड होते.[१]

**ब्रिटीश अधिका-यांचा गणपती उत्सवाबद्दल दृष्ट्रीकोन —**

लोकमान्य टिळकांच्या गणेश उत्सवाबाबत आपले मत व्यक्त करताना विविध ब्रिटीश अधिकारी दिसून येतात.

१)एम. एस एडवर्डस, पोलिस कमिशनर मुंबई (१९०९ — १९१६.) यांच्या मतानुसार गणेशोत्सवाचे मुख्य वैशिष्टये म्हणजे “ब्रिटीशांच्या विरूध्द क्रांतीकारक चळवळ निर्माण करणे होय.”

२) अहमदनगरचे डिस्ट्रीक्ट मॅझिस्ट्रेट आपल्या १८९६ च्या अहवालात म्हणतात, “गणपती उत्सवाची चळवळ आता सर्व ठिकाणी आणि सर्वप्रकारच्या शहरात पसरली आहे. हा उत्सव राजकीय शिक्षणाचे साधन बनला असून दिवसेंदिवस त्याचे महत्व महाराष्ट्र व मुंबई इलाख्यात पसरत आहे. गणपतीच्या मिरवणुकीची गर्दी पाहता असे निदर्शनास आले की, गणपतीच्या गाडीवर फक्त देशी कापड असे लिहिलेले फलक होते आणि देशी बनविलेले कापड अशा प्रकारे असलेली हस्तपत्रके गर्दीत लोकांना वाटण्यात आली”.

३) नाशिक जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी ३ सप्टेंबर १८९५ च्या गणपती मिरवणुकीच्या आपल्या अहवालात असे मत दिले की, “या मिरवणुकीत पन्नास बैलगाडया होत्या. त्यात गणपती रामलक्ष्मण

आणि इतर देवता होत्या. अनेक मुसलमान मिरवणुकीला उपस्थित होते. मिरवणुकीच्या बॅडच्या ताफयात अनेक मुसलमान लोक होते."

४) टिळकांना कुच्छितपणे 'भारतीय असंतोषाचे जनक' अशी विशेषण देणारी पाहिली इंग्रज व्यक्ती वेलेनटाईन चिरोल यांने गणशोत्सबाबत आपला दृष्टीकोन मांडताना असे म्हटले की, "सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करण्याबाबतचा टिळकांचा उद्‌देश म्हणजे, ब्राम्हणांचे गेलेले वर्चस्व पुन्हा प्राप्त करणे व दुस-या बाजुला मुसलमानाविरूध्द,सुधारकांविरूध्द व ब्रिटीश राजवटीविरूध्द चेतावणी देणे असा होता. हा विचार त्याने त्याच्या 'द टाईम्स' च्या लेखात मांडला व नंतरच्या काळात 'भारतीय अशांतता' च्या खंडात प्रसिध्द झाला.वरील चर्चेचा परामर्श इतिहासाचे अभ्यासक व संशोधक डॉ. जे. व्ही नाईक यांनी आपल्या संशोधनपर लेखांमध्ये वरील विधाने करून केलेला आहे.[२]

<u>राष्ट्रीय महोत्सव — उत्सवावरील प्रतिक्रिया</u> —

गणपती व शिवजयंती उत्सव म्हणजे सरकारविरोधी प्रचाराचे साधन आहे. अशी टिका टिळकांचे विरोधक करीतच असत "इंडियन अनरेस्ट" या आपल्या पुस्तकात सर व्हॅलेंटाईन चिरोलने लिहिले आहे की, "नाटकाचे प्रयोग करायला आणि धार्मिक गाणी गायला या उत्सवामुळे संधी मिळे, या नाटकातून आणि गाण्यातून हिंदूंच्या पौराणिक कथांचा विदेशी राज्यकर्त्याविषयीचा द्वेषभाव प्रदीप्त करण्यासाठी मोठया कौशल्याने उपयोग केला जातो. म्लेंच्छ ही उपाधी मुसलमान आणि युरोपीय दोघांनाही सारखीच लागू असे. मुसलमान आणि पोलिस यांच्याशी संघर्ष व्हावा या हेतूनचे वरील उत्सवातल्या मिरवणुकी योजनापूर्वक आखलेल्या असत. अशा संघर्षातून उद्‌भवणा-या खटल्यांमुळे निषेधाचा गदारोळ उडवून

बचावासाठी ज्वलज्जहाल व्याख्याने दयायला निमित्त सापडे. टिळकांच्या प्रचाराचे क्षेत्र गणेशोत्सवाबरोबरच विस्तार पावत गेले."[३]

**रामचंद्र नारायण मंडलिक — कुलाब्याचे असिस्टंट कलेक्टर यांच्या आठवणी —**

(मि. ब्रुक १८९६ — ९७ यांचे उदगार) रामचंद्र नारायण मंडलिक आठवण सांगताना असे म्हणतात की, १८९६ — ९७ साली दुष्काळ पडला होता एक खटलाच्या निमित्ताने टिळक पेण येथे आले होते. खटल्याच्या पाहिल्या दिवशी ब्रुक साहेबांच्या तंबुला हजारो लोकांचा गराडा पडला. बाहेर जमलेला प्रचंड जनसंमर्द पाहून ब्रुक्र साहेब भेदरल्यासारखे झाले. तेव्हा साहेबांनी टिळकांना विनंती केली व टिळकांनी जमावाला शांत केले. यानंतर बुक्रसाहेब टिळकांना म्हणाले की, "शेतकरी वर्गातील अशिक्षित लोकांच्या इतका प्रचंड जमाव एखादया खटलांच्या निमित्ताने जमल्याचे उदाहरण हिंदुस्थानात तर माझ्या पहाण्यात नाहीच,पण विलायतेतहि नाही, मला हा जमाव पाहून 'इंग्लीश इतिहासातील सात विशपांच्यां खटल्याची' आठवण झाली. तुमच्या लोकप्रियतेचीच हा प्रचंड लोकसमुदाय ही साक्ष आहे. या लोकप्रियतेबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो."[४]

**बहिष्काराच्या चळवळीचा ब्रिटीश व्यापारावर परिणाम —**

बहिष्काराच्या चळवळीविषयी जोग 'द इंग्लीशन' या मुखपत्राच्या आधारे असे लिहितात की, "बहिष्काराच्या चळवळीचा ब्रिटीश व्यापारावर किती विदारक परिणाम झाला, हे कलकत्ता येथील ब्रिटीश जमातीच्या 'द इग्लीशमन' या मुखपत्रातील पुढील मजकुरावरून दिसून येते."

"कित्येक प्रमुख मारवाडी पेढया पार बसल्या असून युरोपमधील कित्येक अवाढव्य आयात केंद्रांना आपल्या फुटकळ मालाच्या शाखा बंद

तरी कराव्या लागल्या आहेत वा त्यांच्या व्यवहारात पराकाष्ठेची कपात तरी करावी लागली आहे. वखारीतले साठे फुगतच चालले आहेत. ही वस्तुस्थिती आता इतकी सर्वश्रुत झाली आहे की, ती दडवून ठेवण्याचा खटाटोप फोलच ठरेल. किंबहुना बहिष्कारामुळे झालेल्या नुकसानीला पुरेपूर प्रसिध्दी देण्याचीच वेळ आज आलेली आहे. बहिष्कार घालणा-यांना उत्तेजन मिळण्याचा प्रश्नच नाही. कारण त्यांना तर कसल्याच उत्तेजनाची आवश्यकता नाही. ब्रिटनमधील जनता आणि भारतातले सरकार यांना चांगले जागे करून बिटिशांच्या भारतातील हितसंबधावर घाला घालण्यासाठी साम्राज्याच्या वै-यांच्या हाती बहिष्काराच्या रूपाने एक अत्यंत प्रभावी शस्त्र आलेले आहे. या कटू सत्याची त्यांना नीट जाणीव करून देणे हीच खरी समस्या आहे. आपण मूग गिळून बहिष्काराकडे डोळेझाक केलेली चालणार नाही. नाहीतर सशस्त्र क्रांतीपेक्षा या बहिष्कारामुळेच ब्रिटीशांच्या भारताशी प्रस्थापित झालेल्या संबंधांचां निश्चित नाश होईल."[५]

**<u>लोकमान्य टिळकांच्या ग्रंथद्वयावरील काही अभिप्राय</u> —**

लोकमान्य टिळकांच्या साहित्यावर निरनिराळया प्रो.व्हिटने, ए. ओ. हयुम, प्रो. ब्ल्युमफिल्ड, प्रो. पिशेल, पॉल केरस प्रो. वॉरेन या विचारंवताच्या मताच्या आधारे न. चिं. केळकर असे लिहितात की,

**१) <u>ओरायन या ग्रंथावर अभिप्राय</u> —**

१) प्रो. व्हिटने (अमेरिका) लिहितात "तुमची प्रमेये फार महत्वाची व दीर्घ परिणामी आहेत, पण म्हणूनच अशी प्रमेये कितपत यथार्थतेने काढता येतील याविषयी मनाला आत्मप्रत्यय वाटत नाही. त्याकाळी हिंदुस्थानात ग्रह कोणते ते देखील ठरविले नव्हते व त्यांना नावेही दिली गेली नव्हती, इतक्या जुन्या काळचे आधार तुम्ही घेतले आहेत म्हणून मन जरा कचरते."

२) ए. ओ. हयुम (लाहोर) लिहितात: ‘तुम्ही काढलेले प्रमेय घेऊन त्याचदिशेने पुढे विचार चालवून वैदिक काळ ठरविणे यात काही वावगे दिसत नाही. कदाचित २०/२५ वर्षांनी विद्वान पंडीत प्राचीन कालमार्गाने जाताना तुम्ही रोविलेले हे मैलांचे मजलीचे दगड खुणे दाखल पत्करण्याचा फार संभव आहे.”

३) प्रो. ब्ल्यूमफील्ड (बल्टिमोर अमेरिका) लिहितात “तुमचे पुस्तक मी वरवर वाचले पण तेवढयाने ते मनोरंजक व मोठे कल्पक असल्याविषयी माझी खात्री झाली तुमचे मुख्य प्रमेय स्वीकारण्यास अदयाप मन होत नाही, व फिरून केव्हा तरी त्यातींल किरकोळ गोष्टींची छाननी मी स्वस्थपणाने करीन म्हणतो.”

४) प्रो. पिशेल म्हणतात “तुमच्या युक्तिवादातील तपशिलाचे काही मुद्दे, समजले नाहीत, कारण मला ज्योतिर्गणिताचे ज्ञान हवे तितके नाही. पण एकदरीने पाहतां वैदिक वाङ्‌मय व वैदिक संस्कृती यांचे प्राचीनत्व, आणि विशेषत: मृगशीर्षाविषयी तुम्ही काढलेली अनुमाने पक्की व खात्रीलायक आहेत असे माझे मत झाले आहे. प्रो. मॅक्समुल्लर यांच्या शब्दव्युत्पत्या हल्ली युरोपात कोणीही मानीत नाहीत व त्या चूक आहेत असे माझे निश्चित मत आहे. मात्र गाथा शास्त्राच्या तुलनात्मक विचार करणे हे आता बाजूस पडत चालले आहे. कसेही असो तुमचे पुस्तक अत्यंत महत्वाचे आहे याविषयी शंका नाही.”[६]

**२) <u>आर्कटिक होम</u> —**

१) पॉल केरस (अमेरिका) यांनी या ग्रंथांतील सिध्दतांना ताबडतोब संमती दिली व मॉनिस्ट मासिकात आपला अभिप्राय प्रसिध्द केला. ते आपल्या पत्रात लिहितात की, “एकदोन गोष्टीत मात्र तुमचा माझा मतभेद दिसतो. तुराणी व आर्यन या वंशांत पिंडभेद तर आहेतच, पण भाषा भेदहि

अधिक आहे. निरनिराळया वंशाच्या लोकांनी एकच भाषा बोलणे शक्य आहे आणि ॲकेडियन लोक हे शुध्द तुराणी नव्हते असे तुम्ही मानता. पण मिश्रणानेंच प्रगती होत असते.”

२) **<u>प्रो. वॉरन</u>** –

शिकागो येथील ‘ओपन कोर्ट ’मासिक पुस्तकात त्यांनी आपला अभिप्राय प्रकट केला. ते लिहितात “आर्यांच्या वसतिस्थानावर एक नविन मननीय ग्रंथ हिंदुस्थानात नुकताच लिहिला गेला आहे, आणि अमेरिका व युरोप खंडात विद्वान पंडीत लोक त्याचा विचार करीत आहेत. हे ग्रंथ लिहिणारे टिळक यांना संस्कृत फार चांगले येते व पाश्चात्य शास्त्रांचे ही ज्ञान त्यांना बरेच आहे. ते इंग्रजी भाषा इतकी शुध्द व जोरदार लिहितात की, एखादया इंग्रजालाही त्यांचा हेवा वाटावा. ते कायदेपंडित असल्याने त्यांची विवेचन पध्दती स्पष्ट आणि प्रसादयुक्त असुन ख-या पुराव्याच्या दृष्टीने ग्राहय कोणते व अग्राहय कोणते याचा त्यांना चांगला विवेक करितां येतो. त्यांचां ओरायन ग्रंथ यापुर्वीच मान्यता पावला असल्याने, त्यांच्या या दुस-या ग्रंथाकडे विद्वान लोक आदरबुध्दीन पाहतात यांत नवल नाही.”[७]

**<u>धर्मविषयक प्रतिक्रिया</u>** –

**१) महादेव धोंडो विद्वांस (लोकमान्य टिळकांचे भाचे)**

आपल्या ‘लोकमान्य टिळकांचे आध्यात्मीक जीवन’ या पुस्तकात महादेव धोंडो विद्वांस लिहीतात की, “लोकमान्य ज्या हिंदूधर्मात जन्मले, त्यावर त्यांची प्रथम परंपरागत श्रध्दा होती व पुढे त्यांना त्यांचे धर्माचे सत्य स्वरूप दिसून आले ते बुध्दी प्रधान होते व संस्कार, रूढी, आचार इ टरफले फोडून टाकिली असतां हिंदूधर्माचा गाभा जे उपनिषद तत्वज्ञान ते बुध्दीग्राहय आहे या दोन अवस्थांचेमध्ये काही दिवस स्पेनरचे तत्वज्ञानाचा त्यांनी अवलंब केला असे ‘केसरीत’ प्रसिध्द झालेली अलबत्या

गलबत्यांची मते त्यांचेवर लादू न म्हणणे हे निराधार होय. लहानपणीच त्यांना गीतेची आवड उत्पन्न झाली. व लहान वयातच मनावर घडणारे संस्कार टिकाऊ असल्यामुळे पुढे अभ्यासाने त्यांनी धर्माचे ज्ञान करून घेतले. तत्वज्ञानावर ग्रंथ लिहिण्याची महत्वकांक्षा लहानपणीच त्यांचे मनात उत्पन्न झाली हे सुक्ती क्र १७०३ वरून दिसेल."

महादेव धोंडो विद्वांस पुढे असे लिहीतात की, "धर्मामध्ये तत्वज्ञान निर्भेळ रहात नाही. अंतिम सत्य जर अद्वैत आहे तर त्यांत उपास्य, उपासक हा भेद कोठून असणार? पण धर्मात तर तो आवश्यक असतो. अर्थात अश्या त-हेने ते कधीहि धार्मिक नव्हते. पण धर्मिक या शब्दाने कर्मठ असाहि अर्थ केला जातो व या दृष्टीनेही ते धार्मिक नव्हते त्यांनी नित्याचार कधीही पाळला नाही. त्यांनी गुरूपदेश घेतला नाही, तुरूंगात धार्मिक सत्याग्रह केला नाही, मालवीयाप्रमाणे ते धार्मिक नव्हते ते म्हणत, "माझी सर्वत्र सदा धर्मबुध्दी असते" कर्मठपणापेक्षा निष्काम कर्माची ज्ञानाला जास्त मदत होते असे त्यांचा कर्मयोग शिकवितो.

नैमित्तीक आचार ते पाळीत, पण ते लोकसंग्रहार्थ होय. स्वत:च्या अभ्युदयाकरीता नव्हे 'न बुध्दिभेदं जनयेत आज्ञानम' या तत्वावर हा आचार चाले, अर्थात ज्ञान्याने दुटप्पी वर्तन करावे की काय हा प्रश्न निराळा, तडतोड हे व्यावहारिक सत्य आहे, त्यांचा सतत मारा झाला ते बुध्दिमांदय येते व तेच खरे की काय असा भास उत्पन्न होतो.

धर्माचा, राष्ट्रीयत्वाची भावना जागृत करण्याकडे त्यांनी उपयोग केला. परक्याकडे दुबळेपणाने पाहण्यापेक्षा स्वत:च्या उज्ज्वल धर्माचा योग्य अभिमान त्यांनी उत्पन्न केला. केवळ नैतिक ख्रिस्ती धर्मापेक्षा उपनिषद धर्म श्रेष्ठ होय असे त्यांचे मत होते.

असे जरी आहे तरी लोकमान्य हे त्यांचे काळी कर्मठ धार्मिकतेचे मोठे कैवारी समजले गेले, याचें मुख्य कारण ते आस्तीक होते हे होय.

धर्मलंडपणापेक्षा त्यांना अनेक मिथ्थाचारांची पुटे चढलेला पण आतुन जिंवत असलेला धर्म जास्त ग्राहय वाटला. कारण तो पुन्हा जिवंत होण्याची आशा होती. निवळ धर्मलंडपणा किंवा बौध्दिक बकवा यापासून कोणत्याही त-हेची आशा करण्यास जागा नव्हती याबाबतीत सुधारक पण धार्मिक अशा रानडयांशी त्याचे साध्यर्म्य होते.

रानडयांनी नवा पंथ काढला, तरा टिळकांनी पिढीजाद संस्कार व धार्मिक वाचन यांचेमुळे धर्माचे पुनरूज्जीवन केले, मागील सर्व आचारविचार आज टिकु शकतील असे त्यासही वाटले नाही. पण वर नमुद केलेल्या चार्वाकांशी त्यांनी जो एकजात प्रतिक्रियारूप विरोध केला त्यामुळे ते जुन्याचे अंध अभिमानी होते असा गैरसमज झाला."८

**२) श्रीनिवास नारायण बनहट्टी —**

लोकमान्य टिळकांनी धर्मविषयक मते या न. चि केळकर संपादित निबंधामध्ये लेखक श्रीनिवास नारायण बनहट्टी असे लिहीतात की, "हद्यांत स्थिर असलेली ईश्वरनिष्ठा, परंपरागत हिंदूधर्माचा अभिमान व जरूर पडेल तेथे धर्माचा कैवार घेण्याची तयारी हे धार्मिक भावनेच्या जनतेशी तादात्म्य होण्यात लागणारे गुण अंगी असल्यामुळे ते जनतेशी तेव्हाच समरस झाले. पुढे तर जनता हेच त्याचे सारसर्वस्व होऊन बसले होते."

ऐसे भाग्य कई लाहता होईन । अवघे देखे जन ब्रम्हरूप ।।

या तुकाराम महाराजांच्या उक्तिप्रमाणे सर्व जनतेला परमेश्वररूपांत पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले होते. जनतेलाच ते परमेश्वर (श्रीशाय जनता.त्मने गी. र) किंवा परब्रम्ह मानीत असत व ब्रम्हांशी तादात्म्य होऊन स्वत:च ब्रम्हरूप व्हावे. त्याचप्रमाणे ते स्वत:च जनतास्वरूप होऊन गेले होते. हा जो अद्बितीय लोकसंग्रहयोग त्यांना साधला त्याचे मुख्य कारण लोकांना पटण्यासारखी त्यांची धर्मबुध्दी व धर्मिक भावना या होत. या

लोकसंग्रहाच्या बळावर त्यांनी मोठमोठी राजकीय कार्ये केली तथापि त्या लोकसंग्रहाचे मूळ त्यांच्या धर्मबुध्दीत होते हेच त्यांचा धर्मिक जीवनाचे रहस्य होय.[९]

**३) <u>लेखक गणेश सदाशिव आळतेकर</u> <u>(एम.ए.)</u>**

आपल्या निबंधात असे लिहीतात की, "अधिभौतिक शास्त्रांची हल्ली इतकी वाढ पूर्वी झाली नसतां हि वेदान्तांतील सिध्दांन्त ज्यांनी अन्तर्दृष्टीने फार प्राचीन काळी शोधून काढले,त्यांच्या अलौकिक बुध्दिवैभवाचे आश्चर्य वाटल्या-खेरीज रहात नाही, आणि आश्चर्यच नव्हे, तर आपणास त्याचा योग्य अभिमानही वाटला पाहिजे." (गी. र १४६) हा अभिमान लोकमान्यांचे अंतरंगात किती उत्कटपणे वास करीत होता हे त्यांनी वेळोवेळी दिलेल्या धर्मविषयक व्याख्यानातून व लेखातून स्पष्ट व्यक्त होते. राजकीय चळवळ आपल्या आयुष्याचे कर्तव्य म्हणून ठरविल्यावर तत्प्रीत्यर्थ अश्रांत श्रम करताना वेळात वेळ काढून व तुरूंगांचे तत्वज्ञानमंदिर बनवून त्यांनी 'ओरायन', 'आर्यांचे उत्तर ध्रुवाकडील वसतिस्थान', आणि 'गीतारहस्य' असे अप्रतिम ग्रंथ लिहून आपला धर्म, आपले तत्वज्ञान व आपली संस्कृती यांचा प्राचीनपणा, महत्व व श्रेष्ठत्व प्रस्थापित केले. संकटांना लोळवुन त्यांच्या छातीवर बसुन शांत चित्ताने विचार करण्याचे सामर्थ्य त्यांना धर्मभावनेमुळेच प्राप्त झाले होते.[१०]

**४) <u>लेखक प्रभाकर वासुदेव बापट</u> <u>(बी. ए.)</u>**

आपल्या निबंधात असे लिहीतात की, "टिळकांचे धार्मिक इतिहासातील महत्व तीन प्रकारचे आहे.

१) टिळकांचे खरे संघटनात्मक कार्य म्हटले म्हणजे हिंदी राष्ट्राचा अभ्युदय पुनरूज्जीवनानेच होणार या महासिध्दांताची स्थापना होय.

२) टिळकांची दुसरी धार्मिक कामगिरी, म्हणजे धर्मोपदेशकाचे त्यांनी

केलेले कार्य होय.

३) टिळकांची ही सर्वात मोठी कामगिरी, म्हणजे त्यांनी केलेली प्रवृत्ती —मार्गाची स्थापनाच होय. "त्यांचे गीतारहस्य तर, पुढील पिढयांना त्यांच्या धार्मिक आकांक्षा जागृत करून आध्यात्मीक उन्नतीसाठी राष्ट्राकरीता किंवा इतर मोठया कार्याकरिता निष्काम कर्मयोगाची स्फूर्ती देणा—या, गोड, पवित्र व सामर्थ्यवान ज्ञानाचा अखण्ड वाहणारा झराच होईल."[११]

**५) <u>लेखक — काशिनाथ रघुनाथ वैशंपायन</u> —**

आपल्या निबंधात असे लिहितात की, "राष्ट्राच्या प्रगतीला धार्मिक शिक्षणाची अत्यंत जरूर आहे, असे लोकमान्यांचे ठाम मत आहे. आमचा धर्म दीर्घौदयोग, सहिष्णुता, स्वार्थत्याग, इ तत्वे उत्तमरीतीने शिकवितो व आमच्या राष्ट्रीय चळवळीला धर्माचा ठेका असल्यांवांचून राष्ट्रीय प्रगती अशक्य आहे. धार्मिक शिक्षणामुळे एक प्रकारचे मनोधैर्य मनुष्याच्या अंगात येते, व एक प्रकारचा दृढ विश्वास व अभिमानही मनुष्याच्या मनात उत्पन्न होतो आणि दृढनिश्चय, अभिमान व परंपरा व भरवसा आणि या भरंवशास योग्य अश्या त–हेचे उदयोग कळकळीने करण्याची इच्छा किंवा उमेद आणि सवय असल्यांखेरीज सुधारणेचे कार्य होणे शक्य नाही."[१२]

**<u>समकालीन भारतीय व लेखक यांच्या प्रतिक्रिया</u> —**

**<u>गणपती उत्सवासंदर्भात मत</u> —**

**१) क्रांतीकारक श्री खानखोजे —**

"पुण्याकडे रा. टिळकांच्या नेतृत्वाने गणपती उत्सव देशभक्तीच्या प्रचारार्थ राष्ट्रीय उत्सव झाला होता, त्यांला राष्ट्रधर्माचे स्वरूप मिळाले, पुण्याच्या धर्तीवर अमरावती, वर्धा, नागपूर, इत्यादि शहरात सार्वजनिक गणपती उत्सव सुरू झाले. 'गणानां त्वा गणपती हवामहे' या व्यापक दृष्टीने, गणराज्य देणारा गणपती म्हणजे स्वातंत्र्यदेवता होय असा प्रचार

सुरू झाला. उत्तम वक्तांच्या आणि देशभक्त हरदासांच्याद्वारे गणपतीच्या आश्रयाने क्रांतिकारक एकत्र करण्याचे काम गणपती उत्सवाने सुलभ झाले. धार्मिक उत्सव असल्याने पोलिस त्यात हात घालू शकत नव्हते."[१३]

**२)** एका वृध्द गृहस्थाची आठवण — सांगताना स. वि बापट असे म्हणतात की, लोकमान्याना पहावयास पुष्कळच माणसे येत असत त्यात अर्थातच सर्व जातींची व अगदी लहान मुलांपासून गलितांग झालेल्या वृध्दापर्यतची सर्व वयाची माणसे असत. त्यांना त्रास होऊ नये म्हणून लोकमान्य आम्ही ज्या घरी उतरतो होतो, तेथील चौसीपीतल्या एका मोठया हडप्पावर बसून त्या सर्व मंडळींशीं बोलत असत. अशाच प्रसंगी एक वाकलेले गृहस्थ दर्शनास आले. त्यास वृध्दत्वामुळे नीटसे दिसत ही नव्हते, तेव्हा त्यांनी हातांनी लोकमान्याचे शरीर चाचपून सलिंगन भेट घेतली व असे करिता-करितांच ते लोकमान्यांचे पायावर डोके ठेवू लागले. त्यास तसें न करू देतां लोकमान्य म्हणाले "अहो, असे काय करिता? मस्तक हे फक्त वृध्द अगर देव यांचे पायींच नमवावे.मी असे काय केले आहे, की आपण पांडुरंगाचे पायीच नमवावयाचे मस्तक माझे पायी ठेवू इच्छिता?" तेव्हा ते गृहस्थ सददित अंतकरणाने म्हणाले,'अहो, आपण आणखी काय करणार? श्री शिवाजी महाराजांनी आम्हा हिंदूची शेंडी कायम ठेविली व आम्हा हिंदूस स्वाभिमानपूर्वक मान वर करून इतर जगात वावरावयास शिकविण्याचा प्रयत्न करून आपण तीच परंपरा पुढे चालवित आहांना? झाले, आमचे पांडुरंग आपणच ! अर्थातच लोकमान्यांनी त्यास पाया पडू न देतांच वर उचलून धरिले व वारकरी पथांतल्या आपणासारख्या समजंस गृहस्थावरच हिंदू संस्कृति जिवंत ठेवण्याचा भार असून तुमचेच पायी आम्ही मस्तक लवविले पाहिजे असे सांगितले..[१४]

**३)** सुप्रसिध्द अभंगकार श्री, विष्णुबुवा जोग यांच्या प्रवचनावर टिळकांचे उद्गार एक प्रसंग अगदी कधीही विस्मरण न होण्याजोगा म्हणजे असा —

“माझ्या मनीची आवडी । पंढरपूरा नेईन गुढी ” या सुप्रसिध्द अभंगावर श्री. विष्णुबुवा जोग यांचे अत्यंत रसाळ व सुश्राव्य प्रवचन झाले. गर्दी अफाट लोटली होती व वेळही बराच झाला होता तरी त्यानंतर सुध्दा लोकमान्यांनी काही तरी बोलावेच असा आग्रह मंडळीचा पडला. तेव्हा लोकमान्यांनी त्याच चरणाने सुरूवात करून विष्णुबुवांनी विवरण केलेल्या भागवत धर्माची खुप स्तुति करून त्यांचा मुलभूत तत्वांची अगदी सरळ सोप्या भाषेत श्रोत्यास पटेल अशी फोड केली. “आपणहि एक या भागवत धर्माचे अनुयायी वारकरी आहों, फक्त आपले पंढरपूर सध्याच्या परिस्थितीमुळे बदलले असून ते साध्य करून घेण्याचे साधन जी राजकीय चळवळ ती आपण कार्तिकी—आषाढीच्या वा-या इतक्याच भक्तीने व चिकाटीने व धार्मिक भावनांनी प्रेरित होऊन चालविली पाहिजे या बदललेल्या स्वरूपातही आपण भागवत धर्माचे नेटाने परिपालन करून तो टिकावा व आपण घरचे मालक व्हावे व ऐहिक राष्ट्रोन्नतीरूप मोक्ष मिळावा, अशी बुध्दी देव आपणास देवो अशी त्यापाशी मागणी करा” अशा आशयाचे उद्‌गार काढले.

**४) <u>गंगाधर व्यंकटेश देशपांडे (यांच्या आठवणी)</u>**

पुणे येथे शके १८४२ च्या श्रीशिवजयंन्तीच्या उत्सवात मी किर्तन केले. त्यावेळी तेथे लोकमान्यांचे साठी आरामखुर्ची ठेवली होती. पण त्यांचे त्यावेळी येणे पडले नाही. संध्याकाळी त्यांच्या दर्शनास मी गेलो पायावर डोके ठेविले. उभा राहिलो तेव्हा ते म्हणाले, “बुवा आज किर्तनाला आलो नाही, कारण मला बसवत नाही. अशक्तपणा फार आला आहे “मी म्हटले, मुद्‌दाम आरामखुर्ची ठेविली होती त्यावर ते बोलले ‘बुवा, ते किर्तन आहे व्याख्यान नव्हे किर्तनात लोडाला टेकणे, सुखासनी

बसणे, हे मला अगदी आवडत नाही. अशाने त्या गादीची अप्रतिष्ठा होते. "[१५]

**५) <u>लोकमान्य टिळकांच्या आठवणी व आख्यायिका खंड क्र २ मध्ये बापट, — आठवण सांगतात की,</u>**

अ) लोकमान्यांच्या दौ-याचे वेळी त्यांचे पादस्पर्शनपूर्वक दर्शन घेण्याकरीता आषाढी एकादशीस पंढरीनाथाचे दर्शन घेताना भक्तांची जशी स्थिती होते तशी लोकांची कशी स्थिती होई हे शब्दांनी वर्णन करणे अशक्य आहे. अशा प्रसंगी लोकांस लोकमान्य एक सारखे म्हणत, 'मी साधू नाही, माझ्यात विशेष काही नाही, तुम्हासारखेच मला हात, पाय, कान परमेश्वराने दिले आहेत. तुम्ही माझे पायां न पडता भगवन्ताचे पाया पडा व त्याजजवळ स्वराज्य मागा."

ब) लोकमान्य अजमीरला गेले त्यावेळी त्यांचे दर्शनार्थ दिल्लीपासून अजमिरापर्यंत रात्री व दिवसा सर्व स्टेशनावर लोकांचा तोबा उडत होता ज्या अजमीरच्या प्रख्यात दरग्यांत जहांगीर बादशहाच्या जन्माचा नवस अकबराने पायी चालत येऊन फेडला, त्या ऐतिहासिक दरग्यांत या अनभिषिक्त लोकमान्यमहाराजांचा अपूर्व जयजयकार सर्व मुसलमान बंधूनी केला ही खरोखरच मोठया भाग्याची गोष्ट होय. अजमीरच्या इतिहासात ही गोष्ट नमूद झाल्याखेरीज खास राहाणार नाही.[१६]

**<u>राम शेवाळकर</u> —**

रविवार दि ३१ ऑगस्ट २००८ दै. लोकमत मधील 'दुरितांचे तिमिर जावो' यालेखात असे लिहीतात की "गणेशोत्सवाचे महत्व राष्ट्रजागृतीच्या संदर्भात लोकमान्यांच्यांही लक्षात आल्यामुळे त्यांनी अशा उपक्रमांचें समर्थन करण्यासाठी केसरीमध्ये लेख लिहिला त्याच्या परिणामी १८९४ पासून 'सार्वजनिक गणेशोत्सवाला' सुरूवात झाली. या उत्सवामागील लोण महाराष्ट्र, बृहन्महाराष्ट्र व देशातही पसरले.

या उत्सवांचा एक लाभ झाला. सुशिक्षित मध्यमवर्ग व बहुजन समाज हा उत्सव साजरा करण्याच्या निमित्ताने एकत्र आले आणि किर्तने, प्रवचने, भजने, व्याख्याने यांनी सर्वच गावांमधील दहा दिवस गजबजून व गर्जून गेले. त्यात मेळयांचीही भर पडली. मेळयांच्या निमित्ताने तरूणांमधील वक्तृत्व, गायन व अभिनय या सुप्त कलागुणांना वाव मिळाला. मेळयामध्ये सामाजिक व राजकीय प्रश्नांचाही समावेश झाला व लोकजागृतीचा रंजनावगुंठित असा एक नवा व प्रभावी प्रचाराचा मार्ग मोकळा झाला मेळयांची लोकप्रियता वाढू लागली. परिणामी मेळयांच्या दर्जात व प्रभाव सामर्थ्यातहि भर पडली. किर्तनामध्ये 'राष्ट्रीय किर्तन' नावाचे एक नवे व्यासपीठ लोकमान्यांमुळे पाहिल्यांदाच उपलब्ध झाले व त्यातील इतिहास गौरवाच्या निमित्ताने लोंकामध्ये स्वाभिमानही जागृत करता येऊ लागला आणि गणेशोत्सवाचे एक विशाल उत्साहाने व स्वाभिमानाने भरलेले ज्वलंत असे स्वरूप आकाराला आले."[१७]

**<u>श्रीनिवास साठे</u> —**

दि ४/९/२००८ दै. लोकसत्तामधील 'गणेशोत्सवातील संगीतमय स्वातंत्र्य चळवळ' या लेखात ते असे लिहीतात की, "गणेशोत्सवातील मेळे यांनी प्रबोधनाबरोबरच समाजातील सुप्त गुणांनाही मोठा वाव दिला. गायनातील थोर परंपरा निर्माण केली. तसेच मोठा श्रोतृवर्गही घडविला. नाटय इतिहासाचा सुवर्णकाळ आणि मेळा हे हातात हात घालून वाढले ते याच कालखंडात. त्याचप्रमाणे गायनाच्या मैफिली बंद खोलीतून सार्वजनिक मांडवात आणण्यासही मेळे कारणीभूत ठरले. गावोगावी छोटे मोठे गवई घडवलेच, पण पुढे गजानन वाटवे, बबन नावडीकर, लीला लिमये, मालती पांडे, जी. एन. जोशी इ अनेक स्वातंत्र्यपूर्व काळातील लोकप्रिय झालेले गायक, गायिका मेळयांनी दिले, प्रत्यक्ष महाराष्ट्राचे लाडके गायक नारायण राजहंस उर्फ बालगंधर्व यांना गणेश उत्सवातील मेळयातूनच किर्लोस्कर

कंपनीने प्रथम हेरले ते जळगाव मुक्कामी असताना, बालगंधर्व व विष्णुपंत नातू मेळयातून बालपणी गात. आज ज्याप्रमाणे सारेगमच्या लिटल चॅम्पच्या चढाओढीतून गावोगावचे बालगायक समोर येतात तद्वतच १०० वर्षामागे या गणोत्सवातील मेळयांनी गायन संगीताच्या थोर परंपरेला जन्म दिला यात शंकाच नाही."[१८]

**राजकीय प्रतिकिया —**

**महात्मा गांधी —**

महात्मा गांधीनी मृत्युलेखाद्वारे आदरांजली वाहताना असे म्हटले होते की, "लोकमान्य बाळ गंगाधर टिळक कालवश झाले आहेत यावर विश्वास बसणेच कठीण आहे, इतके ते जनतेशी एकरूप झालेले आहेत ! बहुजन समाजाच्या मनावर त्यांच्याइतकी घट्ट पकड आमच्या काळातल्या दुस—या कोणाही व्यक्तीची नव्हती ! हजारो देशबांधवांची त्यांच्यावरील निष्ठा असाधारण होती. ते जनतेचे दैवतच बनले होते यात वाद नाही.हजारो लोक त्यांच्या शब्दालाच कायदयाचा मान देत! एक महापुरूष कायमचा निद्राधीन झाला !केसरीची गर्जना बंद पडली! जनमनावर त्याची एवढी बळकट पकड बसली याचे कारण तरी कोणते? मला वाटते याचे उत्तर अगदी सोपे आहे. त्यांची देशभक्तीची दुर्दम्य भावना । देशप्रेमा व्यतिरिक्त दुसरा कोणताच धर्म त्यांना माहित नव्हता ! ते जन्मताच लोकशाहीवादी होते. !"

"बहुमताच्या शासनावरील त्यांची निष्ठा इतकी प्रगाढ होती, की मला तिची जवळजवळ भितीच वाटे, पण ती मुळेच त्यांची जनतेवर इतकी पकड बसली. स्वत:ला लाभलेला पोलादी इच्छा शक्तीचा उपयोग त्यांनी देशाच्या सेवेसाठीच केला. त्याचे जीवन उघडया ग्रंथासारखे होते. त्यांची अभिरूची साधी होती, त्याचे खाजगी जीवन धुतल्या तांदळासारखे अगदी निर्मळ व पवित्र होते. लोकमान्यांइतक्या अव्याहत हिरीरीने स्वराज्याच्या संदेशाचा प्रचार दुस-या कोणीही व्यक्तीने केला नाही.।"

"त्यामुळेच त्यांच्या देशबांधवाचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास असे. अदयाप जन्माला न आलेल्या पिढयांना त्याचे नाव 'आधुनिक भारताचे शिल्पकार' म्हणूनच सांगितले जाईल. आपल्यासाठी जगलेला आणि आपल्याचसाठी मरण पावलेला थोर पुरूष म्हणून त्या पिढया त्यांच्या स्मृतीला आदराजलीही अर्पण करतील !"१९

**गोपाळकृष्ण गोखले यांची प्रतिक्रिया —**

"लोकमान्य टिळकांविषयी गोखले असे म्हणतात की, "टिळकांत दोष असतीलही मलाही त्यांच्याशी स्पष्ट शब्दांत बोलून अनेक गोष्टी निकालात काढायच्या आहेत. पण तुम्ही कोण असे लागून गेलात? तुम्ही तर त्यांच्या पासंगाला देखील पुरणार नाही ! ते एक थोर पुरूष आहेत. त्यांची स्वाभाविक गुणसंपदा पाहिल्या प्रतिची असून त्यांनी तिचा देशसेवेसाठी परिपोषही घडवून आणलेला आहे. त्याचे मार्ग मला मान्य नाहीत, पण त्यांच्या हेतुविषयी मात्र मी कधीच आक्षेप घेणार नाही. माझ्यावर विश्वास ठेवा. देशासाठी दुस-या कोणीही एवढा महान त्याग केलेला नाही. हा लढा देताना अनेक वेळा त्यांनां सर्वस्वालाही मुकावे लागेल ! पण प्रत्येक वेळी अगदी अत्यंत अद्वितीय घडाडीने, धीमेपणाने आणि धैर्याने सारी जुळवाजुळव फिरून नव्याने केली. हे गुण इतक्या प्रकर्षाने इतर कोणात आढळणार नाहीत."२०

**श्रीयुत धुडिराजपंत ठेंगडी यांची स्वदेशी संदर्भातील आठवण —**

स्वदेशी ! श्रीयुत धुंडिराजपंत ठेगडी इंजिनियर हे राष्ट्रीय पक्षाचे कट्र अभिमानी होते. त्यांनी स्वदेशी संदर्भात आपली आठवण स. वि. बापटांना सांगितली होती ठेंगडी म्हणाले की "जन्मभर माझ्या लक्षात राहिल अशी फक्त टिळकांची एकच आठवण मला माहिती आहे. कारण तिचा माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला असून माझ्या राष्ट्रीय विचारसरणीस

त्यामुळे निराळे वळण लागलेले आहे. १९०५ सालची ती गोष्ट असावी. देशात स्वदेशी चळवळीस नुकताच प्रारंभ झालेला होता व टिळकांनी तीचा विलक्षण रितीने पुरस्कार चालविला होता. मी युरोप वगैरे देशातून जाऊन आल्यामुळे व आमचे अर्थशास्त्राचे ज्ञान केवळ पुस्तकी विद्येपलीकडे न गेले असल्यामुळे, मला देशातील या स्वदेशी चा अर्थच कळत नसे. म्हणून मी एकदा लोकमान्यांकडे गेलो व त्यांस विचारले की “या चळवळीने आपण मानव जातीच्या उत्कर्षास विघ्न आणीत आहात. खुल्या व्यापाराचे तत्व आपणांस मान्य असू नये हा चमत्कार आहे ! कोणत्या दृष्टीने आपण स्वदेशीस उचलून धरता? हे ऐकून लोकमान्य हसले व म्हणाले “सर्व मानवजातीच्या दृष्टीने विचार कराल तेव्हा तुमचेच म्हणणे खरे आहे पण आज प्रथम आपणास आपल्या देशापुरताच विचार करावयाचा आहे ना? शरीराच्या एकाच अवयवांतून रक्तस्त्राव होत असल्यास, बाकीच्या सर्व अवयवांकडे दुर्लक्ष करून प्रथम लक्ष याच अवयावकडे दयावे लागते, हे तुम्हास कबुल आहे ना? त्याचप्रमाणे सरकारने नामशेष केलेल्या व धुळीस मिळवलेल्या आपल्या देशातील उदयोगधंदयांचे प्रथम संरक्षण करून, त्यांस उत्तेजन देऊन, नंतर त्यांची भरभराट झाल्यावर मग तुम्ही म्हणता त्या तत्वज्ञानास प्रारंभ होतो. एरवी हा वेदान्त खोटा आहे व म्हणूनच स्वदेशी चळवळ केल्याखेरीज गत्यंतर नाही. लोकमान्याच्या या उद्‌देशाने माझाी पूर्ण समजूत पटली व तेव्हापासून शरीराने व मनाने मी पुर्ण स्वदेशी बनलो.।”[२१]

अशाप्रकारे अनेकांना टिळकांनी आपल्या चळवळीत सहभागी करून अनेकांची मते वळविली.

**स्वदेशी विषयी श्री शिवराम महादेव परांजपे यांचा लेख —**

टिळकांच्या स्वदेशी मोहीमेस मिळालेले यश किती मोठे होते हे सांगताना श्री शिवराम महादेव परांजपे असे लिहीतात की, “लोकमान्य

टिळकांनी केसरीमधुन स्वदेशी व्रताचा उपदेश करण्यास सुरूवात केल्यापासून लोकांमधील पुर्वीचा उत्साह जास्त-जास्तच वाढला. केसरीच्या अग्रलेखामध्ये स्वदेशी चळवळीच्या विषयी सांगोपांग चर्चा होऊ लागली. आमच्या देशाची हल्लीची स्थीती, स्वदेशी चळवळीचा अर्थ, संरक्षित व्यापार व स्वतंत्र व्यापारी ही इंग्लडमधील तत्वे हिंदुस्थानात लागु करावयाची की नाही याबद्दल विचार इ. स्वदेशी चळवळीशी संबध असलेल्या अनेक प्रश्नांचे विवेचन केसरीतून प्रसिध्द होऊ लागले. ठिकठिकाणच्या चळवळी व व्याख्याने याचे सारांश केसरीतून प्रसिध्द होऊ लागले. केसरी वर्तमानपत्र हे स्वदेशी चळवळीची एक एनसायक्लोपिडीया बनून गेले अशा रितीने स्वदेशी चळवळीला महाराष्ट्रामध्ये मोठे प्रोत्साहन मिळाले."[२२]

**रविंद्रनाथ टागोर — लोकमान्य टिळकांची स्वराज्याची चळवळ यावर मत—**

"टिळकांनी आपला प्रतिनिधी माझ्याकडे पाठवून मी इंग्लडच्या दौ-यावर जावे असे सुचवून ५० हजार रूपयांची मदत देण्याचे अभिवचन दिले. मला विशेष आश्चर्य हे वाटले की, टिळकांनी असे स्पष्टपणे कळविले की, राजकीय प्रचाराची ते माझ्याकडून अपेक्षा करीत नव्हते, मी स्वताशीच प्रामाणिक रहावे आणि मानवजातीची सेवा करण्याचा जो मार्ग मी स्वीकारला आहे त्या मार्गानेच भारताची सेवा करावी असे सुचविले आहे. टिळकांचा हा संदेश हा माझा श्रेष्ठ गौरव होता असे मी मानतो, मी कदाचित त्याला लायक नसेनही. परंतु टिळकांच्या व्यक्तीमत्वाचा मोठेपणा व त्यांच्या संदेशातून प्रत्ययास आला आणि त्याचा माझ्या मनावर फार मोठा परिणाम झाला. भारताच्या भवितव्याविषयीचे लोकमान्यांचे विचार अतिशय विशाल असे होते. स्वातंत्र्याला अनेक पैलू असतात आणि म्हणून वेगवेगळया त-हांचे खास गुण अंगी असलेल्या सर्वांना

स्वातंत्र्यासाठी करावयाच्या चळवळीत आपापल्या पध्दतीने सहभागी होता येते, हे ते अचूकपणे जाणत होते."[२३]

**हिंदू मस्लीम ऐक्य — बॅ जिना यांची प्रतिक्रिया** —

हिंदू मुस्लीम ऐक्य लोकमान्य टिळक होते म्हणून घडून आले या संदर्भात बॅ जीना म्हणाले, "लोकमान्य टिळकांनी हिंदू मुस्लीम ऐक्य घडवून आणण्यात फार महत्वाची कामगिरी करून देशाची थोर सेवा केली. त्यांच्यामुळेच लखनौ करार घडून आला असे उदगार काढेल आहेत."[२४]

**लोकशाही सर्वांगीण सुधारणा—टिळकांच्या मतावर आगरकरांचा अभिप्राय** —

लोकमान्यांनी अखेरीस स्वराज्याच्या लढयात शांततेने व स्वार्थत्यागाने लढणारे ते सर्व ब्राम्हणच आहेत. मग ते जातीने कोणीही असोत असा उपदेश करून याच वृत्तीचा अवलंब करीत गेल्याने जन्मसिध्द चातुवर्ण नष्ट होऊन गुणकर्मप्रधान वर्णव्यवस्था स्थापन होऊ शकेल असे 'राष्ट्रसभानिष्ठ लोकशाही पक्ष' स्थापन करताना लोकांना सांगितले. तात्पर्य लोकमान्यांना लोकशाही आपल्या देशात येत आहे व तदनुरूप आपल्या पुर्वापार सामाजिक व धार्मिक आचारविचारात फेरफार होत जाणार हे दिसत असले, तरी त्यावर भर देणे हे लोकांचे लक्ष गौण गोष्टीकडे खेचुन मुख्य स्वराज्याच्या कार्यात अडथळे उत्पन्न करते असे वाटत असे.

यावर आगरकर म्हणतात "या देशात ज्या विद्वतेचा पाया शिरला आहे, ती आमच्या राज्यविषयक विचाराप्रमाणे आमच्या धार्मिक व सामाजिक विचाराही प्रचंड क्रांती करणार आणि तदनुसार आमचे आचरण बदलत जाणार आमच्या अर्वाचीन विचारास ज्या धार्मिक व सामाजिक गोष्टी अप्रशस्त वाटू लागल्या आहेत, त्यांस शेकडो मनूंचे व सहस्त्रावधि पाराशरांचे आधार दाखविलेत व त्यांचा प्रसार न व्हावा म्हणून त्यांच्या कोटयावधी लोकांचा मूर्खपणा वृथा धर्माभिमान आणि उठावणीचे आरडे

आणून घातलेत, तरी त्याप्रमाणे पर्वताच्या माथ्यावरील सरोवराच्या भिंती फोडून तुफान वेगाने कडयावरून पडू लागलेल्या वरिवाहाची गति कुंठित करण्यास कोणीही धजत नाही, त्याप्रमाणे आमच्या मूर्खपणाच्या सामाजिक व धार्मिक समजुतीस लागलेला वणवा कोणत्याही अजागळ किटकांच्या शुद्र पक्षवाताने किंवा मोठया किडयांच्या शुष्क श्वासवाताने विझण्याचा मुळीच संभव नाही."[२५]

**<u>ग्रंथविषयक प्रतिक्रिया</u> —**

**<u>सुभाषचंद्र बोस</u> —**

टिळकांसारख्या ज्ञानयोगाच्या वास्तव्याने मंडलेचा तुरूंग पुनीत झाला. या संदर्भात बाबु सुभाषचंद्र बोस आपली आठवण सांगताना असे लिहितात की,

"१९२५ च्या जानेवारीच्या अखेरीस मला मंडालेल्या तुरूंगात पाठविण्यात आले आणि तेव्हाच लोकमान्यांना बंदिवासात ठेवले होते ती जागा मी पाहिली. हवा इतकी वाईट होती की, आमच्यापैकी कोणलाही बौध्दीक श्रम करण्याची ताकद नव्हती. त्यावेळी लोकमान्य टिळक तेथे ५ वर्षाहुन अधिक काळ सतत बौध्दिक जीवन कसे जगले हे मला आठवले. जगापासून दूर, एका कोठडीत शरीराच्या दुर्बल अवस्थेत ग्रंथवाचनात आणि ग्रंथलेखनात रंगुन जाणे हे एखादया ज्ञानयोग्यालाच शक्य होते. त्या ठिकाणी लोकमान्यांनी गीतारहस्य लिहीले, तेथे जाणे ही मला मोठी भाग्याची गोष्ट वाटली, शेवटी बाबु लिहितात लोकमान्य टिळकांसारख्या थोर देशभक्ताच्या स्मृतीने उजळुन गेलेल्या मंडालेच्या त्या तुरूंगात जाणे खरोखरच माझ्यासारख्या राजकीय कार्यकर्त्यांच्या जीवनातील परमपवित्र यात्राच होती."[२६]

आचार्य जावडेकर आपल्या आधुनिक भारत या ग्रंथात लिहीतात की, "टिळकांनी मनुष्यसमाजाला नितिशास्त्र हवे असेल तर अध्यात्मशास्त्राला

सोडून चालणार नाही हे सिध्द करण्यासाठी आपल्या आयुष्याच्या अखेरीस गीतारहस्य लिहीले."[२७]

**गीतारहस्यावर भा. कृ. केळकर यांची प्रतिक्रिया —**

भा. कृ केळकर आपल्या 'टिळक विचार' या ग्रंथात असे लिहीतात की, "भारताला स्वतःच्या जीवनतत्वज्ञानावर आधारलेले नितिशास्त्र आहे हे सिध्द करणे हे गीतारहस्य लिहिण्याचे पाहिले राष्ट्रीय उद्दिष्ट होते. भारताच्या राष्ट्रीय पुनरूत्थानाला राष्ट्रधर्माची संस्थापना आवश्यक आहे म्हणून गीतेतील कर्मयोगशास्त्र पुन्हा मांडले पाहिजे ही टिळकांची दुसरी सामाजिक प्रेरणा होती. वैयक्तीक व सामाजिक जिवनात निवृत्तीमार्गापेक्षा ईश्वरर्पित कर्मावर आधारलेला कर्मयोग हाच अनुकरणीय आहे तेव्हा वैयक्तीक व राष्ट्रजीवनाला कर्मप्रवण अध्यात्माची बैठक देणे हीच भारताची परंपरा आहे. पाश्चात्य नितिविचारांचा त्यांच्या सामाजिक मुल्यांचा तौलानिक अभ्यास करून गीताधर्माची फेरमांडणी करणे हा गीतारहस्याचा तिसरा हेतू होता.".[२८]

**ग्र. प्र. प्रधान —**

ग प्र. प्रधान आपल्या लोकमान्य टिळक या ग्रंथात असे लिहीतात की, "भगवद्‌गीता हे लोकमान्य टिळकांच्या जीवनाचे अधिष्ठान होते. भारतीय जनतेत स्वातंत्र्याची आकांक्षा जागृत करताना जनतेला प्रवृत्तीपर जीवनाचा संदेश भगवदगीतेच्या माध्यमातून देता येईल असे टिळकांना मनोमन वाटले. स्वतः कर्मयोग्याचे जीवन जगताना कर्मयोगाचा संदेश लोकांना देऊन त्यांच्यामधील पराक्रम जागृत करण्यात लोकमान्यांना आपल्या जीवनाची सफलता होईल असे वाटत होते. या अर्थाने गीतारहस्य हा त्यांच्या जीवनाचा सर्वात उदात्त आणि अंतिम अध्याय होता असे म्हटले पाहिजे."[२९]

**डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन —**

टिळकांच्या मृत्युनंतर लिहिलेल्या लेखात म्हणतात की, "Mr Tilak makes out a case that the gita, which has a supreme place in the spiritual life of India stands for the do and dare spirit. The Bhagwad gita is designed as a solution of universal problem of life. It reconciles spiritual freedom with work in the world." [३०]

**सदानंद मोरे** —

रविवार दि २० जुलै २००८ सकाळ मधील 'लोकमान्यांचा तिसरा तुरूंगवास' या लेखात लिहीतात की, "मंडाले येथे शिक्षा भोगत असताना आयुष्याचा दुसरा डाव खेळणा-या टिळकांनी अद्वितीय अशा गीतारहस्य ग्रंथांची निर्मिती केली. गीतेचा कर्मयोगपर अन्वयार्थ लावणा-या या, ग्रंथामधून टिळकांनी आपल्या आजवरच्या राजकीय कृतीची सैंध्दांतिक बैठकच विशद करून सांगितली या एका वेगळया अर्थानेही टिळकांना झालेली शिक्षा फलप्रद ठरली."[३१]

**<u>सारांश</u> —**

- पाश्चात्य जीवनाशी ओळख झाल्यावर राष्ट्रवाद आणि लोकशाही या उदात्त विचारसरणीचे बीजरोपण व्हावे यासाठी टिळकांनी आवश्यक अशा संस्थात्मक जीवनाचा पाया रचला. हे उदात्त विचार त्यांनी अनेक कार्यक्रमाच्या माध्यमातून लोकांपर्यत नेण्याचे काम केले.
- राष्ट्रवाद स्वीकारून हिंदुस्थानातील भिन्न धर्म, विविध जाती, भाषा, जीवनपध्दती यासर्वात ऐक्य निर्माण झाले पाहिजे तरच आपला तरणोपाय आहे अशी त्याची ख्याती पटली होती असे दिसून येते. त्यासाठी त्यांनी एक राजकीय आकांक्षा उत्पन्न करून स्वराज्याशिवाय तरणोपाय नाही हे लोकांना पटवून दिले व एकात्मता निर्माण होण्यासाठी लोकांना शिकवण दिली.
- स्वराज्य म्हणजे सर्वसामान्य माणसाचे राज्य असाच अर्थ लोकमान्यांना अभिप्रेत होता असे दिसून येते. सामान्य माणसांच्या अंतकरणात देशभक्तीची ज्योत त्यांनी प्रज्वलित केली व स्वराज्याचा मूलमंत्र देताना प्रजासत्ताक राज्य हा अर्थ लोकांच्या मनावर त्यांनी बिंबवला व सामान्य माणसाचा स्वाभिमान जागृत करून त्यांना त्यांनी कृतिशिल व आत्मविश्वासू बनविले.
- लोकमान्य टिळकांनी आपल्या आयुष्यात राजकारण करताना धर्म या संकल्पनेचा विचार केलेला दिसून येतो. त्यासाठी त्यांनी गणपती उत्सव, शिवाजी—उत्सव, किर्तन, नाटक, मेळे, इ. व्यासपिठावरून त्यांनी आपले विचार मांडून सामाजिक ऐक्य व जागृती, व लोकसंघटन करण्याचा प्रयत्न केला. या व्यासपिठाचा वापर त्यांनी राष्ट्रीय जागृती करण्यासाठी, प्रबोधनासाठी व स्वराज्य मिळविण्याच्या कामी एक साधन म्हणून केला असे उपलब्ध साधनावरून दिसून येते.

- गणेश उत्सवातून त्यांनी लोकसंघटन केले, तर शिवाजी उत्सवातून त्यांनी स्वाभीमानाची भावना लोकांत निर्माण केली. स्वराज्य स्थापनेच्या कार्यात सर्वांना सर्व धर्मियांना कर्तबगारीनुसार, परधर्म सहिष्णुवृत्तीने वागवून संधी दिली. त्यांच्या उत्सवात परधर्मीय व बहुजन समाज आनंदाने सहभागी झाले. दोन धर्मीयात एकोपा वाढीस लागणे हे उत्सवाचे गमक आहे असे दिसून येते.
- उत्सवांच्या माध्यमातून त्यांनी चतु:सूत्रीचा प्रभावीपणे वापर केला. जुना आधार व नवीन संस्कार मिळून हा उत्सव त्यांनी बनविलेला होता असे दिसून येते. त्यांच्या कार्यावर देशी व विविध परदेशी विचारवंतांनी व त्यांच्या समकालीनांनी विविध प्रतिक्रिया व्यक्त केलेल्या आहेत.
- सर व्हॅलेंटाईन चिरोल यांनी आपल्या 'इंडियन अनरेस्ट' या ग्रथांत त्यांच्या गणपती उत्सवाला कौतुकाची थाप देऊन त्यामुळेच त्यांच्या चळवळीचे क्षेत्र विस्तृत झाले असे, सांगुन शिवाजी उत्सव सुरू करून त्यांचा फायदा टिळकांनी राजकीय कार्याकरीता करून घेतला असे म्हटले आहे.
- अहमदनगरचे डिस्ट्रीक्ट मॅझिस्ट्रेट म्हणतात, 'हा उत्सव राजकीय शिक्षणाचे साधन बनला आहे.'
- गणपती उत्सवा संदर्भात क्रांतीकारक श्री खानखोजे यांनी सार्वजनिक गणपती उत्सवाने देशभक्तीच्या प्रचारार्थ 'राष्ट्रीय उत्सव' असे स्वरूप प्राप्त झाले असे म्हटले आहे.
- गणपत्युत्सव करण्यात लोकमान्यांचा राष्ट्रीय व राजकीय जागृती करण्याचा उद्देश होता असे जावडेकर म्हणतात.

- विद्वांस महादेव धोंडो असे लिहितात की, धर्माचा टिळकांनी राष्ट्रीयत्वाची भावना जागृत करण्याकडे टिळकांनी उपयोग केला व त्यांनी स्वधर्माचा उज्वल अभिमान लोकात उत्पन्न केला.
- श्रीनिवास बनहट्टी यांच्या निबंधावरून असे आढळून येते की, जनतेलाच त्यांनी परमेश्वर मानले व अद्वितीय लोकसंग्रहयोग त्यांनी साधला. या लोकसंग्रहाचे मूळ त्यांच्या धर्मबुध्दीत होते हेच त्यांच्या धार्मिक जीवनाचे रहस्य होय असे दिसून येते.
- गणेश आळतेकर यांच्या निबंधात त्यांनी लोकमान्यांच्या सामर्थ्य प्राप्त होण्याला आपले तत्वज्ञान, संस्कृती, तीचा प्राचीनपणा, महत्व व श्रेष्ठत्व त्यांनी 'ओरायण', 'आर्यांचे उत्तर धृव्रावरील वसतिस्थान' आणि 'गीतारहस्य' इ. ग्रंथाच्या आधारे त्यांनी प्रस्थापित केले हे त्यांना धर्मभावनेमुळेच प्राप्त झाले असे म्हटले आहे.
- प्रभाकर बापट धार्मिक इतिहासात त्यांचे महत्व पुनरूज्जीवनाच्या सिध्दांतांची स्थापना, धर्मोपदेशकाचे त्यांनी केलेले कार्य, प्रवृत्ती मार्गाची स्थापना या तीन प्रकारांनी करतात.
- सर्वसामान्य जनतेचे त्यांच्यावर किती प्रेम होते हे स. वि. बापटांच्या आठवणी वरून व लोक त्यांना देव मानत यावरून आपल्या लक्षात येते.
- गंगाधर देशपांडे यांच्या आठवणीवरून लोकमान्य 'किर्तनाला' किती महत्व व मान देत हे आपल्या लक्षात येते. सर्वधर्मीय जनतेत लोकमान्यांना किती आदराचे स्थान प्राप्त झाले होते हे स. वि. बापटांच्या आठवणीवरून आपल्या लक्षात येते.
- टिळकांची मुसलमानांनी अजमेरला जी मिरवणूक काढली त्यावरून मुसलमांनानी लोकमान्यांचा अपूर्व जयजयकार केला असे आपणास

दिसून येते. हिंदू—मुस्लीम ऐक्यासंदर्भात बॅ. जिना लोकमान्यांची देशासाठीची थोर सेवेचा गौरव करताना दिसून येतात. तर महात्मा गांधी त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून गौरवताना दिसतात.

- धुंडीराज पंत ठेंगडी यांनी स्वदेशी चळवळीत लोकमान्य लोकांना कसे सामील करून घेत हे त्यांच्या उदाहरणावरून आपण दिसून येते, तर रविंद्रनाथ टागोर स्वातंत्र्य चळवळीत सर्वानी सहभागी होवून आपल्या मार्गाने योगदान देता येते, या टिळकांच्या विचारांच्या गौरव करताना दिसतात.
- टिळकांच्या लिहिलेल्या विविध ग्रंथावर देखील विविध लेखकांनी/विचारवंतानी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. प्रो. व्हीटने यांना टिळकांची प्रमेये महत्वाची व दीर्घ परिणामी वाटतात तर ए. ओ हयुम यांना टिळकांचे संशोधन म्हणजे मैलाचा दगड वाटतो. तर पॉल केरस यांनी आर्कटिक होमच्या सिध्दातांना संमती दिलेली दिसून येते.
- टिळकांच्या 'गीतारहस्यासंबधी' शं. द. जावडेकर असे लिहीतात की, "नितीशास्त्र हवे असेल तर अध्यात्मशास्त्र सोडून चालणार नाही हे सिध्द करण्यासाठी टिळकांनी 'गीतारहस्य' लिहिले असे सांगतात. तर भा. कृ. केळकरांच्या टिळक विचारातून असे दिसून येते की, भारताला स्वत:च्या जीवन तत्वज्ञानावर आधारलेले नितिशास्त्र आहे हे सिध्द करणे हा गीतारहस्य लिहिण्यामागचा उद्देश होता.
- ग. प्र. प्रधान यांच्यामते स्वत: कर्मयोग्याचे जीवन जगताना कर्मयोगाचा संदेश लोकांना देवून त्यांच्यामधील पराक्रम जागृत लोकमान्यांनी केला. या अर्थाने 'गीतारहस्य' त्यांच्या जीवनाचा उदात्त आणि अंतिम अध्याय होय असे वाटते. सदानंद मोरे

यांच्यामते राजकीय कृतीची सैध्दांतिंक बैठक म्हणजे ‘गीतारहस्य’ असे त्यांनी म्हटले आहे.

- एकंदरित लोकमान्यांनी आपल्या धर्म या संकल्पनेत उदात्त विचारांचा अवलंब करून त्याग, परोपकार, सहिष्णुता, बंधुभाव, जेष्ठांचा आदर सहनशिलता, दया, क्षमा, शांती, शिल, चारित्र इ गुणांचा अवलंब करून राष्ट्रसंर्वधन केले व त्यांच्या धर्मभावनेचा हा व्यापक अर्थ त्यांनी समाजापुढे मांडला असे दिसून येते.

**<u>संदर्भ सूची</u>** —


१) केळकर न. चिं., 'टिळक चरित्र', खंड क्र १, पुणे १९२३ पृ. ४१९

२) पाटील सु. गो. 'गणेश व शिवजंयती उत्सव यांचे भारतीय स्वातंत्र्य लढयातील योगदान' एम्. फिल. अप्रकाशित संशोधन प्रबंध टि.म.वि. पुणे डिसेंबर २००० पृ. ५३

३) जोग ना. गो., 'लोकमान्य बाळ गगाधर टिळक', प्रकाशन विभाग दिल्ली १९७२ पृ. ४९

४) बापट स. वि., 'लोकमान्य टिळकांच्या आठवणी व आख्यायिका' खंड क्र. ०२ पुणे १९२५ पृ. ४०८

५) जोग ना. गो. उपरोक्त पृ. १०८

६) केळकर न. चि., उपरोक्त पृ. ६३९, ६४०

७) केळकर न. चि., उपरोक्त पृ. ६४३

८) धोंडो विं. म., 'लोकमान्य टिळकांचे आध्यात्मीक जीवन', पुणे १९४५ पृ. ३२,३३

९) केळकर न. चिं., 'लोकमान्य टिळकांची धर्मविषयक मते', पुणे १९२५ पृ. १४४

१०) किता. पृ. ९५

११) कित्ता. पृ. ५१ ते ५६

१२) कित्ता. पृ. २०९

१३) करंदीकर ज. स., 'गणपती उत्सवाची ६० वर्षे', केसरी प्रकाशन पुणे १९५३ पृ. २५

१४) बापट स. वि.,लोकमान्य टिळकांच्या आठवणी व आख्यायिका, खंड क्र. २, पुणे, १९२५, पृ. २५२

१५) कित्ता, पृ. ३७७.

१६) बापट स. वि.,लोकमान्य टिळकांच्या आठवणी  व आख्यायिका, खंड क्र. २, पुणे, १९२५, पृ. ४७०

१७) शेवाळकर राम 'दुरितांचे तिमिर जावो',३१/८/०८ दै.लोकमत पृ. ०१

१८) साठे श्रीनिवास, 'गणेशोत्सवातील संगीतमय स्वातंत्र्य चळवळ' पुणे वृत्तांत

१९) जोग ना. गो. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, प्रकाशन विभाग, दिल्ली, १९७२, पृ. १९५, १९६

२०) कित्ता, पृ. २१३.

२१) बापट स. वि., उपरोक्त पृ. ४५२, ४५३

२२) केळकर भा. कृ, टिळक विचार, श्रीविद्याप्रकाशन, पुणे, १९८१, पृ. १६६, १६७.

२३) प्रधान ग. प्र.,'लोकमान्य टिळक', एन. बी. टी दिल्ली २००८ पृ. १०७

२४) कित्ता. पृ. ९४

२५) जावडेकर शं. द., 'आधुनिक भारत', सुलभ राष्ट्रीय ग्रंथामाला पुणे १९५३ पृ. २२४

२६) प्रधान ग. प्र., उपरोक्त पृ. ८२

२७) जावडेकर शं. द., उपरोक्त पृ. २२४

२८) केळकर भा. कृ., उपरोक्त पृ. २९२

२९) प्रधान ग. प्र., उपरोक्त पृ. १२१

३०) केळकर भा. कृ., उपरोक्त पृ. २९२

३१) मोरे सदानंद 'लोकमान्यांचा तिसरा तुरूंगवास' दै. सकाळ दि. २०/७/२००८

# प्रकरण ६ वे

## उपसंहार

एकोणिसाव्या शतकाचा पूर्वार्ध पुर्णपणे रूढींच्या बंधनात बंदिस्त होता. सर्व व्यवहार धर्म व रूढींच्या बंधनात होते. समाज जीवनावर व व्यवहारावर संपुर्णपणे धर्माचा पगडा दिसून येतो. लोकमान्य टिळकांच्या वैचारिक जडणघडणीवर तत्कालीन धार्मिक परिस्थितीचा प्रभाव पडलेला दिसतो. त्याकाळात हिंदूधर्माला अवकाळा प्राप्त झाली होती. कर्मकांड म्हणजे धर्म अशी समाजाची धारणा बनलेली होती. तर दुसऱ्या बाजुला हिंदूधर्मातील इंग्रजी विचार व शिक्षणामुळे प्रभावीत झालेला सुशिक्षित हिंदू धर्म सुधारण्यासाठी प्रयत्न करीत होता असे दिसते. १९ व्या व २० व्या शतकातील राजकारण हे टप्प्याटप्प्याने प्रगत होत गेले असे दिसून येते. महाराष्ट्रात सुरूवातीला इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर कोणतेही आमुलाग्र बदल केलेले एलफिन्स्टनने दिसून येत नाहीत. याउलट त्याने न्याय, शिक्षण, समाजजीवनातील नव्या कल्पना राबविल्याचे आढळून येते.

१९ व्या व २० व्या शतकामध्ये प्रथम इंग्रजी राजवटीविरूध्द छापखाने व वृत्तपत्रे यांच्यामार्फत लोकमत व्यक्त होवू लागले असे दिसून येते. विविध वृत्तपत्रांतून बुध्दिजीवी मध्यमवर्गाने आपल्या आशा, आकांक्षा, प्रजेची गाऱ्हाणी मांडलेली दिसून येतात, वृत्तपत्रातून राज्यपध्दती,शिक्षणप्रसार, ज्ञानप्रसार, धर्मप्रचाराला आळा, सामाजिक प्रश्न इत्यादी विविध बाबींवर लिहिले जात होते असे दिसून येते. पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावामुळे पाश्चात्त राष्ट्रातील राजकीय तत्वज्ञानाचा परिचय होत चालला होता.त्यामुळे देशाच्या विविध भागांमध्ये आपले राजकीय आस्तीत्व प्रगट करण्यासाठी विविध संस्था स्थापन झाल्याचे दिसून येते. न्या.रानडयांनी राजकीय सुधारणांची मागणी करताना जबाबदार व सनदशीर राज्यपध्दतीचा पुरस्कार केलेला आढळून येतो. न्या.रानडे यांनी ‘भारतीय

अर्थशास्त्राची’ रूपरेखा आखुन महत्वाची कामगिरी करून अर्थिक राष्ट्रवाद प्रगट केला व त्यामुळे हिंदी राष्ट्रास मर्यादित राजकीय सत्तेच्या योगाने अर्थविषयक कल्पनांस मूर्तस्वरूप प्राप्त झाल्याचे दिसून येते. लोकमान्य टिळकांच्या पूर्वसुरींनी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धर्मविषयक जागृती इत्यादी क्षेत्रात कार्य केल्याचे आढळून येते. टिळकांच्या पुर्वसुरींचे व समकालिनांचे लोकमान्य टिळकांच्या राजकारणात योगदान असल्याचे आढळून येते. त्या काळामध्ये महाराष्ट्रातील ब्राम्हण व ब्राम्हणेतर सांस्कृतिक चळवळीविषयीचे वृत्तपत्रांतून परस्परविरोधी लेखन केल्याचे आढळते. ब्राम्हणी धर्माच्या शोषणाचे बळी ठरलेल्या स्त्री शुद्रांना माणूस म्हणून जगण्याची प्रेरणा व शक्ती महात्मा फुले यांचा विचार, लेखन व कार्य यामुळे मिळाली. त्यामुळे महाराष्ट्रात ब्राम्हणी सांस्कृतीला पर्याय देणारी अब्राम्हणी संस्कृति महाराष्ट्रात रूजली गेल्याचे आढळते.

महात्मा जोतीबा फुले यांनी सुरू केलेल्या ब्राम्हणेतर चळवळीचे वाहक या नात्याने कोल्हापूरचे धत्रपती शाहू महाराज यांचे विचार व कार्य यांचा उल्लेख करता येतो. कोल्हापूरच्या दरबारात निर्माण झालेले विविध धार्मिक प्रश्न आणि त्यात ब्राम्हणी धर्म व संस्कृतीची असलेला संबंध विचारात घेता ही बाब ही समस्या ब्राम्हणी संस्कृति आणि अब्राम्हणी संस्कृती यांच्या संघर्षाचे प्रतीक मानावी लागते. हिंदू धर्म व संस्कृतीवर खिस्ती मिशनऱ्यांकडून होत असलेल्या आघाताला प्रत्युत्तर म्हणून महाराष्ट्रातील विव्दान विचारवंत आपल्या परीने विविध प्रयत्न करताना आढळून येतात. इंग्रजांच्यां आगमनामुळे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली. त्यामुळे भारतीय संस्कृतीतील वैगुण्य, खुळचट चालीरीती याबाबत आत्मचिंतन करत सुधारणा घडवू पाहणारा शिक्षितांचा नवा वर्ग समाजात उदयाला आला. त्यामुळे महाराष्ट्रातील सांस्कृतिक जिवनाचा नवा पैलू पुढे आलेला दिसून येतो. लोकमान्य टिळकांच्या वैचारिक जडणघडणीवर व

लेखनावर तत्कालीन धार्मिक परिस्थितीचा प्रभाव पडलेला दिसून येतो. धर्म ही समाज परिवर्तन करणारी, समाजाला वळण लावणारी, नैतिक मार्गदर्शन करणारी संस्था आहे अशी टिळकांची भूमिका होती. टिळकांचे धर्माविषयी सहिष्णुतावादी विचार होते. इतर धर्माचे सहआस्तीत्व ते मानीत.राष्ट्राच्या प्रगतीला धार्मिक शिक्षणाची अत्यंत जरूर आहे असे त्यांचे मत असल्याचे दिसून येते.

लोकमान्यांच्या राष्ट्रीयत्वात 'हिंदूत्वरक्षण' हे प्रमुख तत्व व्यापक धर्मभावनेच्या आधारावर असलेले दिसून येते. लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीयदृष्टया उत्सवांना महत्व दिलेले दिसून येते व धार्मिक उत्सव हे समाजकल्याणाच्या व लोकजागृतीच्या प्रक्रियेतील महत्वाचे घटक आहेत असे त्यांचे मत होते. राष्ट्राची उन्नती होण्यास धर्मोन्नति अत्यंत आवश्यक आहे. स्वधर्मअभिमान व परधर्मसहिष्णुता या गोष्टीद्वारे हिंदुस्थानात धर्मेक्य होऊ शकते असे त्यांचे मत होते. १९व्या व २० व्या शतकातील सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय विचारप्रवाहात लोकमान्य टिळकांनी तत्कालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपली राजकीय चळवळ चालविताना तत्कालीन सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परिस्थितीचा आपल्या राजकीय चळवळींसाठी उपयोग करून घेतला असे दिसते. याबाबत प्रकाशित, अप्रकाशित साधनामध्ये त्याबाबतची माहिती मिळते. लोकमान्य टिळकांच्या सांस्कृतिक, राजकीय व वैचारिक जडणघडणीमध्ये त्यांच्या पूर्वसुरीचां व समकालीन विचारवंतांचा प्रभाव असल्याचे आढळून येते.

विष्णुशास्त्री चिपळूकरांनी निबंधमालेतून तत्कालिन समाजाचे राजकारणाविषयी प्रबोधन केलेले दिसून येते. भारताच्या दरिद्रयाची मिमांसा दादाभाई नौरोजी, न्या.रानडे, जी.व्ही. जोशी, आर.एन. मुधोळकर यांनी केलेली दिसून येते. लोकमान्य टिळकांनी भारताच्या द्ररिदयांची मिमांसा

करताना ‘परकीय राज्य’ हेच भारताच्या गरीबीचे कारण आहे असे प्रतिपादन केलेले दिसून येते. १८८५ ते १९०५ या २० वर्षांत काँग्रेसने केलेल्या कार्याचा परिणाम दिसून येतो. याकाळात संपूर्ण देशात सरकारविरोधी असंतोष उत्पन्न होवून, एकराष्ट्रीयत्वाची भावना जागृत करण्याची महत्वाची कामगिरी काँग्रेसने केलेली दिसून येते. १८८५ ते १९०५ या २० वर्षांत कॉग्रेसमध्ये महाराष्ट्रातील विविध व्यक्तींनी भाग घेतलेला दिसून येते. महाराष्ट्रात लोकमान्य टिळकांच्या ‘स्वदेशी बहिष्कारयोग’ चळवळीमुळें एका नवीन युगाला आरंभ झाला असे दिसून येते. १९१६ ते १९२० या चार वर्षात लोकमान्य टिळक काँग्रेसचे प्रमुख सुत्रधार रहिलेले दिसून येतात. हा काळ काँग्रेसमधील ‘टिळकयुग’ होते, असे दिसून येते.

लोकमान्य टिळकांच्या जीवनाचा पहिला कालखंड महाराष्ट्राच्या दृष्टिने नवनवीन कल्पना व कार्य यासाठी करावयाच्या प्रगतीचा दिसून येतो. दुसऱ्या कालखंडात त्यांनी समाजाची राजकीय मनोवृत्ती जागृत केलेली दिसून येते. टिळकांच्या जीवनातील तिसरा महत्वाचा कालखंड स्वदेशी चळवळीचा प्रामुख्याने दिसून येतो. लोकमान्यांच्या जीवितकार्याचे अधिभौतिकदृष्टा सार काढले तर ते जनतेला आर्थिक निष्पीडनांतून मुक्त करण्याची व प्रत्येक हिंदवासियाला पोटभर अन्न मिळवून देण्याची खटपट होय असे आढळून येते. लोकमान्य टिळकांना भगवदगीतेतील,‘मासांना मार्गशीर्षहम या वचनाचा अर्थ गुढ वाटून त्यांनी त्यावर संशोधन करून ‘वेदकालनिर्णय’ (ओरायण) हा ग्रंथ लिहिला. ‘ अर्क्टिक होम इन द वेदाज या ग्रंथाव्दारे टिळकांनी आर्य संस्कृतीचा जन्म प्राचीनतम वेदकालापूर्वी कित्येक वर्ष झाला असे मानायला हरकत नाही असा सिध्दांत त्यांनी प्रस्थापित केला. गीतारहस्यांमध्ये कर्तुत्वशाली जीवनाचे हिंदू तत्वज्ञान लोकमान्यांनी विशद केलेले दिसून येते. टिळकांनी ‘गीतारहस्यांत’ भारतीय

नितीशास्त्राचा विचार करून भारताच्या राष्ट्रीय पुनरूत्थानासाठी कर्मयोगाचे तत्वज्ञान त्यांनी विशद केले व साऱ्या मानवजातीच्या महत्वाच्या प्रश्नांचा विचार या ग्रंथात त्यांनी केलेला दिसून येतो. लोकमान्य टिळकांनी आपल्या कार्याची दिशा राजकीय दिशा निश्‍चित केली. त्यासाठी त्यांनी राजकीय चळवळ करावयाची असा निर्धार त्यांनी केलेला दिसून येतो. टिळकांनी जुन्या समाजरचनेतील शक्तीचे पुनरूज्जीवन करून आधुनिक जीवनास अनुरूप अशा संस्था व चळवळी यांची जुळणी केली. शिवाजी उत्सव व गणपती उत्सव त्यांनी सुरू केला. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे श्रध्दास्थान असून ते अक्षय स्फुर्तिस्थान रहावे व त्यांच्या उत्सवातून स्वराज्याची आकांक्षा जोपासावी हा टिळकांचा त्यापाठीमागचा हेतू दिसून येतो. गणपती उत्सवाला टिळकांनी एक सार्वजनिक स्वरूप देवून लोकशिक्षण व लोकजागृती करावी व त्याबरोबर या दहा दिवसात विद्यार्थ्यांना संस्कार होईल असे शिक्षण मिळावे, जनतेचे प्रबोधन व्हावे व लोक संघटित व्हावेत, लोकांत स्वसंस्कृती, स्वधर्म अभिमान उत्पन्न व्हावा, त्यांच्यात स्वराज्याची आकांक्षा जागृत होवून लोक निर्भय स्वावलंबी व्हावेत असा देखील विचार हे राष्ट्रीय महोत्सव सुरू करण्यामागे त्यांचा दिसून येतो.

लोकमान्य टिळकांनी बुध्दीची अधिष्ठात्री देवता गणपती हिला सार्वजनिक अधिष्ठान देवून समाजातील शक्तीच्या झाऱ्यांना वाट मोकळी करून दिली व त्यामुळे लोकांचे समाजजीवन बहरून गेले असे दिसून येते. मेळे, संगीत, नाटक, किर्तन, प्रवचन, भजन, उत्सव इत्यादीमुळे स्वातंत्र्य चळवळ संगीतमय झालेली दिसून येते. मेळयांमुळे राष्ट्रभक्ती वाढीस लागून समाजातील सुप्त गुणांना वाव मिळून गायनात थोर परंपरा निर्माण झाली यात शंकाच नाही असे दिसून येते. १८९६च्या दुष्काळाच्या वेळी टिळकांनी शेतकऱ्यांना संघटित करून सरकारने आपले कर्तव्य केले

पाहिजे, यासाठी प्रचंड चळवळ उभी केली. ती कायदयाच्या चौकटीत राहून केली. त्यासाठी त्यांनी सरकारवर जनमताचे दडपण आणले त्यामुळे कायदयाचे पालन करावयाचे ही त्यांची भूमिका दिसून येते. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सुत्रीव्दारे त्यांनी असंख्य कार्यक्रमातुन लोकांना स्वराज्य साधनेत वाव मिळवून दिला व राजकीय चळवळ सतत कार्यरत ठेवली. कायदयाच्या चौकटीत राहून त्यांनी लोकांना बंडखोरीचा कार्यक्रम दिला व टिळकांनी स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या विधायक मार्गाने जनशक्तीचा अविष्कार देशभर घडवून आणला यात शंकाच नाही असे दिसून येते.

लोकमान्यांनी गणपती उत्सव, शिवाजी उत्सव, शेतकरी चळवळ, चतु:सुत्री, होमरूल चळवळ इत्यादी चळवळ करून समाज सुसंघटित केला व या शक्तीचा वापर त्यांनी स्वातंत्र्य लढयात स्वराज्य स्थापनेच्या कामी केलेला दिसून येतो. लोकमान्यांच्या लोकशाहीवरील श्रध्देस आध्यात्मिक अधिष्ठान होते असे उपलब्ध साधनावरून दिसून येते. लोकमान्यांनी किर्तन हे प्रबोधनाचे एक उत्तम साधन आहे हे ओळखून त्यांनी गणेशोत्सवात ‘राष्ट्रीय किर्तन’ हा नवा प्रवाह सुरू करून त्यांनी अनेकांना प्रवृत्त केलेले दिसून येते. लोकमान्य टिळकांनी केसरीच्या माध्यमातून धर्मविषयक, संस्कृतीविषयक, राष्ट्रीयशिक्षणविषयक, स्वराज्य, स्वदेशी व बहिष्कारविषयक लोकजागृती व लोकशिक्षणाचे कार्य केले.त्याचबरोबर आपल्या राजकीय विचारांच्या प्रचार व प्रसाराचे कार्य केसरीच्या माध्यमातून उभे केलेले दिसून येते.

लोकमान्य टिळकांनी राजकीय विचार लोकापर्यंत नेण्यासाठी यात्रा, उत्सव व सत्पुरूष यांचाही उपयोग करून घेतला. त्यामुळे लोकमान्य टिळकांच्या कार्याला राजकारणाबरोबरच धर्म कार्याचे ही स्वरूप प्राप्त झाल्याचे दिसून येते. किर्तन, प्रवचन, भाषणे, व्याख्याने या माध्यमातून

राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी, बहिष्कार या राजकीय विचारांच्या प्रचार व प्रसार करण्यासाठी अनेक किर्तनकार, प्रवचनकारांना त्यांनी प्रोत्साहित केले. कोणताही प्रसंग असो त्याचा 'लोकजागृतीकडे' उपयोग कसा करता येईल, इकडे लोकमान्यांची भूमिका दिसून येते, हे रामचंद्र विनायक पटवर्धन यांच्या आठवणीवरून स्पष्ट होते. हिंदी राष्ट्राचे पुनरूज्जीवन करणे त्याला त्याच्या गतकालाप्रमाणेच किंबहुना शक्य असल्यास जास्तच वैभवशाली व उज्वल करणे हा टिळकांचा जिवनोददेश होता व तेवढयाकरिता त्यांनी नुसती राजकीय जागृती करावयाची नसून सुप्तावस्थेत असलेल्या राष्ट्राच्या आत्माला खडबडून जागे करावयाचे होते, असे बाबू अरविंद घोषांच्या लिखानावरून दिसून येते.

युरोपातील राजकीय चळवळीचा अभ्यास करून त्यापासून बोध घेणे, त्यांचा उपयोग हिंदी राजकारणांत करणे ही गोष्ट टिळकांनीच प्रथम केली. १८९६ साली त्यांनी दुष्काळाच्या प्रंसगी शेतकऱ्यांना हाती धरून चळवळ केली ती आयर्लंडमधील लँडलीगच्या चळवळीवरूनच सुचलेली होती असे व्हॅलेंटाईन चिरोलने त्यांच्यां कार्याविषयी मत होते असे दिसून येते. लोकमान्य टिळकांचे तत्कालीन राजकारणातील महत्व जसे भारतीयांनी मान्य केले होते. तसेच तत्कालीन ब्रिटीश राजनितियज्ञ यांनीही केलेले होते. हे त्यांच्या विविध आठवणीवरून दिसून येते. लोकमान्य टिळकांच्या सांस्कृतिक व राजकीय कार्याविषयी अनेक समकालीनांनी आपल्या त्याच्यांबाबतच्या आठवणी लिहून ठेवल्या आहेत त्यावरून लोकमान्य टिळकांची राजकीय चळवळ व तिचा असणारा सांस्कृतिक अनुबंध दिसून येतो. किर्तन, नाटक, संगित हा लोकमान्यांच्या लेखी स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग होता असे दिसून येते.

१९ व्या व २० व्या शतकातील सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय विचार प्रवाहात लोकमान्य टिळकांनी तत्कालीन परिस्थितीच्या

पार्श्वभूमिवर आपली राजकीय चळवळ चालविताना तत्कालीन सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परिस्थितीचा आपल्या राजकीय चळवळीसाठी उपयोग करून घेतला असे दिसून येते या राजकीय व सांस्कृतिक चळवळीचे स्वातंत्र्य आंदोलनात फार मोठे योगदान झालेले दिसून येते. पाश्चात्य जीवनाशी ओळख झाल्यावर राष्ट्रवाद आणि लोकशाही या उदात्त विचारसरणीचे बीजरोपण व्हावे यासाठी टिळकांनी आवश्यक अशा संस्थात्मक जीवनाचा पाया रचला. हे उदात्त विचार त्यांनी अनेक कार्यक्रमाच्या माध्यमातून लोकांपर्यंत नेण्याचे काम केले. राष्ट्रवाद स्वीकारून हिंदुस्थानातील भिन्न धर्म, विविध जाती, भाषा, जीवनपध्दती यासर्वात ऐक्य निर्माण झाले पाहिजे तरच आपला तरणोपाय आहे अशी त्याची ख्याती पटली होती असे दिसून येते. त्यासाठी त्यांनी एक राजकीय आकांक्षा उत्पन्न करून स्वराज्याशिवाय तरणोपाय नाही हे लोकांना पटवून दिले व एकात्मता निर्माण होण्यासाठी लोकांना शिकवण दिली. स्वराज्य म्हणजे सर्वसामान्य माणसाचे राज्य असाच अर्थ लोकमान्यांना अभिप्रेत होता असे दिसून येते. सामान्य माणसांच्या अंतकरणात देशभक्तीची ज्योत त्यांनी प्रज्वलित केली व स्वराज्याचा मूलमंत्र देताना प्रजासत्ताक राज्य हा अर्थ लोकांच्या मनावर त्यांनी बिंबवला व सामान्य माणसाचा स्वाभिमान जागृत करून त्यांना त्यांनी कृतिशिल व आत्मविश्वासू बनविले. लोकमान्य टिळकांनी आपल्या आयुष्यात राजकारण करताना धर्म या संकल्पनेचा विचार केलेला दिसून येतो. त्यासाठी त्यांनी गणपती उत्सव, शिवाजी—उत्सव, किर्तन, नाटक, मेळे, इ. व्यासपिठावरून त्यांनी आपले विचार मांडून सामाजिक ऐक्य व जागृती, व लोकसंघटन करण्याचा प्रयत्न केला. या व्यासपिठाचा वापर त्यांनी राष्ट्रीय जागृती करण्यासाठी, प्रबोधनासाठी व स्वराज्य मिळविण्याच्या कामी एक साधन म्हणून केला असे उपलब्ध साधनावरून दिसून येते. गणेश उत्सवातून त्यांनी लोकसंघटन

केले, तर शिवाजी उत्सवातून त्यांनी स्वाभीमानाची भावना लोकांत निर्माण केली. स्वराज्य स्थापनेच्या कार्यात सर्वाना सर्व धर्मियांना कर्तबगारीनुसार, परधर्म सहिष्णुवृत्तीने वागवून संधी दिली. त्यांच्या उत्सवात परधर्मीय व बहुजन समाज आनंदाने सहभागी झाले. दोन धर्मीयात एकोपा वाढीस लागणे हे उत्सवाचे गमक आहे असे दिसून येते. उत्सवांच्या माध्यमातून त्यांनी चतु:सूत्रीचा प्रभावीपणे वापर केला. जुना आधार व नवीन संस्कार मिळून हा उत्सव त्यांनी बनविलेला होता असे दिसून येते. त्यांच्या कार्यावर देशी व विविध परदेशी विचारवंतांनी व त्यांच्या समकालीनांनी विविध प्रतिक्रिया व्यक्त केलेल्या आहेत.

सर व्हॅलेंटाईन चिरोल यांनी आपल्या 'इंडियन अनरेस्ट' या ग्रथांत त्यांच्या गणपती उत्सवाला कौतुकाची थाप देऊन त्यामुळेच त्यांच्या चळवळीचे क्षेत्र विस्तृत झाले असे, सांगुन शिवाजी उत्सव सुरू करून त्यांचा फायदा टिळकांनी राजकीय कार्याकरीता करून घेतला असे म्हटले आहे. अहमदनगरचे डिस्ट्रीक्ट मॅझिस्ट्रेट म्हणतात, 'हा उत्सव राजकीय शिक्षणाचे साधन बनला आहे.' गणपती उत्सवा संदर्भात क्रांतीकारक श्री खानखोजे यांनी सार्वजनिक गणपती उत्सवाने देशभक्तीच्या प्रचारार्थ 'राष्ट्रीय उत्सव' असे स्वरूप प्राप्त झाले असे म्हटले आहे. गणपत्युत्सव करण्यात लोकमान्यांचा राष्ट्रीय व राजकीय जागृती करण्याचा उद्‌देश होता असे जावडेकर म्हणतात. विद्वांस महादेव धोंडो असे लिहितात की, धर्माचा टिळकांनी राष्ट्रीयत्वाची भावना जागृत करण्याकडे टिळकांनी उपयोग केला व त्यांनी स्वधर्माचा उज्वल अभिमान लोकात उत्पन्न केला.

श्रीनिवास बनहट्टी यांच्या निबंधावरून असे आढळून येते की, जनतेलाच त्यांनी परमेश्वर मानले व अद्वितीय लोकसंग्रहयोग त्यांनी साधला. या लोकसंग्रहाचे मूळ त्यांच्या धर्मबुध्दीत होते हेच त्यांच्या धार्मिक जीवनाचे रहस्य होय असे दिसून येते. गणेश आळतेकर यांच्या निबंधात

त्यांनी लोकमान्यांच्या सामर्थ्य प्राप्त होण्याला आपले तत्वज्ञान, संस्कृती, तीचा प्राचीनपणा, महत्व व श्रेष्ठत्व त्यांनी 'ओरायण', 'आर्यांचे उत्तर धृव्रावरील वसतिस्थान' आणि 'गीतारहस्य' इ. ग्रंथाच्या आधारे त्यांनी प्रस्थापित केले हे त्यांना धर्मभावनेमुळेच प्राप्त झाले असे म्हटले आहे. प्रभाकर बापट धार्मिक इतिहासात त्यांचे महत्व पुनरूज्जीवनाच्या सिध्दांतांची स्थापना, धर्मोपदेशकाचे त्यांनी केलेले कार्य, प्रवृत्ती मार्गाची स्थापना या तीन प्रकारांनी करतात. सर्वसामान्य जनतेचे त्यांच्यावर किती प्रेम होते हे स. वि. बापटांच्या आठवणी वरून व लोक त्यांना देव मानत यावरून आपल्या लक्षात येते.

गंगाधर देशपांडे यांच्या आठवणीवरून लोकमान्य 'किर्तनाला' किती महत्व व मान देत हे आपल्या लक्षात येते. सर्वधर्मीय जनतेत लोकमान्यांना किती आदराचे स्थान प्राप्त झाले होते हे स. वि. बापटांच्या आठवणीवरून आपल्या लक्षात येते. टिळकांची मुसलमानांनी अजमेरला जी मिरवणूक काढली त्यावरून मुसलमांनानी लोकमान्यांचा अपूर्व जयजयकार केला असे आपणास दिसून येते. हिंदू—मुस्लीम ऐक्यासंदर्भात बॅ. जिना लोकमान्यांची देशासाठीची थोर सेवेचा गौरव करताना दिसून येतात. तर महात्मा गांधी त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून गौरवताना दिसतात. धुंडीराज पंत ठेंगडी यांनी स्वदेशी चळवळीत लोकमान्य लोकांना कसे सामील करून घेत हे त्यांच्या उदाहरणावरून आपण दिसून येते, तर रविंद्रनाथ टागोर स्वातंत्र्य चळवळीत सर्वानी सहभागी होवून आपल्या मार्गाने योगदान देता येते, या टिळकांच्या विचारांचा गौरव करताना दिसतात. टिळकांच्या लिहिलेल्या विविध ग्रंथावर देखील विविध लेखकांनी/विचारवंतानी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

प्रो.व्हीटने यांना टिळकांची प्रमेये महत्वाची व दीर्घ परिणामी वाटतात तर ए. ओ हयुम यांना टिळकांचे संशोधन म्हणजे मैलाचा दगड

वाटतो. तर पॉल केरस यांनी आर्कटिक होमच्या सिध्दातांना संमती दिलेली दिसून येते. टिळकांच्या 'गीतारहस्यासंबधी' शं. द. जावडेकर असे लिहीतात की, "नितीशास्त्र हवे असेल तर अध्यात्मशास्त्र सोडून चालणार नाही हे सिध्द करण्यासाठी टिळकांनी 'गीतारहस्य' लिहिले असे सांगतात. तर भा. कृ. केळकरांच्या टिळक विचारातून असे दिसून येते की, भारताला स्वत:च्या जीवन तत्वज्ञानावर आधारलेले नितिशास्त्र आहे हे सिध्द करणे हा गीतारहस्य लिहिण्यामागचा उद्‌देश होता. ग. प्र. प्रधान यांच्यामते स्वत: कर्मयोग्याचे जीवन जगताना कर्मयोगाचा संदेश लोकांना देवून त्यांच्यामधील पराक्रम जागृत लोकमान्यांनी केला. या अर्थाने 'गीतारहस्य' त्यांच्या जीवनाचा उदात्त आणि अंतिम अध्याय होय असे वाटते. सदानंद मोरे यांच्यामते राजकीय कृतीची सैध्दांतिंक बैठक म्हणजे 'गीतारहस्य' असे त्यांनी म्हटले आहे.

एकंदरित लोकमान्यांनी आपल्या धर्म या संकल्पनेत उदात्त विचारांचा अवलंब करून त्याग, परोपकार, सहिष्णुता, बंधुभाव, जेष्ठांचा आदर सहनशिलता, दया, क्षमा, शांती, शिल, चारित्र इ गुणांचा अवलंब करून राष्ट्रसंर्वधन केले व त्यांच्या धर्मभावनेचा हा व्यापक अर्थ त्यांनी समाजापुढे मांडला असे दिसून येते.

# संदर्भ ग्रंथसूची


## १) प्राथमिक साधने

अ) अप्रकाशित साधने

मराठी

१. टिळक,बा.गं.,विष्णुसहस्त्रनामासंबंधी प्रस्तावना, टिळक संग्रहालय, पुणे, २२/३, १९१८.

२. टिळक, बा.गं., गीतारहस्य ग्रंथाचे हस्तलिखित, टिळक संग्रहालय,पुणे.

**ब) प्रकाशित साधने**

**मराठी**

१) केळकर न.चिं., लोकमान्य टिळकांचे केसरीतील लेख, भाग ४, संकीर्ण लेखसंग्रह सामाजिक, धार्मिक, वाडमयविषयक, केसरी मराठा संस्था, पुणे १९२०.

२) केळकर न.चिं.,लोकमान्य टिळकांचे केसरीतील लेख, भाग १ राजकीय खंड क्र.१, केसरी मराठा संस्था, पुणे १९२२.

३) टिळक ज.श्री. (संपा),समग्र लोकमान्य टिळक, गीतारहस्य, ब्रम्हसुत्र वृत्ति, खंड क्र.१, टिळक ज.श्री., केसरी प्रकाशन, पुणे, १९७४.

४) टिळक ज.श्री. (संपा),समग्र लोकमान्य टिळक, राजकीय लेख संग्रह, खंड क्र.३, टिळक ज.श्री, केसरी प्रकाशन, पुणे १९७६.

५) टिळक ज.श्री. (संपा),समग्र लोकमान्य टिळक, समाज व संस्कृती, खंड क्र. ५, प्रथमावृत्ती , केसरी प्रकाशन, पुणे १९७६.

६) टिळक, ज.श्री. (संपा),समग्र लोकमान्य टिळक जीवन ध्येय, खंड क्र. ६ प्रथमावृत्ती, केसरी प्रकाशन, पुणे १९७६.

७) टिळक दि.ज, (संपा), श्रीमदभगवदगीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र, चोवीसावी आवृत्ती, टिळक बंधू, केसरी मुद्रणालय, पुणे २०११.

८) पांगारकर ल.रा. (संपा), सद्यस्थिती, गायकवाडवाडा गणपतीपुढे लोकमान्य टिळकांचे व्याख्यान, मुमुक्षु, वर्ष १ले, अंक ३५वा, २६ सप्टेंबर १९०७.

**इंग्रजी**

1- Tilak B. G., Smagra Lokamanya Tilak , volume 7, Towards Independence, kesari prakashan, pune 1975.

2- vidwans m.d. ( Edi) Letters of lokmamanya tilak, first ediction kesari prakashan, pune, vidwans m.d. ( Edited by ) Auguest 1966.

**२) दुय्यम साधने**

**अ) मराठी**

१) श्री.अरविंद, बाळ गंगाधर टिळक, संजीवन कार्यालय, श्री अरविंद आश्रम, पांडीचेरी १९१८.

२) ओक प्रमोद,एलफिन्स्टन मुंबईचा गव्हर्नर, माउन्ट स्टुअर्ट एलफिन्स्टन याचे चरित्र, राजहंस प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, २७ मार्च १९९०.

३) कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्रीसाईनाथ प्रकाशन, नागपूर, २ ऑक्टोबर २००५.

४) करंदीकर ज.स., गणेशोत्सवाची ६० वर्षे, केसरी प्रकाशन, पुणे १९७२.

५) केळकर भा.कृ., टिळक विचार, श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९८१.

६) केळकर न.चिं., लोकमान्य टिळकांची धर्मबुध्दी व धर्मविषयक मते, १९२५.

७) केळकर न.चिं., केसरी प्रबोध, केसरी महोत्सव मंडळ १९३१, नवीन समर्थ विद्यालयाचा समर्थ भारत छापखाना, पुणे, १९३१.

८) केतकर ना.म., केसरी शताब्दी सूची, खंड क्र. १, (१८८१ – १९२०) कुलकर्णी पां.सी., केसरी प्रकाशन, पुणे, ४ जाने १९८१.

९) केळकर न.चिं.,लोकमान्य टिळकांचे चरित्र खंड क्र.१, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर , ऑक्टोबर २०१२.

१०) केळकर न.चिं., लोकमान्य टिळकांचे चरित्र, खंड क्र.२, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, ऑक्टोबर २०१२.

११) केळकर न.चिं., लोकमान्य टिळकांचे चरित्र, खंड क्र.३, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, ऑक्टोबर २०१२.

१२) गोखले शरच्चंद्र, केसरी १८८१ ते १९८१ (वैचारिक संदर्भ आणि वाटचाल),केसरीचा इतिहास म्हणजे राष्ट्राचा ज्वलंत इतिहास, केसरी प्रकाशन, पुणे, ४ जाने १९८१.

१३) घोरपडे चंद्रकांत, गणेशोत्सवाची १०० वर्षे, केसरी प्रकाशन, पुणे १ ऑगस्ट १९९२.

१४) चाफेकर दा.ह., गणपतीच्या मेळयांची पदे, सुवर्ण प्रिंटींग प्रेस,मुंबई, १८९६.

१५) जावडेकर शं.द.,आधुनिक भारत, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला पुष्प, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, १९३८.

१६) जोग ना.गो., लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, प्रकाशनविभाग, दिल्ली, १९७२.

१७) टिळक, दि.ज., आधुनिक भारताचे शिल्पकार, लोकमान्य बा.ग.टिळक, केसरी प्रकाशन, पुणे.

१८) तर्कतीर्थ जोशी, लेखसंग्रह, खंड १ला, श्रीविद्याप्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे २० ऑगस्ट १९८२.

१९ ) दिक्षित रा.म.,एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र मध्यमवर्गाचा उदय, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे १६ डिसेंबर २००९.

२०) दाते शं.रा., लोकमान्य टिळकांचे पुण्यस्मरण, कार्य व तत्वज्ञान, साप्ताहिक काळामधील जुलै १९७० मधील लेखांच्या आधारे काळ मुद्रणालय, पुणे.

२१) पाटकर विवेक, संशोधन मार्गावरील प्रवास, सुबोध आर्टस, प्रथमावृत्ती, मुंबई ऑगस्ट २००७.

२२) प्रधान ग.प्र., लोकमान्य टिळक व्यक्ती आणि कार्य, केसरी प्रकाशन, पुणे, १९७१.

२३) प्रधान ग.प्र., लोकमान्य टिळक, एन.बी.टी., दिल्ली १९९१.

२४) पाटील सु.गो., गणेश व शिवजयंती उत्सवांचे राष्ट्रीय चळवळीतील योगदान,एम.फिल.,अप्रकाशित प्रबंध,टि.म.वि.,पुणे डिसेंबर २०००.

२५) फडके य.दि.,विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १, श्रीविद्याप्रकाशन, पुणे, ३० जाने १९८९.

२६) फडके य.दि., आगरकर, मौज प्रकाशनगृह, मुंबई, २० मार्च १९९६.

२७) बापट.स.वि., लोकमान्य टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका, खंड २ रा, प्रथमावृत्ती, जगाव्दितेच्छु प्रेस,पुणे १९२५.

२८) बापट स.वि., लोकमान्य टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका, खंड ३ रा, पुणे, १९२६.

२९) बापट स.वि., लोकमान्य टिळकांच्या आठवणी, केसरी प्रकाशन, पुणे, ऑगस्ट १९९२.

३०) बनहटटी श्री.ना., नवभारत ग्रंथमाला २२, टिळक आणि आगरकर, सुविचार प्रकाशन, नागपूर १९५६.

३१) बहुलकर श्री, संस्कृती परिचय, प्राचीन भारतीय संस्कृतीविषयक लेखसंग्रह, केसरी मुद्रणालय, पुणे, २८ फेब्रुवारी २००८.

३२) बकाणे छा.सु., विष्णुशास्त्री चिपळूणकर, श्रीविद्याप्रकाशन, पुणे, १५ ऑगस्ट १९९९.

३३) भोळे, भा.ल., एकोणिसाव्या शतकातील मराठी गदय, खंड २, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली २००८.

३४) मोरे सदानंद, लोकमान्य ते महात्मा, पहिली आवृत्ती, खंड १ला, राजहंस प्रकाशन, पुणे २६ जाने २००७.

३५) मोरे सदांनद, कर्मयोगी लोकमान्य (चिकित्सक आकलन), गंधर्व वेदप्रकाशन, पुणे ८ जून २०१४.

३६) वेलकर प्रताप, अव्यक्त लोकमान्य बाळ गंगाधर टिळक इतिहास सत्यशोधन, टिळक स्मारक ट्रस्ट, केसरी मुद्रणालय, पुणे.

३७) सोवनी नी. वि.,एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील तथाकथित प्रबोधनाचे स्वरूप, लोकमान्य टिळक व्याख्यानमाला, पुष्प २रे, टि.म. वि.,प्रथमावृत्ती, पुणे जुलै १९८१.

३८) हुसेन एस. अे., भारताची राष्ट्रीय संस्कृती, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, चौर्थी आवृत्ती, नवी दिल्ली २००९.

३९) क्षीरसागर शकुंतला, प्रबंधलेखनाची पध्दती, युनिर्व्हर्सल प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे २०१२.

**ब) इंग्रजी**

1- Kumbhojkar Shraddha , Nationalisam ,Literature and creation of memory Maharashtra in the Nineteenth century, sugawa Prakashan, Pune February 2008.

2- Parvate t.v., Tilak : The Economist, Maharashtra state board for Literature and culture, yeravada prision press, first edition, pune, dec 1985.
3- Tilak D.J, Lokamanya Bal Gangadhar Tilak maker of modern India, Lokmanya smarak Trust, Pune.

**३) नियतकालीके**

१) केळकर,न.चिं., बुध्दिप्रामाण्य, सहयाद्री, खंड १०वा, अंक १ला, १७ जून १९३९.
२) केळकर,न.चिं., टिळक व बडे देशी लोक, सहयाद्री, खंड १४ वा, अंक ८वा, वर्ष ७ वे, ऑगस्ट १९४१.
३) कर्वे, द.गो., रानडे यांची राष्ट्रोध्दाराची योजना, सहयाद्री, खंड १५ वा, अंक १ला, जाने १९४२.
४) केळकर,न.चिं., रानडे यांची राजकारणविषयक भूमिका, सहयाद्री, लोकमान्य टिळक विशेषांक, खंड १५ वा, अंक १ला, जाने १९४२.
५)काळे, वा.गो., न्या.रानडे हयांची अर्थशास्त्रविषयक कामगिरी,सहयाद्री, रानडे विशेषांक, खंड १५ वा, अंक १ ला, जानेवारी १९४२.
६) कानिटकर,रा.प्र., युध्दकालीन कॉग्रेस,चित्रमयजगत, वर्ष २६ वे, अंक १ला, जानेवारी १९३५.
७) कलिकिंकर, वर्ध्याचा गणेशोत्सव, मुमुक्षु, १७ सप्टेंबर १९०८.
८) कनिटकर, रा.प्र.,यंदाचे श्रीगणेशोत्सव, चित्रमयजगत, सप्टेंबर १९२२.
९) केतकर,ग.वि.,लोकमान्य टिळकांचे ग्रंथकर्तृत्व,सहयाद्री, टिळक विशेषांक, वर्ष १ले, अंक ८ वा, ऑगस्ट १९३५.
१०) कानिटकर प्र.क., यंदाचे ठिकठिकाणचे श्रीगणेशोत्सवांतील मेळे, चित्रमयजगत, सप्टेंबर १९२२.

११) केतकर,ग.वि., लोकमान्य टिळकांनी विशद केलेला जिवित ध्येय व राजकारणाचा संबंध, वर्ष १ले, अंक ८ वा, ऑगस्ट १९३५.

१२) खापर्डे दादासाहेब, लोकमान्य टिळक यांच्या गीतारहस्याचे परीक्षण, चित्रमयजगत, Vol ६, वर्ष ६ वे, अंक ८ वा, ऑगस्ट १९१५.

१३) खाडिलकर कृ., स्वदेशी व बहिष्कारावर गणपत्युत्सवात व्याख्यान, मुमुक्षु, ३ सप्टेंबर १९०८.

१४) खडिलकर, प्र.ह., राष्ट्रधर्मप्रवर्तक बाबू अरविंद घोष, चित्रमयजगत, सप्टेंबर १९२२.

१५) ग्विन जे.टी., जे.टी. ग्विन व टिळक, सहयाद्री, लोकमान्य टिळक विशेषांक, वर्ष १ले, अंक ८ वा, ऑगस्ट १९३५.

१६) गोखले दा.वि.,टिळकांनी प्रणीत केलेली स्वराज्याची साधने, सहयाद्री, टिळक विशेषांक, वर्ष १ले, अंक ८ वा, ऑगस्ट १९३५.

१७) गर्दे, एन.बी., उंट छाप शाईने जग जिकंले, सहयाद्री, टिळक विशेषांक, वर्ष १ले, अंक ८ वा, ऑगस्ट १९३५.

१८) घोष, बा.अ., लोकमान्य टिळकांचे ध्येय राष्ट्रसंवर्धन, सहयाद्री, टिळक विशेषांक, वर्ष १ले, अंक ८ वा, ऑगस्ट १९३५.

१९) चिरोल, सर व्हॅलेटाईन चिरोल व टिळक, सहयाद्री, टिळक विशेषांक, वर्ष १ले, अंक ८ वा, ऑगस्ट १९३५.

२०) जावडेकर, व्यं.ग., लोकांच्या आठवणीत राहिलेले लोकमान्य, सहयाद्री, लोकमान्य टिळक विशेषांक, वर्ष १ले, अंक ८ वा, ऑगस्ट १९३५.

२१) देवगिरीकर,त्र्यं.रं.,कॉंग्रेसचा उग्दम व प्रारंभ, चित्रमयजगत, वर्ष २६ वे, अंक १ला, जानेवारी १९३५.

२२) देवगिरीकर,त्र्यं.रं., कलकत्ता ते बनारस, चित्रमयजगत, वर्ष २६ वे, अंक १ला, जानेवारी १९३५

२३) नौरोजी दादाभाई, महाराष्ट्र कसा होता? मुमुक्षु,२६ सप्टेंबर १९०७.
२४) पांगारकर, लं. रा., येथील गणेशोत्सव, मुमुक्षु, मराठी मासिक, २६ सप्टेंबर १९०७.
२५) प्रधान,रा.ग.,रा.ग.प्रधान,नाशिकयांची आठवण, सहयाद्री, लोकमान्य टिळक विशेषांक, वर्ष १ले,अंक ८ वा, ऑगस्ट १९३५.
२६) भिडे,रा.गो., नवयुगारंभ, चित्रमयजगत, वर्ष २६ वे, अंक १ ला, जानेवारी १९३५.
२७) भिडे रा.गो.,लोकमान्य टिळक व हिंदू संघटन, संघटनेसाठी गणेशोत्सव, सहयाद्री, लोकमान्य टिळक विशेषांक, ऑगस्ट १९३५.
२८) भट,आ.रा., लोकमान्य टिळकांची आर्थिक विचारसरणी, सहयाद्री, टिळक विशेषांक, वर्ष १ले, अंक ८ वा, ऑगस्ट १९३५.
२९) मिंटो,लॉर्ड राजद्रोहाचे प्रणेते, सहयाद्री, लोकमान्य टिळक विशेषांक, वर्ष १ले, अंक ८ वा, ऑगस्ट १९३५.
३०) रानडे, कृ.त्र्य., हिंदुधर्माचे सध्याचे स्वरूप व सार्वजनिक गणपत्युत्सव, ज्ञानप्रकाश, अंक २८ वा, २८ सप्टेंबर १९०९.
३१) विव्दांस,धों.वा.,ह.भ.प. साखरेबुवा यांची आठवण, सहयाद्री, टिळक विशेषांक, वर्ष १ले, अंक ८ वा, ऑगस्ट १९३५.
३२) विव्दांस, धों.वा., झॅकेरियस व टिळक, सहयाद्री, टिळक विशेषांक, वर्ष १ले, अंक ८ वा, ऑगस्ट १९३५.
३३) सिडनॅहम, सिडनहॅम व टिळक, सहयाद्री लोकमान्य टिळक विशेषांक, वर्ष १ले, अंक ८ वा, ऑगस्ट १९३५.
३४) सोमण, मा.प., टिळकांच्या धार्मिक सुधारणेतील रहस्य, सहयाद्री, टिळक विशेषांक, ऑगस्ट १९३५.

३५) सहस्त्रबुध्दे,द.ल., रानडे आणि सामाजिक सुधारणा, सहयाद्री, खंड १५ वा, जाने १९४२.

## ४) कोश वाङःमय

१. जोशी महादेवशास्त्री (संपा.),भारतीय संस्कृतीकोश, खंड प्रथम, प्रथमावृत्ती, संगमप्रेस, पुणे, २० डिसेंबर १९६२.

२. जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतीकोश, खंड ७ वा, मराठी भाषा व साहित्य ते राजस्थान, केंद्रीय शिक्षा मंत्रालय दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या सहयाने प्रकाशित, भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे १५ ऑगस्ट १९७२.

३. जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृती कोश, नववा खंड, बिहार ते सिंधी लोक, भारतीय संस्कृतीकोश मंडळ, प्रथमावृत्ती, पुणे, ३० नोव्हेंबर १९७६.

४. कुलकर्णी कृष्णाजी पांडुरंग, मराठी व्युत्पत्तिकोश, श्रीलेखनवाचन भांडार, व्दितीयावृत्ती, पुणे, जानेवारी १९६४.

## ५) वृत्तपत्रे

१) कुमठेकर, मानसिंगराव, ''मिरजेत प्रसिध्द झाले पहिले 'गीतारहस्य' तरूण भारत, सांगली दिनांक २५/५/२०११, पृ.क्र.४.

२) गोंधळेकर, गंगाधर, ''पुण्यांतील श्री. शिवराय जन्मोत्सव,'' 'वार्तानिधी, २७ एप्रिल १८८९.

३) मोरे, सदानंद, '' लोकमान्यांचा तिसरा तुरूंगवास'', दैनिकसकाळ, पुणे, दिनांक २०/७/२००८.

४) मोटे, अशोक प्रभाकर, ''गीतारहस्यांचे रहस्य'', दैनिक केसरी, पुणे, दिनांक १/८/२००८.

५) शेवाळकर, राम, ''दुरितांचे तिमिर जावो'', 'दैनिक लोकमत, दिनांक ३१/८/२००८.

६) साठे, श्रीनिवास,'' गणेशोत्सवातील संगितमय स्वातंत्र चळवळ'', दैनिक लोकसत्ता, पुणे वृत्तांत, दिनांक ४/९/२००८.

## ६) अप्रकाशित प्रबंध

१) एम.फिल. — पाटील सुरेश गोपाळ, राष्ट्रीय प्रबोधनात शिवजयंती व गणेश उत्सवाचे योगदान, एम.फिल. अप्रकाशित प्रबंध, टि.म.वि. पुणे. २०००.

## ७) इतर साधने

### सी.डी.

टिळक,बा.गं.,सन १९१५ च्या गणेशोत्सवात लोकमान्य टिळकांचा आवाज (सी.डी.), टिळक स्मारक ट्रस्ट, पुणे.

## ८) अभ्यासकाळातील फोटो

''केळीच्या खुटांनी सजविलेल्या अश्वरथात श्रींची मिरवणूक लोकमान्य टिळक, श्रीमंत दगडूशेठ हलवाई, काळकर्ते परांजपे इत्यादी. टिळक संग्रहालय, पुणे.''

# परिशिष्टे

| क्र. | परिशिष्ट | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | गीतारहस्याचे हस्तलिखित. | २२० |
| २ | केळीच्या खुटांनी सजविलेल्या अश्वरथात श्रींची मिरवणूक,लोकमान्य टिळक, श्रीमंत दगडूशेठ हलवाई, काळकर्ते परांजपे इ. (छायाचित्र) | २२१ |
| ३ | चाफेकर दामोदर हरी, संगीत गणपतीच्या मेळयांची पदे. | २२२ ते २३१ |
| ४ | यंदाचे ठिकठिकाणचे श्री गणेशोत्सवातील मेळे. सप्टेंबर १९२२. | २३२ ते २३८ |
| ५ | स्वदेशी बहिष्काराचे महत्व. १६ नोव्हेबर १९०७ रोजीचे पंढरपूर येथील भाषण. | २३९ ते २४४ |
| ६ | ४ मे १९०८, अकोला शिवजयंती उत्सवात, श्री. गजानन महाराज अध्यक्ष असतानाचे लोकमान्य टिळकांचे भाषण. | २४५ ते २५४ |
| ७ | लोकमान्य टिळकांचे विविध धार्मिक व्यक्तींबरोबरचे फोटो. | २५५ ते २५६ |
| ८ | लोकांच्या आठवणीत राहिलेले लोकमान्य. | २५७ ते २६३ |
| ९ | टिळकांविषयीचे लोकमत. | २६४ ते २७० |
| १० | लोकमान्य टिळकांशी संबधित व्यक्तींची नावे. | २७१ ते २९० |

# परिशिष्ट क्र. १

गीतारहस्याचे हस्तलिखित.



॥ श्रीगणेशाय नमः ॥

ॐ तत्सत्.

\- श्रीमद्भगवद्गीता - रहस्य -

अथवा

\- कर्मयोग-शास्त्र. -

प्रकरण १ लें.

विषयप्रवेश.

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम्।
देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत्॥
महाभारत - आदिमश्लोक -

श्रीमद्भगवद्गीता हा आमच्या धर्मग्रंथांपैकी एक अत्यंत तेजस्वी व निर्मल हिरा आहे. पिंडब्रह्मांडज्ञानपूर्वक आत्मविद्येची गूढ व पवित्र तत्वें थोडक्यांत पण असंदिग्ध रितीनें सांगून त्यांच्या आधारें मनुष्यमात्रास आपल्या आध्यात्मिक पूर्णावस्थेची म्हणजे परमपुरुषार्थाची ओळख करून देणारा [illegible] [illegible] [illegible] [illegible] - करून सुंदर जोड घालून संसारांत भांबावून गेलेल्या मनास शांत आणि [illegible] - पर: निष्काम कर्तव्याचरणास प्रवृत्त करणारा, [illegible] [illegible] - [illegible] ग्रंथ संस्कृतांत च [illegible] काय पण जगांतील इतर वाङ्मयांत हीं सांपडणें दुर्मिळ होय. केवळ काव्य या दृष्टीनें जरी याचें

'गीतारहस्य' ग्रंथाचे हस्तलिखित.

The Manuscript of 'Geetarahasya'

(सौजन्य - संदर्भ - टिळक संग्रहालय, पुणे.)

# परिशिष्ट क्र. २

केळीच्या खुटांनी सजविलेल्या अश्वरथात श्रींची मिरवणूक,लोकमान्य टिळक, श्रीमंत दगडूशेठ हलवाई, काळकर्ते परांजपे इ. (छायाचित्र)



केळीच्या खुंटांनी सजविलेल्या अश्वरथात श्रींची मिरवणूक.
लोकमान्य टिळक, श्रीमंत दगडूशेठ हलवाई, काळकर्ते शिवराम महादेव परांजपे,
बाबूराव गोडसे, सोमनाथशेठ गाडवे इत्यादी

(सौजन्य - टिळक संग्रहालय पुणे.)

**परिशिष्ट क्र. ३**

चाफेकर दामोदर हरी, संगीत गणपतीच्या मेळयांची पदे,



श्रीगजाननप्रसन्न.



## पद १ लें.

( सुंदरमुख० या चालीवर )

वारणमुख पार्वतिसुत श्रीगणाधिपा ॥
सुरवरनत स्तविति अमित ब्रह्म चिद्रुपा ॥धृ०॥
पाशांकुश धारणकरि वरद पाणितो ॥
सिद्धलड्डु शोभेकरीं बहुत डोलतो ॥
अगमनिगम वदति विभू फार खोलतो ॥चा० ॥
देवा, धावा, पावा, त्वदियनाम सुखदधाम ॥
पुरितकाम करितुं सुरनृपा ॥ वा० ॥ १ ॥
विघ्नहरा शिवकुमरा धांव सत्वरीं ॥
गोधन मम रक्षण करि दुःख सागरीं ॥
तुजविणतिस नच रक्षक झाली घाबरी ॥चा०॥
भर्ता, भ्राता, त्राता, जनकजननि होसि
म्हणुनि शरण चरणिं तुज गणाधिपा ॥वा०॥२॥

( २ )

## पद २ रें.

( यशोदा सांगे कृ० या चालीवर )

तारि गजवदना ।। सुख सदना ।। आह्माला
पहाया आलों तव चरणा करूं नमना ।। अंत्रा
दुष्ट नीच किति छळति आह्माला ।।
कसि तुज झोंप बा आली ।।
नसे तुज वांचुनि वाली ।। १ ।।
सकलविकल होउनिया आलों ।।
सुमंगल या तुझ्या पायीं ।।
गजानन या करुनि घाई ।। ता० ।। २ ।।
मद्यमांस भक्षक बहु झाले ।।
नपुसति जात गोतातें ।।
आई गुरु तीर्थ देवातें ।। ३ ।।
विघ्नविनाशक गणपति पहिला ।।
असि जगिं ख्याति तुझि आहे ।।
आह्मावरि दया करुनि पाहे ।। ४ ।।

## पद ३ रें.

( अरि आर्य तुह्मि तरि० या चालीवर )

चला जाउं सुजनहो गणपतिला ।।
देइल तो आपणा सन्मतिला ।। गा पहाया जा
प्रभुच्या पदकमला ।। चला० ।। १ ।।

( ६ )

शुंडादंड विराजित प्रभुहा दे अभय
सकलां अशा परिकर केला ।। २ ।।
देइल विक्रम अपुल्या अंगीं ।।
दुष्टां माराया सोडण्या धेनुला ।। ३ ।।
वांच्छित गणपति देइल आपणा ।।
जरि वाहु दुर्वा शमि आणि पुष्पाळा ।। ४ ।।

## पद ४ थें.

( चाल ल्यांडची पाशि चाली० )

एकदंत सौख्यवंत श्रीविनायका ।।
आर्य हे नमुनि करति विनति आयका ।। हाय।।
हाय कायही स्थिती आर्य जननिची ।।
कठिण जाहलि दशा आह्मा हिंदुचि ।।
दे विक्रम आमुच्या आंगि दुष्टां माराया ।।
गाइब्राह्मण वैदिकधर्म रक्षाया ।।
प्रतिवर्षी उत्सवि तुजला पुजाया ।।
आह्मासि कुबुद्धि देऊं नका ।। १ ।।
पूर्वकालिं दुष्ट शिलानष्ट मातले ।।
श्रीकृपें शिवाजि बाजी जन्म पावले ।। ते ।।
विक्रमें करुनि अटकपार जाहले ।।
निशाण त्याठिकाणीं हिंदु भगवें लागलें ।।
इराणी दुराणी मोंगल कापिले ।।

सकळांच्या मुखें धन्य ह्मणविलें ॥
ह्मणुनिया उत्सवीं आह्मी गाइलें ॥
आह्मासि कुबुद्धि देउ नका ॥ २ ॥
हिंदु पातशाहिची कमाइ जाहली ॥
हीनदैव हिंदु खचित आह्मि न पाहिली ॥
मोरया आह्मावरि कृपा करुनियां ॥
देइबुद्धि आर्यभूमि हित करावया ॥
वंदि हरिसुत दामोदर चरणाप्रति ॥
मागुनि घेतो चरणि करूनि वीनंती ॥
विक्रम देउनी अंगि करी देशोन्नती ॥
आह्मासि कुमार्गी लाउ नका ॥ ३ ॥

## पद ५ वें.

( द्वैत करींहो विनाश या चा० )

मद्य मांस भिस्कुटा खाउनी व्यसनि तुह्मी झाल
त्या योगानें शक्ति न उरली जोम कसा गेल
स्वधर्म सोडुनि नीचपणानें परधर्मी रतला
अभिलाषानें आंग्लजनांच्या थापेला भुलल
द्वैतपणानें कलह माजला ऐक्यपणा गेला ॥
स्वराज्य सारें गमवुनि वसलों घात असा झा
आठवा तुह्मी शूर पूर्वजा राव सदाशिव
भाउ पेशवे कैसी केली मजा ॥ १ ॥



मर्दपणा तो जात चालला आमुच्या आर्यांचा ॥
त्या योगानें घात होतसे आमुच्या कार्यांचा ॥
यवन पारशी फिरंगी आपणा कुत्सितसे वदती ॥
स्वधर्म कर्में करित आसतां विघ्न मधें करिती ॥
आर्य सुजनहो ऐक्यता करा
सुदृढ होउनि बाहुबलानें म्लेंच्छा चकितकरा॥२॥

## पद ६ वें.

( धिरे धिरे चालो या चा०

आम्हि मेळ काढिला आहे हिंदु धर्मका डंकाहै ॥
एक दिलानें सारे जमलो भजनीरत आह्मी झालों॥
शिवरायाचा भगवा झेंडा हातिं शोभत आहे॥ १ ॥
स्वधर्म निष्ठा पाहुनि आमुचि परधर्मी मनीं थिजले॥
मर्दपणानें उभे ठाकलों त्यांना हें नच साहे ॥
भाला बर्ची घेउनि हातीं आर्य धर्म हा राखु आपुला
वाली गणपति सकलही विघ्नविनाशक आहे ॥
हरिसुत दामोदर करि विनती आर्य सुजनहो ऐका
धर्म हितास्तव नित्य झटावें तोचि मार्ग उचिताहे ॥३॥

## पद ७ वें.

( श्रीरंगाया दीनातें या चा० )

सकळ मिळुनिया भजनीं रमुया ॥
धरुनि हातीं विणा मृदंग गावुया ॥

(६)

विप्रराजा हिंदुसमाजा देसी तुं विजया ॥१॥
हारिनें उभे राहुं निशाण भगवें ॥
प्रथम पद टाकुं समान उजवें ॥
एक पोशाखानें जाउं नाचत प्रभु पाहाया ॥२॥
द्वैत दुर्वा वाहुं प्रभुचे चरणीं ॥
मागुनि ऐक्य घेउं विनति करूनि ॥
हे गणराजा आर्य समाजा विक्रम दे सदयाः॥

## पद ८ वें.

( तारा तारा मज या चा० )

सोडा सोडा मज आर्य मुलांनों ॥
आंग्लबंधनीं पडें मुलांनों ॥
धर्म वस्त्र हें फेडुनि माझें नग्न पहा मज केलें मुलांनों
पूर्वज तुमचे किति अभिमानि
प्राण माझ्यासाठीं दिले मुलांनों ॥ २ ॥
शिवाजी राजा हिंदुसमाजा भूपवुनि
पहा गेला मुलांनों ॥ ३ ॥
पटवर्धन पेशवे बापुगोखले
शूर पूर्वजां स्मरा मुलांनों ॥ ४ ॥
गाई ब्राह्मणा छाळिति दुष्ट हे त्याचि
लाज कांहीं धरा मुलांनों ॥ ५ ॥

(७)

## पद ९ वें.

( राग भूप )

चाल मोरया लुटु लुटु लुटु पटु
तुरु तुरु मोदक भक्षाया ॥ ध्रु० ॥
सारीरीगगपपधधसासुस्वरगायनयातकधिलांग
कधिलांगधुमकीटतकथेया ॥ १ ॥ तु० ॥
रुण झुणु रुणु झुणु चराणि वाजती घागरिया
दुडु दुडु दुडु दुडु गतिये मोदक भक्षाया ॥२॥ तुं०
नामे जडली वृत्ती टाकुनिया माया वंदी
राघव नंदन अर्पुनिया काया ॥ ३ ॥ तुं०.

## पद १० वें.

( कमल नयन या चाली० )

तुझि शरण चला जोडुनि करा श्रीगजानना ॥
एकदंत हृदयीं धरा तुटति वासना ॥
व्यर्थ भुलुनि मोहरमांत काय पाहतां ॥
वेडि वांकडीं सोगें घेउनि काय नाचतां ॥
विसरुनियां हिंदुपणा दुजा बोलतां ॥
नीच यवन खिचडा तो काय भक्षिता ॥
मुडद्यावरि कां प्रीती शरम धरमना ॥ १ ॥ तु०

## पद ११ वें.

( चाल ब्यॉडचि )

यारे यारे यारे झडकरि जाउं जाउं जाउं प्रभुघ
पाहुं पाहुं गणपतिला मागुनि घेउं सन्मतिल
पाशांकुशधर गजवदना रुपें तुच्छ करी मदन
वाहन उंदिर कटिं पीतांबर सिंदूरासुर मर्दुनिया
केले सुरवर मुक्त पहा संकट टळलें सगळें अ
विघ्न निवारक प्रभु शुभदायक ·
नाम विनायक देवाचें ॥
कोणी नाहीं प्राण्या पाही दिशादाही ॥
शास्त्रें साही गजवदनाविण देव नसे ॥ १ ॥

## पद १२ वें.

( स्मराहारी या चालो० )

नका जाऊं डोले पांडु–भाव ठेवूं हिंदुधर्मी
करा एकी त्यजा बेकी धरानेकी धर्मकर्मी ॥
स्मरा पिढिला वाडवडिलां
प्राण त्यजिला शौर्य करुनि ॥
धरा नीति जुनी रीती नका भीति बसूं धरुनि
स्वधर्मातें नका सोडूं जात मोडूं नका आपुल
नका विधवा पाट लाउं नका सोडूं रीत आपुल
मद्यमांसा नका खाउं नका सेवूं बिस्किटाला
भजा सुमुखा भाव धरुनि
करील विजयी स्वदेशाला ॥ १ ॥



## पद १३ वें.

( अंगिकार० या चा० )

विघ्नराज चरणिं करु नमन सर्वदा ॥
त्रिविध ताप पाप सकळ वारि आपदा ॥
त्य गीत वाद्यगजर भजन तें करूं ॥
यान हृदयीं एकदंत सुमुख तो धरूं ॥
श अंकुशास धरुनि हुरवि आपदा ॥
सिद्धलड्डु शोभेकरीं हर्षमनीं सदा ॥ १ ॥

## पद १४ वें.

( नृपासिंहासन० या चा० )

दीत अह्मा हें हिंदु हें दोसधुल्ला ॥ ध्रु० ॥
हारमांग धेडाशिं निक्का ॥
आविति होउनियां निःशंका ॥
यांच्या पासुनि संतति देखा ॥
रता पुरति पीर जोका ॥
जिति हिंदु तो मुडदा यवनि बिह्मा ॥ वद० ॥
सुनि देव बहुत हिंदुचे
गे प्रेम कसें मुडद्याचें ॥
टे नवल अशा लोकांचें ॥
सती हिंदु बीज ते साचे ॥
त्यजुनिया एक दंताला ॥

भजति नर जे सेकसल्ला ॥ २ ॥ कद० ॥

## पद १५ वें.

( अनंग दांडगा या चा० )

हे गजानना तुझ्या विणें न आसरा ॥
त्रिलोकिं देव यक्ष किन्नरीं न दुसरा ॥
कृपा करोनि आर्य भुमि मुक्तता करा ॥
तुझाविणें न पुरवी हेतु मृत्युलोकि या नरा

## पद १६ वें.

( नृपाल कोप या चा० )

हे प्रभो जगन्निवास विश्व पालका ॥
गोपि गोप गोस गोकुलांत रक्षका ॥
शरण चरणीं लीन ह्मणुनि दास तारका ॥
धांव धांव धांव धांव ॥
दास तारका असुर मारका ॥ १ ॥
त्राहि पाही नाहीं तुझ्याविणें आसरा ॥
नेंवि जलावीण मीन धेनु वासरा ॥
विघ्न वधुनि दीन ह्मणुनि ये करीं त्वरा ॥
धांव धांव धांव धांव ॥
असुर मारका दास तारका ॥ २ ॥

## पद १७ वें.



( नृपतनये वर या चा० )

भजाभजारे गणपतिचरणा ॥
संकट आपुलें हरावया ॥
पुरविल हेतु सर्व मनाचे ॥
विघ्ननिवारक मोरया ॥
बुद्धिदायका श्रीविनायका सकळ या
लोकांवरी कृपाकरा सद्धर्मी लावुनियां ॥ १ भ०
कोणी नाहीं गणपति वांचुनि
विघ्न विनाशक भूतलीं ॥
हालत नाहीं ज्याच्या सत्ते
वांचुनिही नुसती सुतळी ॥
सिंदुरासुरा मारुनी सुरा यक्षकिन्नरा सोख्य
किति दिलें आसुरांतें मारुनियां ॥ २ ॥ भ० ॥

## हिंदु मुसलमानाचा संवाद.

( मुर्खा अक्कल नाहीं तुजसी या चा० )

मुस०––क्यौं हिंदू तुम हमसे लडते ॥
ताबुत छोडकर गणपति करते ॥
हिंदु मुसलमिन भाई कहते ॥
तंटा बखेडा नाहक करते–
हिं०––कां रे वदतां ऐसे भलतें ॥
तंटा केला कोणी वदतें ॥
मशिदीं वरुनि वाजुं न देतां ॥

( १२ )

आमुच्या देवळावरि वाजवितां ॥
पाहुनि आमुचा वाहिन कोणी ॥
केली आमुची तुह्मि धुळधाणी ॥
साह्य होऊनि इंग्रेजांनीं ॥
वाद्य बंद हें केलें त्यांनीं—
मुस०—नहीं अंग्रेजने बंद किया है ॥
हमारे जोरपर बंद हुवा है ॥
ढांले धोतीवाले बम्मन उनोने
करना खानेकी चंमन ॥
हिं०——दारुवाल्याच्या पुला वरती ॥
कांरे दडाला मशिदिखालती ॥
ढीले ब्राह्मण छाती वरती ॥
दंड ठाकुनि उभेच असती ॥
त्या वेळेला कांरे पळाला ॥
मॅक्फरसन तुह्मां साह्य मिळाला ॥
घेउनि आला पोलीसाला
ह्मणोनि अवघे जिवे राहिलां—
मुस०—चूपबैठ फत्तर पुजनेवाले ॥
खाली धाता करनेवाले ॥
बंबईमें किते देव निकाले ॥
तुकडे तुकडे करके डाले ॥
हिं० —चल जा मुर्खा ठाउक आहे ॥
मशिदि फोडिल्या कितीक पांहे ॥

( १३ )

घाटिकमाठीं यांनीं तुमचा ॥
मक्षा उतरिला त्यावेळेचा ॥
ताबुद करणें धर्म न आमुचा ॥
मुडदा पुजणें कुधर्म तुमचा ॥
आपखुषीनें एक दिलानें ॥
उत्सव करु आह्मी गणराजाचा ॥
भाईपणा जरी तुह्मासि आवडे ॥
व्यर्थ वल्गना नका करु गडे॥
तुह्मी वाजवा आह्मी वाजवुं ॥
हिंदुमुसलमिन भेद न समजा ॥
दोघे आपण सत्ते वाला
परक्याचे वरी नचले गमजा ॥

( आरतीभुवन सुंदराची या चा० )

आरती विघ्नसूदनाची सिध्यंगना गणेशाची ॥
॥ ध्रु० ॥ विलसे वदनि लोलशुंडा प्रमथा-
धिपा वक्रतुंडा सुमदें लोलुप अलिगंडा खचित
मणि रत्न दिसे दंडा ॥ चा० ॥ पूजनें त्व-
रित नासुनि दुरित आपदा हरित-सतत पूज-
काची मथिताख्याति गणेशाची ॥ १ ॥ चा० ॥
विधिहरिहरतु इभकर्णा प्रणवात्मका आदि-
वर्णा-पाहुनि हर्षाले आपर्गा मस्तकि दुर्वा

( १४ )

शमिपर्णा ॥ चा० ॥ दर्शने नाश होई
पाश-लागली आस- पुरवि बालकाची प्र
॥ २ ॥ आ० ॥ पार्वति कुमरा अखुव
शोभति आयुधें हाति नाना-श्रुतिला न
गुणगणना सकलहि व्यापुनि परिपूर्णा ॥
नाहिं मज थार-सेवका तार- करी भवपा
आवडमागण्याची प्र० ॥ ३ ॥ आ० ॥
विनायक विनवुनि गजवदना ॥ मागतो
विमलमती स्तवना ॥ नपडो विसर क
नमना ॥ दयाघन दीन लीन चरणा
जगदाधार-तुचि परपार श्रुतींचे थार ॥ सत
नामवाचे ॥ प्र० ॥ ४ ॥ आ० ॥

समाप्त.



२१८८३



(सौजन्य - संदर्भ - चापेकर दामोदर हरी, सुवर्ण प्रिंटिंग, मुंबई, १८९६.)

# परिशिष्ट क्र. ४

यंदाचे ठिकठिकाणचे श्री गणेशोत्सवातील मेळे.




Vol. 6.] जानेवारी १९१५. January 1915. [No. 1.

## हिंदुधर्माचें स्वरूपलक्षण.

लेखक—लोकमान्य बाळ गंगाधर टिळक.

सुमारें पंधरा वर्षांपूर्वी म्हणजे शके १८२२ च्या गणपत्युत्सवांत, हिंदुधर्म इतर धर्मांपासून कसा ओळखावा हें दाखविण्यासाठीं एका व्याख्यानांत आम्हीं त्याचें—

**प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ।**
**उपास्यानामनियमश्चैतद्धर्मस्य लक्षणम् ॥**

याप्रमाणें लक्षण बांधिलें होतें. वेदांच्या ठिकाणीं प्रामाण्यबुद्धि म्हणजे वेद प्रमाण मानणें, ईश्वरप्राप्तीचीं साधनें अनेक आहेत असें कबूल करणें, आणि उपास्य दैवत अमुकच असलें पाहिजे असा नियम नसणें, हें आमच्या धर्माचें लक्षण होय, असा याचा अर्थ आहे. हें लक्षण बांधिल्यानंतर आतांपर्यंत जो काल गेला, त्यांत याबद्दल बरेच ठिकाणीं चर्चा झालेली आहे. पण हिंदुधर्मांचें व्यावर्तक लक्षण या नात्यानें तें अपुरें पडतें असें कोणींहि दाखविलें नाहीं. उलट प्रसिद्ध नैय्यायिक वैकुंठवासी महामहोपाध्याय भिमाचार्य झळकीकर यांनींहि हें लक्षण इतर धर्मांपासून हिंदुधर्म ओळखण्यास पुरें व उपयुक्त आहे, असें त्यावेळीं आम्हांस लिहिलें होतें. परंतु हिंदुधर्मांचें याप्रमाणें व्यावर्तक लक्षण करून सर्व काम भागत नाहीं. हिंदुधर्म इतर धर्मांपासून कसा ओळखावा, हें सांगितलें तरी हिंदुधर्माचे अनुयायी लोक परधर्मीय लोकांपासून कसे ओळखावे याचा त्यानें नीट बोध होत नाहीं. उदाहरणार्थ, वरील लक्षणाप्रमाणें एखादा साहेब वागत असला, किंवा त्याचें मत त्याप्रमाणें असलें म्हणजे तो हिंदु झाला कीं काय ? आणि नाहीं म्हटल्यास त्याचें कारण काय, हें सांगितल्याखेरीज हिंदुधर्मांचें स्वरूपलक्षण पुरें होत नाहीं. म्हणून या निबंधांत हिंदुधर्मांचें स्वरूपलक्षण कोणत्या प्रकारें करितां येईल याचें विवेचन केलें आहे. मद्रासेस नुकत्याच भरलेल्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष बाबू भूपेन्द्रनाथ बसु यांनीं कांहीं वर्षांपूर्वी म्हणजे सन १९११ सालीं हिंदु लोकांचीं लग्नें रजिष्टर करण्यासंबंधानें वरिष्ठ कायदेकौंसिलांत जेव्हां एक बिल आणिलें होतें, तेव्हां " हिंदु कोणाला म्हणावें " याबद्दल वर्तमानपत्रांतून बरीच चर्चा झालेली होती; आणि अलाहबादच्या ' लीडर ' पत्रांत त्या वेळीं याच विषयावर निरनिराळ्या इलाख्यांतील कांहीं विद्वान् लोकांचे अभिप्राय व मतेंहि प्रसिद्ध झालीं होतीं. हीं मतें एका छोट्याशा पुस्तकरूपानें मद्रासेस नटेसन मंडळीनें प्रसिद्ध केलीं आहेत, व त्यांत सर गुरुदास बानर्जी, न्या. सदाशिव आय्यर, सर. सुब्रह्मण्य आय्यर, ना. गोकुळदास पारख, रा. ब. चिंतामणराव, वैद्य वगैरे पंचवीस गृहस्थांचे अभिप्राय नमूद केलेले आहेत. परंतु हे अभिप्राय बहुतेक विचारिलेल्या प्रश्नास तात्पुरता जबाब म्हणून दिलेले असल्यामुळें, त्यांत या विषयाचा जितका मार्मिक विचार व्हावयास पाहिजे होता तितका झालेला दिसत नाहीं; व त्यामुळें ' हिंदु ' कोणाला म्हणावें याचीं यांत दिलेलीं बहुतेक लक्षणें अपुरीं, अशास्त्रीय आणि कांहीं स्थळीं तर जवळ जवळ हास्यास्पद झालेलीं आहेत. उदाहरणार्थ, एकानें असें म्हटलें आहे कीं, जो मुसलमान, ख्रिस्ती, पारशी वगैरे धर्मांतला नाहीं तो हिंदु होय ! हें लक्षण दिसण्यांत बरें वाटतें; पण न्यायदृष्ट्या पाहिलें असतां त्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपल्याला हिंदूचें लक्षण बांधावयाचें आहे, आणि ' जो कोणी हिंदूहून इतर नाहीं तो हिंदु ' असें म्हटल्यानें हिंदुत्वाचा स्वरूपबोध कांहींच होत नाहीं. ज्याला शेंडी आहे तो हिंदु, जानवें आहे तो हिंदु, हिंदुस्थानांत रहातो तो हिंदु, किंवा ज्याचे आईबाप हिंदुस्थानांत जन्मले तो हिंदु, इत्यादि लक्षणेंहि अतिव्याप्ति व अव्याप्ति दोषांनीं ग्रस्त झालेलीं आहेत. कारण शेंडी नाहीं, जानवें नाहीं आणि हिंदुस्थानांतहि रहात नाहींत, असे सध्या पुष्कळ हिंदुलोक आहेत आणि पूर्वीहि होते. सामान्य व्यवहारांत ' हिंदु ' हा शब्द वापरतांना त्याचें लक्षण बांधणें इतकें कठिण असेल असें कोणास वाटत नाहीं. पण तर्कशास्त्रदृष्ट्या ' हिंदु ' या शब्दाच्या अर्थाचा कीस काढूं लागलें म्हणजे अनेक अडचणी उत्पन्न होतात, हें वरील व्याख्यांच्या अपुरेपणावरून दिसून येईल. या सर्व अडचणी लक्षांत आणून " जो आपल्याला हिंदु म्हणतो आणि हिंदु राहूं इच्छितो तो हिंदु होय " असें ' हिंदु ' या शब्दाचें लक्षण एका विद्वानानें केलें आहे. पण एतावता काय झालें ? हिंदुत्व किंवा हिंदुपणा ज्याच्या त्याच्या म्हणण्यावर अवलंबून राहिला; आणि उद्यां एखाद्या साहेबानें मी हिंदु आहे असें म्हटलें कीं तो हिंदु झाला ! आमच्या मतें कोणीहि हिंदु गृहस्थ हिंदुत्वाची ही व्याख्या कबूल करणार नाहीं. अशा अडचणींत दुसऱ्या एका विद्वानानें असें सुचविलें आहे कीं, " इंग्रजी न्यायाचीं कोर्टें ज्याच्या इस्टेटीच्या वारसहक्काचा परंपराक्रम व निकाल हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें करितात तो हिंदु होय. " पण हें लक्षणहि समाधानकारक नाहीं. इंग्रजी कोर्टें या देशांत स्थापन होण्यापूर्वी हिंदुलोक या देशांत होते; आणि त्यांचें धर्मशास्त्र प्रमाण धरून पुढें त्याप्रमाणें इंग्रजी कोर्टें हिंदूंच्या इस्टेटीसंबंधीं न्याय देऊं लागलीं आहेत. म्हणजे हिंदु प्रथम आणि इंग्रजी न्यायकोर्टांतला ' हिंदु लॉ ' मागाहून झालेला आहे. अर्थात् ' हिंदु लॉ ' ज्याला लागतो तो हिंदु म्हणजे कार्यकारणभाव बदलून घोड्याला गाडीच्या मागें जोडण्यासारखें आहे ! तथापि, या व्याख्या सर्वांशीं चूक आहेत, असेंहि म्हणतां यावयाचें नाहीं; त्या प्रत्येक व्याख्येंत थोडा तरी सत्यांश आहे. हिंदूला शेंडी असते, हें कांहीं सामान्यतः खोटें नव्हे; परंतु यापेक्षां हें लक्षण जास्त व्यापक पाहिजे हे कोणीहि कबूल करील. पण अशा व्यापक दृष्टीनें या विषयाचा विचार करूं लागलें असतां त्यांत पुष्कळ अडचणी येतात, किंबहुना व्यापक व निर्दोष लक्षण बांधणेंहि शक्य नाहीं, असें कित्येकांचें म्हणणें आहे. परंतु आमच्या मतें या अडचणी अगदींच अनिवार्य आहेत असें नाहीं. जगांतील इतर लोकांपासून आमचा भिन्नपणा काय, असें कोणीं विचारिल्यास आम्ही हिंदु आहोंत असें आपण म्हणतों; आणि ' हिंदु ' या शब्दाची लोकांस समजण्यासारखी व्याख्या जर आम्हांस करितां आली नाहीं, तर " मी कोण ? " याचेंच आम्हांस ज्ञान नाहीं, असें म्हणावें लागेल. त्यांतून हिंदुस्थान देशांत जेव्हां हिंदुखेरीज दुसरे कोणतेहि लोक नव्हते, तेव्हां या प्रश्नाचें उत्तर देण्याची फारशी जरूर नव्हती किंवा फारसा कोणी विचारहि करीत नसे. पण सध्याचा काळ तसा नाहीं, हें कोणासहि सांगावयास नको.

कोणत्याहि पदार्थाचें, वस्तूचें किंवा शब्दाचें लक्षण अगर व्याख्या सांगण्याचे पूर्वी तो शब्द आपण कोणत्या अर्थी योजितों, याचा खुलासा करावा लागतो. उदाहरणार्थ, संस्कृतांत ' सैंधव ' या शब्दाचे दोन अर्थ होतात. एक ' सिंधुदेशांत जन्मलेला घोडा ' आणि दुसरा ' खाणींतील मीठ '. म्हणून ' सैंधव ' या शब्दाचा अर्थ काय याचा खुलासा न करितां सैंधव चार पायांचा, शेंपटीचा, दोन कानांचा व आयाळीचा एक पशु आहे इ. लक्षण कोणीं सांगितल्यास, तें खोटें आहे, सैंधव खारट आहे, त्याला पाय नाहींत आणि शेपटीहि नाहीं, असें दुसरा कोणी प्रतिपक्षी त्यावर चटकन उत्तर देईल. ही आपत्ति टाळण्यास प्रथमतः ज्याचें लक्षण द्यावयाचें त्या शब्दाच्या अर्थाची व्याप्ति ठरवावी

# यंदाचे ठिकठिकाणचे श्रीगणेशोत्सवांतील मेळे.




अभिप्राय.

लोकसंग्रह—( ता. ११९।२२ ) कार्याची कळकळ व आंच असल्यानें हृदयांतून उमटणारे बोल चटका लावून सोडणारे असतात.

सत्याग्रही—( ता. २।९।२२ ) निरनिराळ्या मनःप्रवृत्ति पदांत प्रतिबिंबित झाल्या आहेत.

केसरी—( ता. ५।९।२२ ) धर्मभावना उद्दीपित करणारीं व राष्ट्रीय मनोवृत्ति उचंबळविणारीं उद्बोधक अशीं पदें असून मेळ्यांतील लहान बालकांच्या कोमल व मधुर आलापांनीं अंतःकरण प्रमुदित होत असे.

इंदुप्रकाश—( ता. १२।९।२२ ) कोणत्याहि पक्षभेदांत न सांपडतां या मेळ्याचीं पदें म्हटलीं जातात. टिपऱ्या वगैरे कामेंहि प्रेक्षणीय व मोहक होतात.

स्वधर्म पुणें—( ता. २१।९।२२ ) वक्तशीरपणा, टापटीप, शिस्त व पदें म्हणण्याची धाटणी नांवाजण्यासारखी असून प्रत्येकानें कित्ता घेण्याजोगी आहे.

मेळ्यानिमित्त संस्थेस मिळालेली मदतः—प्रो. जे. पी. त्रिवेदी ( ॲग्रिकल्चर कॉलेज रु. ५०, बी. जे. मेडिकल स्टुडंटस रु. ३५, श्री. माधवराव आनंदराव रास्ते रु. २५, इतर जमा रु. ११७। पत्रावळी रु. २०, एकूण जमा रु. २४७।, यंदाचे श्रीगणेशोत्सवांत सार्वजनिक व खासगी मिळून १०८ गणपती पुढें मेळ्यानें हजेरी दिली.

## पुणें येथील मुलामुलींचा समर्थ मेळा.



मेळ्यांतील मुलामुलींचा फोटो.

## पुणें येथील सत्याग्रह मित्र मेळा.




मेळ्यांतील मुलांचा फोटो.

---

## पुणें येथील प्रेस वर्कर्स युनियनचा गणपत्युत्सव.



पुणें.येथील निरनिराळ्या छापखान्यांतील कामगार मंडळी.

.सदर संस्थेच्या.विद्यमानें यंदाचा श्रीगणेशोत्सव मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. दे. नरसिंह चिंतामण केळकर, दे. पोतदार यांची व्याख्यानें, ह. भ. प. मुषडकरबुवा यांचें पुराण व निमंत्रित मेळ्यांचें संमेलन होऊन त्यांना युनियनतर्फे पदकें व पारितोषकें देण्यांत आलीं.

## धारवाड येथील कर्नाटक राष्ट्रीय महाविद्यालयाचा मेळा.



मेळ्यांतील मुलांचा फोटो.

बसलेले डावीकडून:—श्रीयुत नरसिंहाचार्य पुणेकर ( काव्यानंद ) श्रीधर शि. खानोलकर ( तरुण कवि ) प्रल्हाद नरसिंह ( शिशु कवि )

## महाड येथील गणपत्युत्सव.



मुरलीधर मेळ्यांतील मुलांचा फोटो.

महाड येथें यंदा सार्वजनिक गणपत्युत्सव मोठ्या थाटानें साजरा झाला. त्या वेळीं येथें बरेच मेळे निघाले होते. त्यांतच " श्रीमुरलीधर मेळा. " या नांवानें एक मेळा निघाला होता. सदरहू मेळ्यानें सार्वजनिक तऱ्हेनें जमविलेले पैसे गोरक्षणास दिलेले आहेत.

## अकोला ( वऱ्हाड ) येथील टिळक राष्ट्रीय कन्याशाळेचा श्रीगणेश मेळा.



मेळ्यांतील मुलींचा फोटो. [ फोटोग्राफर—का. ग. बाजी, अकोला

आजपर्यंत या शहरीं अशा प्रकारचा मुलींचा मेळा कधींच झाला नसल्यामुळें यंदाच्या गणपत्युत्सवास अपूर्व शोभा आली होती. हा मेळा अत्यंत यशस्वी करून दाखविण्याचें पूर्ण श्रेय टिळक राष्ट्रीय कन्याशाळेच्या मुख्याध्यापिका श्री. सौ. इंदिराबाई कट्टी यांजकडे आहे.

## ग्वाल्हेर येथील श्रीगणेशोत्सव व रामलीलोत्सव.

" सार्वजनिक श्रीगणेशोत्सव "
नवा बाजार, लष्कर-ग्वालेर.



उत्सवांत केलेल्या कातरकामाचा नमुना.

लष्कर-ग्वालेर येथील सन्मित्र मंडळाचा गणेशोत्सव.



उत्सवांतील मुलांचा फोटो.

उत्सवाच्या कार्यक्रमांत मंडळानें एक दिवस चंद्रग्रहण नाटक व एक दिवस सतंग हे खेळ यशस्वी रीतीनें पार पाडले.



रामलीला उत्सवांत काम करणारी मंडळी. [ फोटोग्राफर—रा. ल. देसाई.

## कोल्हापूर येथील न्यु स्कूलचा श्रीगणेशोत्सव.



शिक्षक व व्हालंटीयर्स. [ फोटो पाठविणार—शं. मा. इनामदार न्यु स्कूल, कोल्हापूर.

## अमदाबाद येथील भद्रभजन मंडळाचा गणेशोत्सव.



अमदाबाद येथें भद्रेतील मंडळीच्या साहाय्यानें झालेला भद्रभजन समाजचा प्रथम गणेशोत्सवांतील मिरवणूक.

## पुणें येथील सोट्याम्हसोबाचे मेळ्याचा श्रीगणेशोत्सव.



मेळ्यांतील मुलांचा फोटो.

## पुणें येथील विद्यार्थीमंडळाचा श्रीगणेशोत्सव.




मेळ्यांतील मुलांचा फोटो.

पसंत देशी सुती गंजीफ्रॉक्स— व स्वदेशी शिंगाचीं व शिंपांचीं सुंदर फॅशनेबल बटनें आमचेकडे अगदीं कमी भावानें मिळतील. रामकृष्ण आणि को. २७२ सदाशिव पेठ, पुणें शहर.

# परिशिष्ट क्र.५

# स्वदेशी बहिष्काराचे महत्व दिनांक १६ नोव्हेंबर १९०७ रोजीचे पढंरपूर येथील भाषण.



हिंदुस्थानांत शांतता असतां, साम्राज्यावर कोणतेंहि संकट नसतां, रशियाचा पाय मोडला असतां, रशिया येण्याची भीति बिलकुल नसतां, असें करणें हें इंग्रजी राज्याच्या इभ्रतीस बट्टा आणणारें आहे ! कायदा जितका अधिक कडक तितका तो चुकविण्याची बुद्धि अधिक होत असते. रशियांत असे कायदे आहेत, आणि तिकडील लोक ते चुकवीत आहेत. तोंडावाटें बाहेर पडणारे विचार पोटांत कोंडले तर अनर्थ होईल ! आम्ही स्पष्ट सांगतों कीं, सरकारनें असें करणें हें त्यांना चांगलें नाहीं. आम्हांलाहि चांगलें नाहीं. रशिया येण्याची भीति होती ती जपाननें दूर केली, पण आतां येथेंच रशिया होत आहे याला काय करणार ? वायव्य प्रांतांतून रशिया येणार होता. आतां तो सिमल्याहून येत आहे. चुकलों, वायव्य सरहद्दीवरून रशिया येणार होता तो आतां सिमल्यावरून येत आहे. सभाबंदीचा हा कायदा जुलमी आहे. असा कायदा करण्याचा सरकारला हक्क नाहीं. मनगटाच्या जोरावर असेल, पण नीतीनें नाहीं. ईश्वरदत्त वाणीचा हक्क काढून घेण्याचा सरकारास हक्क नाहीं. मी तुम्हांला सांगतों कीं, तुम्ही आतांपासून तयार व्हा; आज वाणीनें तर उद्यां तुम्हांला कृतीनें निषेध करावा लागेल. जो कायदा आपल्याला जुलमी वाटतो, तो न मानणें हें प्रजेचें काम आहे. कायद्यानें वागणाऱ्या गरीब, शांतताप्रिय, सुशील प्रजेवर जुलूम करणें रशियन सरकारपेक्षांहि क्रूरपणाचें – रानटीपणाचें आहे. प्रसंग कठिण आला आहे, त्याकरितां आतांपासून तयार व्हा, अशी विनंति करून मी आपलें भाषण पुरें करतों.

– लो. टिळक यांचीं व्याख्यानें, पृ. ५६

## ४ स्वराज्यासाठीं स्वदेशी

पंढरपूर येथें चंद्रभागेच्या वाळवंटावर सुमारे १५००० लोकांसमोर ता. १६ नोव्हेंबर १९०७ रोजीं रात्रीं लो. टिळक यांनीं पुढील भाषण केलें –

सभ्य गृहस्थहो !

गेल्या सालीं याच ठिकाणीं चंद्रभागेच्या वाळवंटावर मीं दोन शब्द सांगितले होते व आपण ऐकले होते; त्याला एक वर्ष होऊन गेलें. त्या वेळचे लोक आज पुनः आले असतील. त्यांना आतां मी जें सांगणार आहे तें नवीन वाटणार नाहीं; पण पांडुरंगाचें दर्शन कितीहि वेळां घेतलें तरी तें जसें इष्टच आहे त्याप्रमाणें मी सांगणार आहे ते विचार ऐकून अंतःकरणांत उतरेपर्यंत त्यांचें निरूपण झालें पाहिजे. तेव्हां पुनः तेच विचार बोलल्याबद्दल आपण माफी कराल अशी आशा आहे. गेल्या वर्षांत काय झालें ? दोन स्नेही भेटले तर, "तुझ्या घरचें कसें काय चाललें आहे, मुलें-माणसें चांगलीं आहेत ना, गुरेंढोरें ठीक आहेत का, रोगराई वगैरे कांहीं नाहीं ना," असे

प्रश्न एकमेकांना करितात. त्याप्रमाणें 'गेल्या वर्षांत काय झालें' असा प्रश्न झाल्यास आपल्याला काय उत्तर द्यावें लागेल ? प्लेग पसरत चालला आहे, पिकें चांगलीं नाहींत, गेल्या वर्षापेक्षां स्थिति चांगली झाली असें सांगतां येत नाहीं. तुम्ही सर्व जण पांडुरंगाचें दर्शन घ्यावयास आला आहां. पण देशाचें कल्याण करण्याची बुद्धि आम्हांला दे, अशी प्रार्थना त्याजजवळ तुम्हीं केली आहे काय ? पूर्वी येथें येण्यास आगगाडी नव्हती, यंदां झाली आहे. मग या गाडीनें तुमचा फायदा झाला आहे काय ? का तुमचे पैसे मात्र तेवढे गेले आहेत ? या किंवा असल्या गोष्टींचा विचार तुम्हीं केला आहे काय ? तुम्ही म्हणाल, "पांडुरंगावर आमचा हवाला आहे. तो आम्हांला देईल." कबूल आहे. गोष्ट खरी आहे. पण पांडुरंगाला तरी मागावें लागतें, तेव्हां तो देतो. त्याच्यावर भक्ति व दृढ विश्वास ठेवून त्याला मागावें लागतें व आपलें मागणें त्याला देणें भाग पडतें. तुमची स्थिति कशी आहे व तुम्हांला काय पाहिजे आहे, याचा विचार करून निष्ठेनें आणि भक्तीनें पांडुरंगाजवळ तुम्ही मागणें केलें आहे काय, हा माझा प्रश्न आहे. देशस्थितीचा विचार करा, हें माझें सांगणें आहे.

गुदस्त सालचें सरकार यंदां राहिलें नाहीं. तुमची स्थिति जशी वाईट झाली तशी तुमच्या सरकारची बुद्धीहि वाईट झाली आहे. सभाबंदीचा कायदा सरकारनें नुकताच केला आहे. वीस माणसांपेक्षां जास्त माणसें राजकीय गोष्टींकरितां एके ठिकाणीं बसूं द्यावयाचीं नाहींत, असें सरकारनें ठरविलें आहे. देशाची सेवा करणारांना सरकारनें पकडलें आणि अटकेंत टाकिलें. आतां त्यांतील लाला लजपतराय यांस सोडिलें आहे. शेतकरी, व्यापारी, उदमी सर्वांना कठिण स्थिति आली आहे. ही एक कचाटी आहे व त्यांत आपण सांपडलों आहों, आपण यांतून निघत नाहीं, हा दोष कोणाचा ? आपला का परमेश्वराचा ? परमेश्वराची बुद्धि सदा सारखी आहे. भक्ताचें संकट परमेश्वर निवारण करतो. पण तशी निष्ठा तुम्हीं आपल्या कृतीनें दाखविलेली नाहीं. एक वर्षांत स्थिति बदलली आहे व पुढें काय होईल हें सांगतां येत नाहीं. आज मी येथें आपणां-समोर व्याख्यान द्यावयास उभा राहिलों आहे. अशा रीतीनें पुढल्या वर्षी आपण जमलों असतां व्याख्यान देणें शक्य होईल कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. असाहि प्रसंग येण्याचा संभव आहे कीं, वीस माणसांपेक्षां जास्त मंडळींचा फड येथें पुढल्या वर्षी येऊं शकणार नाहीं ! पांडुरंगाचें नांव घेतल्यानें तुमच्या मनांत खळबळ झाली तर तुम्ही कायद्यांत येतां, असें होण्याचा संभव आहे. पंढरपूर हें मोठें महत्त्वाचें क्षेत्र आहे. तें महाराष्ट्रांतील मुख्य ठिकाण आहे म्हटलें तरी चालेल. मुंबई, पुणें हीं शहरें तुम्हांला मोठालीं दिसतील, पण त्या शहरांतून १० रुपयांकरितां गुलामगिरींत जाणारे लोकच तुम्हांला सांपडतील. पण पंढरपूरचें तसें नाहीं. कळकळीनें व निश्चयानें, कोणचाहि स्वार्थ नसतां आपण होऊन जर कोठें लोक जमत असतील तर ते पंढरपुरास जमतात. तुमची जेवणाखाण्याची सोय येथें नाहीं. तुम्हांला कोणीं आमंत्रण केलें नव्हतें. तुमची उतरण्याची वगैरे सोय मुद्दाम आधींच कोणीं केलेली नाहीं. पंढरपुरांत रोगराई होण्याचा

संभव आहे, असें असलें तरी तुम्ही येथें येतां. त्या श्रद्धेनें, निष्ठेनें, कळकळीनें तुम्ही देशाविषयीं विचार करा.

व्यापारी जसा वर्षाचा आढावा काढतो; नफा झाला का तोटा झाला, खर्च काय झाला व शिल्लक काय राहिली हें पहातों त्याप्रमाणें देशाविषयीं वर्षांतून एक दिवस तरी—निदान एक घटका तरी—तुम्ही विचार करा. हा माझ्या एकट्याचा किंवा दुसऱ्या एखाद्या व्यक्तीचा प्रश्न नाहीं. हा तुमचा-माझा—सर्वांचाच प्रश्न आहे. आपली स्थिति गेल्या वर्षांत निर्विवाद वाईट झाली आहे. तुमच्याकरितां सरकारशीं भांडणारांस तें शिक्षा करीत असून 'असें कां करितां' म्हणून त्यांस विचारिलें असतां 'रयतेच्या कल्याणाकरितां' असा जबाब येतो! सभाबंदी कां करितां? तर रयतेच्या कल्याणाकरितां! २० रेडे, २० म्हशी, २० गाई एकत्र जमल्या तर चालतील. २० मेंढ्या जमल्या—हजारों जमल्या—तर चालतील. पण २० माणसें जमलेलीं चालणार नाहींत! याचा प्रतिकार तुम्ही करणार कीं नाहीं, हा प्रश्न आहे. आमच्या धर्माच्या ठिकाणीं, पुण्य-क्षेत्रीं, आमच्या धर्माविरुद्ध बोलण्यास मिशनऱ्यांना मुभा आहे. कां, तर म्हणे मनांतील विचार मोकळेपणानें बोलून दाखविण्याची मोकळीक सर्वांना असली पाहिजे. मग आमचीं तोंडें सरकारनें कां बंद करावी, हा प्रश्न आहे. राज्य कोणाला नको? मिळालें तर सर्वांना पाहिजे आहे. मला दिलें तर मलाहि पाहिजे असें वाटतें. हा मनुष्यधर्म आहे. पण राजाच्या मागें धर्म आहे, शास्त्र आहे. ते जेव्हां राजा उल्लंघून जातो, पाळीत नाहीं तेव्हां राजा पाप करतो. या राजाच्या शास्त्रांत सांगितलें आहे कीं, राजाचीं दुष्कृत्यें प्रजेला भोंवतात. माझें पाप मला भोंवतें. तुमचें पाप तुम्हांला भोंवतें. राजाचें पाप राष्ट्राला भोंवतें. आमच्या शास्त्रांत असें आहे. असें न झालें तर तो राजा कशाचा? राजाचें पाप नुसतें राजाला भोंवलें तर राजांत व इतर माणसांत फरक तो काय राहिला? मग तो साधा मनुष्य झाला. राजाच्या पापानें प्रजेवर संकटें येतात व त्याचा प्रतिकार प्रजेनें न करणें म्हणजे राजाच्या पातकांत प्रजेनें आपल्या पातकाची भर घालून आपल्यावर जास्त संकटें ओढून घेणें आहे. राजाचा धर्म सुटला आहे. पाप झालें आहे. देशांत धान्य नाहीं! पण धान्य देशाबाहेर कोण जाऊं देतो? व जर धान्य देशाबाहेर जातें तर खरें दुष्काळाचें कारण कोणतें? जी गोष्ट अधर्माची व अनीतीची आहे ती राजाला व प्रजेला दोघांनाहि अहितकारक आहे असें स्पष्टपणें म्हणण्यास काय हरकत आहे? गोष्ट मनांतल्या मनांत ठेवण्याचे दिवस गेले आहेत. तुम्ही उद्योग कराल तर हे दिवस जातील—खात्रीनें जातील; नाहीं तर कठिण अवस्थेंत रहाल. सध्यांच्या स्थितीसंबंधानें खेड्यापाड्यांतून चर्चा झाली पाहिजे. येथून कांहीं शिकून जर परत जावयाचें असेल तर राजाची नीति बिघडली आहे, धर्म बिघडला आहे, हें लक्षांत आणा व कार्याला लागा. "तोंड दाबून बुक्क्यांचा मार आम्हीं सहन करणार नाहीं!" असें ज्या दिवशीं स्पष्ट सांगाल त्या दिवशीं तरणोपाय आहे.

सरकार काय म्हणत आहे ? आम्ही इतक्या कोसांवरून जें आलों आहोंत तें चंबूगबाळें उचलून परत जाण्याकरितां आलों नाहींत, आम्ही येथें रहाणार. आम्ही हल्लीं करतों त्याचप्रमाणें राज्य करणार. तुम्ही तक्रार करतां कामा नये, केली तर शिक्षा होईल. सभाबंदीचा कायदा का केला म्हणून जर विचाराल, तर तुम्हांला सांगतील कीं, हे 'बामण' वाईट आहेत. त्यांचीं तोंडें बंद करण्याकरितां हा कायदा केला आहे. त्यांचें म्हणणें तुम्ही आपणहून तोंड बंद ठेवा, व तुम्ही न ठेवाल तर तें आम्ही शिवूं. तुम्ही म्हणाल कीं, राजकीय विषयावर नाहीं तर नाहीं, आम्ही धार्मिक विषयावर बोलूं. पण त्यानें खळबळ, जागृति, स्फूर्ति उत्पन्न झाली. विठ्ठल विठ्ठल म्हणण्यानें खळबळ झाली तर तें सरकार बंद करणार! याचा विचार तुम्हीं करावा. खेड्यापाड्यांतून हा विचार तुम्ही घेऊन जावा. हा माझ्या बोलण्याचा हेतु आहे. गेल्या वर्षाची हकीगत सांगण्याकरितां मीं मुद्दाम येथें आलों आहे. कोणी विचारतील "मग काय ? आम्हीं बंड करायचें कीं काय ?" बंड करायला नको व स्वस्थहि बसायला नको, हें माझें यांस उत्तर आहे. पोलीस कोण आहे, मुनसफ कोण असतात, मामलेदार कोण असतात ? सगळे तुमचेच लोक. सगळे तुमच्या हातांत आहे. पण तुम्ही ओळखीत नाहीं. ही बार्शी लाईट रेल्वे आहे. ती चालवितो कोण ? एक साहेब वर आहे. बाकी आम्हीच ती चालवितों. असेंच सगळें आहे. आणि जर असें आहे तर सरकारला आपल्या मनासारख्या गोष्टी करायला कां लावतां येणार नाहीं ? पाटील, कुलकर्णी, सारा वसूल करणारे, न दिल्यास धरणारे आपलेच लोक असतात. पिकें चांगलीं आहेत असा खोटा रिपोर्ट करणारे लोकहि आपलेच असतात! सरकारला तुमच्यांतील चहाडखोर लोक कसे वाढतील याची काळजी आहे. असल्या प्रकारची चहाडी करणें हा देशाशीं बेइमानपणा, मातेशीं बेइमानपणा आहे! तो सोडून द्या. ही पहिली गोष्ट. एवढी गोष्ट कराल तर सरकारचा एक पाय खास लंगडा पडेल, दुसऱ्या पायाचें मग पाहूं. ते म्हणतात, आम्ही सहा हजार कोसांवरून आलों आहों, तुम्ही आम्हांला बातमी देणार नाहीं तर आमचें कसें होईल ? तुम्ही चहाडी केली नाहीं तर सरकारचें अर्धें काम बंद होईल. हें पूर्वी कोणी बोलतें तर तो राजद्रोह समजला गेला असता, पण आतां सरकारी अधिकारीच हें सांगत आहेत; त्यांचेंच म्हणणें मीं तुम्हांला सांगितलें आहे. दुसरी गोष्ट काय, तुम्हांला खायला जर मिळत नसेल, तुमच्या पोटाला मिळत नसेल, तुमच्या पोटांतून खरी कळ येत असेल, तर तुमचें तोंड त्यासंबंधानें बोलेल. तुमच्यापैकीं कोणीं चहाडी केली नाहीं, रुसून बसला 'तर तुम्हांला काय पाहिजे' म्हणून आपोआप विचारायला येतील, 'मग आम्हांला हें – हें पाहिजे.' असें त्यांना सांगावें. वैद्याला खरेंच सांगितलें पाहिजे, नाहीं तर इलाज होणार कसा ?

शेतकऱ्यांनीं, कारागिरांनीं, धंदेवाल्यांनीं, पाटील-कुलकर्ण्यांनीं – सर्वांनीं "या राज्यांत आमची स्थिति चांगली नाहीं." असें स्पष्ट सांगितलें पाहिजे. यांत सर्वांच्या सांगण्यांत मेळ पाहिजे. कलेक्टर असो, कमिशनर असो, कीं त्यापेक्षां दीड हात उंचीचा

कोणी साहेब असो, त्याला हेंच उत्तर देण्यास भिऊं नका. नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाहीं; नाहीं तर ( दांतखिळीच बसली असल्यास ) पळी घालून तोंड उघडावें लागतें. पांडुरंगाचा पदर धरून त्याला जेवायला लावलें होतें. सरकारचा पदर तुम्हांला सांपडलेला नाहीं व तो पदर तुम्हांला धरतां येत नाहीं. इंग्रज सहा हजार कोसांवरून येथें आले आहेत. ते तुमच्या कल्याणाकरितां, मोक्षाकरितां येथें आलेले नाहींत, हें स्पष्टपणें सांगितलें पाहिजे व तें मी तुम्हांला सांगतों. ते आपल्या फायद्याकरितां – आपल्या कल्याणाकरितां – येथें आले आहेत. मग त्यांचें कल्याण कांहीं कमी करण्याचें तुमच्या हातांत आहे काय, याचा विचार करा. यावर स्वदेशी व्रताचें अवलंबन हा एक उपाय आहे. आपल्याजवळ शस्त्रें नाहींत. ते बळकट आहेत, ते श्रीमंत आहेत, त्यांना आपण पैशानें उडवूं शकत नाहींत. तेव्हां हाच उपाय आहे. तुमच्या पैशांवर तुम्ही बातम्या देतां व त्यावर तुमच्या कर्तबगारीवर जें राज्य चाल्तें तें कोठें तरी अडलेंच पाहिजे. सरकारचे अधिकारी येथें कोणी असतीलच. माझें संरक्षण करायला कांहीं पोलीस माझ्या-मागें येत असतात. पण आम्ही कोणाचा द्वेष करीत नाहीं. आपल्या पोटावर प्रीति करतो एवढेंच. असेंच तुम्ही सांगा. यांत इंग्रजांचा द्वेष नाहीं. सर्वांना खायला मिळावें अशी आमची इच्छा आहे. त्या सर्वांत आम्ही स्वतः येतों. आमचें ताट घेऊन दुसऱ्यास द्यावयास मात्र आम्ही तयार नाहीं. गेल्या वर्षी 'स्वदेशी' व्रताविषयीं शपथ घेण्यास मीं तुम्हांस सांगितलें होतें; तें विसरला असाल तर पुनः एकदां शपथ घ्या. पुनः पुनः हेंच सांगावयाचें कीं, चहाडी पुरे करा. सरकारवर रुसून बसा. लहान मुलें बापावर रुसतात तर मग वयानें मोठ्या अशा तुम्हांस रुसतां येणार नाहीं ? उद्योग करतां येत नाहीं, रुसतां येत नाहीं, व तोंडहि बंद ठेवतां येत नाहीं ? ज्याच्यानें चहाडी केल्याशिवाय रहावत नाहीं त्याला पांडुरंगानें एकच जागा केली आहे – ती जागा नरक ही होय.

आपल्या कर्मानें खालीं पडाल किंवा वर याल, रुसाल तें मनासारखें घडून येईपर्यंत रुसा. गोष्ट शेवटाला लागेपर्यंत रुसा. मग सरकार कितीहि बलाढ्य असो. तें तुम्हांला 'काय पाहिजे' म्हणून येऊन विचारील. सरकारला वाटतें आहे कीं, सध्यांची चळवळ धाकानें जाईल. ती वरवरची आहे. मूल रुसलें असतां बाप तरी काय करतो ? प्रथम छडी दाखवितो. त्यानें काम झालें नाहीं तर आपोआप रुसवा जाईल म्हणून कांहीं दिवस दुर्लक्ष करून तसाच रहातो. त्यानेंहि झालें नाहीं तर मग विचारतो 'तुला काय पाहिजे ?' मग 'उद्यां करीन' म्हणून गोष्ट पुढें ढकलतों व यानेंहि साधलें नाहीं म्हणजे जें पाहिजे तें देत असतो. तसेंच लोका-संबंधानेंहि आहे. रुसणें हें बेकायदेशीर नाहीं – बेकायदा वर्तन करूं नका – व हें एकनिष्ठेनें कराल तर पांडुरंग तुम्हांला तारील यांत शंका नाहीं. तुमच्यांत मनुष्यपण आहे, तुमचें हितानहित तुम्हांला कळतें असें दाखवा. मी सांगतों हें माझ्या फायद्याकरितां नाहीं. यानें कदाचित् मी सरकारच्या रोषास पात्र होईन. सरकारी धोरण तुम्हांला कळूं नये अशी अधिकाऱ्यांची इच्छा दिसत आहे. पण स्पष्टपणें खरें सांगणें जरूर आहे. असे दिवस आले

आहेत; आणि म्हणून ही जबाबदारी मीं आपल्या अंगावर घेतली आहे. आज मी येथें बोलतों आहे व तुम्ही इतके जण ऐकत आहां, पण पुढल्या सालीं असें करूं शकणार किंवा नाहीं याची शंका यावी, असाच काळ आला आहे. तुम्ही भ्याल तर तुमचा तरणोपाय नाहीं असें स्पष्टपणें पांडुरंगासमोर या चंद्रभागेच्या तटावर मी सांगत आहे. विचार करा व कार्याला लागा, अशी माझी तुम्हांस विनंति आहे – नाहीं, आग्रह आहे. तुमच्यांत एकनिष्ठा, सत्यनिष्ठा पाहिजे, परमेश्वरनिष्ठा पाहिजे. जो परमेश्वराशीं प्रतारणा करतो तो राष्ट्राशींहि प्रतारणा करण्याचा संभव आहे. धीर धरा, निश्चयानें वागा, स्वदेशीचें व्रत एकनिष्ठेनें पाळा, परमेश्वर तुम्हांला संकटांतून मुक्त करील.

– लो. टिळक यांचीं व्याख्यानें, पृ. ७१

(संदर्भ - टिळक ग. श्री. (संपा), समग्र टिळक, खंड क्र ६, पृ. ७३० ते ७३५.) केसरी प्रकाशन, पुणे १९७६,

# ५ आम्ही दरिद्री का ?

सोलापूर येथें सदर बाजारांत ता. २९ फेब्रुवारी १९०८ रोजीं लो. टिळक यांचें व्याख्यान झालें. तें पुढीलप्रमाणें –

अध्यक्ष आणि सद्गृहस्थहो !

सदर बाजारांतील लोकांनीं या ठिकाणीं जो आमचा सन्मान व गौरव – आम्ही तितके योग्य नसतांहि – केला त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतों. आज लोकसमुदाय फारच मोठा जमला आहे, पण उशीर झाला असल्यामुळें थोड्या अवधींत मला जे चार शब्द सांगतां येतील तेवढ्यांत आपण पूर्तता करून घ्याल व कमी-अधिक असल्यास ते गोड करून घ्याल अशी मला आशा आहे. 'सद्यःस्थिति' या विषयाचें, हल्लीं काय चाललें आहे, पाठीमागें काय होतें, आणि ही स्थिति सुधारतां येईल किंवा कसें, असे तीन भाग होऊं शकतात. प्रत्येकाचें विस्तृत विवेचन एका वेळीं होणें अशक्य आहे.

महाभारतांत एका पर्वांत धर्म आणि नारद यांचा संवाद दिला आहे. त्यांत नारदांनीं धर्मास अनेक प्रश्न विचारले आहेत. लोकांची स्थिति कशा प्रकारची असावी तें नारदांनीं या प्रश्नांत ध्वनित केलें आहे. पाऊस, कृषिकर्म, वाणिज्य, व्यापार वगैरे कसे काय आहेत, ब्राह्मण आपला धर्म पाळतात कीं नाहीं वगैरे अनेक तऱ्हेचे हे प्रश्न आहेत. तुम्हीहि अशा तऱ्हेचे प्रश्न विचारून त्यांचीं उत्तरें देण्याचा प्रयत्न केल्यास तुमची स्थिति तुम्हांस कळून येईल.

हल्लीं राज्य इंग्रजांचें आहे. पहिला प्रश्न असा उद्भवतो कीं, हिंदुस्थानांत पाऊस नीट पडतो कीं नाहीं व नीट पाऊस पडत नसला तर जितका पाऊस पडतो तितका शेतकऱ्यांकरितां सांठवून ठेवण्याची तजवीज केली आहे किंवा नाहीं ? शेतकी पावसावर अवलंबून न ठेवतां जे राजे कालवे, तलाव वगैरे करतात ते चांगल्या तऱ्हेचे, अशी

# परिशिष्ट क्र. ६

## ४ मे १९०८,अकोला शिवजयंती उत्सवात श्री गजानन महाराज अध्यक्ष असतानाचे टिळकांचे भाषण.



स्वराज्यहि मिळत नसतें. तें मिळण्यास तुरुंगवास, फटके, हद्दपारी इतकेंच काय, पण सत्पक्षाकरितां व न्यायाकरितां आपण मरणासहि तयार झालें पाहिजे.

ही मनाची तयारी होण्याला राष्ट्राची काय स्थिति आहे ती स्पष्ट दिसून अंतःकरणावर बिंबली पाहिजे. ज्यांच्या अंतःकरणावर बिंबली अशा या व मागच्या पिढींतील सर्व देशभक्तांनीं हिंदभूचा जो मोडका गाडा अशा स्थितींत येथपर्यंत आणून सोडला आहे तो नेटानें पुढें ओढण्याचें काम पुढच्या पिढीचें आहे; व तो ते ओढतील व कोठेंहि खुंटूं देणार नाहींत असा मला भरंवसा आहे. तरुणांनीं, मवाळ-जहालांच्या तंट्यांत पडूं नका. मवाळ असा, जहाल असा, राष्ट्रकार्य करण्यास अंगचोरी व कसूर करूं नका. महाराष्ट्राकडे सर्वांचे डोळे आहेत. महाराष्ट्रानें आधीं केलें आहे. या गोष्टीची त्याला ओळख आहे. स्वराज्य म्हणजे काय याचा त्याला अनुभव आहे. तेव्हां महाराष्ट्रीयांच्या अंगांत त्या पूर्वजांचें शुद्ध रक्त जर खेळत असेल, तर हल्लींच्या परिस्थितीला योग्य व आंखून दिलेल्याच कायद्याच्या मर्यादेंत ते स्वराज्याचे हक्क संपादतील. नाहीं तर बोलूं नये, पण अनिर्बाह-पक्ष असून बोलतों कीं, महाराष्ट्रीयांचें शुद्ध व तेजस्वी वीर्य भ्रष्ट झालें आहे असें समजावें लागेल.

– लो. टिळक यांचीं व्याख्यानें, पृ. ७८

## ४ साध्य-साधन-मीमांसा

अकोला (वऱ्हाड) येथें दहा-बारा हजार श्रोतृसमाजापुढें ता. ४ मे १९०८ रोजीं लों. टिळक यांचें व्याख्यान झालें. या सभेस श्रीगजाननमहाराज उपस्थित होते. लो. टिळकांनीं पुढील भाषण केलें.

देशबांधवहो,

आजचा हा प्रचंड जनसमूह पाहून मला आनंद होत आहे. आजचा प्रसंग अपूर्व आहे. श्रीशिवाजी-उत्सवाचा आज तिसरा दिवस आहे. या प्रसंगीं आपल्या प्रांतांतील प्रसिद्ध सिद्ध पुरुषाचें या ठिकाणीं आगमन होऊन त्याचा अनुग्रह व्हावा हें खरोखर सुदैव होय. असा प्रसंग आजपर्यंत श्रीशिवाजी-उत्सवाला यापूर्वी कधींहि आला नव्हता. महाराजांना येथें निमंत्रण करून हा अपूर्व योग आपण घडवून आणला याबद्दल मी आपला फार आभारी आहे. श्रीगजाननमहाराजांची परंपरा श्रीशिवगुरु श्रीरामदासस्वामींपासून आहे हें आपणांस माहीत आहेच. या उत्सव-प्रसंगीं यांनीं हजर रहावयाचें मनांत आणून व आपल्या विनंतीस मान देऊन येथें आगमन केलें आहे. "हजर रहाण्याचें मनांत आणून व विनंतीस मान देऊन" असें मीं म्हटलें आहे. येथें येण्याचें त्यांच्या मनांत आलें, यामुळें आपल्या कार्याला यश येईल, अशी सद्‌बुद्धि माझ्या मनांत उत्पन्न झाली आहे. कोणत्याहि कार्यास परमेश्वराचा अनुग्रह पाहिजे व त्याचें चिन्ह

आजचें महाराजांचें आगमन होय. त्यांनीं येण्याचा अनुग्रह केल्यामुळें त्यांच्यासमोर बोलणारावर जबाबदारी येऊन पडली आहे, आणि या जबाबदारींतून आपण कसें पार पडूं याची शंका मला वाटावयास लागली. तथापि ज्या कृपेनें त्यांचें येथें आगमन घडवून आणलें तीच सत्कृपा हें कार्य घडवून आणील, अशी मला खात्री वाटते. असे योग क्वचित् येतात. यांत ईश्वरी प्रेरणेचा अंश खचित आहे. या ठिकाणीं येण्याची त्यांना बुद्धि व्हावी, आमचीं वेडीवांकडीं कृत्यें त्यांनीं अवलोकन करावीं व त्या कार्यांना त्यांचें पाठबळ मिळावें, यावरून हा दैवी योग आहे, अशी माझी समजूत झाली आहे. माझ्या मतें एवढी प्रस्तावना पुरी आहे. पुरी म्हणण्याचें कारण हें आहे कीं, या वेळेस माझ्या मनोवृत्ति इतक्या उंचबळल्या आहेत, विचार इतके प्रगल्भ झाले आहेत कीं, त्यांचें स्पष्टीकरण करणें अशक्य झालें आहे. यासाठीं त्यांनीं आज जो अनुग्रह केला त्याबद्दल त्यांचे उपकार मानून व आमच्या चळवळीवर अशीच कृपादृष्टि ठेवावी ही त्यांस प्रार्थना करून मी व्याख्यानास आरंभ करतों.

देशबांधवहो, काल आणि परवां मी आपणांस सांगितलें कीं, राष्ट्राचें अगदीं अखेरचें अंतिम साध्य 'स्वातंत्र्य' हें होय. सत्पुरुषादेखत ही गोष्ट मला आपणांस कळवितां आली, याचा मला आनंद होत आहे. यासंबंधाच्या अपेक्षांचा उल्लेख पूर्वींच झाला आहे. पारमार्थिक गोष्टींत काशीयात्रा हें जसें अंतिम साध्य इहलोकीं आहे तसेंच राजकीय बाबतींत स्वातंत्र्यगंगा हा अंतिम हेतु आहे. जगांत हजारों धर्मक्रांत्या झाल्या, विचारक्रांत्या झाल्या, राज्यक्रांत्या झाल्या, तरी पण या सर्व क्रांत्या पाहून हिंदुस्थान देश या घटकेपर्यंत शाबूत आहे. कोणताहि देश हिंदुस्थानची बरोबरी करूं शकत नाहीं. आज हजारों वर्षें आपला देश जिवंत आहे. तो निरंतर परावलंबनांत ठेवण्याकरितां ईश्वरानें ठेवला आहे काय ? आपल्या राष्ट्रावर जर ईश्वराची अवकृपा असती तर हें राष्ट्र नामशेष झालें असतें. आपणांस सुदिन दाखविण्याचें परमेश्वराच्या मनांत खास आहे. मी आपल्या प्रेरणेनें हें बोलत नाहीं – वस्तुस्थिति तशी आहे. तिच्या अवलोकनापासून जें कळलें तें मीं सांगत आहे. परमेश्वराचे जे अनेक मार्ग आहेत त्या मार्गांचें गूढ आपणांस उकलत नाहीं. ईश्वर जें कांहीं करतो तें सर्व आपल्या बऱ्याकरितां करतो, या म्हणीप्रमाणें आपली भावना ठेवा. परमेश्वर कोपला नाहीं. कर्में वाईट झालीं असतील, नाहीं असें मी म्हणत नाहीं; परंतु सत्कर्में करून त्यांची शुद्धि करून घ्या. तशी शुद्धि करून घेतां येण्यासारखी आहे. सोन्यांत जर अशुद्धता असेल तर ती अग्नीनेंच काढून टाकली पाहिजे. अग्नींत जळावें लागतें म्हणून जर सोन्याची कांडी कुरकुर करील तर जगाच्या व्यवहाराबद्दल ती अज्ञान प्रगट करतें असें म्हणावें लागेल. ' हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकापि वा ' असेंच कालिदासानें म्हटलें आहे. सध्यां संकटाचे दिवस आले आहेत. ज्या वेळेस आम्ही मलमलीचीं वस्त्रें परिधान करीत होतों आणि आमचे राज्यकर्ते कातडीं पांघरीत असत, ज्या वेळेस ग्रीक लोकांचें नांवहि ऐकूं येत नव्हतें, खाल्डियाच्या साम्राज्याचा उदयहि झाला नव्हता, आमची एकसारखी भरभराट होत

होती आणि जगांत दुसरें कोणतेंहि राष्ट्र जन्मास आलें नव्हतें, त्या वेळेपासून आमचें राष्ट्र – मोडकीतोडकी का होईना – पण पूर्वपरंपरा कायम राखून आणि कालास टक्कर देऊन कायम राहिलें आहे.

रोमन राष्ट्र नामशेष झालें, कार्थेजचें साम्राज्य धुळीस मिळालें, इराणचें साम्राज्य लयाला गेलें, तरी पण आमचा धर्म, आमची परंपरा हीं सर्व कायम आहेत. कांहीं कमी असेल, पण परंपरा अजून कायम आहे. हा जो चिवटपणा आमच्यांत आहे तोच आमच्या जिवंतपणाचें कारण होय. जिवंत रहाण्याची प्रत्यक्ष तुमची जरी इच्छा नसली, तरी ईश्वराची तशी इच्छा आहे. इतिहासाची अशी साक्ष असूनहि तुम्हीं मोहाला फशी पडून ही ईश्वराची देणगी जर गमावली, तर तुमच्यासारखे हतभागी तुम्हीच! म्हणून आपलें ध्येय विसरूं नका. तें भावी उत्कर्षाचें बीज आहे. हिंदुस्थानची नौका कोणीकडे हांकावी, हें दाखविणारा हा ध्रुवाचा तारा आहे. तो तारा जर का सुटला तर कांहींहि कामास यावयाचें नाहीं. काशीस जाणें म्हणजे वाटेंत भेटणाऱ्या नर्मदा नदीचें दर्शन करणें नव्हे. काशीची यात्रा करणें म्हणजे गंगेचें दर्शन झालें पाहिजे. याबद्दल कायद्याची भीति बाळगावयाचें कारण नाहीं. राजानें केलेले कायदे आपल्या मनांतील हेतु दाबूं शकत नाहींत. कायद्याचा अंमल शरीरावर चालतो, मनावर चालू शकत नाहीं. पूर्वी राजाचा अंमल मनावरहि चालत असे. ते कोणाहि मनुष्याच्या मनांतील पाप काढून टाकण्यास समर्थ असत. हल्लींच्या राजाचा अंमल मनावर चालू शकत नाहीं. रघुवंशांत असें वर्णन केलें आहे कीं, एक राजा प्रजेच्या मनांत पाप आल्याबरोबर सिद्ध पुरुषांच्या साहाय्यानें धनुष्यबाण घेऊन तें नाहींसें करीत असे. अशा सिद्ध पुरुषांचें साह्य कलियुगांतील राजांना नाहीं. पुष्कळ जण राजद्रोहाचें ढोंग करून इतरांस बावरवीत असतात. राजाचे धर्म व प्रजेचे धर्म परस्परसंबंधीं आहेत; पण हल्लींचे कायदे एकपक्षीय आहेत. सध्यांच्या पिनल कोडांत प्रजाद्रोहाला शिक्षा सांगितलेली नाहीं, आणि ती जरी पृथ्वीवरील राजांच्या पिनल कोडांत सांगितलेली नसली, तरी सर्व राजांचा राजा जो परमेश्वर त्याच्या कोर्टांत प्रजा-द्रोहाबद्दल शिक्षा सांगितलेली असलीच पाहिजे. हा प्रजाद्रोहाचा गुन्हा राजाकडून घडत असला म्हणजे प्रजेच्या मनोवृत्ति प्रज्वलित होऊन राजे लोक त्यांत पतंगाप्रमाणें नाश पावतात. पण राजे लोक प्रजाद्रोह करीत नसले, तर असें होण्याचें कांहीं कारणच रहात नाहीं. अशा रीतीनें राष्ट्राचें अंतिम साध्य कायम झाल्यावर तें मिळविण्याच्या उपायांचा खुलासा केला पाहिजे. पारमार्थिक बाबतींत मोक्ष हा एक अंतिम साध्याचाच प्रकार आहे. स्वातंत्र्याशिवाय आम्ही मुक्त होणार नाहीं. याचें प्रत्यक्ष उदाहरण श्रीगजाननमहाराजांचें आहे. मोक्षाशिवाय दुसरें कोणतेंहि अंतिम साध्य असूं शकत नाहीं. खायला-प्यायला मिळालें, बायका-पोरें सुखी असलीं म्हणजे अंतिम साध्य मिळालें अशी जर कोणाची धर्मसमजूत असेल, तर त्यास श्रीगजानन-महाराजांची केव्हांहि अनुमति मिळणार नाहीं. धार्मिक बाबतींत मोक्ष जसें अंतिम साध्य तसें राजकीय बाबतींत 'स्वातंत्र्य' हें अखेरचें ध्येय होय. हें अंतिम साध्य कोणास

प्राप्त होवो वा न होवो, तें अंतिम साध्य कमी होऊं शकत नाहीं. श्रीगजाननमहाराजां-सारख्या एखाद्यासच तें मिळतें, म्हणून तें अंतिम साध्य नव्हे, असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं. राज्यकर्ते आमचें ऐकत नाहींत. मुलगा वयांत आल्यावर जर बाप त्याला मालमत्तेचा भागीदार करणार नाहीं, तर त्यावर फिर्याद करण्याची सोय कायद्यानें करून ठेविली आहे, असें जर नसतें तर बाप मेल्याशिवाय मुलास कांहींहि मिळालें नसतें.

आज शंभर वर्षें आमच्यावर इंग्रजांचें राज्य आहे. त्यांच्यामुळें आमच्यांत विचारक्रांति झाली आहे. या क्रांतीमुळें जें मिळविण्याचें आम्ही योजलें आहे तें 'स्वराज्य' होय. 'स्वराज्य' लांब नाहीं, तें जवळ आहे, त्याची ओळख पटवून घ्या. ती ओळख पटली म्हणजे स्वराज्य मिळवणें व देणें हें शब्दच रहात नाहींत. म्हणून स्वराज्य-प्राप्तीचा पहिला उपाय ओळख पटणें हा होय. ही ओळख पटण्यास शस्त्रें नकोत. अस्त्रें नकोत. ही ओळख पटण्यासाठीं भगवद्गीतेंत 'ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः' म्हणून सांगितलें आहे. राष्ट्रीय बाबतींत हाच न्याय लागू आहे. ज्ञानी असतात तेच तत्त्वदर्शन करून देत असतात. हें ज्ञान मिळविण्यासाठीं राज्यकर्त्यांकडे धांव घेऊं नका. कारण या बाबतींत अधिकाऱ्यांचा स्वार्थ आड येणार आहे. मी नेहमीं पुराणांतील प्रल्हाद व हिरण्यकश्यपु यांचें उदाहरण देत असतों. हिरण्यकश्यपूनें प्रल्हादास शाळेंत घातलें खरें, पण ईश्वराचें नांव त्याच्या कानावर पडूं नयें, असा कटाक्ष होता. ज्या स्वातंत्र्यासाठीं आमचे प्रयत्न चालू आहेत, त्या स्वातंत्र्याची ओळख काय सरकारी शिक्षण करून देणार? राष्ट्रीय शिक्षणाची आवश्यकता ही ओळख पटवून देण्याकरितां आहे. सध्यांच्या स्थितींत हें ज्ञान पूर्ण स्वतंत्र गुरूकडूनच मिळणें शक्य नाहीं. म्हणून राष्ट्रीय शिक्षण हें अंतिम साध्याचें पहिलें साधन होय. ज्ञानासारखें पवित्र या जगांत कांहींहि नाहीं असें भगवद्गीता सांगतें. पण जें ज्ञान सध्यां आपणांस मिळतें तें अपवित्र ज्ञान आम्हांस काय शिकवितें म्हणाल, तर इंग्रजांशिवाय आमचा तरणोपाय नाहीं. पूर्वकाळीं आमचें हस्तकौशल्य कितीहि असलें तरी त्याचा यंत्रकौशल्यापुढें टिकाव लागावयाचा नाहीं, म्हणून पक्का माल उत्पन्न करण्याच्या भानगडींत न पडतां तुम्ही कच्चा माल उत्पन्न करा, असलें शिक्षण सध्यां आम्हांस मिळत आहे. आमचे राज्यकर्ते जरी सांगत नसले तरी त्यांचेच जातभाई पाद्री आम्हांस असें सांगतात कीं, 'आमचा ख्रिस्ती धर्म तुमच्या हिंदु धर्मापेक्षां श्रेष्ठ आहे, व आमचा धर्म श्रेष्ठ नसला तरी तुमचा हिंदु धर्म वाईट आहे.' जगाची प्रगति आधि-दैविक शक्तीनें न होतां आधिभौतिक शस्त्रानेंच होत असते, अशाहि प्रकारचें शिक्षण मिळत असतें. आधिभौतिक आणि आधिदैविक यांची अशा प्रकारें फूट पाडून आधि-दैविकाची ओळख विसरून घोंटाळ्यांत पाडणारें शिक्षण सध्यां आम्हांस मिळत आहे.

धर्माचें शिक्षण नाहीं, नीतीचें शिक्षण नाहीं, स्वातंत्र्याचें शिक्षण नाहीं किंवा उच्च मनोवृत्ति उद्दीपित करणारें शिक्षण मिळत नाहीं. पशूंस जसें शिक्षण मिळतें तसें इंग्रजांच्या ताब्याखालीं कसें रहावें एवढ्याचपुरतें शिक्षण मिळत आहे म्हटलें तरी चालेल. या शिक्षणानें पोटास भाकर मिळते, सरकारी नोकरी मिळते, दरबारांत खुर्ची मिळते, किताब

मिळतो; हें सर्व जरी खरें असलें तरी राष्ट्राच्या अंतिम ध्येयाशीं तुलना केली असतां या गोष्टी क्षुल्लक आहेत. जें शिक्षण सध्यां आम्हांस मिळत आहे, तें इंग्रजांचें राज्य चिरस्थायी होण्यासाठींच केवळ देण्यांत येत आहे असें दिसतें. त्यांत आमच्या कल्याणाचा विचार प्रथम होत नाहीं. कित्येक जण राष्ट्रीय शिक्षणाची थट्टा करीत असतात. पण तें वळण आहे, आणि हें वळण जर रहाणार नाहीं, तर मनुष्य व पशु यांच्यांत भेद रहाणार नाहीं. पशूंस शिक्षण नको, त्यांच्यांत जी उपजत बुद्धि-इन्स्टिंक्ट असते तिला अनुसरून त्यांची दिनचर्या असते. पशु आपल्या पुढील पिढीबद्दल काळजी करीत नाहींत. परंतु मनुष्याचा विशेष असा आहे कीं, तो आपला अनुभव पुढील पिढीस देऊन त्या अनुभवाची वाढ करण्यास तिला सांगत असतो. याचेंच नांव 'राष्ट्रीय शिक्षण' हें होय. पुढें पाऊल पडेल असें शिक्षण पाहिजे. आमच्या उन्नतीची ही किल्ली आम्हीं सरकारच्या स्वाधीन केली आहे. परकीयांच्या ताब्यांत पाण्याचा सांठा देऊन नंतर त्यासाठीं त्यांच्याजवळ तोंड वेंगाडणें हा शहाणपणा नव्हे. राष्ट्राचें शिक्षण राष्ट्राच्या ताब्यांत न ठेवतां परकीयांच्या ताब्यांत देणें म्हणजे हातांतील गांठोडें जाणूनबुजून दडवणें होय. हें शिक्षण आम्हांला द्या म्हणून सरकारजवळ भिक्षांदेही करणें म्हणजे तर मूर्खपणाच होय. राष्ट्रीय शिक्षणासंबंधानें गैरसमज दूर करण्यासाठीं मी हें सांगत आहे. कित्येक जण असें विचारतात कीं, "तुम्ही राष्ट्रीय भूगोल कसा शिकविणार ? ब्रह्मदेश बंगाल्यांत आहे म्हणून सांगणार ?" यावर माझें असें उत्तर आहे कीं, "कलकत्ता बंगाल्यांत आहे असें मी सांगणार, पण तें समुद्र-कांठीं आपल्या व्यापाराच्या सोयीसाठीं इंग्रजांनीं वसविलेलें बंदर आहे असें मी विद्यार्थ्यांना समजावून देईन." कित्त्यांतील अक्षरें तींच व मायनाहि तोच; पण वळण बंडोपंती आहे कीं दुसरें आहे, हा त्यांत महत्त्वाचा प्रश्न आहे. हाच वळणाचा न्याय राष्ट्रीय शिक्षणांत अंतर्भूत होतो. हल्लींच्या शिक्षणानें राष्ट्रांतील ज्योत जागृत होत नाहीं. ही ज्योत जर प्रज्वलित झाली नाहीं तर शिक्षणाचें कार्य झालें नाहीं असें समजावें.

हल्लींचें शिक्षण इंग्रजांच्या फायद्यासाठींच असल्यासारखें आहे. कोणास टोंचून बोलावें म्हणून मी बोलत नाहीं. राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय हें ज्यास समजत नसेल त्यांनीं इंग्लंड किंवा अमेरिका येथें जाऊन पहावें. आम्हीं आमचें शिक्षण परकीयांच्या स्वाधीन केलें आहे. राष्ट्रपुरुषाची सर्व तऱ्हेनें उन्नति करणारें आणि राष्ट्रीयत्वाची ओळख करून देणारें तें राष्ट्रीय शिक्षण होय. हें शिक्षण इंग्रजांच्या ताब्यांत देऊं नका. कित्येक असे आक्षेप घेतात कीं, "ग्रँट घेतल्यानें काय होतें ? सरकार जो पैसा देतें तो तरी आमचाच कीं नाहीं ?" तो पैसा तुमचाच खरा, पण त्यावर तुमचा ताबा नाहीं हें विसरूं नका. त्या 'ग्रँटवर' बसून अराष्ट्रीयत्वाचें भूत येत असतें. ग्रँटचें भूत एकदां घरांत शिरलें कीं, तें तुमच्या मानगुटीस बसल्याशिवाय रहात नाहीं. हें मीं अनुभवा-वरून सांगत आहे. कोणाच्या उद्योगाला नांवें ठेवावयाचीं आहेत असें नाहीं. पूर्ण उद्योग झाला नाहीं असें माझें म्हणणें आहे. धर्मशिक्षण नाहीं तर तें मागा, असें कांहीं जण म्हणत असतात. जें देत नाहीं तें मागा म्हणणें ही कांहीं त्याची तोड नाहीं. राजाचा

स्वार्थ व प्रजेचा स्वार्थ हीं सर्वस्वीं एक नाहींत, फार अंशानें भिन्न आहेत. राजा व प्रजा जेथें एक नाहींत तेथें राष्ट्रीय शिक्षण मिळणें शक्य नाहीं. जर्मनींत व इंग्लंडांत दोघेहि एक असल्यामुळें हें शिक्षण तेथें देण्यांत येतें, राष्ट्रीय शिक्षणाची सोय करणें म्हणजे स्वराज्याचा 'श्रीगणेशाय नमः' करणें होय. राष्ट्रीय शिक्षण स्वदेशी बहिष्कारापेक्षां जास्त योग्यतेचें आहे. राष्ट्राचें मन बदलणें, राष्ट्रांतील लोकांत भावना उत्पन्न करणें, हें राष्ट्रीय शिक्षणाचें काम आहे. यासाठीं सरकारच्या कच्छपी लागूं नका. मनुष्यस्वभावाप्रमाणें ते वागत आहेत. "तुम्ही शहाणे झालां म्हणजे आम्ही आपलें चंबुगवाळें आटोपून निजधामास परत जाऊं" हें बोलावयास सोपें आहे; एक करण्यास फार कठिण आहे. इंग्लंडांतून साधु हीं तत्त्वें सांगतात, पण सर्वांस हें शक्य नाहीं. मुलगा व बाप यांचे तंटे तोडण्यास जशी इंग्रजी कोर्टें आहेत तशी राजा व प्रजा यांमधील तंटे तोडणारीं कोर्टें नाहींत. तीं असतीं तर हा समाज आज येथें जमलाच नसता. तथापि दृढनिश्चय करा. पाहिजे तें मिळवूं हें शिकविणारें राष्ट्रीय शिक्षण होय. आम्ही गरीब आहों, आमच्याजवळ पैसा नाहीं, या अडचणी मी जाणून आहे. पण आमचा प्रयत्न सफळ झाला म्हणजे खाजगी शाळा तोच कित्ता वळवितील व सरकारासहि पुढेंमागें तसें करणें भाग पडेल.

स्वराज्याच्या साधनत्रयीपैकींच स्वदेशी व बहिष्कार हीं दोन साधनें आहेत. स्वदेशी उद्योगधंद्यांना सरकार उत्तेजन देत नाहीं. हें मनुष्यस्वभावास अनुसरूनच आहे. तो त्यांचा दोष नसून विक्रम-बत्तिशींतील गोष्टीप्रमाणें ज्या जागेवर ते अधिष्ठित झाले आहेत त्या जागेचा हा गुण आहे. लॉर्ड मिंटो म्हणतात कीं, "मी प्रामाणिक 'स्वदेशी' आहे." पण प्रत्येकाच्या स्वदेशाची व्याख्या निराळी आहे. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि पंजाबपासून आसामपर्यंत जो प्रदेश पसरलेला आहे तो माझा स्वदेश आणि युरोपच्या पश्चिमेस एका कोंपऱ्यांत असलेलें समुद्रवलयांकित बेट हा लॉर्ड मिंटोचा स्वदेश. लॉर्ड मिंटो स्वदेशी आहेत, मीहि स्वदेशी आहे. ते जशी स्वदेशाची काळजी बाळगतात तशीच आपणहि बाळगली पाहिजे. त्यांचें वैभव कमी होईल असे उद्योग ते आपणांस शिकवितील हें दुर्घट आहे. आमच्या हितासाठीं आम्हींच उद्योग केला पाहिजे. आम्हीं जर एखादा कारखाना काढून भरभराटीस आणला, तर इंग्लंडांतील आपल्या गोऱ्या जातभाई कारागिरांच्या फायद्यासाठीं त्यावर जबर जकात बसवून सरकार त्याचे हातपाय तोडीत असतें. लॉर्ड कर्झनसाहेबानें एकदां असें म्हटलें आहे कीं, राजकीय साम्राज्यापेक्षां औद्योगिक साम्राज्य अधिक महत्त्वाचें आहे. मी म्हणतों कीं, राजकीय स्वातंत्र्यामागूनच भरभराट जात असते. ती गुलामगिरीमागून जाणें अशक्य आहे. तुमचा तुम्हींच विश्वास धरला पाहिजे. आमचे विचार, आमच्या कल्पना, आमचा पोषाख सर्व विलायती झालें आहे. आमचे आत्मेहि विलायती झाले आहेत किंवा नाहींत हें सांगतां येत नाहीं. 'वासांसि जीर्णानि यथा विहाय' या गीता-वचनाप्रमाणें आमच्या आत्म्यांनीं नवीन वस्त्रें परिधान केलीं आहेत किंवा काय, हें सांगणें कठिण आहे. पण

आतां तुमचा सर्व मोठेपणा अंतःकरणांतून बाहेर येऊं द्या. उन्नति आत्म्यापासून सुरू होऊन शरीरापर्यंत होत असते. शरीरापासून आत्म्यापर्यंत होत नाहीं. म्हणून आत्मे प्रथम नीट जतन करून ठेवा. महाराज, स्वदेशी हें ढोंग नव्हे. ज्या देशांतील अन्नानें आमचा पिंड बनला व ज्या देशांत आम्ही आज रहात आहों तो देश काय ढोंग आहे? आर्यभूमि वाट पहात आहे. तिला माता-पिता म्हणून केव्हां ओळखाल याची ती वाट पहात आहे.

आर्यभूमीला माता म्हणून ओळखणें, हीच स्वदेशी चळवळ होय. तुम्ही प्रपंचांत गुरफटला आहांत, बंधूंचें नुकसान होत आहे, पैशाचें नुकसान होत आहे, हें तुम्हांस कळेनासें झालें आहे. हें तुम्हांस कळणार नाहीं असेंच शिक्षण सध्यां मिळत आहे. स्वदेशीबरोबर बहिष्काराचीहि ओळख करून घ्या. स्वदेशी व बहिष्कार यांत द्वैत नाहीं. एकाच देहापासून परमेश्वरानें ज्याप्रमाणें स्त्री-पुरुष उत्पन्न केले, त्याचप्रमाणें एकाच देहाचे स्वदेशी व बहिष्कार हे दोन प्रकार आहेत. स्वदेशी करा, पण बहिष्कार नको, असें कित्येकांचें म्हणणें आहे. या बहिष्काराची राज्यकर्त्यांस फार भीति वाटत आहे. हा बहिष्कार आज विलायती मालावर आहे तोच उद्यां आपल्या राज्यावर पडेल असें वाटत आहे. हिंदु धर्म द्वेष करावयास शिकवीत नाहीं, आणि आम्ही तो शिकवीत आहों, असा आमच्यावर आरोप आहे! आम्ही द्वेषामुळें बहिष्कार घालीत नसून, स्वदेशाच्या प्रीतीमुळें आम्ही बहिष्कार घालीत आहों. राग-द्वेष व्यवस्थित असावे असें भगवद्गीतेंत सांगितलें आहे. द्वेषाचा अतिरेक होतां कामा नये. कंदिलाच्या उजेडाबरोबर छायाहि येतेच. हीच गोष्ट स्वदेशी-बहिष्कारासंबंधीं आहे. बहिष्कार नवीन नाहीं. जर बहिष्कार नसता, तर स्वर्गांत बदमाष लोकांचा भरणा झाला असता; असुरी मायेनें गुणांस ग्रासून टाकलें असतें. या बहिष्कारामुळेंच इंग्रज लोक वैभवास चढले असूनहि ते आम्हांस बहिष्कारयोग शिकवीत नाहींत. सामान्य लोकांची अशी समजूत असते कीं, आपणांस माहीत असलेला योग किंवा मंत्र दुसऱ्यास शिकवूं नये; कारण त्या योगानें आपलें महत्त्व कमी होईल असें त्यांस वाटत असतें.

तुम्ही जर या बहिष्कारयोगाचा त्याग कराल तर घरीं चालत आलेल्या कामधेनूला गमाविल्यासारखें होईल. मी म्हणतों, यांत अतिशयोक्ति नाहीं. बहिष्कारास प्रतिबंध करणें अशक्य आहे. बहिष्काराबद्दल तंटा करीत बसणें म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर तुमच्या घशांत अमृताचा घोट घालीत असतां तो 'नको' म्हणण्यासारखें आहे. बहिष्काराचा उच्चार करून राजाचा कोप संपादन करण्यांत अर्थ नाहीं. काय करावयाचें तें गुपचीप करावें, असें कित्येक जण म्हणतात. पण मी म्हणतों कीं, आम्हांस जें वाटतें तें बोलून दाखविण्यासाठींच ईश्वरानें मनुष्यास वाणी दिली आहे. वाणी पशूस दिलेली नाहीं. विचार व्यक्त करण्यासाठीं वाणी दिलेली आहे. तिचा उपयोग केला नाहीं तर तो राजद्रोह होत नसला तरी देशद्रोह होतो हें खास. इतरांनीं वापरलेलें हें शस्त्र निःशस्त्र लोकांनीं वापरण्यासारखें आहे. आम्हां निःशस्त्र लोकांजवळ या शस्त्राशिवाय दुसरें कोणतें

शस्त्र राहिलें आहे ? आम्हीं जर निश्चय केला तर आमच्या मनांवर कोणाचाहि हुकूम चालणार नाहीं. आम्ही हें यशस्वी शस्त्र टाकून कां देणार ? तर साहेबाजवळ बोलण्याचें धैर्य नाहीं म्हणून ! परमेश्वरानें निःशस्त्रांसहि शस्त्रें दिलीं आहेत. बहिष्कार हें असें शस्त्र आहे कीं, त्या योगानें निःशस्त्र असलेल्यांचे सर्व हेतु पूर्ण होतात. त्याचा उच्चार करायला – तें वापरायला भिऊं नका. पुरुषाचे जे प्रकार आहेत त्यांपैकीं कित्येकांच्या मनांत विचारच येत नाहींत. कित्येकांच्या मनांत विपरीत विचार येतात, कित्येक विचार बोलून दाखवीत नाहींत. कित्येकांचे विचार एक आणि वर्तन दुसरें असें असतें – 'मनसि वचसि काये' जे एकच असतात, ते श्रेष्ठ, कां इतर पुरुष श्रेष्ठ ? बहिष्कार हें सामान्य शस्त्र नाहीं. त्याचा उपयोग कसा करावा हें आपणांस शिकावयाचें आहे. स्वदेशींतच त्याचा उगम होऊन त्यामुळें परकीय तें आपोआप बाहेर पडतें. राष्ट्रीय शिक्षणांतच स्वदेशी-बहिष्काराचा अंतर्भाव होतो. तिन्हीहि आचरणीय असून स्वातंत्र्यपोषक आहेत. हे उपाय सर्वांस कळावे हा या नवीन चळवळीचा हेतु आहे. त्यांचें निदर्शन केलें आहे. हा विषय फार व्यापक आहे. एका विषयावर दहा व्याख्यानें दिलीं तरी पुरीं होणार नाहींत. राष्ट्रांत ही जी नवीन ज्योत उत्पन्न झाली आहे तीवर फुंकर घालूं नका.

हे नवीन चळवळीचे हेतु कोणाकडून साध्य करावयाचे याचा आतां विचार करूं. ही चळवळ यशस्वी करण्याची जबाबदारी सर्वस्वीं नवीन पिढीवर आहे. मी जुन्यांना नांवें ठेवीत नाहीं. मीहि त्याच कोटींतील आहे. अनेक वर्षांच्या संस्कारानें जुन्यांची बुद्धि नवीन कल्पना ग्रहण करूं शकत नाहीं. तिच्यांत नवीन जोम उत्पन्न करणें दुर्घट आहे. पण जुन्यांनींहि आतां ताणून बेऊं नये अशी माझी त्यांना विनंति आहे. नवीन पिढीला पुढें जाऊं द्या. जे परिणाम होतील ते, ते भोगतील. आमच्या अनुभवाचा फायदा त्यांना मिळालेला आहे. आमच्या खांद्यावर ते उभे असल्यामुळें त्यांच्या दृष्टीचें क्षेत्र विस्तृत झालें आहे. आमचें उदाहरण व त्यापासून मिळालेलें ज्ञान हें नवीन पिढीच्या अस्वस्थतेचें खरें कारण आहे. मीहि जुनाच आहे, हें मीं पूर्वींच सांगितलें आहे. तरुण पिढीस माझें असें सांगणें आहे कीं, तुम्ही नवीन मार्ग काढा. आम्हांस जें मिळालें नाहीं तें तुम्ही मिळवा; तें तुम्हीं मिळवावें अशी परमेश्वराची इच्छा आहे. वृद्धांस माझी अशी प्रार्थना आहे कीं, तरुण पिढीचे हातपाय तुम्ही बांधूं नका. मुलांच्या हातून दोष होत असतील तर त्यांस क्षमा करा. त्यांच्या आड येऊं नका. ते जें कार्य करीत आहेत तें तुमचेंहि नाहीं व त्यांचेंहि नाहीं, तर राष्ट्राचें आहे. तुमच्या अनुभवाचा त्यांस फायदा करून द्या. खेदाची गोष्ट अशी आहे कीं, आम्हीं त्यांस कांहीं शिकविलें नाहीं, आतां त्यांस खोटा भरंवसा तरी देऊं नका. पन्नास नाहीं जास्त वर्षें झालीं, आम्हीं उद्योग केला. आम्हांस स्वराज्य नको होतें असें नाहीं, पण आम्ही फसलों. हा अनुभव नव्या पिढीनें घ्यावा. दोष आमच्या – जुन्या पिढीच्या – माथीं मारूं नका. आम्ही उद्योग केला. ही परंपरा तुम्ही पुढें चालू ठेवा. अंतिम हेतु पुढें ठेवून राष्ट्राचें जहाज मार्गावर आणून सोडणें हें तरुण पिढीचें काम आहे. आमच्या हातून चुका झाल्या आणि आतां आम्ही बहिष्काराच्या

गप्पा मारीत आहों, असें तुम्ही आम्हांला म्हणाल, पण तेव्हांच्या स्थितींत जें करावयास पाहिजे होतें तें केलें; आतां ती परिस्थिति बदलून टाकून तुम्ही काय पाहिजे तें मिळवा. व्यवस्था ठेवण्याचें पोलिसांचें काम आमचे स्वयंसेवक करूं लागले. येथपर्यंत मजल आली आहे. प्रयत्न चांगला चालला आहे. स्वराज्य, स्वराज्य म्हणजे काय ? तर सरकार जें हल्लीं करीत आहे तें आम्हीं करावयाचें. या ओघास अडवूं नका. वृद्धांना अवज्ञा वाटत असेल, तरुण पिढीकडून दोषहि होत असतील. पण कोणत्याहि कार्याचा आरंभ हा दोषांनीं आवृत्त असावयाचाच.

सध्यांचें धोरण ओळखून आणि उगवणाऱ्या स्वातंत्र्यसूर्याकडे दृष्टि देऊन वृद्ध-तरुणांनीं कामगिरी बजाविली पाहिजे. हा दोघांच्या मिलाफाचा प्रश्न आहे. प्रसंग आणीबाणीचा प्राप्त झाला असतां पानपतच्या रणक्षेत्रांतील दुहीप्रमाणें जहाल व मवाळ असे दोन भेद होऊन दुही माजावी हें राष्ट्राचें दुर्दैव होय. संकटाखेरीज यश मिळत नाहीं. 'न संशयमनारुह्य नरो भद्राणि पश्यति' हें ध्यानांत ठेवा. मोंहोर साध्य कीं फल साध्य, असला तंटा करूं नका. नवीन पिढीची भावना, फल मिळेल, अशी आहे. ही भावना देशाचा उत्कर्ष करणारी आहे. ती परमेश्वरानें उत्पन्न केली आहे; तिला खची करण्याचा प्रयत्न करूं नका. नवीन पिढीनें पुढें जावें अशी तिची इच्छा आहे. असें असतांना गाड्याचा एक बैल चिखलांत रुतला तर तें दुर्दैव नाहीं तर काय ? नवीन पिढीचा निर्धार झालेला आहे. स्वातंत्र्यगंगेचें पाणी खेळत असलेलें त्यांना दिसत आहे. रस्ता बिकट असला तरी तो सर्वांनीं गिरविलेला आहे. आमच्या राज्यकर्त्यांनीं गिरविलेला आहे. याच रस्त्यानें आमचे पूर्वजच नव्हे, तर सर्व गेलेले आहेत. रस्त्यावर विघ्नें आहेत; पण उमेद अशी आहे कीं, वाटेंत देह पडला तरी शेवटली वासना त्या स्वातंत्र्यगंगेंत जाऊन स्नान करीलच करील. अशा वासनांनीं प्रेरित होऊन राष्ट्र निघालें आहे. सत्पुरुषांचें साहाय्य मिळेल असा भरंवसा आहे. आम्ही उपोषित आहों आणि या उपोषणाची पारणा गंगेंत स्नान करून सोडूं, असा निर्धार आहे. मेहरबानी करून याला आड येऊं नका. तरुणांनींहि वृद्धांची अवहेलना करूं नये. सन्मार्ग धरा, वाडवडील तुम्हांस विसरतील, पण परमेश्वर विसरणार नाहीं.

सर्वजण स्नानास निघाले आहेत. बंगाल निघाला आहे, पंजाब निघाला आहे, आणि मद्रास निघाला आहे. महाराष्ट्र आपला पूर्वेतिहास विसरेल काय ? स्वातंत्र्यरूपी परमेश्वराच्या मंदिराचें शिखर आम्हांस दिसत आहे. चुकणारांची अनुकंपा करा. कोणाची निंदा करण्यासाठीं हा उद्योग सुरू केलेला नाहीं. परमेश्वराच्या प्रेरणेनें ही यात्रा निघालेली आहे. ज्यांना आमच्याबरोबर यावयाचें असेल त्यांची गाडींत सोय होईल. ज्यांना यावयाचें नाहीं त्यांनीं आमचा मार्ग रोधूं नये. हें आमचें कार्य तडीस जाईल अशी खात्री आहे. जसा भाव असेल तसें सत्पुरुषांच्या कृपेनें हें कार्य तडीस जाईल.

– लों. टिळक यांचीं व्याख्यानें, पृ. २५३

(संदर्भ - टिळक ग. श्री, समग्र टिळक, खंड क्र ६, केसरी प्रकाशन, पुणे १९७६, पृ. ४२४ ते ४३२.)



मंचावर उच्च स्थानी शेगावचे संत गजाननमहाराज. अग्रभागी टिळक, जवळ पटवर्धन. आजूबाजूला खापर्डे, दामले, कोल्हटकर, भावे, देसाई इत्यादि एकाहून एक मोठे व्यासंगी विद्वान. टिळक उभे राहिले, व्याख्यान सुरू झाले. ते म्हणाले, जसा शिवरायांना समर्थांचा आशीर्वाद प्राप्त झाला, तद्वतच आज या सभेतील आपणा सर्वांना संतश्रेष्ठ श्री गजाननमहाराजांचा आशीर्वाद आहे. ही सभा निश्चितच यशस्वी होईल.

(संदर्भ- मोटे अशोक प्रभाकर, 'गीतारहस्याचे रहस्य', दै० केसरी पुणे दि० ९/८/२००८.)

## परिशिष्ट क्र. ७

## लोकमान्य टिळकांचे विविध धर्मिंक व्यक्तींबरोबरचे फोटो.



Lokmanya Tilak is addressing a gathering, while His holiness Gajanan Maharaj ( Shegaon) is sitting besides.dais.



Swami Vivekanand meets Lokmanya Tilak at Sardar Vinchurkar's residence in Sadashiv Peth in 1892



Siddharudh Swami and Lokmanya Tilak



Lokmanya Tilak with Krishnanand Swami.

(संदर्भ - Tilak D.J, Lokmanya Bal Gangadhar Tilak, maker of Modern India, Lokmanya Smarak Trust Pune)

# परिशिष्ट क्र. ८

## लोकांच्या आठवणीत राहिलेले लोकमान्य.

[फोटो : वॅ. व्ही. व्ही. ओक, मुंबई]




महाराष्ट्र ग्रंथालय पुणे

श्रीरामदासशिवगणचरणांजितधूलिधूसरितमौलिः।
निश्चलधृतिररिसागरभङ्गश्रीर्जयति जगति सह्याद्रिः ॥

वर्ष १ लें] ऑगस्ट १९३५ [अंक ८ वा

टिळक-चरित्र

### लो. टिळकांचें संक्षिप्त चरित्र

[ १ ] 23/6/1956

लो. टिळकांचा जन्म सन १८५६ च्या जुलै महिन्याच्या २३ व्या तारखेस रत्नागिरी येथे सदोबा गोरे यांचे घरीं झाला. हा दिवस हिंदु पंचांगांप्रमाणे शके १७७८ आषाढ कृष्ण ६ सोमवार असा येतो. नक्की जन्मवेळ सूर्योदयानंतर सुमारे दोन घटका होती. टिळकांच्या कुंडलीवरून त्यांचें जन्मलग्न कर्क असून, फलज्योतिष मताप्रमाणे रवि स्वगृहीं आणि नवमस्थानीं चंद्र व गुरु यांची युति, असे दोन भाग्यदर्शक योग त्यांच्या जन्मकाळीं होते. टिळक सन १९२० च्या ऑगस्टच्या पहिल्या तारखेस मृत्यु पावले. म्हणजे त्यांना चौसष्ट वर्षें आणि आठ दिवस इतका आयुर्दाय लाभला. ऐन उमेदींत टिळकांना असें वाटे कीं, आपण आपल्या बरोबरीच्या इतर कित्येक मित्रांप्रमाणे अल्पायुषी होणार नाही कशावरून! परंतु त्यांचें भाग्य, किंवा त्यांचें म्हणण्यापेक्षां त्यांच्या देशाचें भाग्य, म्हणून त्यांना सुमारे ६४ वर्षांपर्यंत आयुष्य लाभलें. आश्चर्य हें कीं, त्यांच्या आयुष्यांतील खऱ्या कर्तृत्वाचा व यशाचा काल म्हटला म्हणजे त्यांच्या ऐन उमेदीच्या पुढचाच होय!

स. ८४

#### टिळक व कोंकण

टिळकांचें जन्मस्थान रत्नागिरी. हें लहानसें शहर महाराष्ट्रालगतच्या कोंकणाचें केंद्र होय. हा कोंकण भाग अत्यंत दरिद्री असा समजला जातो. परंतु ईश्वर एक ठिकाणचें उणें दुसऱ्या ठिकाणीं भरून काढीत असतो. त्याप्रमाणें या दरिद्री कोकणाला त्यानें बुद्धिमत्तेची विशेष देणगी दिली आहे अशी जनतेची सामान्य समजूत आहे. बुद्धिवान मुलें कोकणांतून निघून वरघाटी यावीं व त्यांनी भाग्याला चढावें अशीं उदाहरणें गेल्या २–३ शतकांतलीं बरींच दाखवितां येतील. टिळकांचें उदाहरण त्यांपैकीच होय. सन १९२७ सालीं रत्नागिरी येथे प्रांतिक परिषद भरली. तिजमध्ये टिळकांच्या जन्मस्थानाचें स्मारक करण्यासंबंधाचा एक ठराव पुढे आला. तो मांडतांना रा. न. चिं. केळकर यांनी टिळकांच्या आंगचे गुण व कोकण प्रांताचे गुण यांचा मेळ विनोदबुद्धीने घालण्याचा प्रयत्न केला होता. त्याचा उल्लेख या ठिकाणीं केला असतां तो अनुचित होणार नाही. रा. केळकर म्हणाले:—

"रत्नागिरीच्या जन्मभूमीपासून टिळकांनी कोंकणच्या विशिष्ट लक्षणांपैकीं प्रत्येकाचा थोडा थोडा स्वीकार

[१

चित्र क्र. २

आठवणी

# लोकांच्या 'आठवणीं'त राहिलेले लोकमान्य

**लो.** टिळकांच्या विविध गुणांचीं प्रतिबिंबें लाखों लोकांच्या चित्तांवर उमटलेलीं आहेत. तीं एकत्र करण्याचा प्रयत्न श्री. सदाशिव विनायक बापट यांनी केला. सुमारें सहा हजार पत्रें लिहून त्यांनी सातशें लोकांकडून आठवणी मिळविल्या व त्या तीन खंडांत प्रसिद्ध केल्या. त्यामुळे त्यांनीच म्हटल्याप्रमाणे, महाराष्ट्रजनतेला "लोकमान्यांचें त्रिखंडात्मक विश्वरूपदर्शन" घडलें. त्याचा "सौम्यवपु" असा अवतार "सह्याद्री" च्या वाचकांचे संग्रहीं असावा या हेतूने भिन्न भिन्न गुणांच्या निदर्शक अशा आठवणी वेचून काढून त्या, शक्य तों कालानुक्रमें, पुढे दिल्या आहेत.

### बळवंत नांव कसें पडलें?

एके दिवशीं सहज गोष्टी निघतां निघतां आपलें नांव 'केशव' असतां आपण 'बळवंत' नांवाचाच उपयोग कां करतां? म्हणून प्रश्न केला असतां बळवंतराव म्हणाले, "आमची मातुःश्री तपस्विनी होती. पुत्रप्राप्तीस्तव तिने वर्ष दीड वर्ष सूर्याराधनेचें खडतर तप केलें होतें. तिने प्रेमाने जें नांव ठेवलें व जें सर्वांनी प्रचारांत आणलें त्याची योग्यता शास्त्रप्रेमापेक्षा कमी नसल्यामुळे तेंच मी उपयोगांत आणूं लागलों."

—ऋ. आ. गुरुजी

### 'जे कां रंजले गांजले'

एके दिवशीं एक विधवा बाई प्लेगच्या दुखण्यांतून बरी होऊन दवाखान्यांतून गांवांत परत जावयाची होती. तिचें तेथील बिल सुमारें ३०।३५ रुपये झालें होतें. पण तिचेजवळ मुळींच पैसे नव्हते. दवाखान्याच्या ऑफिसचे अधिकारी, तेथील नियमाप्रमाणे, तिचेकडून पैसे घेतल्याखेरीज तिला सोडीनात. इतक्यांत लांबून गार्डीतून श्रीमंत बाळासाहेब नातू यांचेसह येत असलेल्या लोकमान्यांस तिने पाहून, संकटसमयीं अचानक रीतीने अवतीर्ण होऊन द्रौपदीस साहाय्य करणाऱ्या श्रीकृष्णाची तिला आठवण झाली व आपणासहि तोच अनुभव आता येत असल्याचें तेथील सर्व मंडळींदेखत तिने सद्गदित कंठाने बोलूनहि दाखविलें! इतक्यांत लोकमान्य तेथे आले. त्यांनी सर्व प्रकार ऐकून घेतला. बाळासाहेब नातू एवढे श्रीमंत, पण त्यांनी तें सर्व ऐकून हळूच तोंड चुकवून ते मागे सरले. लोकमान्यांनी तेथील अधिकाऱ्यांस "या बाईचे सर्व पैसे माझे खात्यावर टाकून त्यांस येथून जाण्याचा पास द्या व त्या अशक्त झाल्यामुळे गाडींतून त्यांस त्यांचे घरीं पोंचतें करा" असें सांगितलें! अशा रंजल्या-गांजलेल्यांस आपुले म्हणणाऱ्या त्या साधु-पुरुषास या प्लेग-हॉस्पिटलच्या पायीं अखेर किती तरी भुर्दंड भरावा लागला!

—ब्रह्मगिरीबुवा, पुणें

### "दुःखेष्वनुद्विग्नमनाः"

टिळकांचे वडील चिरंजीव विश्वनाथपंत हे वारल्यावर पुढे दुसरे दिवशीं सोमवार आला. ज्या झोपडींत विश्वनाथपंत वारले, त्या झोपडीपासून दहाबारा पावलांवर टिळकांची झोपडी होती. टिळक यांनी त्या दिवशीं नेटिव्ह संस्थानिकांबरोबर इंग्रज सरकारच्या झालेल्या तहनाम्यांचीं व करारांचीं पुस्तकें आणवून तीं वाचलीं व केसरींतील "श्री. महाराज होळकर यांचा राजीनामा मंजूर झाला" हा अग्रलेख मला तोंडाने सांगितला! झोपडींत बापूला ताप आला आहे अशी कुजबूज सुरू झाली व रामभाऊ म्हणाला, 'मी दादांना सांगतों.' आमचें लिहिणें चालू असल्यामुळे, "आतां नको सांगूं" असें टिळकांच्या कुटुंबाने सांगितलें. हें सर्व भाषण मला ऐकूं येत होतें. पण मजकूर संपत आला होता, म्हणून मीहि बोललों नाही. मजकूर संपल्यावर रामभाऊने 'बापूस ताप आला आहे' असें येऊन सांगितलें. यत्किंचितहि न घाबरतां व घाई न करतां त्यांनी सर्व मजकूर शांतपणें वाचला, दुरुस्त केला व मग ते घरीं गेले!

—अ. वि. कुलकर्णी, पुणें

### कामाचें दांडगें चक्र

लोकमान्यांची कर्तव्यतत्परता इतकी दांडगी होती कीं, साठी उलटल्यानंतरहि, एखादें जरूरीचें काम अंगीकृत केल्यास, एका बैठकीवर ११।१२ तास ते एकसारखे बसून त्या कामाचा पिच्छा पुरवीत. मला मदतीला घेऊन एक दिवस सकाळीं ११ पासून तों रात्रीं ११-४५

[ ३०

ने गाडीने मुंबईस जावयास ११ वाजता निघेपर्यंत चिरोल-केसचें काम ते एकसारखें पाहत बसले होते. इतक्या वयस्कपणांत जर ह्या गृहस्थाच्याने इतकें काम करवतें, तर भर तारुण्यांत त्याची कर्तृत्वशक्ति किती दांडगी असेल हें कळण्याची माझी जिज्ञासा तृप्त करण्याकरितां मी त्यांस त्याबद्दल सहज विचारलें. तेव्हा ते म्हणाले, "मुंबईच्या एका राष्ट्रीय सभेच्या बैठकीचे वेळीं मी एकसारखा एका खुर्चीवर ३६ तास बसून काम करीत होतों."

—डॉ. वि. म. भट, येवलें

### अंतर्बाह्य सोज्वळ

प्रत्येक थोर पुरुषाच्या यशाचें बीज त्याच्या शुद्धाचरणांत असतें. १८९६ सालाचा तो प्रसंग. एकदा बळवंतराव व मी दोघेच बोलत बसलों असतांना एका मातबर मनुष्याची बाई कांहीं कागदपत्र व खालच्या कोर्टाच्या निवाड्याच्या नकला घेऊन, टिळकांनी अपील तयार करून द्यावें म्हणून त्यांजकडे आली होती. बळवंतराव दीड तासपर्यंत ते कागद एकीकडे सारखे चाळीत होते व एकीकडे अवश्य ते प्रश्न बाईला विचारीत होते. त्या बाईचें प्रकरण सारें लक्ष्यांत घेऊन 'आठ दिवसांनी या, मी तोंवर अपील तयार करतों' असें सांगून त्यांनी बाईस जाण्यास सांगितलें. नवलाची गोष्ट ही कीं, दीड तास बाई दारांत उभी असून व तिच्याशीं अनेक प्रश्नोत्तरें होऊनहि बळवंतरावांनी एकवारहि मान वर करून 'ही बाई कसली आहे' हें पाहिलें नाही.

—ल. रा. पांगारकर, पुणें

### संकटकाळींहि चित्तशांति

सन १८९७ सालीं टिळक दाजीसाहेब खरे यांचे बंगल्यावर उतरले असतां रात्रीं ९-३० वाजता एक युरोपियन पो. सुपरिंटेंडंट आला व बाहेर बोलावून घेऊन त्याने १२४ कलमाखालचें वारंट त्यांना दाखविलें. त्यास पांच मिनिटें थांबण्यास सांगून टिळक आंत गेले व दाजीसाहेबांबरोबर त्यांनी त्या कलमासंबंधीं चर्चा केली. दाजीसाहेबांनी प्रे. मॅजिस्ट्रेटचे बंगल्यावर जाऊन जामीनाचा अर्ज करावा व त्याचा निकाल काय होतो तो तुरुंगांत कळवावा असें ठरवून टिळक दहाचे सुमारास पोलिसाबरोबर तुरुंगांत गेले. १०॥ वाजता तुरुंगांत गेल्याबरोबर टिळक अंथरुणावर निजले. लगेच त्यांना गाढ झोंप लागली. ११-३० वाजता दाजीसाहेब आले, त्यावेळीं टिळक घोरत होते! त्यांनी दोन हाका मारल्यावर ते जागे झाले."

—म. गो. अभ्यंकर, पुणें.

### विपत्तींतहि विनोद

कठीण प्रसंगांतहि लोकमान्यांचा विनोदी स्वभाव दिसून येई. लोकमान्यांची केस नामदार हायकोर्टांत चालू असतां त्यांचे बॅरिस्टरास एकदा येण्यास जरा उशीर झाला. तेव्हां तेथील एक तरुण तरतरीत बॅरिस्टर आपल्या एका बॅरिस्टर स्नेह्याबरोबर लोकमान्यांकडे गेले व 'आपले बॅरिस्टरांस येण्यास उशीर झाला असला तरी आम्ही मदत करण्यास तयार आहोंत' असें म्हणाले. ते असें म्हणतांच लोकमान्य हास्यमुद्रेने म्हणतातः— "सोळा-सतरा वर्षांच्या उपवर वधूस वीस बावीस वर्षांचे वराऐवजी दहा-अकरा वर्षांचे दोन वर चालतील काय?" तेव्हा तेथे मोठा हंशा पिकून बॅरिस्टरद्वय तेथून मुकाट्याने दूर गेलें!

—ल. ज. आपटे, पुणें

### विद्याव्यासंगाची आवड

टिळकांचा एक मित्र बोलतां बोलतां म्हणाला, "बळवंतराव, स्वराज्यांत तुम्ही कोणतें काम पत्कराल? तुम्ही मुख्य दिवाण व्हाल कीं परराष्ट्रमंत्री बनाल?" टिळकांनी उत्तर दिलें, "नाही हो, स्वराज्य स्थापन झाल्यावर एखाद्या स्वदेशी कॉलेजांत गणित विषयाच्या प्रोफेसराचें काम पत्करीन व सार्वजनिक चळवळींतून अंग काढून घेईन. मला राजकारणाचा तिटकारा आहे. 'डिफरेन्शिअल कॅल्क्युलस' वर एखादें पुस्तक लिहावें असें मला अजून वाटतें. देशाची स्थिति फार वाईट आहे आणि तुमच्यापैकीं कोणी कांहीं करीत नाहीं, म्हणून मला इकडे लक्ष्य घालावें लागत आहे."

—द. बा. कालेलकर, साबरमती

* * *

गणपत्युत्सव होता. श्रीमंत विंचुरकरांचे वाड्यांत श्रीगजाननापुढे बळवंतरावांचें व्याख्यान व्हावयाचें होतें. मंडपांत अगदी चिकार गर्दी उडून राहिली. व्याख्यानाची वेळ होऊन गेली, तरी बळवंतरावांचा पत्ता नाही. शेवटीं प्रो. जिनसीवाले त्यांस पाहण्यास-बोलविण्यास-गेले. तों स्वारी आपल्या माडींत ज्योतिष व भूस्तरशास्त्राच्या पुस्तकांत इतकी गर्क होऊन गेली होती कीं, तेथे जिनसीवाले आले तरी त्याची त्यांस शुद्धि नाहीं! अखेर प्रोफेसरसाहेब त्यांस म्हणाले, "अहो! उठा, चला खाली आता. समाधि हलवा! तिकडे लोक कंटाळूं लागले आहेत." हें ऐकून बळवंतराव त्यांस म्हणतात, "भय्यासाहेब! या आनंदांतून बाहेर पडणें जिवावर येतें! खरोखर अशा ग्रंथांच्या सहवासांतच

माझा जन्म जावयाचा. यांतच मला परमानंद वाटतो. पण या दुर्दैवी देशाच्या पायांतील पारतंत्र्यशृंखला कायम ठेवून तो आनंद मी उपभोगणें पापमूलक अतएव 'यो भुंक्ते स्तेन एव सः' होय यांत शंका नाही."

—शं. ग. लवाटे, पुणें

"लालाजी हद्दपार होतो आणि........!"

१९०७ सालच्या उन्हाळ्यांत लोकमान्य सिंहगडावर असतां हे. लाला लजपतराय यांस अकस्मात् हद्दपार करण्यांत आलें. ही बातमी कळतांच तात्यासाहेब केळकर यांनी ताबडतोब खाली येण्याकरितां लोकमान्यांस सिंहगडावर बोलावणें पाठविलें. सायंकाळीं गाडींतून उतरून लोकमान्य गायकवाडवाड्यांत शिरतात तों तिकडून सार्वजनिक सभेचे माजी चिटणीस अप्पासाहेब मांडे येत होते. ते त्यांच्याबरोबर लोकमान्यांच्या घरांत माडीवर गेले. अप्पासाहेब उद्वेगाने लोकमान्यांस म्हणतात, "लजपतराय हद्दपार झाले." डोक्यावरची पगडी डाव्या हाताने खुंटाळ्यावर ठेवीत व उजव्या हाताने आंगरख्याचे बंद सुटेनात म्हणून ते तोडीत खवळलेल्या सिंहाप्रमाणें हा पुरुषसिंह उद्गारतो, "लालाजी-सारखा देशभक्त हद्दपार होतो, आणि लॉर्ड मिंटो अजून कसा जगतो!" पण किंचित् थांबून विवेकशक्तीने देशकालपरिस्थितीचा 'मध्यबिंदु' छेडून शांतपणें पण जरा निराशेने हलक्या स्वरांत ते म्हणतात, "या दुर्बल राष्ट्राकडून भलतीच अपेक्षा करणें मूर्खपणाचें आहे."

—स. वि. बापट, पुणें

वीरनवालीचें क्षोभकारक प्रकरण

१९०६-७ सालीं लोकमान्यांनी बेळगांव जिल्ह्यांत दौरा काढला होता. या प्रवासांतच लाहोरकडे 'मूर' नांवाच्या एका गोऱ्या रेल्वे नोकराने वीरनवालीवर अत्याचार केल्याची हकीकत त्यांनी वाचली. त्या दिवशीं रात्रभर त्यांना स्वस्थपणा नव्हता व झोंपहि नव्हती. सकाळीं स्नानाच्या वेळीं त्यांना अभ्यंग स्नान घालावें म्हणून डोक्यास लावण्यासाठी स्वयंसेवक बालमंडळी तेल घेऊन गेली. तेल नको असें त्यांनी सांगितलें. तेव्हा कै. गोविंदराव याळगी पुढे होऊन म्हणाले 'रात्रीं झोंप नाही, प्रवासाचे श्रम होतात, विचार करून व व्याख्यानें देऊन डोकें तापून जात असेल; तेलाने थोडें शांत होईल.' लोकमान्यांनी म्हटलें, "डोकीं तापावयास पाहिजेत तितकीं तीं तापत नाहींत म्हणून मी ओरडतों. तर तुम्हीं डोकीं थंड करावीं म्हणतां!!"

—स. ल. सोमण, बेळगांव.

* * *

बलात्कारानंतर वीरनवालीच्या नवऱ्याने मूरवर कोर्टांत खटला केला. त्याबद्दलची कांहीं हकीगत वर्तमानपत्रांत आलेली तांबड्या पेन्सिलीने खूण करून एके दिवशीं सायंकाळीं मी त्यांना दाखविली. त्याबरोबर संतापाने त्यांचे डोळे लाल होऊन ते म्हणाले, "स्त्रीवर जुलूम झाल्याचें कळल्यावर जो षंढ कोर्टांत फिर्याद करण्यास जाण्याइतका शांत राहतो, त्याच्या देशाची उन्नति अजून फार दूर आहे!"

—दा. ना. आपटे, बडोदें

मंडालेच्या तपोमंदिरांत

महाराजांचा सर्व वेळ लिहिण्यापेक्षां वाचनांत व त्याहिपेक्षा कापडी खुर्चीवर पडून तोंडांत सुपारीचें खांड चघळीत डोळे लहानमोठे करीत विचार करण्यांत जात असे. मी त्यांस एकदा म्हणालों, 'आपण नेहमीं एकसारखा इतका विचार कसला करतां?' ते हसत म्हणाले, 'अरे, माणसाच्या डोक्यांत ब्रह्मदेवाची सारी सृष्टि मावते आणि त्याची तेथे घडामोड चालू असते!" पुढे एकदां ते सहज म्हणाले, "मी शाळेंतला विद्यार्थी आहें. ही माडी माझी शाळा, पुस्तकें माझे मास्तर, जेलर हा शिपाई व तूं खेळगडी! येथे जर्मन, फ्रेंच, पाली व दुसऱ्याहि कांहीं भाषांचा अभ्यास मी करीत असतों. येथून सुटून गेल्यावर पुढें जर्मनींत जाऊन यावें असें म्हणतों. त्या वेळीं मला स्वयंपाक करून घालण्यास तूं मजबरोबर येशील का!" महाराजांस एकदां कांहीं बालबोध लिहावयाचें होतें. त्यांनी तेव्हा तोंडाने सांगून तें मी लिहावें असें त्यांना वाटलें. पण लगेच ते म्हणाले, "नको, तुझ्याकडून सक्तमजुरी मला करवून घ्यावयाची नाही. तुझें काम तुला पुष्कळ आहे, माझें मी पाहीन."

—वा. रा. कुलकर्णी, मंडालेचा कैदी

"मी बंड कां करीत नाही?"

सरदारगृहांत लोकमान्यांची कांहीं पुढारी लोकांशीं भेट झाली. राष्ट्रांतील लोकांची तयारी कितपत आहे ह्यावर गप्पा चालल्या होत्या. त्या वेळेस मीहि तेथे होतों. एक पुढारी म्हणाले कीं, राष्ट्राची तयारी अगदी जय्यत आहे, आणि पुढारी काय सांगतील तें लोक करतील, असें मला वाटतें. लोकमान्य म्हणाले, "ही तयारी नुसती वरपांगी आहे. प्रसंगीं, मार्शल लॉला लोक टिकतील असें मला वाटत नाही. लोकांची शेकडा ५० टक्के खरी तयारी मला दाखवा, म्हणजे मी बाकीचा हवाला ईश्वरावर ठेवून उद्या बंड पुकारतों. आपल्याला निःशस्त्रच बंड करावयाचें आणि सशस्त्र करा

वयाचें नाही, असा काही माझा हट्ट नाही. साधेल तें करावयास मी तयार आहें. मग आहे कां तयारी?" ह्यावर ते पुढारी गप्पच बसले.

—डॉ. वि. म. भट, येवलें

## 'मोक्ष सारावा परता'

स्वदेशाच्या करुणास्पद व केविलवाण्या स्थितीचें चिंतन करीत दादा कित्येक वेळां एकाग्रतेने आरामखुर्चीवर पडत. अशा वेळीं कामानिमित्त त्यांचे पुढून मी एकसारखा येई-जाई; पण याचें त्यांस मुळींच भानहि नसे. एकदा अशा स्थितींत विचार करतां करतां त्यांस काय वाटलें न कळे, ते एकदम खुर्चीवरून उठले व किंचित् सद्गदित झाल्यासारखे दिसून म्हणाले, "क्षणभर परमेश्वराने मला साक्षात् मोक्ष देतों म्हणून म्हटलें तरी तो मी झिडकारून त्यास म्हणेन कीं, प्रथम पारतंत्र्यांतून सुटलेला माझा देश मला पहावयाचा आहे. कारण वैयक्तिक मोक्ष झाला तरी तो उच्च कोटीचा पण पराकाष्ठेचा स्वार्थसाधुपणाच आहे."

—धों. वा. विद्वांस, पुणें

## अनुभवाचें शहाणपण

वॉर-कॉन्फरन्सच्या वेळीं लोकमान्यांची व महात्माजींची सरदारगृहांत गांठ पडली होती. रिक्रूट मिळविण्याकरितां सरकारला मदत करावी असा एक ठराव कॉन्फरन्सपुढे येणार होता. म. गांधी त्या ठरावावर अनुकूल बोलणार होते. 'सरकारकडून स्वराज्याला पाठिंबा मिळत असल्यास आपण सरकारास मदत करण्यास तयार व्हावें' असा विचार कॉन्फरन्सपुढे मांडण्याचें लोकमान्यांचें ठरलें होतें. त्याला गांधींनी पुष्टि द्यावी अशी लोकमान्यांची इच्छा होती, व त्याप्रमाणें ते महात्माजींचें मन वळविण्याचे प्रयत्न करीत होते. त्या वेळीं म. गांधींच्या पाठीवरून हात फिरवून ते म्हणाले, "My good friend, you have not burnt your fingers as yet while playing with this Government. During the last forty years my fingers have burnt more than once. *When you will get your fingers burnt I am sure you will go ahead of me.*" म. गांधी हसले व आपण ठरावाविरुद्ध बोलण्यापेक्षां न बोलण्याचेंच त्यांनी ठरविलें.

—ग. बा. देशपांडे, बेळगांव

## ज्वलज्जहाल टिळकभक्त

नाशिक खटल्याचे होमकुंडांत सापडल्याने कारागृहांत बारा वर्षांची तपश्चर्या करीत असतां, एके दिवशीं साबरमतीच्या तुरुंगांतील कोठडींत टिळकभक्त ब्रह्मगिरीबोवांस जेल-सुपरिंटेंडेंटाने, त्यांची केवळ कुचाळकी करण्याकरितां, व्हॅलेंटाइन चिरोलकृत Unrest in India हें पुस्तक वाचण्यास मुद्दाम दिलें व तो त्यांस म्हणतो, 'तुमच्या टिळकांस खरोखर फांशीच दिलें पाहिजे.' साहेबाच्या तोंडचे ते शब्द ऐकतांच त्या बंदिवान भक्ताने लाथेने तें पुस्तक दूर भिरकावून दिलें व त्या साहेबावर चित्त्याप्रमाणे एकदम तुटून पडून हातांतील त्या वेळच्या पाणी पिण्याच्या टिनपॉटच्या शस्त्राचा तो त्याचेवर प्रहार करणार तोंच इतर शिपायांनी सुपरिंटेंडेंटाचा बचाव केला. ही गोष्ट एका गृहस्थाने लोकमान्यांस सांगितली, तेव्हां त्यांनी उद्गार काढले ते असे, "माझा यांत कांहीहि संबंध नसता तर मला या बाबतींत स्वतंत्रपणें अधिक बोलतां आलें असतें. तरी पण स्वामिनिष्ठ करारी पुरुषांच्या स्वामिभक्तीच्या अचाट कृतीनेच कित्येक देशांचा इतिहास निराळ्याच रीतीने रंगलेला पहावयास सांपडतो, हें विसरतां कामा नये."

—स. वि. बापट, पुणें

## श्रद्धेची परम सीमा

आमच्या विशेष परिचयाचे पुंजाजी शेट म्हणून एक मारवाडी गृहस्थ होते. त्यांची लोकमान्यांविषयीं अपूर्व भक्ति असे. लोकमान्यांस ते अवतारी पुरुषच समजत, इतकेंच नव्हे तर शेवटीं शेवटीं लोकमान्यांविषयीं त्यांची भक्ति इतक्या निःसीम पदास जाऊन पोहोचली कीं, त्यानी लोकमान्यांची तसबीर आपल्या देव्हाऱ्यांत ठेवून पुत्रसंतान होण्याबद्दल त्यास नवसहि केला. योगायोग असा कीं, त्या निपुत्रिकास हा नवस फळास येऊन पुत्रलाभ झाला!!

* * *

तसेंच आमचे एक स्नेहि राजेश्री गावडे हेहि एक मोठे टिळकभक्त होऊन गेले. लोकमान्य मंडालेहून बंधमुक्त होण्याचे आधीं पंधरा दिवस राजेश्री गावडे यांस स्वप्नांत दृष्टान्त झाला कीं, अमुक अमुक दिवशीं मी पुण्यांत येऊन पोहोंचणार आहें. यामुळे तेव्हापासून त्यांनी उपोषण सुरू केलें व दृष्टांताप्रमाणें ठराविक दिवशीं अचानक टिळकमहाराज पुण्यास आल्याची बातमी आम्हां सर्वांस कळली! त्या आनंदाचें वर्णन कोण करूं शकेल?

—गणपतिबुवा भिंगारकर, पुणे

## प्रतिस्पर्ध्याची मनोवृत्ति

सुरतेची राष्ट्रीय सभा उधळली गेली, त्या वेळच्या दंगलींत कोणी एका गोखलेपक्षीय नेमस्ताने बळवंत-

रावांचे अंगावर फेकण्याकरितां खुर्ची उचलली. हें ना. गोखले यांनी पाहतांच त्वेषाने त्यांचे हातून त्यांनी ती खुर्ची घेऊन म्हटलें:—" In case you touch his hair bloodshed is certain " ( जर त्या पुरुषाच्या केंसाला तुम्ही धक्का लावाल, तर येथे निःसंशय रक्तपात होईल. )

—शं. ग. लवाटे, पुणें

### सर्वत्र आदरभाव

टिळकांवर जामिनकीचा खटला झाला त्यावेळची एक मोठी विलक्षण आठवण आहे. ज्या दिवशीं त्यांच्यावर नोटीस बजवावयाची होती त्याच दिवशीं एका गौर बालिकेचें एक पोस्टकार्ड सकाळीं टिळकांच्या हातांत पडलें. त्यांत 'माझे वडील उद्या तुमच्यावर नोटीस बजावली जाईल असें म्हणत होते' असें लिहिलें होतें. गायडरसाहेब नोटीस घेऊन येण्यापूर्वीच हें कार्ड मिळाल्याने आगाऊ सर्व तयारी टिळक करून बसले होते. टिळकांबद्दल किस्येक गौरकाय मुलींच्या मनांतहि किती आदर होता हें दर्शविणारी ही आठवण असल्यानेच तिचें महत्त्व आहे.

—डॉ. वि. म. भट, येवलें

* * *

कोठे पुणें व कोठे कोंकण आणि कोठे राजद्रोहासारख्या तात्त्विक गुन्ह्याचा खटला व कोठे गवत-लांकडें विकणाऱ्या गरीब महारांच्या बाया ! पण टिळकांना शिक्षा झालेली ऐकून १९०७ सालीं कोंकणांतील एका खेड्यांत लांकडांच्या मोळ्या विकावयास आलेल्या महार बाया विश्रांतीसाठीं पिंपळाचे पारावर टेकल्या असतां त्यांच्या तोंडून उद्गार निघाले कीं,—"बापडा, बिचारा ! आपल्या गरिबांसाठी तुरुंगांत तळमळतो आहे ! !"

—के. ल. ओगले, मुंबई

* * *

१९१८ मधील मुंबई स्पेशल कॉंग्रेसच्या विषयनियामक कमिटीच्या सभेंत 'स्वराज्य' या विषयावर रणकंदन चालू असतां नेमस्त वृत्तीच्या एका गृहस्थाने लोकमान्यांच्या राजकारण-बुद्धीविषयी किंचित् संशयास्पद असे उद्गार काढले. लगेच कॉंग्रेसचे अध्यक्ष बॅ. हसन इमाम चवताळून उठून म्हणाले, 'Let me say, and it is with great pride, that Lokamanya Tilak is my father in point of politics.' सर्व सभासद अगदी चित्रासारखे तटस्थ बसले.

—स. वि. बापट, पुणें

### सोन्यारुप्याचीं फुलें उधळलीं

१९१८ सालीं गोध्रा येथील कॉन्फरन्सला लोकमान्य व श्रीमंत दादासाहेब खापर्डे गेले होते. तेथून परत येतांना सुरत येथील रहिवाशांच्या आग्रहावरून उभयता सुरतेस उतरले. तेथील लोकांनी त्यांचें अपूर्व स्वागत करून मोठी मिरवणूक काढली होती. ती अजमासें चार तास चालली. त्या मिरवणुकींत लोकमान्यांवर मोतीं व सोन्यारुप्याचीं फुलें उधळलीं होतीं. सायंकाळीं सभेची व्यवस्था फारच शिस्तवार केली होती. लोकमान्यांचे शब्द तेथे जमलेल्या सर्व समुदायाचे कानावर पडावे म्हणून एकंदर १३ प्लॅटफॉर्म तयार करून प्लॅटफॉर्मखाली हजार बाराशें मंडळी व्यवस्थेशीर बसविली होती. सभा मुख्य प्लॅटफॉर्मवर सुरू करून तेथे श्रीमंत दादासाहेबांस गुजराथींत भाषण करण्यास लावून, आपण प्रत्येक प्लॅटफॉर्मवर जाऊन तेथे १०।१५ मिनिटांत थोडें थोडें व्याख्यान देऊन लोकमान्यांनीं सर्वत्रांची इच्छा तृप्त केली.

—अ. वा. फडणीस, पुणें

### मंदिरांतील अपूर्व मान

विलायतेहून परत आल्यावर अमृतसर कॉंग्रेसला जाण्यापूर्वी लोकमान्य कांहीं राजकीय कामासाठीं मद्रासला जाऊन आले. त्यावेळीं तेथील एका सुप्रसिद्ध प्राचीन देवालयांत त्यांना पानसुपारी करण्याचें देवालयाच्या पुजारी ब्राह्मणांनीं ठरविलें व त्याप्रमाणें निमंत्रण केलें. देवालयाचे मुख्य सभामंडपांत पानसुपारीचा जाहीर समारंभ झाल्यावर पुजारी मंडळी लोकमान्यांना अगदी आंतील मूर्तीचे गाभाऱ्यांत घेऊन जाऊं लागली असतां लोकमान्यांनीं आपण होऊन हळूच सुचविलें—"मी नुकताच विलायतचा प्रवास करून आलों असून प्रायश्चित्त वगैरे अद्याप कांहीं घेतलेलें नाहीं." पुजारी ब्राह्मणांना ही गोष्ट माहीत असल्यामुळे ते म्हणाले, "आपण केवळ देशकार्यासाठीं विलायतेस गेलां होतां, व तिकडे अभक्ष्यभक्षण किंवा अपेयपान केलें नाहीं याबद्दल आमची खात्री असल्यामुळे आपणांस प्रायश्चित्त घेण्याची मुळीच जरूर नाहीं, कारण "तीर्थोदकंच वन्हिश्च नान्यतः शुद्धिमर्हतः" असें म्हणून त्यांनी लोकमान्यांना बळेंच आंत ओढलें, त्यांच्या डोक्यावर देवाचे मूर्तीचा रत्नखचित सोनेरी मुकुट धरला व मंत्राक्षता टाकल्या. अशा प्रकारचा अपूर्व बहुमान तिकडे आजपर्यंत दुसऱ्या कोणास मिळालेला नाहीं असें लोक बोलतात.

—श्री. ब. टिळक, पुणें

* * *

लोकमान्य अजमीरला गेले त्यावेळी त्यांच्या दर्शनार्थ दिल्लीपासून अजमीरपर्यंत रात्रीं व दिवसा सर्व स्टेशनवर लोकांचा तोबा उडत होता. ज्या अजमीरच्या प्रख्यात दर्ग्यांत जहांगीर बादशहाच्या जन्माचा नवस अकबराने पायीं चालत येऊन फेडला, त्या ऐतिहासिक दर्ग्यांत या अनभिषक्त लोकमान्यमहाराजांचा अपूर्व जयजयकार सर्व मुसलमान बंधूंनी केला! अजमीरच्या इतिहासांत ही गोष्ट अजब म्हणून नमूद झाल्याखेरीज राहणार नाही.

—अज्ञातवासी भक्त

## 'अन्तकालेऽपि भूदेवीं स्मरन्'

मुंबई येथील सरदारगृहांत लोकमान्य अखेरच्या दुखण्याने आजारी पडले असतां सारें बोलणें चाले तें देशासंबंधीं!

ता. २८ जुलै रोजीं रात्रीं ते म्हणाले,

" १८१८ सालीं असें झालें—परवा हें १९१८ साल आलें—A hundred year's history—आम्ही हे असे हीन झालों. "

" पंजाब Matter मध्ये तुम्ही काय करणार? पटेल यांस तार केली काय? आम्ही Special कॉंग्रेस भरविणार आहोंत. "

ता. २९ जुलै रोजीं रात्रीं १ वाजतां व्याख्यानाच्या भाषेंत ते म्हणाले,

" माझी अशी खात्री आहे आणि आपणाहि विश्वास बाळगा कीं, हिंदुस्थानाला स्वराज्य मिळाल्याखेरीज तरणोपाय नाही. "

रात्रीं २ वाजतां व्याख्यानाच्या भाषेंत ते म्हणाले,

" आपण व जनता यांनी जे परिश्रम केले त्याबद्दल मी आपले आभार मानतों. "

ता. ३० च्या पुढे त्यांचें बोलणें अस्पष्ट होऊं लागलें व तें अगदी जवळच्या माणसासदेखील समजेनासें झालें. मरणसमयीं त्यांची मुद्रा अत्यंत शांत होती.

—ग. वि. केतकर, पुणें

## सरकारी किताब!

पुणें जिल्ह्याचा सन १९०८ सालचा अबकारी कमिशनर वरिष्ठ अधिकाऱ्यास केलेल्या आपल्या खासगी रिपोर्टांत म्हणतो, " Mr. Tilak ruled over Poona for the last two weeks. " तसेंच सार्वजनिक सभेंत टेंपरन्स असोशिएशनचे व्हाईस-प्रेसिडेन्ट रेव्हरंड डॉ. मॅक्निकल हे, पिकेटिंगची चळवळ अगदी व्यवस्थित चाललेली पाहून तें केवळ लोकमान्यांचेंच कर्तृत्व आहे हें मनांत पक्कें ओळखून, हसत मुद्दाम विचारतात, " Oh! Mr. Lawate, who is supporting this gigantic movement and doing all this? Is it that great man? "

—शं. ग. लवाटे, पुणें

* * *

पंचाण्णव सालच्या सुमारास पुण्यांत जो एक प्रकारचा राम दिसत होता, तो कांही आजकालच्या पुण्यांत मला दिसत नाही असें मी एकदां म्हणालों. त्यावर लोकमान्य उद्गारले, " वीस वर्षांपूर्वी ब्रुइनसाहेब पुण्यांत पोलिस-सुपरिटेंडंट असतांनाच त्यांनी सरकारांत असा रिपोर्ट करून ठेविला आहे कीं, " Take away Tilak and Poona is nothing. " ( टिळकांना तेवढे उचला म्हणजे पुणें कांहीच नाही. )

—त्र्यं. ग. जावडेकर, धुळें

* * *

पुण्याचे कलेक्टर मि. कार्मायकेल यांच्या इच्छेवरून टिळक त्यांना भेटावयास गेले. त्यांचें सुमारें दोन तास जगांतील राजकारणाबद्दल मोकळेपणें बोलणें झालें. एकदा तर बळवंतराव त्यांस म्हणाले, ' कल्पना करा; हल्लीसारख्या आमच्या देशस्थितींत माझे ठिकाणीं तुम्हीच जर आमच्या पत्राचे संपादक असतां, तर काय केलें असतें? आयर्लंडांत-फार काय स्कॉटलंडांत-स्कॉच एडिटर कसें लिहितो हें काय आम्ही पहात नाही?' हें ऐकून साहेबबहादूर खूपच हसूं लागले! दुसरे दिवशीं मला बोलावून ते म्हणतात, " Mr. Deshpande, your friend is a gigantic intellectual man! "

—ल. मो. देशपांडे, पुणें

* * *

एका ब्रिटिश मंत्र्याने एका सीलोनच्या विद्यार्थ्याजवळ पुढीलप्रमाणे उद्गार काढल्याचें मी ऐकिलें होतें. There is only one Indian, whom we cannot win over by any sort of influence or inducement and that is Mr. Tilak; all others, we can influence more or less. " ( असा एकच हिंदी गृहस्थ आहे कीं, ज्याला आम्हास कोणत्याहि आमिषाने आमच्या बाजूचा करतां येणार नाही. आणि ते म्हणजे टिळक होत. बाकीच्यांवर कमीजास्त प्रमाणाने आम्ही आपलें वजन पाडूं शकूं. )

—रा. ग. प्रधान, नाशिक

[ ३५

( संदर्भ - अमृत - सह्याद्री, वर्ष १ले, अंक ८ वा, ऑगस्ट १९३५, पृ. ३० ते ३५. )

# परिशिष्ट क्र. ९

## टिळकांविषयीचे लोकमत.



# टिळकांविषयींचें लोकमत

[ १ ]

## मॉन्टेग्यु व टिळक

ब्रिटिश प्रधानमंडळांतील भारतमंत्री म्हणून एडविन एस्. मॉंटेग्यु यांनी १९१७–१९ या कालांत हिंदुस्थानास भेट दिली. येथे असतांना त्यांनी रोज जी डायरी लिहिली ती १९३० सालीं 'ॲन इंडियन डायरी' या नांवाच्या पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यांत आली. लोकमान्य टिळक राजकीय सुधारणांबाबत शिष्टमंडळ घेऊन मॉंटेग्युसाहेबांच्या भेटीस गेले होते. त्यामुळे मॉंटेग्यु साहेबांच्या डायरींत टिळकांविषयी कांही उल्लेख सापडतात. ता. १० नोव्हेंबर १९१७रोजीं अपोलो बंदरावर उतरल्यावर त्यांनी स्वतःस आलेले स्वागतपर संदेश वाचले. ते संदेश पाठविणारांपैकीं बिकानेर, अलवार, ग्वाल्हेर यांच्या महाराजांचा त्यांनी मुद्दाम उल्लेख केला असून टिळकांच्याहि नांवाचा त्यांनी तेथे निर्देश केला आहे.

### शिष्टमंडळाची भेट

ता २६ नोव्हेंबर १९१७ रोजीं मिसेस बेझंट व लो. टिळक हे होमरूल लीगचें शिष्टमंडळ घेऊन मॉंटेग्यु साहेबांच्या मुलाखतीस गेले. याविषयीं डायरींत खालील वर्णन आढळतें—" कॉंग्रेस व मुस्लीम लीगनंतर मिसेस बेझंट व महान् ( धि ग्रेट ) टिळक आपली होमरूल लीग घेऊन आले. अधिक अंतिम स्वरूपाचें व कटु लागणारें असें मागणीपत्र त्यांनी वाचून दाखविलें. पण तें निःसंशय मनोरंजक व चांगलें होतें. अर्थात् होमरूल लीगच्या मागण्या या कॉंग्रेसच्याच मागण्या होत्या. कारण जुनाट कॉंग्रेसकरिता चळवळ करावी या हेतूनेच खरोखर ही लीग काढलेली होती."

### मॉंटेग्यूंच्या गळ्यांत हार

ता. २६ रोजीं सकाळीं हार घालण्याविषयीं मोठी मजेदार गोष्ट घडली असें सांगून तिचेंहि मॉंटेग्युसाहेबांनी थोडक्यांत वर्णन दिलें आहे—" होमरूल लीग डेप्युटेशननंतर मिसेस बेझंट व टिळक आपल्या मागणीपत्राच्या प्रति मला व चेल्म्सफर्ड यांस देण्यास पुढे आले. मिसेस बेझंट यांनी 'आपल्या गळ्याभोवती मी हार घालूं का' असें व्हाइसरॉयांस विचारलें. ते 'नको' असें म्हणाले व त्यांनी तो आपल्या हातांत घेतला. टिळ[kां]नी मला विचारलेंच नाही; पण हार मात्र मा[झ्या] गळ्यांत घालून टाकला; म्हणजे जर हें प्रसिद्ध झालें [तर] निदान अप्रत्यक्ष रीत्या ज्यांच्या वर्तमानपत्री लिखाणा[चा] एका हिंदी अधिकाऱ्याच्या खुनाशीं संबंध आला म्ह[णून] सात वर्षें सक्त मजुरीची शिक्षा भोगून जे नुकतेच बा[हेर] पडले अशा सुप्रसिद्ध टिळकांनी मला हार घातला अ[सें] आढळून यावें."

### शास्त्रीय गृहस्थ

